म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २४९४

REFBK-0012330



# स्वामी विवेकानंद ह्यांचे समग्र ग्रंथ... १

अनुवादक

गणेश वामन गोगटे

## जन्म - शताब्दी गौरव - आवृत्ति

संपादक

[illegible]र

REFBK-0012330

कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

मूल्य तीन रुपये

आतां अवधारा कथा गहन ।
जे सकल कौतुकां जन्मस्थान ।
कीं अभिनव उद्यान ।
विवेकतरूंचें ॥
ना तरी सकळ धर्मांचें माहेर ।
सज्जनांचें जिव्हार ।
लावण्यरत्नभांडार ।
शारदेचें ॥

— भगवान ज्ञानेश्वर

© कर्नाटक प्रकाशन संस्था

सहावी
जन्म-शताब्दी गौरव-आवृत्ति
१५ सेप्टेंबर, १९६२

Printed by
B. G. DHAWALE
at the KARNATAK
PRINTING PRESS
& published by him
for the KARNATAK
PUBLISHING HOUSE
Karnatak House
Chira Bazar, Bombay 2

मराठा
अनुक्रम ...33755..... वि: ....निबंध
क्रमांक ........

# अनुक्रमणिका

नव्या स्वरूपांतील जन्म-शताब्दी गौरव-आवृत्ति ४
पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना ७
स्वामी विवेकानंद ह्यांच्या वाङ्मयाचे अनुवादक गणेश वामन गोगटे १०
स्वामी विवेकानंद ( चरित्र ) १८
आमचे गुरुदेव आणि त्यांचा संदेश २२

## शिकागो येथील सर्व-धर्मपरिषदेपुढें दिलेलीं व्याख्यानें

अमेरिकेंतील स्वागतास उत्तर ३३
मतभेद कां होतो ! ३५
हिंदुधर्माचें स्वरूप ३७
हिंदूस धर्मज्ञानाची उणीव नाहीं ५७
बौद्धधर्म : हिंदुधर्माची पुरवणी ५८
धर्मपरिषदेंतील शेवटचें व्याख्यान ६२

## कर्मयोग

१ कर्माचा दानतीवर परिणाम ६५
२ स्वकर्तव्यदक्ष प्रत्येक मनुष्य सारखाच मोठा आहे ७७
३ कर्मरहस्य ९७
४ कर्तव्य ११५
५ परोपकार स्वतःसच कल्याणप्रद आहे १३०
६ अनासक्ति हाच अहंकार नाश १४४
७ मुक्ति १६६
८ कर्मयोगाचा आदर्श १८९

* * * * * * * * * * * * *

## नव्या स्वरूपांतील
## जन्म-शताब्दी
## गौरव-आवृत्ति

* * * * * * * * * * * * *

पन्नास वर्षांपूर्वी आजच्याच दिवशीं स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथांचें मराठींत अवतरण झालें. स्वामीजी समाधिस्थ झाल्याला ( १९०२ ) दहा वर्षे होऊन गेलीं होतीं. ते अमेरिकेंत प्रसिद्धीस आल्यानंतर त्यांच्या अनुयायांनीं रामकृष्ण-विवेकानंदांच्या शिकवणीचा व अद्वैत वेदान्तधर्माचा प्रसार व्हावा ह्यासाठीं, त्यांच्याच प्रेरणेनें, आलमोरा-मायावती येथून 'प्रबुद्धभारत' व मद्रासहून 'ब्रह्मवादिन्' अशीं दोन मासिकें इंग्रजी भाषेंत सुरू केलीं. स्वामीजींचे लेख, व्याख्यानें, पत्रें त्यांतून प्रसिद्ध होऊं लागलीं. त्यांचा लाभ अर्थात् इंग्रजी शिकलेल्यांनाच झाला. सर्वसामान्य लोकांपर्यंत त्यांचे विचार पोंचूं शकले नाहींत. ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊन प्रांतिक भाषांतून ते प्रसिद्ध करण्यासाठीं कांहीं मंडळी पुढें सरसावली. त्यांपैकीं महाराष्ट्रांत कै. दादा गोगटे हे प्रमुख होत. अत्यंत चिकाटीनें त्यांनीं एकोणीस वर्षें लेखन करून १९३१ सालीं शेवटचा तेरावा खण्ड प्रसिद्ध करून तें पूर्ण केलें. दादा हे पाश्चात्य व पौर्वात्य ह्या दोन्ही तत्त्वज्ञानांत पक्के मुरलेले व गहन विचार सुलभ व सुललित शैलींत मांडण्यांत कसबी, असे असल्यानें अनुवादाचा पाक सुंदर उतरला. मागें एकदा एका समीक्षकानें त्यांच्या ह्या अनुवादाबद्दल, 'विवेकानंद जणूं काय मराठींतच बोलत आहेत असा भास होतो,' असा आपला अभिप्राय व्यक्त केला होता. हा अभिप्राय किती यथार्थ होता ह्याचा प्रत्यक्ष अनुभव वाचकांस आल्यावांचून राहात नाहीं.

गेल्या अर्धशतकांत जे कांहीं तात्त्विक व विचारप्रधान ग्रंथ मराठी भाषेंत लोकप्रिय झाले, त्यांत स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथांना अग्रस्थान द्यावें लागेल. कांहीं कांहीं खण्डांच्या पांच-पांच आवृत्त्या निघाल्या. गेलीं कांहीं वर्षें ह्यांतील बरेच खण्ड दुर्मिळ झाले होते. त्यांना नित्य मागणी असे. परंतु अनेक अडचणींमुळें, इच्छा असूनही, पुनर्मुद्रणाचा योग यावा तितका लवकर जुळून येत नसे. यंदा तो, पुढील वर्षीं स्वामीजींच्या व्हावयाच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानें, आला.

एकोणीसशें त्रेसष्ट हें वर्ष भारतांत व भारताबाहेरील अनेक देशांत 'विवेकानंद जन्मशताब्दी वर्ष' म्हणून गौरवपूर्वक साजरें व्हावयाचें आहे. अशा ह्या संस्मरणीय मंगल प्रसंगीं आम्हीं प्रसिद्ध केलेल्या स्वामीजींच्या समग्र ग्रंथांचा संच, सर्वसामान्य व्यक्तीलाही सहज परवडेल अशी स्वल्प किंमत (प्रत्येक खण्डास रुपये तीन) ठेवून प्रसिद्ध करण्याचा आम्हीं संकल्प केला आहे. ह्या संकल्पाप्रमाणें चालू वर्ष संपण्याच्या आंत स्वामीजींचे ग्रंथ पंधरा खण्डांत प्रसिद्ध होतील. ग्रंथांची किंमत जशी कोणाच्याही खिशाला परवडेल अशी ठेविली आहे, तसाच त्यांचा आकारसुद्धा कोणाच्याही खिशांत मावेल असा ठेविला आहे. वाचकांना ग्रंथांचें हें नवें स्वरूप आवडावें अशी अपेक्षा आहे.

स्वामीजींच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगानें ग्रंथमालेच्या पूर्वचालकांची एक अपुरी राहिलेली इच्छाही पूर्ण करण्याचें आम्हीं योजिलें आहे. स्वामीजींचे ग्रंथ पूर्ण झाल्यावर त्यांचें एक छोटें चरित्रही प्रसिद्ध करण्याच त्यांचा विचार होता, परंतु दादा गोगटे निवर्तल्यामुळें तो बेत स्थगित झाला असावा. पूर्वचालकांची अपुरी इच्छा लक्षांत ठेवून 'समग्र ग्रंथ' प्रसिद्ध होतांच त्यांच्या पाठोपाठ स्वामीजींचें एक छोटें चरित्रही आम्ही प्रसिद्ध करीत आहों.

स्वामीजींचें स्मरण महाराष्ट्रीयांस प्रतिदिन व्हावें आणि त्यांच्या स्फूर्तिदायक विचारांचें मनन त्यांजकडून घडावें ह्या हेतूनें १९६३ सालापासून

प्रतिवर्षीं त्यांच्या नांवानें वेगवेगळ्या आकारांत रोजनिशा प्रसिद्ध करण्याचा उपक्रम आम्हीं सुरू केला आहे. नेहमींच्या रोजनिशांत आढळणाऱ्या सर्व अंगांचा त्यांत समावेश केला आहेच पण त्याबरोबरच प्रत्येकें तारखेच्या पृष्ठावर नित्य दर्शन घडविणारें स्वामीजींचें शीर्षचित्र व चित्ताला स्फूर्ति व समाधान देणारें त्यांचें वचन दिलेलें आहे. आमच्या असंख्य आश्रयदात्यांस व स्वामीजींच्या महाराष्ट्रीय भक्तांस हा आमचा नवा उपक्रम आवडून ' विवेकानंद रोजनिशी 'चे ते कायम ग्राहक व्हावेत अशी आम्ही अपेक्षा बाळगतों. ' विवेकानंदांचे समग्र ग्रंथ ' व ' विवेकानंद रोजनिशी ' हीं एकपरी स्वामीजींचीं वाङ्मयीन स्मारकेंच होत.

कर्नाटक छापखान्यानें विवेकानंदांचे ग्रंथ पूर्ण केल्यावर अल्पकाळांतच ' श्रीमन्महाभारतार्थ ' ग्रंथमाला सुरू केली व तिचेही बारा खण्ड प्रसिद्ध केले. त्यानंतर धर्मविषयक प्रकाशन असें त्याजकडून झालें नाहीं. इतर अनेक विषयांवरील अनेक प्रकारचे ग्रंथ त्यानें प्रसिद्ध केले पण धर्मविषयक ग्रंथांचें प्रकाशन घडलें नाहीं. ही त्रुटी भरून काढण्याचें आमच्या मनांत वारंवार येई, पण नेहमींच्या निकडीच्या कार्यव्यापृततेमुळें त्या दिशेनें हालचाल करण्यास सवड होत नसे. चालू वर्षापासून धार्मिक व आध्यात्मिक स्वरूपाचें थोडें थोडें प्रकाशन करूं लागलों आहों. ' ॐ धर्मोपासना ' ह्या नांवाची त्यासाठीं एक स्वतंत्र मालाच आम्हीं सुरू केली आहे. धर्मोपासनेला उपयुक्त व मार्गदर्शी अशीं छोटीं छोटीं, स्वल्प किंमतीचीं व सुंदर सजावटीचीं पुस्तकें ह्या मालेंतून आम्ही प्रसिद्ध करूं लागलों आहोंत. आमच्या वाचकवर्गाच्या सदिच्छेवर व आश्रयावर भिस्त ठेवूनच आम्ही ह्या उद्योगास प्रवृत्त झालों आहों. त्यांची सहानुभूति सदैव आमच्या पाठीशीं राहून प्रगतीचा मार्ग आक्रमण्यास आम्हांस ती प्रोत्साहक होईल असा आमचा विश्वास आहे.

प्रकाशक

मुंबई, १५ सेप्टेंबर, १९६२

72330

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

स्वामी विवेकानंद ह्यांची ओळख आतां आमच्या वाचकांस नव्यानें करून द्यावयास पाहिजे असें नाहीं. अर्वाचीन पाश्चात्य संस्कृतीचें केवळ माहेरघर अशी जी अमेरिका तेथें जाऊन ज्यांनीं सनातनधर्माचें वर्चस्व स्थापिलें व थोड्याच वेळांत आपलें नांव सर्वतोमुखीं करून टाकलें, त्यांच्या कीर्तींत आमच्या स्तुतीनें कांहीं विशेष भर पडणार आहे असें नाहीं. त्यांनीं बजाविलेल्या कामगिरीचें खरें स्वरूप भगिनी निवेदिता ह्यांनीं आपल्या उपोद्घातांत स्पष्ट करून दाखविलेंच आहे, तेव्हां त्यासंबंधींही कांहीं सांगण्याचें प्रयोजन आम्हांस उरलें नाहीं.

पाश्चात्य संस्कृतीच्या जबर धक्क्यानें कित्येक शतकांच्या मोहनिद्रेंतून आम्ही जागे झाल्यावर कांहीं काळ आमची स्थिति फार चमत्कारिक झाली होती. गाढ अंधारांतून एकदम उजेडांत आलेल्या मनुष्याचे डोळे दिपून त्यास जसें कांहीं काळ यथार्थ वस्तुज्ञान होत नाहीं, तशीच आमची स्थिति झाली होती. जडवादाच्या अत्यंत मोहक स्वरूपामुळें विकृत झालेल्या आमच्या बुद्धीस 'पुराणें म्हणजे शिमगा' वाटूं लागलीं होतीं. 'अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता। सर्वार्थान् विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी॥" असें भगवंतांनीं सांगितलेलें तामसी बुद्धीचें लक्षण आमच्या ठिकाणीं पूर्णत्वानें प्रत्ययास येऊं लागलें होतें. कांहीं काळानें आमचे डोळे हळू हळू स्थिरावूं लागले ही गोष्ट खरी; तथापि आमच्या बुद्धीची विकृति साफ बरी झाल्याचा प्रत्यय अद्यापिही येत नाहीं.

'वेदान्तानें आम्ही नेभळे झालों', 'साधुसंतांनीं आम्हांस धारकऱ्यांचे वारकरी केलें', 'समाधि म्हणजे बेशुद्धि', इत्यादि अनेक प्रकारचे जे उद्गार आम्ही काढतों, त्यांवरून आमच्या बुद्धीच्या शुद्ध स्थितीबद्दल सत्पुरुषांस शंका आली तर त्यांत नवल नाहीं. स्वतःच्या देहस्वास्थ्याचाही विचार न करतां ज्यांनीं केवळ परोपकारार्थ आपलें आयुष्य वेंचलें, लोकांस सन्मार्गाचा उपदेश करणें हीच ज्यांची इतिकर्तव्यता, लोकसेवा हेंच ज्यांचें ब्रीद, 'राहिलों उपकारापुरता' हाच ज्यांचा जप आणि 'बुडतें हें जन न देखवे डोळां' म्हणून आमचा कळवळा येऊन ज्यांनीं आम्हांस मोक्षमार्ग दाखविला, त्या सत्पुरुषांस अशीं शेलकीं फुलें वाहून त्यांचा उपकार आम्हीं चांगलाच फेडला! परंतु संत दयासागर आहेत. आमच्या कृतघ्नपणाकडे लक्ष न देतां ते आम्हांस पुन्हा पुन्हा बोधामृत पाजीत आहेत. ते कधीं तुकारामादि रूपानें, तर कधीं त्रैलोक्यविजयी विवेकानंद-रामतीर्थादि रूपानें अवतरून आम्हांस सन्मार्गाचा उपदेश करतात. विवेकानंद म्हणतात, 'अनेक सद्गुरूंचा आजवर उपमर्द करून सांप्रतची कर्मदशा तुम्हीं आपणांवर ओढवून घेतली आहे!' हें त्यांचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. आमच्या धर्मांत काय सांगितलें आहे ह्याचें ज्ञान आम्हांस आज इतरांपासून प्राप्त करून घ्यावें लागत आहे! 'धर्म' 'धर्म' म्हणून हजारों खुळसट गोष्टींस आम्ही मिठी मारून बसलों आहों. आमचा धर्म कशांत आहे, त्याचें स्वरूप काय, धर्म म्हणजे काय, इत्यादि गोष्टी आम्हांस आज कोड्यासारख्या होऊन बसल्या आहेत. आमचे जुने धर्मग्रंथ समजण्याजोगी आमची स्थिति राहिली नाहीं व खऱ्या धर्माचरणाच्या अभावीं आम्ही एकसारखे अवनतीस जात आहों. हें पाहून आमचे पूर्वकालीन ऋषि आणि संत विवेकानंद-रामतीर्थादि रूपानें अवतरले व जुना सनातनधर्म नव्या रूपानें त्यांनीं आम्हांस पुन्हा सांगितला.

अत्यंत तीव्र अशा विवेचकबुद्धीच्या साहाय्यानें ज्यांना धर्मशास्त्राचा अभ्यास करावयाचा असेल, त्यांनीं विवेकानंदांच्या ग्रंथांचा सतत अभ्यास

केला पाहिजे. त्यांचा अभ्यास मनःपूर्वक केला तर आपले प्राचीन ग्रंथही समजण्यास सुलभ होतील. विवेकानंदांच्या विचारमौक्तिकांचा लाभ निवळ मराठी वाचकांसही करून द्यावा, ह्या हेतूनें आम्हीं हा प्रस्तुतचा उद्योग आरंभिला आहे. परमेश्वराच्या कृपेनें व आमच्या मराठी वाचकवर्गाच्या साहाय्यानें हें काम तडीस गेलें तर अशाच प्रकारचे इतर आचार्यांचे ग्रंथ व कांहीं स्वतंत्र ग्रंथही मराठी वाचकांस अर्पण करण्याची प्रस्तुत लेखकास उमेद आहे. ही त्याची उमेद योग्य आहे कीं नाहीं हें ठरविणें मराठी वाचकवर्गाचें काम आहे. त्यांनीं योग्य प्रोत्साहन दिलें तर पुढील कामगिरीस तो हात घालील; न दिलें तर आपली तितकी योग्यता नाहीं असें समजून तो स्वस्थ बसेल.

स्वामी विवेकानंद ह्यांचें चरित्र प्रथम खंडांत प्रसिद्ध करण्याविषयीं कित्येकांनीं पत्रद्वारा सूचना केली होती, परंतु स्वामीजींचें चांगलें जीवन-चरित्र आम्हांस उपलब्ध झालें नसल्यामुळें तें प्रसिद्ध करतां आलें नाहीं, स्वामीजींचें चरित्र मिळविण्याची आम्ही खटपट करीत आहों व ती यशस्वी झाल्यास तें आम्ही शेवटच्या खंडाच्या वेळीं प्रसिद्ध करूं.

पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत हा आमचा पहिलाच प्रयत्न आहे. आमच्या वाचकवर्गानें मनापासून साहाय्य केलें तर त्यांच्या द्रव्याचा मोबदला त्यांस चांगल्या पुस्तकांच्याद्वारें देण्याची आम्ही शक्य तितकी खबरदारी घेऊं. मराठी वाङ्मयांत चांगल्या ग्रंथांची भर पडण्यासाठीं कायावाचामनानें झटण्यास आम्ही मागें पुढें पाहाणार नाहीं असें आश्वासन देतों.

आमच्या ह्या यत्नांत उदारबुद्धीनें साहाय्य करण्यास व मनोभावें आम्हीं केलेली सेवा गोड करून घेण्यास आमच्या प्रिय वाचकवर्गास विनंती करून त्याची सध्या रजा घेतों.

लेखक

मुंबई, ता. १५ सेप्टेंबर, १९१२

## स्वामी विवेकानंद ह्यांच्या वाङ्मयाचे अनुवादक गणेश वामन गोगटे

कै. गणेश वामन ऊर्फ दादा गोगटे हे 'स्वामी विवेकानंद ह्यांचे समग्र ग्रंथ' ह्या ग्रंथमालेचे लेखक होत. ह्यांचा जन्म सुमारें सत्तावन वर्षांपूर्वीं रत्नागिरीच्या दक्षिणेस असलेल्या गोळप गांवीं झाला. ह्या त्यांच्या जन्मभूमींत त्यांचें घरदार, वतनवाडी सर्व कांहीं आहे.

दादांचें प्राथमिक शिक्षण कोठें झालें तें माहीत नाहीं. पण मॅट्रिक-पर्यंतचें इंग्रजी शिक्षण मात्र पुण्यास झालें. त्यांचे एक सहाध्यायी व अगदीं जवळचे मित्र, पुणें येथील माजी 'ज्ञानप्रकाश' दैनिकाचे एक उपसंपादक, बापुराव आंबेकर हे होत. दादांच्या उनाड खेळाडूपणाच्या व खोडकरपणाच्या ते अनेक गोष्टी सांगतात. दादांचें शरीर गोटीसारखें होतें. शाळेंत असतांना अभ्यासाकडे त्यांचें फारसें लक्ष नसे, पण कीर्तन, पुराण, प्रवचन व व्याख्यानें हीं ऐकण्याचा मात्र त्यांना अति नाद होता. ह्याप्रमाणें अभ्यासाकडे दुर्लक्ष असल्यामुळें मॅट्रिक होण्यास त्यांना तीन वर्षें लागलीं व शेवटीं त्याकरितां प्रयागाची यात्राही करावी लागली. म्हणजे तिसऱ्या खेपेस येथें नापास होतांच अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसून ते पास झाले. पुढें त्यांचे भगिनीपति शारंगपाणी, बडोद्याचे माजी न्यायाधीश, ह्यांच्या मदतीनें ते मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें वैद्यशास्त्र शिकण्यास भरती झाले, पण कॉलेजांत कांहीं काळ घालवून नंतर त्यांनीं कॉलेजला व त्याबरोबरच नियमित विद्यार्थिजीवनाला कायमचा राम राम ठोकला.

कॉलेज सुटल्यावर कांहीं काल ते मराठा हॉस्पिटलमध्यें नोकरीस होते. पण कोणत्याही कारणास्तव असो ती नोकरी सोडून ते स्वतंत्र व्यवसाया-मागें लागले. ह्यापुढील त्यांचीं कांहीं वर्षे अनेक प्रकारचे धंदे करण्यांत गेलीं. ह्या धंद्यांच्या फेरफारांत कांहीं दिवस त्यांनीं कापसाच्या धंद्यांतही घालविले असल्यामुळें कापसाच्या एकंदर धंद्याची त्यांनीं चांगली माहिती मिळविली होती. पुढें ह्या माहितीच्या जोरावर ते इंदुप्रकाश, वगैरे वर्तमानपत्रांतून व्यापारी बातम्या देत असत. असो. ह्याप्रमाणें अनेक धंदे चांचपूनही कोणत्याच धंद्यांत त्यांचें आसन स्थिरावलें नाहीं.

त्या काळीं दादांसारख्यांना व त्यांतल्या त्यांत मागें बळकट वशिला असलेल्यांना एखादी चांगली नोकरी मिळणें कठीण नव्हतें; पण हे स्वतंत्र वृत्तीचे असल्यामुळें थोडा वेळ कांहींतरी पोटापुरता धंदा करावा व बाकीचा सारा वेळ विद्वान् मित्रांशीं निरनिराळ्या विषयांवर गप्पा गोष्टी करण्यांत किंवा वाचनांत घालवावा असा त्यांचा दैनंदिन कार्यक्रम असे. दादांचा विद्वानांच्या संगतींत किंवा वाचनांत बहुतेक वेळ जात असल्यामुळें त्यांच्याशीं क्षणभर बोलणारासही त्यांच्या बहुश्रुतपणाची साक्ष पटत असे.

अशा प्रकारच्या ह्या एकांगी वृत्तीला त्यांच्या एकुलत्या एका मुलाच्या निधनानें जास्त जोराची उसळी दिली असावी; त्यांच्यांत आधींच वसत असलेली विरक्तता अधिक बळावून त्यांचा कल तत्त्वज्ञानाकडे वळला असावा. सुदैवानें किंवा दुर्दैवानें असो, असा पाश पुढील जीवनांत न निर्माण झाल्यामुळें व सभोवतालची परिस्थितिही ह्या नूतन वृत्तीला पोषक अशीच बनत गेल्यामुळें तो कल तिकडे अधिकच झुकला.

सुख हें मानण्यावर आहे हा सिद्धान्त दादांनीं किती पूर्णपणें आपलासा करून टाकला होता हें कांहीं क्षण त्यांच्या सहवासांत घालविणाराच्याही चटकन् ध्यानांत येत असे. दादा साधारण आजारी असोत कीं अंथरुणाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

खिळलेले असोत, पैशांच्या टंचाईत असोत किंवा अन्य तऱ्हेनें चिंताग्रस्त असोत, त्यांची हास्यवृत्ति कायम असे. त्यांच्या चेहेऱ्यावरुन कोणालाही त्यांच्या मनःस्थितीची कल्पना येणें शक्य नव्हतें.

सन १९१२ च्या सुमारास स्वामी विवेकानंदांचे ग्रंथ मराठींत आणावे अशाविषयीं विचार झाला. पण अशा तात्त्विक ग्रंथांचें भाषांतर कोण करणार हा प्रश्न पुढें उभा राहिला. अशा प्रकारें विचार चालू असतां स्वामीजींच्या पत्रांचा मासिक मनोरंजनामार्फत प्रसिद्ध झालेला पहिला भाग एका गृहस्थांच्या वाचनांत आला व त्यांनीं 'हीं पत्रें ज्यांनीं भाषांतरित केलीं असतील त्यांजकडूनच समग्र ग्रंथांचें भाषांतर करविणें चांगलें' असें म्हटलें. ह्या पत्रांचें भाषांतर करणारे छापखान्यांत नेहमीं येणारे 'दादाच होत' असें दुसऱ्या एका गृहस्थांनीं सांगितलें. पुढें नेहमींप्रमाणें दादा आल्यावेळीं त्यांना विचारण्यांत आलें असतां त्यांनीं लगेच मोठ्या आनंदानें कबूल करून कामास सुरवात केली व तें शेवटास नेलें.

दादा म्हणजे झांकलें माणिक होतें. अमूक एका विषयांत त्यांची गति नव्हती असें नाहीं. महायुद्धाच्या वेळीं युद्धाचा रागरंग कसा आहे, कोण कोठें आहे, कोणाचा कशावर डोळा आहे, जर्मनीची फौज अमक्या ठिकाणीं थडकली आहे तेव्हां तिचा पुढील बेत काय असावा व तो साध्य होण्याचा कितपत संभव आहे अशा गोष्टींविषयीं खल करण्यांत व जवळच्या लोकांना माहिती देण्यांत ते सदोदित रंगून गेलेले असावयाचे आणि अशा एखाद्या गोष्टींत त्यांचें चित्त रंगलें कीं तहान-भुकेचेंही त्यांना भान राहात नसे. कोणीं आठवण करावी तेव्हांच ह्यांची तंद्री सुटावयाची !

ह्यापुढें कांहीं दिवसांनीं दादा आजारी पडले व जवळ जवळ तीनचार वर्षे त्यांची प्रकृति सुधारली नाहीं. पुढें एकदाचे बरे झाले. पण पूर्वीचा जोम राहिला नाहीं. दादा फारसे आजारी पडत नसत, पण एकदा आजारी पडले कीं त्यांतून उठण्यासही त्यांना बराच कालावधि लागे.

विवेकानंद लिहावयास घेऊन कर्नाटक छापखान्याशीं लेखक ह्या नात्यानें त्यांचा संबंध जडण्यापूर्वी मासिक मनोरंजनाशीं त्यांचा घनिष्ट संबंध होता. मनोरंजनकार कै. मित्र व ते ह्यांमधील ह्या संबंधाची कल्पना 'विविध वृत्त' साप्ताहिकांत (२४–३–१९२९) प्रसिद्ध झालेल्या त्यांजवरील मृत्युलेखांतील पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल.

"वीस वर्षांपूर्वी काशीनाथपंत मित्रांच्या मनोरंजन कार्यालयांत काव्यशास्त्रविनोदांत सायंकाळच्या दोन घटका घालविण्यासाठीं जी लेखक व कविमंडळी जमे त्यांपैकीं दादा गोगटे ही एक व्यक्ति होती. ह्या मंडळींत केव्हां श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, केव्हां बाळकृष्णपंत भिडे, केव्हां गोविंदराव देवल, हरिभाऊ लिमये, वासुदेवराव पटवर्धन, कल्याणचे माधवानुज कवि, कृष्णाजी लक्ष्मण सोमण ऊर्फ किरात, सीतारामपंत देवधर, विनायकराव जोशी, वासुदेवराव आपटे, वगैरे अनेक वाङ्मयसेवक वारंवार भेटत. गोविंदराव ढेंगे, दिनकरराव वर्दे, विठ्ठल सीताराम गुर्जर, दादा गोगटे, आनंदराव तेलंग, पुरुषोत्तमराव काणेकर ऊर्फ शारदाश्रमवासी, लक्ष्मणराव परळकर, द्वारकानाथ गोविंद वैद्य व बाबुराव पंडित ही मंडळी तर तेथें नेहमीं येणारी. ही सगळी मंडळी काशीनाथपंत मित्रांना मनोरंजनाच्या बाबतींत लेखनसाहाय्य करीत. मनोरंजन कार्यालयांतल्या गप्पा आटोपल्या म्हणजे दादांनीं आपल्या कांहीं मित्रांसमवेत चौपाटीच्या वाळवंटांत जावें व त्या ठिकाणीं प्रहररात्र होईपर्यंत नाना तऱ्हेच्या गप्पा मारीत बसावें. पण त्यांच्या गप्पांचा मुख्य विषय पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें, त्यांतील विविध लेख व त्यांचे लेखक हाच असे.

"वीस वर्षांपूर्वीच्या मनोरंजनांत दादा पुष्कळ लिहीत. केव्हां गोष्टी, केव्हां विनोदी लेख, केव्हां निबंध असा मजकूर त्यांनीं मनोरंजनासाठीं लिहून द्यावयाचा. पण तो काशीनाथपंत त्यांच्यामागें सारखी टोंचणी लावीत म्हणून ते लिहीत. त्यांच्या गोष्टी चटकदार असत व विनोदी लेखही मार्मिक असत; पण त्यांपैकीं कशावरही आपलें नांव घालावयाचें नाहीं ही दादांची पहिली अट असे. पंचवीस वर्षांपूर्वी मनोरंजनांत प्रसिद्ध झालेल्या शेर्लोक होम्सच्या

अनुवादरूप ‘शाबास बाबूराव!’ ह्या मथळ्याखालील गुप्त पोलिसाच्य चातुर्याच्या गोष्टींचे लेखक दादा होते.”

ह्यावरून कै. मित्रांशीं त्यांचा किती घरोबा होता व दादांनीं आपल्या मित्राच्या ‘मनोरंजना’साठीं काय केलें हें वरील उताऱ्यावरून दिसून येईल. पण पुढें काशीनाथपंत मित्रांचें लक्ष मनोरंजनाच्या भरभराटीबरोबर प्रोफेसर, वकील, बॅरिस्टर अशा मंडळीकडे वळलें व त्यामुळें ‘बी. ए.’ हीं जादूचीं अक्षरें नांवापुढें नसलेल्या दादांसारख्या लेखकांची मनोरंजनांत फारशी प्रतिष्ठा राहिली नाहीं. दादांनीं तें उमजून तेथून पाय काढला.

मनोरंजनाखेरीज हरिभाऊंच्या करमणुकींतही त्यांनीं बऱ्याच गोष्टी लिहिल्या. राष्ट्रमत व इंदुप्रकाश ह्या पत्रांतही त्यांनीं अनेक लेख लिहिले. महाराष्ट्रभाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर ह्यांच्या सुप्रसिद्ध ज्ञानांजन मासिकांतही त्यांनीं अनेक खळबळ उडविणारे लेख लिहिले. महाराष्ट्रसारस्वताची अशी विविध प्रकारें बराच काल सेवा करूनही ते नामानिराळे राहिले. ह्या विसाव्या शतकांत अशी ही वृत्ति कौतुकास्पद अन् विस्मयकारक नाहीं असें कोण म्हणेल ?

कर्नाटक प्रेसशीं दादांचा संबंध जडल्यावर स्वाभाविकपणेंच तेथूनच प्रसिद्ध होणाऱ्या भारत-गौरव-ग्रंथमालेशीं त्यांचा संबंध आला. कौंट टॉलस्टॉय, युद्धरहस्य, प्रिन्स बिस्मार्क, ज्ञानदीप हीं पुष्पें त्यांजकडून मालेंत गुंफिलीं गेलीं. पुढें मालेचे मूळ मालक भसे निधन पावल्यावर तिची मालकी कर्नाटक छापखान्याकडे आली. त्याचे चालक श्री. मंगेशराव कुळकर्णी ह्यांना दादांनीं आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा अनेक प्रकारें लाभ दिला.

वर लिहिल्याप्रमाणें कोणताही धंदा किफायतशीर न झालेला पाहून विविध प्रकारचा लेखनव्यवसाय चालू असतां अखेरपर्यंत त्यांनीं घड्याळ-दुरुस्ती हा आपला मुख्य व्यवसाय केला होता. मुंबई शहरीं ठाकुरद्वार रस्त्यावरील आर्यन वॉच कंपनींत ते हें काम करीत असत. पण येथेंही ते कोणाचे नोकर नव्हते. ह्या कामांतही ते थोडाच वेळ घालवीत असत.

जेमतेम पोटापुरती कमाई असे. करीन तें काम व पडेल तो दाम अशी त्यांची वृत्ति असे.

ह्याप्रमाणें वर्षांमागून वर्षें गेलीं व विवेकानंदांच्या तेराव्या भागाचें हस्तलिखित तयार होऊन तें छापूनही गेलें. फक्त कवितांमुळेंच खंड प्रसिद्ध होणें अडलें होतें. ह्या प्रकारें ही माला पुरी झाल्यामुळें दुसरें काय हातांत घ्यावें ह्या विचारांत दादा व मंगेशराव कुळकर्णी होते. दादांच्या मनांतून ज्ञानेश्वरी चालू मराठी भाषेंत आणावयाची होती. ज्ञानेश्वरीचीं त्यांनीं बरींच पारायणें केलीं असल्यामुळें व ज्ञानेश्वरीवरील इतरांच्या टीका व प्रवचनें वाचल्या व ऐकलीं असल्यामुळें इतरांचा गोंधळ कोठें होतो हें त्यांना कळून चुकलें होतें. त्याकरितां आपल्या आवृत्तींत अशीं गोंधळाचीं स्थळें राहूं नयेत ह्यासाठीं त्या त्या स्थळाच्या विशेष स्पष्टीकरणार्थ योग्य साधनांचा संग्रहही त्यांनीं केला होता. ह्याखेरीज हिंदी तत्त्वज्ञानावर एक सांगोपांग ग्रंथ लिहिण्याचीही त्यांची मनीषा होती. ते म्हणत असत कीं आमच्या लोकांनीं फक्त सिद्धान्त सांगितले आहेत. पाश्चात्यांप्रमाणें त्यांची पद्धतशीर सांगड घातलेली नाहीं. ह्यासाठीं जरूर तेथें पाश्चात्यांची मदत घेऊन आपलें तत्त्वज्ञान पद्धतशीर बनवून तें सर्वसाधारण लोकांच्या आकलनांत आणलें पाहिजे.

पण ह्या सर्व आशा, अपेक्षा तडीस जावयाच्या नव्हत्या. १९२८ सालच्या शेवटीं दादांना एकदम अशक्तता भासूं लागली. हळूहळू त्यांना बारीक ज्वरही येऊं लागला. प्रकरण वाढत चाललेलें पाहून त्यांनीं प्रथम वैद्याचे व नंतर डॉक्टरचे इलाज करण्यास सुरुवात केली. परंतु कशाचाही उपयोग होत नाहीं असें पाहून त्यांच्या मित्रांनीं त्यांची एकंदर परिस्थिति ठाऊक असल्यामुळें त्यांच्या आईकडे म्हणजे उपरिनिर्दिष्ट गोळप येथें जाण्यास त्यांस आग्रह केला. पण ते कांहीं गेले नाहींत. शेवटीं दादा अति आजारी असल्याचें बडोद्यास त्यांच्या बहिणीला कळतांच ती लगेच मुंबईला आली व अतिशय आग्रह करून त्यांना बडोद्यास घेऊन गेली. बडोद्यास घेऊन

गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे ११ मार्च, १९२९ रोजीं दादांनीं स्वर्लोकीं प्रयाण केलें. त्यांच्या मागें त्यांची पत्नी आपल्या गांवीं दादांच्या आईकडे गेली.

ह्या ठिकाणीं त्यांच्या स्वभावाविषयीं व त्यांच्या नेहमींच्या चालचलणुकी-विषयीं थोडेंसें लिहिणें अस्थानीं होणार नाहीं.

विनोद, गप्पा, चहा व विड्या हीं दादांचीं आवडतीं करमणुकीचीं साधनें. अध्यात्मचिंतनांतही ते बराच काळ घालवीत. हें चिंतन विशेषत: सकाळची सहल करतांना होत असे. मोठ्या पहांटेस उठून दादा हळूहळू विचारी माणसासारखीं सावकाश पावलें टाकीत व प्रत्येक पावलागणीक कांहीं विचार मनांत घोळवीत पांच सात मैल चालून येत. चौपाटी, वाळकेश्वर, मलबारहिल, नेपियन सी रोड, महालक्ष्मी, पेडर रोड असा कांहींसा वेडावाकडा लांबलचक फेरा ते घेत. ह्यांत त्यांचे दोनतीन तास जात मूळ शरीरयष्टि मजबूत असल्यामुळें हें सर्व झेपे. अध्यात्मचिंतनांत आनंद मानून न राहातां आपला वेदान्त त्यांनीं आचरणांतही बराच उतरविलेला होता. अढळ शांति, समचित्त, निर्लोभता, निष्कापट्य, प्रसिद्धिपराङ्मुखता, इत्यादि गुण त्यांच्यांत बाणले होते. एकदा त्यांचें एकुलतें एक अपत्य कालमुखीं पडून त्याची शेवटची व्यवस्था लावण्यासाठीं ते सोनापुराकडे जात असतां वाटेंत कोणी ओळखीचा इसम भेटला. त्याबरोबर तात्काल त्यांचें हास्य त्यांच्या मुखावर झळकूं लागलें. बापड्या भेटणाऱ्यानें मात्र त्या गंभीर प्रसंगास उचित असें आंबट तोंड केलें. आपलें कर्तव्य बजाविल्यावर खेद करणारे दादा नव्हते. दादांच्या अंगावरील कपड्यांची एकंदर किंमत कधीं एक दोन रुपये तरी भरली असती कीं नाहीं ह्याची वानवा आहे. कित्येक वेळां त्यांचे जीर्ण कपडे भिकाऱ्यानेंही घेतले नसते.

दादांची योग्यता ठरविणें साधारण माणसाचें काम नाहीं. ती जाणण्यास तशाच योग्यतेचा इसम पाहिजे. ह्या दृष्टीनें माजी 'प्रगति' साप्ताहिकाचे विद्वान् संपादक प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, हे काय म्हणतात तें सांगून

दादांचा हा छोटासा परिचय पुरा करतों. ते आपल्या साप्ताहिकांत लिहितात :

" सुमारें तीन महिने झाले. एक अज्ञात मराठी लेखक बडोदें शहरीं मरण पावला. ज्यांनीं त्याच्या शेवटच्या संस्कारप्रसंगीं हातभार लावला त्यांपैकीं कितीजणांस स्मशानांत भस्मीभूत होणाऱ्या त्या कष्टानें झिजून झिजून केवळ अस्थिमात्र राहिलेल्या कलेवराच्या मागें केवढी आत्मज्योति होती ह्याची कल्पना असेल ? जगांतील यशाच्या मापानें न मोजतां आत्म्याच्या विकासाच्या मापानें जर माणसाची योग्यता कोणी ठरवूं लागता तर त्या गार पडलेल्या प्रेतांत कांहीं घटकांपूर्वीं राहाणारा आत्मा जीवन्मुक्तावस्थेच्या बऱ्याच वरच्या कोटीस पोचलेला होता असें त्यास आढळून येतें. जगांतील यशसुद्धा मानमान्यता, सुखसंपत्ति, अधिकारकीर्ति ह्या ताजव्यांनीं न तोलतां समाजसेवेच्या तागडींत टाकून पाहिलें तर तेंही ह्या मृताच्या वांट्यास अगदीं कमी आलें होतें असें म्हणतां येणार नाहीं. वाचणारांस केवळ मनोरंजक वाटणारे नव्हे तर ज्ञानवर्धक, बोधप्रद व सर्वस्वी समाजहितकारी असे पंधरावीस ग्रंथ मराठींत आणणारा लेखक बराच वरच्या दर्जाचा समाजसेवक म्हणावा लागेल. तसेंच ही समाजसेवा केवळ अर्थार्जन, कीर्तिलालसा, वगैरे हेतूंनीं प्रेरित होऊन केलेली नसून हौसेची वाङ्मयसेवा म्हणूनच केलेली असल्यानें तर त्या सेवेची नैतिक योग्यता फारच जास्त ठरते. केवळ एखादा दहापांच पानांचा लेख खरडून लेखक म्हणून मिरवणारे लेखक कोणीकडे व पंधरावीस पुस्तकें लिहूनसुद्धा वर आपलें नांवही न घालूं इच्छिणारा हा खंदा लेखक कोणीकडे ? जगाचें खरें हित करूं इच्छिणारीं माणसें बहुधा अप्रसिद्ध असतात हेंच खरें."

प्रगतिकारांनीं दादांविषयीं काढलेले हे उद्गार सार्थ नाहींत असें कोण म्हणेल ?

# स्वामी विवेकानंद
## [ चरित्र ]

अमेरिकेंतील मिचिगन सरोवराच्या कांठीं वसलेल्या शिकागो शहरांत १८९३ सालीं भरलेल्या सर्व धर्मांच्या परिषदेंत हिंदुधर्माचा प्रतिनिधि ह्या नात्यानें स्वामीजी सार्वजनिक रीत्या प्रथम प्रगट झाले. वय होतें तीस वर्षांचें. अमेरिकेंत तर सोडाच पण खुद्द त्यांच्या मायभूमींतही फारच थोड्यांना ते ज्ञात होते. स्वामीजींनीं ह्यापूर्वीं कोणत्याही परिषदेंत वा जाहीर सभेंत भाषण केलेलें नव्हतें. ११ सेप्टेम्बर, १८९३ रोजीं सर्व-धर्मांच्या प्रतिनिधींस हिंदु धर्माचा संदेश सांगण्यासाठीं जेव्हां ते उभे राहिले, तेव्हां 'माझ्या अमेरिकन भगिनींनो व बंधूंनो' ह्या पहिल्याच वाक्यासरशीं त्यांनीं श्रोत्यांचें चित्त आपल्याकडे आकर्षून घेतलें. त्यांचें भाषण होतें छोटेंसेंच. पण त्यांतील विचार व त्यांची मांडणी ह्यांत इतकें नावीन्य होतें कीं त्यानें श्रोत्यांच्या चित्ताची एकदम पकड घेतली. त्यांच्या भाषणानें परिषदेच्या वातावरणांत एक नवें चैतन्य ओतलें गेलें. त्या दिवशीं प्रत्येकाला वाटलें कीं, 'हा कोण संप्रति नवा पुरुषावतार!' सर्व जगभर ख्याति पसरली ह्या हिंदु तरुण संन्याशाची.

स्वामीजींचा जन्म कलकत्ता शहरीं १२ जानेवारी, १८६३ रोजीं दत्त कुटुंबांत झाला. त्यांचें नांव नरेन्द्रनाथ. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त हे एक नामांकित सधन वकील होते. त्यांनीं त्यांना सर्वांगीण शिक्षण मिळावें ह्यासाठीं खूप दक्षता घेतली होती. नरेन्द्रनाथ १८८३ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. कॉलेजांत अध्ययन करीत

असतां पाश्चात्य तत्त्वज्ञानाशीं त्यांचा परिचय घडून आला. त्याच्या अध्ययनानें त्यांचें समाधान न होतां किंवा आस्तिक्यबुद्धि दृढ न होतां उलट नास्तिकता मात्र दृढ होऊं लागली. अनेक ख्यातनाम ईश्वरवाद्यांना व परमार्थपंथीयांना ते भेटत आणि त्यांना म्हणत, "तुम्हीं जें ध्येय आपल्या डोळ्यांपुढें ठेविलें आहे त्या ध्येयाचा माझ्या डोळ्यांना प्रत्यक्ष प्रत्यय आणून द्या. जें सत्य आहे म्हणून तुम्ही सांगतां त्याचें मला प्रत्यक्ष दर्शन करून द्या आणि जी दिव्य शक्ति ह्या जगांत संचार करते असें तुम्ही सांगतां त्या शक्तीच्या अस्तित्वाचा मला प्रत्यक्ष अनुभव करून द्या." परंतु सत्याचें दर्शन करून देणारा किंवा दिव्यशक्तीच्या अस्तित्वाचा अनुभव आणून देणारा कोणीही पुरुष त्यांना भेटला नाहीं. अशा पुरुषाच्या शोधांत असतांना त्यांच्या एका नातलगाच्या सांगण्यावरून ते दक्षिणेश्वरीं श्रीरामकृष्ण परमहंस ह्यांच्या दर्शनास गेले. त्यांनीं मात्र त्यांच्या ह्या प्रश्नाला, "होय, मला सत्याचें दर्शन झालें आहे. मीं दिव्यशक्तीचा अनुभव घेतला आहे. तूं मला समोर जसा दिसतो आहेस तसाच अगदीं देव मला दिसला आहे आणि तुझ्या अंतःकरणांत तेवढी तीव्र तळमळ असेल, तर तुलाही तो दिसेल. मी तुला तो दाखवूं शकेन." असें उत्तर लगेच दिलें. श्रीरामकृष्ण हें बोलत असतांना त्यांच्या वाणींत जें तेज भासलें त्यानें नरेन्द्रनाथ स्तंभित झाले. हाच पुरुष आपलें अंतःकरण निववून सत्यपथ दाखवील अशी त्यांची खात्री झाली. त्यांचें त्यांच्याकडे जाणें-येणें सुरू झालें.

नरेन्द्रनाथांना श्रीरामकृष्ण परमहंसांचा सहवास सुमारें पांच वर्षें घडला. त्यांच्या ठिकाणच्या सामर्थ्यानें त्यांच्या अंतःकरणाच्या जखमा भरून येऊन त्यांना शांति प्राप्त झाली.

श्रीरामकृष्ण परमहंस १६ ऑगस्ट, १८८६ सालीं समाधिस्थ झाले. तत्पूर्वीं एक दिवस त्यांच्याजवळ आलेल्या कांहीं निवडक तरुण सुशिक्षित भक्तांना नरेन्द्रनाथांच्या स्वाधीन करून, "तूं ह्यांचा नेता बनून ह्यांच्यासह माझ्या शिकवणीप्रमाणें कार्य करूं लाग" असा त्यांनीं त्यांस आदेश दिला.

ह्या आदेशानुसार नरेन्द्रनाथांनीं व त्यांच्या इतर चौदा गुरुबंधूंनीं संन्यासाश्रम स्वीकारून कलकत्याजवळील वराहनगर ह्या उपनगरांत श्रीरामकृष्णांच्या नांवें मठ स्थापन केला व आध्यात्मिक साधनेस सुरुवात केली.

संन्यासी बनलेल्या नरेन्द्रनाथांनीं [आतां स्वामी विवेकानंद] ह्या नव्या आश्रमांतील पहिलीं पांच वर्षें हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि गंगासागरापासून सिंधुसागरापर्यंत अनेक नांवें बदलून अज्ञातपणें प्रवास केला. समाजाच्या नाना थरांतील लोकांशीं त्यांचा परिचय झाला. प्रवासांत संधि मिळेल त्या त्या वेळीं वेद-वेदांगांचाही अभ्यास त्यांनीं चालू ठेविला होता. परिव्राजकावस्थेतील ह्या परिभ्रमणांत आपल्या मातृभूमीची खरी ओळख त्यांना झाली. भारताचें शेवटचें टोक जें कन्याकुमारी तेथें त्यांनीं आपल्या परिभ्रमणाची समाप्ति केली. देवीला साष्टांग प्रणिपात करून तिच्या देवळाबाहेर ते पडले, तेव्हां समोर अमर्याद पसरलेल्या सागराकडे त्यांची दृष्टि गेली. कांहीं अंतरावर असलेला जलवेष्टित असा एक खडक त्यांना दिसला. त्यांनीं पाण्यांत झेप टाकली आणि ते पोहत त्या खडकाकडे गेले. तेथें त्यांनीं बराच काळ चिंतनांत घालविला. "माझं कर्तव्य कोणतं? संन्यास घेतांना देवसेवेंतच माझं जीवन व्यतीत करीन अशी मीं शपथ घेतली आहे. सद्गुरु, जीव हाच शिव, जीवाची सेवा हीच शिवाची सेवा, असं नाहीं का सांगून गेले! जीवांच्या मुक्तींतच आपली मुक्ति, त्यांच्या कल्याणांतच आपलं कल्याण पाहिलं पाहिजे. पण ही मुक्ति आणि कल्याण निष्कांचन संन्याशाला कशीं साधणार?" स्वामीजींची तंद्री लागली होती. त्या तंद्रींत त्यांना अकस्मात् एक विचार सुचला. "उदार म्हणून प्रसिद्ध असलेल्या अमेरिकेंत जावें. भारताशीं तिचा परिचय घडवावा. तिचें आध्यात्मिक अंतरंग तिला समजून द्यावें. 'भारत जगला तरच मानवसमाज जगेल', हें पटवून द्यावें. सध्याच्या त्याच्या मुमुर्षु अवस्थेची कल्पना तिला आणून देऊन त्याला त्यांतून बाहेर काढण्यासाठीं तिजकडून साह्य मिळतें का पाहावें."

स्वामीजींना हा विचार सुचतांच त्यांनीं कन्याकुमारी सोडली. ते दक्षिणेकडून उत्तरेकडे वळले. प्रवासांत, शिकागो येथें भरावयाच्या सर्वधर्मपरिषदेसंबंधींची वार्ता त्यांना कळली. ह्या परिषदेस स्वामीजींनीं हिंदुधर्माचा प्रतिनिधि म्हणून उपस्थित असावें असा त्यांना अनेक भक्तांकडून आग्रह सुरू झाला. त्यांच्याही मनांत विचार घोळत होताच. खेतडीचे महाराज व इतर कांहीं भक्त – विशेषतः मद्रासकडील – प्रवासाच्या खर्चाची व्यवस्था करण्यास पुढें आले. स्वामीजींनीं ३१ मे, १८९३ रोजीं मुंबईहून अमेरिकेकडे प्रयाण केलें.

सर्वधर्मपरिषदेंत स्वामीजींनीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांचा प्रभाव अमेरिकन जनतेवर चांगलाच पडला. स्वामीजी अमेरिकेंत जवळ जवळ दोन वर्षें होते. एवढ्या काळांत त्यांनीं अद्वैत वेदान्ताचें महत्त्व तिकडील मंडळींस पटविलें, भारतीय संस्कृतीची व सद्यःस्थितीची ओळख करून दिली. अमेरिकनांची भारतीय जनतेविषयीं सहानुभूति संपादून, त्यांजकडून मिळालेल्या निधीमधून अमेरिकेंत वेदान्ताचा प्रचार करणारीं ‘वेदान्त सोसायटी’ सारखीं केंद्रें निर्माण केलीं. हिमालयांत आलमोडा येथें व कलकत्याजवळील बेलूर गांवीं श्रीरामकृष्ण मठाची स्थापना केली. अमेरिकेहून पुढें स्वामीजी इंग्लंड, फ्रान्स, इटली, वगैरे देशांत गेले. तेथें वेदान्तधर्माचा युरोपियन समाजाला त्यांनीं परिचय करून दिला.

१८९७ सालच्या प्रारंभीं स्वामीजी हिंदुस्थानांत परत आले. ‘रामकृष्ण संघ’ ह्या नांवानें संन्याशांची घटनाबद्ध संघटना त्यांनीं निर्माण केली.

भारतांत आल्यापासून स्वामीजींची प्रकृति नीटशी राहिली नाहीं. ‘जगांतील आपला वास्तव्यकाळ संपत आला आहे’ असें ते आपल्या निकटवर्तीयांकडे मधूनमधून बोलत असत. त्याचप्रमाणें घडलें. ४ जुलै, १९०२ रोजीं रात्रीं नऊ वाजतां कोणालाही हासभास नसतां त्यांनीं ध्यानस्थ स्थितींत स्वेच्छेनें ह्या जगांतून प्रयाण केलें. भारत एका थोर राष्ट्राभिमानी व मानवप्रेमी पुरुषास मुकला.

# आमचे गुरुदेव
# आणि
# त्यांचा संदेश

स्वामी विवेकानंद ह्यांच्या प्रसिद्ध होत असलेल्या ह्या ग्रंथमालेच्या योगें साऱ्या जगाला धर्ममार्गाचा खरा बोध होईलच; पण खुद्द भरतभूमीच्या लेंकरांनाही स्वतःच्या धर्माचें खरें स्वरूप कळण्यास त्यांचा आदर्शवत् उपयोग होईल. नवयुगाघातानें भरतभूमि शतधा विदीर्ण झाली आहे. अशा वेळीं तिच्या धर्माचें तारूं कोणीकडच्या कोणीकडे भडकावें ह्यांत नवल नाहीं. प्रचंड वादळांत सापडून इतस्ततः भडकणाऱ्या नौकेला चांगल्या बंदराच्या आश्रयाची अत्यंत जरूरी असते. त्याचप्रमाणें हिंदुधर्मरूपी नौकेलाही सध्याच्या काळीं अशाच प्रकारच्या बंदराची अत्यंत आवश्यकता होती; ती उणीव स्वामी विवेकानंदांनीं पूर्णपणें भरून काढली आहे. हिंदु धर्माचें वास्तविक स्वरूप काय आहे ह्याचा बोध प्रस्तुत ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेल्या स्वामीजींचे लेख, व्याख्यानें व संभाषणें ह्यांयोगें उत्तम रीतीनें होईल.

हिंदुस्थानांत जन्मलेल्या आणि हिंदु धर्मानें दर्शविलेल्या अत्युच्च पदावर आरूढ झालेल्या एका हिंदु महात्म्यानें हिंदु धर्माचा प्रसार करीत साऱ्या जगभर फिरावें, ही गोष्ट इतिहासकालानंतर तरी प्रथमच घडून आली आहे. आपल्या धर्मांत काय सांगितलें आहे ह्याचें ज्ञान करून घेण्याची इच्छा कोणाही हिंदूस झाली, आपल्या मुलांस धर्मज्ञान देण्याची इच्छा कोणा मातेस झाली, तर अशीं स्त्री-पुरुषें विवेकानंदांच्या ग्रंथांकडे वळतील ह्यांत संशय नाहीं. इंग्रजी भाषा हिंदुस्थानांतून समूळ नष्ट होण्याची वेळ

कधीं काळीं आलीच तर त्या वेळींही त्या भाषेंतून स्वामीजींनीं केलेलें ज्ञानदान शिल्लक राहून साऱ्या जगास फलद्रूप होईल ह्यांत तिळमात्र संदेह नाहीं. सांप्रतकाळीं विस्कळित झालेलीं हिंदुधर्मतत्त्वमौक्तिकें एका सूत्रांत गुंफून त्यांचा पक्का हार बनविण्याची अत्यंत आवश्यकता उत्पन्न झाली होती; तसेंच भौतिकशास्त्रांच्या प्रखर भट्टींतही टिकून राहाणारा धर्म जगाला सध्या हवा होता. हीं दोन्ही कामें स्वामीजींनीं आपल्या अमोघ सामर्थ्यानें तडीस नेलीं. सनातनधर्मांत जें चिरंतन सामर्थ्य वास करीत आहे, त्याचीही साक्ष आपणांस येथें पटते. अत्यंत विकट परिस्थितींतही स्वामीजींसारखें नवरत्न उदयास येऊन सनातनधर्माचा जिवटपणा जगास पटवितें, ह्यावरून त्या धर्मांतील चिरकाल टिकणाऱ्या सामर्थ्याचा पूर्ण प्रत्यय येतो.

मानवी जीविताचें रहस्य इतरांना कथन करण्यांत स्वतःचेंही हित आहे, ही गोष्ट भारतास आजच प्रथम समजली असें नाहीं; आपणांस जें ज्ञान प्राप्त झालें आहे तें इतर देशांतील लोकांस सांगून त्यांसही सुखाचा मार्ग खुला करून द्यावयाचा हें भारतभूमीचें ब्रीदच आहे.

जगांतील इतर देश अज्ञाननिद्रेंत घोरत पडले असतां, भगवान् बुद्धानें आपल्या शिष्यांच्या द्वारें त्यांस जागृति आणली. आपलें ज्ञान इतरांस दिल्यानें दुणावतें, ही गोष्ट आर्यभूमीच्या लक्षांत आल्यास पुष्कळ काळ लोटून गेला आहे. आपल्या ज्ञानाचा देशोदेशीं प्रसार केल्यामुळें हिंदुधर्मास अभेद्य रूप प्राप्त झालें आहे. पाश्चात्य देशांतील एका व्याख्यानांत स्वामी विवेकानंद म्हणाले, ' जर एक धर्म खरा असेल तर इतर धर्मही खरे असलेच पाहिजेत. सर्व धर्मांचें साध्य एकच असल्यामुळें सर्व जग वस्तुतः एकधर्मीच आहे. ह्याकरितां हिंदुधर्म जितका माझा म्हणतां येईल, तितकाच तो तुम्हां सर्वांचाही आहे. ' आपले शिष्य इतर देशांत पाठविण्यांत भगवान् बुद्धांच्या मनांत एकंदर मानवजातीबद्दल जें प्रेम वसत होतें, त्याचीच पुनरावृत्ति स्वामीजींच्या ह्या उद्गारांत आपणांस आढळून येते. दुसऱ्या एका

व्याख्यानांत स्वामीजी म्हणतात, 'आम्ही हिंदु लोक इतर धर्मांशीं विरोध तर करीत नाहींच, पण नुसते उदासीनही न राहातां त्यांच्या मूलतत्त्वांशीं एकजीव होऊन राहातों. धर्म म्हटला कीं तो महंमदानें सांगितलेला असो, झरतुष्ट्रानें सांगितलेला असो अथवा येशू ख्रिस्तानें सांगितलेला असो; त्यांतील सार ग्रहण करण्यास आम्ही नेहमीं तयार असतों. अगदीं रानटी देशांतल्या धर्मांपासून तों अत्युच्च धर्मांपर्यंत सर्व धर्म, हे परमेश्वरप्राप्तीचे, अनंताशीं एकरूप होण्याचे, मार्ग आहेत, ही गोष्ट आजपर्यंत आमच्या लक्षांतून कधींही गेली नाहीं. ह्याकरितां सर्व धर्मरूप पुष्पें प्रेमसूत्रानें एकत्र करून अनंताच्या चरणीं अर्पण करणें हाच आमचा पूजाविधि आहे.' अमूक एक मनुष्य परका अथवा परदेशाचा असा भाव स्वामीजींच्या चित्तास कधीं शिवलाही नाहीं. एकंदर मनुष्यजातीबद्दल त्यांच्या चित्तांत आपलेपणा वसत होता. सत्यमार्गाचा उपदेश त्यांनीं सर्वांना एकसारखाच केला.

अमेरिकेंतील सर्व धर्मांच्या परिषदेपुढें त्यांनीं 'हिंदुधर्मकल्पना' ह्या विषयावर व्याख्यान दिलें, तेव्हां हिंदुधर्मतत्त्वांचें सामान्य निरूपण करावयाचें इतकाच त्यांचा उद्देश होता; पण त्यांच्या अमोघ वाणीचा प्रवाह सुरू झाल्याबरोबर सामान्य निरूपणाचें स्वरूप बदलत जाऊन शेवटीं हिंदु धर्म आपल्या संपूर्ण तेजानें प्रकाशमान झाल्याचें आढळून आलें! तो प्रसंगच तसा होता! मिचिगन सरोवराच्या कांठीं वसलेल्या त्या शिकागो शहरांत पाश्चात्य संस्कृतीचें स्वरूप जणूं एकवटून दिसत होतें. ह्या स्वरूपांत जसा कांहीं मनोहर भाग आहे, त्याचप्रमाणें कांहीं विषादकारक भागही आहे. यच्चयावत् पाश्चात्य देशांतील संस्कृतींतील उत्तमोत्तम तत्त्वांचा ज्याप्रमाणें अमेरिकेनें संग्रह केला आहे, त्याचप्रमाणें त्या संस्कृतींतील कांहीं विषादकारक तत्त्वांचा संग्रहही तिनें केला आहे. विशेषतः शिकागो शहरांत युरोपियन संस्कृतीचें संकलित स्वरूप जितक्या उत्तम रीतीनें दिसतें तितक्या रीतीनें तें अमेरिकेंत इतर ठिकाणीं आढळत नाहीं. एखादा नवखा मनुष्य प्रथमच शिकागो शहरीं आला, तर तेथील जनसंमर्द आणि

अविरत गडबड पाहून तो गोंधळून जातो. सान्या जगांतले बाजारबुणगे जणूं काय एकत्र झाले आहेत असें त्यास वाटतें. पण ही उथळ दृष्टि बाजूस ठेविली, तर ह्या प्रचंड घोटाळ्यांतही अत्यंत अंतर्वर्ती अशी एकतानता असून एकंदर जगास बंधुभावाचा धडा ह्याच शहरानें घालून द्यावा असा परमात्म्याचा स्पष्ट उद्देश दिसतो.

स्वामी विवेकानंद भाषण करण्यास उभे राहिले तेव्हां त्यांजपुढें असलेला श्रोतृसमूह कोणत्या प्रकारच्या विचारांनीं भरलेला असावा ह्याचा अंदाज वरील वर्णनावरून होण्याजोगा आहे. आपल्या धर्माहून उच्च धर्म नाहीं आणि आपल्या संस्कृतीहून उच्च संस्कृतिही जगांत दुसऱ्या कोठें नाहीं ही कल्पना त्यांस एका बाजूस ओढीत असतां कुतूहल त्यांस दुसऱ्या बाजूस ओढीत होतें. स्वामीजी आपणांस नवीन असें काय सांगणार तें ऐकण्यास त्यांच्यापुढील श्रोतृगण अत्यंत उत्सुक झालेला दिसत होता. स्वामीजींसमोर अशा प्रकारचा श्रोतृसमूह असतां त्याच वेळीं त्यांच्या पाठीमागें अत्यंत शांत व ज्ञानानें तृप्त झालेला असा प्राचीन ऋषिसमूह होता. हा समूह केवळ चैतन्यरूप असल्यामुळें अर्थातच बाह्यनेत्रांत गोचर होत नव्हता. हा चैतन्यसागर अत्यंत प्राचीन आहे; इतका कीं त्याच्या तुलनेनें बौद्धधर्मही परवांचा असें म्हणतां येईल. ह्या सागरस्वरूप सनातन-धर्मांत अनेक शाखा आणि पंथ ह्यांचा समावेश झाला आहे. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं स्वामीजींच्या पाठीमागें हजारों वर्षांचा ज्ञानवृद्ध आणि तपोवृद्ध असा भारतीय राष्ट्रपुरुष उभा होता.

अशा रीतीनें दोन चैतन्यसागर तेथें एकमेकांस भेटूं पाहात होते. अत्यंत प्राचीन आणि अत्यंत अर्वाचीन संस्कृतींचा संयोग होण्याची ही वेळ होती आणि तें कार्य स्वामीजींच्या हस्तें व्हावयाचें ह्या ईश्वरी संकेताची येथें पूर्तता होत होती. अशा रीतीनें हा संधि होतांच त्यांतून सर्व जगास मान्य अशा नव्या स्वरूपाचा सनातनधर्म तेथें उत्पन्न झाला हें योग्यच झालें. स्वामीजींनीं तेथें स्वतःचें असें कांहींच सांगितलें नाहीं; इतकेंच नव्हे तर आपल्या

गुरूसंबंधींही कांहीं सांगितलें नाहीं. मागें उभ्या असलेल्या राष्ट्रपुरुषाच्या प्रेरणेस अनुसरून पासिफिक समुद्राच्या तीरावरील घोरत पडलेल्या जनतेस त्यांनीं जागें केलें. कित्येक सहस्त्रकांचें आपलें अनुभवजन्य ज्ञान भारतीय राष्ट्रपुरुष, जणूं काय त्यांच्या मुखानें बोलत होता! आणि तरुण असा पाश्चात्य पुरुष तें दिव्य ज्ञान, मोठ्या औत्सुक्यानें आपल्या हृदयसंपुटांत सांठवीत होता. आपलें खरें मोठेंपण आणि सामर्थ्य कशांत आहे, ह्याचें रहस्य समजण्यास हा तरुण पुरुष अत्यंत उत्सुक झाला होता.

स्वामीजी ज्या उच्चासनावर उभे होते, तेथेंच दुसरेही अनेक पंथांचे आणि धर्मांचे आचार्य विराजमान झाले होते; परंतु विश्वव्यापी धर्मरहस्य कथन करण्याचा अधिकार एकट्या स्वामीजींसच प्राप्त झाला होता. स्वामीजींनीं सांगितलेला धर्म एखाद्या महासागरासारखा असून इतर आचार्यांचे पंथ, हे त्या महासागरास मिळूं पाहाणाऱ्या लहान मोठ्या नद्यांसारखे होते. 'अनेक धर्म आणि अनेक पंथ हे मजकडे येण्याचेच अनेक मार्ग आहेत.' '**मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।**' हा भगवान् श्रीकृष्णांचा निरोप स्वामीजींनीं तेथें कथन केला. '**यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥**' हें भगवंतांचें वचन कथन करून, अनेक पंथांची आणि धर्मांची स्वामीजींनीं जणूं एकवाक्यताच केली. "मनुष्य पापांतून पुण्याकडे प्रवास करीत नाहीं, दुःखांतून सुखाकडे जात नाहीं, अथवा असत्यांतून सत्यांत प्रवेश करीत नाहीं; तर कमी पुण्यांतून अधिक पुण्यांत, कमी सुखांतून अधिक सुखांत व अंधुक सत्यांतून पूर्ण प्रकाशमान सत्यांत प्रवेश करतो. चैतन्याचा अनुभव घेऊन तो स्वतः पूर्ण चैतन्यस्वरूप होतो. ज्या दिवशीं मनुष्यप्राणी स्वतः सच्चिदानंदरूप होईल, त्या दिवशींच त्याच्या धर्मजीवनाचा शेवट झाला असें म्हणतां येईल. सकल विश्वांत मृत्यूचें साम्राज्य असतां अविनाशी स्वरूप सापडणें, विश्वाच्या स्वरूपांत दरक्षणीं बदल होत असतां त्याच्या स्थिर अधिष्ठानावर आपण आरूढ होणें व अनेकतेनें भासमान

होणाऱ्या विश्वचैतन्याची एकतानता अनुभवणें ही जीविताची इतिकर्तव्यता आहे;" असा निरोप त्या दिवशीं भारतीय राष्ट्रपुरुषानें तरुण पाश्चात्य राष्ट्रपुरुषास स्वामीजींच्या मुखानें कथन केला.

सर्व जगाला धर्मज्ञान सांगण्याचा जो हक्क भरतभूमीला आहे त्याचा जणूं ताम्रपटच स्वामीजींच्या हस्तें कोरला गेला आहे. स्वामीजींनीं उभारलेली धर्माची इमारत वेदांच्या पायावर आहे; पण खुद्द 'वेद' ह्या शब्दाची व्याख्याही त्यांनीं धार्मिक स्वरूपाची केली आहे. ते म्हणतात, 'वेद म्हणजे पुस्तकें नव्हत. निरनिराळ्या ऋषींनीं जे धार्मिक सिद्धान्त ठरविले, त्या सर्वांस समुच्चयेंकरून वेद अशी संज्ञा आहे. जें कांहीं सत्य असेल तें सर्व वेद ह्या संज्ञेस पात्र आहे.' सनातनधर्माचें स्वरूप सांगतांना ते म्हणाले, 'वेदान्ताच्या अत्युच्च तत्त्वांपासून तों पौराणिक स्वरूपाच्या मूर्तिपूजेपर्यंतचे सर्व पंथ, तसेंच बुद्धाचा शून्यवाद व जैनांचें निरीश्वरमत ह्या सर्वांचा सनातनधर्मांत अंतर्भाव होतो. हिंदूंतील अनेक मतें व मूर्तिपूजादिकांचे प्रकार इतरांच्या दृष्टीनें वेडगळपणाचे दिसले तरी तीं परिस्थित्यनुरूप झालेलीं एकाच सनातन-धर्माचीं अनेक रूपें आहेत.' प्रत्येकाची इष्टदेवता वेगळी असली म्हणून त्याचा धर्म वेगळा होत नाहीं, असें स्वामींचें मत होतें. किंबहुना स्वतःची स्वतंत्र इष्टदेवता व इष्टमार्ग असणें हा प्रत्येकाचा हक्कच आहे, असें ते म्हणत. सनातनधर्माची ही व्याख्या मान्य केली म्हणजे हिंदु धर्माइतकें विस्तृत साम्राज्य दुसऱ्या कोणत्याही धर्माचें नाहीं असें दिसून येईल. किंबहुना तें विश्वव्यापी साम्राज्यच होय. खुद्द ब्रह्माची भेट होईपर्यंत सनातन धर्माचा मार्ग संपत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला त्यानें पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. परमात्म्याची भेट कोणत्या मार्गानें घ्यावी हें ज्याचें त्यानें ठरवावें. धर्मस्वातंत्र्याचें हें अत्यंत परिणत रूप आहे.

पण सनातनधर्माची प्रौढी केवळ इतक्यानेंच संपते असें नाहीं. प्रत्येक व्यक्तीस धर्माचें पूर्ण स्वातंत्र्य त्यानें ठेविलें आहे; इतकेंच नव्हे तर प्रत्येक व्यक्ति पूर्ण स्वतंत्र – मुक्त – आहे, मृत्यूच्या पलीकडे आहे आणि केवळ

आनंदरूप आहे, असें तो उच्चघोषानें सांगत आहे. ' सच्चिदानंद ' ह्या एका शब्दांत अनेक धर्मांचा आणि अनेक पंथांचा अंतर्भाव होतो. ह्या एका शब्दाच्या अनुभवाकरितांच हे अनेक धर्म आणि अनेक पंथ इतका काल खटपट करीत आहेत. एका व्याख्यानांत स्वामी म्हणाले, ' देवळाची एक नवी इमारत बांधण्याचें काम सध्या आपणां सर्वांस करावयाचें आहे. त्या ठिकाणीं येण्यास प्रत्येक व्यक्तीस पूर्ण अधिकार असावा. त्याच्या गाभाऱ्यांत फक्त ॐ ह्या एका अक्षराचीच स्थापना करावयाची. ह्या कामीं आपणां सर्वांच्या मदतीची मी याचना करतों. ' स्वामीजींचे हे शब्द ऐकून आम्हांपैकीं कित्येकांच्या मनांत भरतभूमिरूपी विश्वदेवालयाची कल्पना उभी राहिली. जगांतील सर्व धर्मांचे लोक ह्या प्रचंड देवालयांत एकवटले आहेत. नामरूपातीत अशा स्वरूपाची भेट घ्यावयाची हाच त्यांचा उद्देश आहे. आम्ही अनंत मार्गांनीं चालत असलों, तरी सर्वांच्या भेटीचें ठिकाण सनातन धर्मांतच आहे. दृश्यांतून अदृश्यांत प्रवेश करणें, आकारांतून निघून निराकारांत जाणें आणि अनंतत्वांत एकत्व अनुभविणें हाच सर्वांचा उद्देश आहे. ह्याविरुद्ध कोणीही मार्ग आक्रमण करीत नाहीं. असें सांगणाऱ्या धर्मांची इतर सर्व उच्च धर्मांशीं एकवाक्यता असली तर त्यांत नवल काय? इतर मोठ्या धर्मांत आणि सनातन धर्मांत फरक असला तर तो इतकाच कीं स्वतःस पवित्र व इष्ट वाटणाऱ्या मार्गानें जाण्याची त्यानें प्रत्येकास पूर्ण परवानगी दिली आहे.

स्वामीजींनीं निव्वळ आपल्या पदरचें असें कांहींसुद्धा सांगितलें नाहीं. भगवान् श्रीकृष्णांप्रमाणें अथवा भगवान् श्रीशंकराचार्यांप्रमाणें त्यांनीं प्रत्येक वाक्य श्रुति आणि उपनिषदें ह्यांच्या आधारानेंच उच्चारलें आहे. सनातन धर्म नव्या परिस्थितीस अनुकूल अशा स्वरूपानें सांगावयाचा इतकीच कामगिरी त्यांनीं केली. स्वामीमहाराज जन्मास आले नसते तरी त्या प्रमेयांस कांहीं उणीव आली असती असें नाहीं. फरक इतकाच कीं नव्या परिस्थितीमुळें त्यांचें स्पष्ट स्वरूप आम्हांस समजलें नसतें. त्यांतील विरोधाभासानें आमचा

गोंधळ झाला असता. आम्हांसारख्या आर्तांस मोक्षमार्ग आज पूर्ण उघडला गेला आहे, तो स्वामीजींच्या अभावीं बंद राहिला असता. सनातनधर्माचें प्रवचन स्वामींनीं पूर्ण अधिकारयुक्त वाणीनें केलें आहे; पण तें केवळ वाक्पटु पंडिताप्रमाणें नसून अनुभवी ब्रह्मनिष्ठाप्रमाणें केलें आहे. स्वामी श्रोत्रीय असून ब्रह्मनिष्ठही होते. चैतन्यरत्नाकराच्या तळापर्यंत बुडी मारून तेथील संपूर्ण कोष त्यांनीं प्रथम हस्तगत केला आणि नंतर आम्हां पामरांच्या करुणेस्तव तो मार्ग त्यांनीं प्रगट केला. हा आप्त, हा परका, हा ब्राह्मण, हा चांडाळ, असा भेद मनांतही न आणतां त्यांनीं हें गुह्य सर्वांस सारखेंच प्रकट केलें.

त्यांनीं नवें असें कांहींच सांगितलें नाहीं असें मीं म्हटलें, तथापि तसें म्हणणेंही थोडेंसें अयुक्त आहे. अद्वैतसिद्धान्त हा यच्चयावत् धर्ममार्गांचा मुकुटमणि आहे, असें सांगतांना त्यांनीं द्वैत आणि विशिष्टाद्वैत ह्या अद्वैत-सिद्धान्ताच्या पायऱ्या आहेत असेंही सांगितलें, हें विसरतां कामा नये. परमेश्वर साकार आहे आणि निराकारही आहे, असें भगवान् श्रीरामकृष्ण म्हणत असत. एकाच ब्रह्माचीं व्यक्त आणि अव्यक्त अशीं दोन स्वरूपें असून निरनिराळ्या दर्जाच्या भावनेनुरूप त्यांचा अनुभव होतो आणि सर्वत्र एकरूपच पाहाणें, 'एकमेवाद्वितीयम्' असा अनुभव होणें, ही अत्युच्च अनुभवाची भावना आहे, असें श्रीरामकृष्ण ह्यांचें मत होतें. त्याचाच अनुवाद सशास्त्र पद्धतीनें करून स्वामीजींनीं ह्या परस्परविरोधी दिसणाऱ्या मतांची एकवाक्यता केली हें विसरतां कामा नये. स्वामींच्या प्रवचनांत जो नवीनपणा आहे, तो हाच.

अशा रीतीनें पौर्वात्य व पाश्चात्य आणि जुनें व नवें ह्यांचा पूर्ण संधि करून भांडणाचें बीजच ज्यांनीं दग्ध करून टाकलें, ते माझे सद्गुरु धन्य होत! धर्ममंदिरावर हा कळसच त्यांनीं उभारला असें कोण म्हणणार नाहीं? जर 'एकमेवाद्वितीयम्' हें खरें आहे तर पूजनाचे सर्व मार्ग खरे आहेत; एवढेंच नव्हे तर सर्व प्रकारचीं कर्में आणि एकंदर जीवनक्रम

हे सर्व पूजाविधिच आहेत असें म्हणावयास काय हरकत आहे? ह्याकरितां अमूक कृत्य ऐहिक आणि अमूक पारलौकिक हा भेदसुद्धा खोटाच म्हटला पाहिजे. कर्म करणें हासुद्धा पूजाविधिच आहे. मनोजय हाच त्याग. सर्व मानवी जीवनक्रमच धर्मरूप आहे. सदैव कार्यमग्न राहाणें हें जितकें कठीण आहे, तितकेंच संन्यस्त होणें हेंही कठीण आहे. दोहोंचेंही अंतिम पर्यवसान एकच.

ज्ञान आणि भक्ति ह्यांपासून कर्म वेगळें नाहीं असें विवेकानंदांनीं सांगितलें त्याचें रहस्य हेंच होय. परमेश्वराची भेट मठांत अथवा देवळांतच होते असें नाहीं; तर ती एखाद्या कारखान्यांत अथवा शेतांतील झोपडींतही होऊं शकते. परमेश्वराच्या सेवेंत राहून जसा परमेश्वर भेटतो, तसाच तो मनुष्याच्या सेवेनेंही भेटतो. जनतेची सेवा तीच परमात्म्याचीही सेवा होय. जनतेच्या सेवेकरितां लढणारा वीर आणि कोणाच्या स्तुतीचीही अपेक्षा न करितां आपलें उद्दिष्ट साधण्याकरितां खटपट करणारा सामान्य मनुष्य ह्यांची योग्यता स्वामींच्या दृष्टीनें सारखीच आहे. आपणांस धार्मिक न म्हणवितां खऱ्या सन्मार्गानें चालणारा मनुष्य आणि अत्यंत धार्मिक वृत्तीचा मनुष्य ह्यांत योग्यतेच्या दृष्टीनें फरक नाहीं, असें ते म्हणत. ‘सर्व भौतिक शास्त्रें, विद्या व धर्मशास्त्रें एकाच सत्याचा शोध करीत आहेत; पण हें बरोबर समजण्यास आपणांस अद्वैतसिद्धान्त प्रथम नीट कळला पाहिजे,’ असें स्वामींनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. त्यांच्या एकंदर लेखांत व व्याख्यानांत ह्याच तत्त्वाचा त्यांनीं सर्वत्र अनुवाद केला आहे; किंबहुना त्यांचे सर्व लेख, व्याख्यानें व संभाषणें ह्या एकाच तत्त्वाच्या प्रतिपादनार्थ केलेल्या टीकाच आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

स्वामी विवेकानंद ह्यांनीं संस्कृत आणि इंग्रजी ह्या दोन्ही भाषांचें चांगलें अध्ययन केलें होतें. ह्या दोन्ही संस्कृतींचा परिणाम स्वामीजींच्या मनावर एकदम झाल्यामुळें त्यांच्या परस्परविरोधी स्वरूपाकडे त्यांचें चित्त वेधलें. परस्परविरुद्ध अशा ह्या संस्कृतींत सत्य कोणती, ह्याचा विचार

मनांत आल्यावर त्यांची बुद्धि आपोआप जागृत होऊन विचारमालिकेस सुरुवात झाली. विवेचकबुद्धीचें पूर्ण समाधान होईपर्यंत मध्यंतरीं कोठेंही विसावा न घेतां सशास्त्र पद्धतीनें ह्या दोन्ही संस्कृतींचा त्यांनीं अभ्यास केला. ह्या मार्गाचें अंतिम पर्यवसान अद्वैतमतांत झालें. पूर्वकालीन ऋषींना तरी अद्वैतसिद्धान्त कांहीं अगम्य रीतीनें अथवा केवळ दैववशात् प्राप्त झाला होता असें नाहीं. त्याकरितां त्यांनाही आपल्या बुद्धीस आटोकाट ताण द्यावा लागला होता.

ज्या अद्वैताची सिद्धि बुद्धीनें केली होती, त्याचेंच प्रत्यक्ष स्वरूप नरेंद्रास ( विवेकानंदांचें पूर्वाश्रमींचें नांव ) दक्षिणेश्वराच्या देवालयांतील उद्यानांत दिसलें. पूर्वकालीन ऋषींनीं सांगितलेलें व बुद्धीनें कबूल केलेलें रूप भगवान् श्रीरामकृष्ण ह्या विभूतींत अवतरलें आहे, अशी नरेंद्राची खात्री झाली. ज्याचें परोक्ष वर्णन ग्रंथांनीं केलें तें रूप त्यांस प्रत्यक्षच दिसलें. समाधि हाच ज्यांचा ज्ञानार्जनाचा मार्ग व ज्यांचें भाषण म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानाचें व्यक्त रूप अशा श्रीरामकृष्णांचें त्यांस दर्शन झालें. त्यांच्या दर्शनाबरोबर परमात्मदर्शनाची उत्कंठा उद्भवली. क्षणोक्षणीं वाढणाऱ्या तापाप्रमाणें ती इच्छा बळावत गेली. ग्रंथांनाही ज्याचें पूर्ण वर्णन करतां आलें नाहीं, त्या स्वरूपांत निमग्न असणाऱ्या श्रीरामकृष्णांस ग्रंथांत काय सांगितलें आहे ह्याची खबरही नव्हती ! श्रीरामकृष्णांच्या प्रसादानें मानवी जीविताचें रहस्य विवेकानंदांनीं हस्तगत केलें.

पण इतक्यानेंच त्यांच्या कार्याची पूर्वतयारी संपली नाहीं. ह्यानंतर त्यांनीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत प्रवास करून अनेक संतमहंत आणि श्रोत्रीय ह्यांच्या भेटी घेतल्या. सामान्य मनुष्यांशींही स्वामीजी अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागत. सामान्य मनुष्यापासूनही जें घेण्यासारखें दिसलें, त्याचा त्यांनीं संग्रह केला. परमहंस श्रीरामकृष्ण आणि इतर संत ह्यांच्यापासून ज्याप्रमाणें भरतभूमीच्या प्राचीन स्वरूपाची माहिती

त्यांस मिळाली त्याप्रमाणें सध्याच्या भरतभूमीची माहिती त्यांनीं सामान्य जनांपासून मिळविली.

अशा रीतीनेंही त्यांनीं शास्त्रें, सद्गुरु आणि प्रवास ह्यांच्यायोगें ज्ञान प्राप्त करून घेतलें, तेंच त्यांनीं जगास परत दिलें. ज्ञानाच्या ह्या त्रिविधरूपाची छाया त्यांच्या सर्व भाषणांत स्पष्ट उमटलेली आहे. ह्या त्रिविधज्ञानापासून सर्व जगाचा ताप हरण करणारी दिव्य औषधि त्यांनीं निर्माण केली. ह्या तीन वार्तीनीं जो ज्ञानदीप भरतभूमीनें त्यांच्या हस्तें लाविला आहे, त्याच्या योगानें तिच्या मुलांचाच नव्हे तर सर्व सृष्टीचा मोक्षमार्ग प्रकाशित झाला आहे. ता. १९ सेप्टेंबर १८९३ पासून ता. ४ जुलै १९०२ पर्यंतच्या कालांत हें सर्व काम त्यांनीं केलें. ज्या भूमीनें हें नररत्न आम्हांस दिलें तिचा सदा विजय असो! ज्यांच्या प्रेरणेनें तें प्रकट झालें ते विजयी असोत! त्यांनीं जो संदेश दिला त्याचा अभिप्राय व त्याची व्यापकता ह्यांचें आकलन आपणास अद्यापही नीटसें झालेलें नाहीं.

रामकृष्ण – विवेकानंदशिष्या
निवेदिता

४ जुलै, १९०७

माझ्या पाठीमागें मानवी सामर्थ्याहून आणि परमेश्वरी सामर्थ्याहूनही महत्तर अशी ज्योति उभी आहे. मला कोणाच्याही मदतीची अपेक्षा नाहीं. लोकांना मदत करण्याचाच उद्योग मीं माझ्या साऱ्या आयुष्यभर केला.

—विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३३५५५ ...... वि: ......
१११४ ...... नों. दि. ......

# शिकागो येथील सर्व-धर्मपरिषदेपुढें दिलेलीं व्याख्यानें

## अमेरिकेंतील स्वागतास उत्तर

११ सप्टेंबर १८९३

माझ्या अमेरिकन भगिनींनो आणि बंधूंनो, आम्हां सर्व धर्मांच्या प्रतिनिधींचें जें तुम्हीं अंत:करणपूर्वक स्वागत केलेंत त्याबद्दल तुम्हां सर्वांचे आभार मानण्यास मला अत्यानंद होत आहे. खरी संन्यस्तवृत्ति म्हणजे काय हें आपल्या उदाहरणानें ज्यांनीं जगाच्या प्रथम निदर्शनास आणिलें त्यांच्या वतीनें, तसेंच जगांतील सर्व धर्मांची जननी असा जो हिंदुधर्म, त्या धर्मांच्या वतीनें आणि निरनिराळ्या वर्णांच्या व धर्ममार्गांच्या कोट्यवधि हिंदु लोकांच्या वतीनें मी सर्वांचे आभार मानतों.

तसेंच जगाच्या दूरदूरच्या भागांतून येथें आलेल्या प्रतिनिधींपैकीं ज्यांनीं आम्हां पौर्वात्यांच्या परमतसहिष्णुतेचा प्रसार आपापल्या देशांत करण्याचें वचन दिलें, त्या सर्व प्रतिनिधींचेही मी आभार मानतों. परधर्मसहिष्णुता आणि विश्वबंधुत्व ह्यांची ओळख साऱ्या जगास ज्या धर्मानें प्रथम करून दिली, त्या धर्मांत माझा जन्म झाला ह्याचा मला मोठा अभिमान वाटतो. सर्व धर्मांबद्दल सहिष्णुता बाळगावी इतकेंच नव्हे, तर सर्व धर्म सत्य आहेत

असा आमचा समज आहे. स्वतःच्या राष्ट्रांत मतभेदामुळें ज्यांचा छळ झाला व वित्त आणि जीवित ह्यांसही सुरक्षितपणा राहिला नाहीं, अशा सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या लोकांस ज्या भूमीनें आपल्या पोटांत घेतलें, तीच माझी जन्मभूमि आहे ह्याचा मला अभिमान वाटतो. रोमनराष्ट्राच्या जुलमानें ज्यांचा धर्म नामशेष होण्याच्या मार्गास लागला, त्या यहुदी लोकांस माझ्या जन्मभूमीनें आपल्या ओटींत घेतलें. पूर्वकाळीं सुप्रसिद्ध असलेल्या झरतुष्ट्रानुयायांसही आमच्याच देशांत आश्रय मिळाला. प्रिय बंधूंनो, माझ्या लहानपणापासून माझ्या नित्य पाठांत असलेलें एक स्तोत्र मला आठवलें तें तुम्हांस म्हणून दाखवितों. लक्षावधि हिंदु लोकांच्या नित्यपाठांत तें स्तोत्र § आहे.

रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां ।
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥

"येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धायान्विताः । तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥" असें जें श्रीकृष्णांनीं गीतेंत म्हटलें आहे त्याची सत्यता जगास पटविण्याकरितांच जणूं काय तुमची ही 'सर्वधर्मपरिषदे'ची कल्पना उदयास आली. जात्यभिमान, फाजील स्वमताग्रह आणि त्यामुळें उद्भवणारें धर्मवेड ह्यांचें पृथ्वीतलावर आज दीर्घकालपर्यंत साम्राज्य सुरू आहे. ह्या धर्मवेडामुळें किती भयंकर जुलूम झाले, केवढाले रक्तपात झाले, संस्कृतीस कैक जबर धक्के बसले आणि कैक मोठमोठीं राष्ट्रें निराशापंकांत रुतून गेलीं. जर धर्मवेड पृथ्वीवर जन्मास आलें नसतें, तर मानवजातीची आज जी स्थिति आपण अनुभवीत आहों, तीहून खास अधिक चांगली प्रगति आपणांस पाहावयास सांपडली असती; परंतु आतां ह्या धर्मवेडाचें आयुष्य भरत आल्याचीं शुभचिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. आपल्या आजच्या सभेचें काम सुरू झाल्याचें सूचक म्हणून जो मोठा घंटानाद झाला, त्यानें जणूं काय ह्या धर्मवेडाचा मृत्यु

§ श्रीशिवमहिम्नः स्तोत्रम् ।

झाल्याचेंच जगास जाहीर केलें. सर्व जग निरनिराळ्या मार्गांनीं परंतु एकाच केंद्राकडे धाव घेत आहे; त्याजमधील द्वेषबुद्धि लयास गेली आहे व आतां तरवारीच्या धारेनें अथवा इतर कोणत्याही मार्गानें परस्परांचा छळ करण्याचे दिवस उरले नाहींत, असेंच त्या घंटानादानें जगास सूचित केलें आहे.

* * * * * * * * * * * * *

## मतभेद का होतो?

१५ सेप्टेंबर १८९३

* * * * * * * * * * * * *

माझ्या पूर्वीच्या एका वक्त्यानें जगांत सर्वत्र मतभेद दिसतो ह्याबद्दल दुःख प्रदर्शित करून 'आपण हीं भांडणें बंद करूं या' अशी विनंती केली. माझ्या लहानपणीं ऐकलेली एक गोष्ट मी तुम्हांस सांगणार आहें. जगांत सर्वत्र मतभेद कां दिसतो, ह्याचें विवेचन ह्या लहानशा गोष्टीवरून बरेंच होण्याजोगें आहे.

एका विहिरींत एक बेडूक राहात होता. तो बराच काळपर्यंत त्या विहिरीचा रहिवासी होता. त्याला डोळ्यांनीं दिसत होतें कीं नाहीं हें सांगण्यास आपले सध्यांचे उत्क्रांतिवादी तेथें हजर नव्हते; परंतु त्या बेडकाला दृष्टि होती असें धरून चालण्यास नड नाहीं. विहिरींतील सर्व विषारी कीटक नाहींसे करून तिचें पाणी शुद्ध करण्याचा उद्योग तो बेडूक सदोदित करीत असे. सध्यांच्या जंतुशास्त्रज्ञांसही हेवा वाटण्याइतकें त्या बेडकानें विहिरीचें पाणी शुद्ध ठेविलें होतें. कालेंकरून तो बेडूक चांगलाच पुष्ट दिसूं लागला होता. असो. एके दिवशीं कर्मवशात् समुद्रांतला एक

बेडूक त्या विहिरींत आला; तेव्हां त्यांजमध्यें एक गमतीचा संवाद झाला.

" दादा, तूं कोठून आलास ? "

" मी समुद्रांतून आलों. "

" तुझा तो समुद्र केवढासा आहे बरें ? माझ्या ह्या विहिरीएवढा मोठा आहे काय ? " असें म्हणून विहिरींतल्या बेडकानें ह्या कांठावरून त्या कांठावर उडी मारली.

" वेड्या, तुझ्या ह्या विहिरीची आणि माझ्या समुद्राची तुलना तरी होणें शक्य आहे काय ? "

आणखी एक उडी मारून विहिरींतला बेडूक म्हणाला, " खचित, तुझा समुद्र एवढा मोठा नसेल. " दुसरा उत्तर करितो, " अहो अकलेचे खंदक, माझा समुद्र आणि तुमची विहीर ह्यांच्या तुलनेचा नुसता विचारही हास्यास्पद आहे हें मीं पूर्वीं सांगितलें तें विसरलां वाटतें ? "

विहिरींतला बेडूक मोठ्यानें ओरडून म्हणाला, " जा, जा. माझ्या विहिरीपेक्षां मोठें असें कांहीं असणें शक्यच नाहीं. तूं अगदीं खोटें बोलतोस. चल, येथून चालता हो. "

आपलीं मनुष्यांतलीं भांडणेंही बहुधा ह्याच प्रकारचीं असतात. एक हिंदु आपल्या लहानशा खबदाडांत बसून सारें जग म्हणजे तें खबदाड, असें म्हणतो. अशाच रीतीनें ख्रिस्ती, मुसलमान, वगैरे लोक आपापल्या खबदाडांत सर्व विश्व सांठविलें असल्याचें कंठरवानें सांगूं लागतात.

माझ्या अमेरिकन बंधूंनो, ह्या सर्व निरनिराळ्या खबदाडांच्या भिंती जमीनदोस्त करून सर्वांस अफाट मैदानावर आणण्याचा जो स्तुत्य उद्योग तुम्हीं आरंभिला आहे, त्याजबद्दल तुमचे किती आभार मानावे ! ह्या तुमच्या उद्योगांत परमेश्वर तुम्हांला खचित साहाय्य करील.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 33655 वि:
क्रमांक ... नों: दि:

# हिंदुधर्माचें स्वरूप

१९ सेप्टेंबर १८९३

इतिहासकालाच्या पूर्वींपासून आजपर्यंत चालत आलेले असे तीन धर्म आपणांस सांप्रत उपलब्ध आहेत. हिंदुधर्म, झरतुष्ट्राचा धर्म आणि यहुदी धर्म. यहुदी धर्माची स्थिति पाहिली तर त्याच्याच पोटांतून निघालेल्या ख्रिस्ती धर्मानें त्याची अगदीं धूळधाण करून त्यास जन्म-भूमींतूनसुद्धा हद्दपार केलें. झरतुष्ट्राच्या धर्माचीही जवळजवळ तीच अवस्था आहे. पूर्वीं झरतुष्ट्राचा धर्म होता इतकें दर्शविण्यापुरती मूठभर पारशी लोकांची संख्या सध्यां अवशिष्ट राहिली आहे. हिंदुधर्मावरही अनेक हल्ले आजपर्यंत झाले. खुद्द त्याच धर्मांत अनेक पोटपंथ उपस्थित होऊन कांहीं वेळ त्यांचें एवढें प्राबल्य माजलें कीं वृद्ध वैदिकधर्म आतां नामशेष होतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. परंतु त्या वेळीं दिसणारी पीछेहाट केवळ थोड्या वेळेपुरतीच होती. प्रचंड धरणीकंपामुळें समुद्राचें पाणी किंचित् काळ ओहटलेलें दिसावें, पण कांहीं काळानें सहस्रपटींनीं तें जोराची उसळी मारूं लागावें, तसें झालें. वैदिकधर्माचें आणि त्याच्याच पोटांतून निघालेल्या ह्या अनेक पंथांचें युद्ध संपून जरा स्थिरता आल्याबरोबर वैदिकधर्म जिवंत राहिला, एवढेंच नव्हे तर पूर्वींपेक्षां दुप्पट जोरानें फोफावूं लागल्याचें नजरेस आलें. वैदिकधर्मानें ह्या सर्व पंथांतील आणि मतांतील तात्त्विक विचार खाऊन पचवून टाकले.

ज्यांचा केवळ लहानसा प्रतिध्वनि आधुनिक भौतिक शास्त्रें काढीत आहेत, अशा विश्वव्यापी वेदान्ततत्त्वांपासून तों पौराणिक कालच्या मूर्तिपूजेपर्यंत,

तसेंच बौद्धांचा शून्यवाद आणि जैनांचा निरीश्वरवाद ह्यांतील सर्व तत्त्वविचार ज्यांत ग्रथित झाले आहेत असा सांप्रतचा हिंदुधर्म आहे. तर मग ह्या अगदीं परस्परविरुद्ध दिसत असलेल्या तत्त्वांचें कोठेंतरी केंद्रीकरण होणें शक्य आहे काय? अगदीं निरनिराळ्या दिसणाऱ्या ह्या इमारतींचा एक सर्वसामान्य पाया असणें शक्य आहे काय? इत्यादि प्रश्नांची परंपरा आपोआप उद्भवते. ह्याच प्रश्नांचीं समर्पक उत्तरें देण्याचा आज मी यत्न करून पाहणार आहें.

हिंदुधर्माची मूळ उत्पत्ति वेदांपासून झाली आहे. वेद अपौरुषेय आहेत व आदि-अंतरहित आहेत असें हिंदूंचें मत आहे. एखाद्या पुस्तकाला आरंभ नाहीं व शेवटही नाहीं ही गोष्ट तुम्हांस खचित हास्यास्पद वाटेल, परंतु वेद ह्या शब्दानें एखाद्या विशिष्ट पुस्तकाचा उल्लेख केला जात नाहीं हें आपण ध्यानांत धरा. निरनिराळ्या महात्म्यांनीं निरनिराळ्या वेळीं जे विश्वव्यापी सिद्धान्त शोधून काढले, त्या सिद्धान्तांच्या समुच्चयास वेद अशी संज्ञा आहे. न्यूटननें शोधून काढीपर्यंत गुरुत्वाकर्षणाचा नियम गतिनियमनाचें कार्य करीत होता आणि सर्व मानवजाति तो नियम विसरून गेली, तरीही तो आपलें कार्य तसेंच करीत राहील. जड जगाचें नियमन करणारे सिद्धान्तही जसे कालस्थलातीत आहेत, तसेंच चैतन्ययुक्त विश्वाचें नियमन करणारे सिद्धान्तही कालस्थलातीत आहेत.

निरनिराळ्या व्यक्तींचा परस्पर आत्मिक संबंध आणि सर्व व्यक्तींचा अथवा व्यष्टींचा समष्टीशीं अथवा विश्वात्म्याशीं संबंध ज्या सिद्धान्तांनीं नियत झाला आहे, ते सिद्धान्त त्रिकालाबाधित आहेत. ह्या सिद्धान्तांचा शोध लागण्यापूर्वीही ते अस्तित्वांत होतेच आणि उद्यां आपण ते सर्व विसरून गेलों तरीही ते राहतीलच ह्यांत यत्किंचितही संदेह नाहीं.

हे सिद्धान्त ज्यांनीं शोधून काढले त्यांस ऋषि असें म्हणतात; आणि ते पूर्णरूप – परमेश्वर स्वरूप – आहेत असें समजून आम्ही त्यांस मान देतों. ह्यांत कित्येक स्त्रियाही आहेत हें मी मोठ्या आनंदानें आपणांस सांगतों.

हे सिद्धान्त प्रत्यक्ष रूपानें अंतरहित असतील असें मानिलें तरी ते तशा रूपानें अनादि नसावे असें वाटतें. एखादा समाज अस्तित्वांत आला म्हणजे त्याच्या नियमनाकरितां कांहीं कायदे तयार होतात; आणि समाज नष्ट झाला तर त्या कायद्यांचें अस्तित्वही संपतें. आतां त्या कायद्यांतील मूलतत्त्वें जरी सर्वकाल खरीं ठरणारीं असलीं तरी त्यांचें समाजाच्या अस्तित्वानंतरचें अस्तित्व केवळ भावरूप होतें. त्या मूलतत्त्वांचें विधिरूप म्हणजे कायदे ह्यांचें अस्तित्व समाजाच्या अस्तित्वाबरोबरच संपतें; तथापि वरील सिद्धान्तांचें विधिरूप प्रत्यक्ष दृग्गोचर होतें असा काल केव्हांतरी असला पाहिजे अशी कल्पना मनांत येते; म्हणजे सृष्टि अंतरहित असली तरी अनादि नसावी अशी कल्पना मनांत येते; सृष्टि अनाद्यनंत आहे असें वेदांनीं आम्हांस सांगितलें आहे. जड विश्वांत कितीही फेरबदल झाले, तरी विश्वाच्या चैतन्योत्पादकशक्तींत कमी-अधिकपणा येत नाहीं असा सिद्धान्त भौतिक शास्त्रांनींही ठरविल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. तर मग ह्या विश्वास ज्या वेळीं सांप्रतचें मूर्तरूप नव्हतें, त्या वेळीं आज दृग्गोचर होणारी ही चैतन्यशक्ति कोठें होती? ती अमूर्तरूपानें परमेश्वराच्या ठिकाणीं लीन होती असें ह्या प्रश्नाचें उत्तर कित्येक देतात. ही कल्पना खरी मानिली, तर कांहीं वेळ जड आणि कांहीं वेळ चैतन्यात्मक अशा द्विधा स्वरूपाचा ईश्वर आहे असें मानणें भाग पडतें. ह्याचा अर्थ, परमेश्वर हा जड आणि चैतन्ययुक्त अशा भिन्न धर्मांचें मिश्रण आहे असा होतो. मिश्र पदार्थांत कालेंकरून फेरबदल होत होत त्याचें दृश्य स्वरूप नष्ट होतें, असा शास्त्रांचा सिद्धान्त आहे. हाच नियम वरील प्रकारच्या परमेश्वरस्वरूपास लागू केला, तर परमेश्वर मर्त्य आहे असा सिद्धान्त निघतो आणि हें म्हणणें तर धडधडीत खोटें आहे. ह्याकरितां सृष्टीचा अमुक आरंभकाल आणि अमुक अंतकाल असें बोटानें दाखविणें शक्य नाहीं; म्हणून सृष्टि ही अनाद्यनंत आहे हाच सिद्धान्त निघतो. दोन वर्तुळें शेजारीं शेजारीं ठेविलीं तर त्यांच्या रेषांचा आदि-अंत ठरविणें जसें अशक्य आहे, तसेंच परमेश्वर आणि सृष्टि ह्यांचा

आदि-अंत ठरविणें अशक्य आहे. परमेश्वर सदोदित चैतन्ययुक्त असून त्याच्या शक्तीनें अनंत सृष्टिमालिकांच्या घडामोडी विश्रांत नेहमीं चालू आहेत, अव्यक्तांतून व्यक्तांत येऊन कांहीं वेळ अस्तित्वांत राहून पुन्हा अव्यक्तांत लीन होणें हा सृष्टिव्यापार नेहमींचाच चालू आहे. त्यांत नवीन असें कांहींच उत्पन्न होत नाहीं. हीच गोष्ट

> ‘ ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत ॥
> ततो रात्र्यजायत ततः समुद्रो अर्णवः ॥
> समुद्रादर्णवादधिसंवत्सरो अजायत ॥
> अहोरात्राणि विदधद्विश्वस्य मिषतो वशी ॥
> सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् ॥
> दिवं च पृथिवीं चांतरिक्षमथो स्वः ॥ ’

ह्या श्रुतीनें दर्शित केली आहे. प्रत्येक ब्राह्मणाचा मुलगा हें सूक्त रोज म्हणत असतो.

आपण असें समजूं कीं तुमच्यापुढें उभा असलेला जो ‘ मी ’ त्यानें स्वतः आपण कोण ह्याच्या विचारास सुरुवात केली. मी डोळे मिटून प्रथम इतर बाह्य जग विसरतों. नंतर विचारास सुरुवात होते. ‘ मी ’ ‘ मी ’ म्हणजे कोण ? ह्या प्रश्नाचें उत्तर म्हणून प्रथम माझें शरीर माझ्या कल्पना-चक्षूंपुढें उभें राहातें. तर मग ‘ मी ’ म्हणजे केवळ जड वस्तूचें मिश्रण आहे काय ? ह्यावर आमचे वेद उत्तर देतात, “ बाबा रे, तूं जड शरीर नव्हस. तूं ह्या जड शरीरांत राहाणारें चैतन्य आहेस. ” तर मग ‘ मी ’ म्हणजे जड शरीर नव्हे. शरीर कालेंकरून मृत होईल. ‘ मी ’ मात्र मरणार नाहीं. हें शरीर मृत्पिंड झालें, तरीही ‘ मी ’ सदोदित जिवंत राहणारच. जसा ‘ मी ’ भविष्यकाळीं सदोदित राहणार तसाच गतकालींही ‘ मी ’ होतोंच. आत्मा हा कोणीं निर्माण केलेला नव्हे, कारण, उत्पन्न करणें ह्या शब्दांतच मिश्रण

करणें ह्या कल्पनेचा अंतर्भाव होतो ; आणि आज जो पदार्थ मिश्र स्थितींत आहे, त्यांतील घटक कालांतरानें भिन्न होणार हा नियम आहे. म्हणजे आत्मा जर कोणीं नवा उत्पन्न केलेला असता, तर तोही केव्हां तरी खचित मेला असता. कित्येक जन्मतःच सुखी असतात ; कित्येकांची शरीरसंपत्ति जन्मतःच चांगली असते. त्यांस कशाची कधींही वाण पडत नाहीं. कित्येक जन्मतःच दुःखी-कष्टी असतात ; कित्येक जन्मतःच लंगडे–लुळे असतात ; कित्येक जन्मतःच वेडे असतात आणि देहपातापर्यंत कसेंबसें आयुष्य कंठीत असतात. जर ह्या सर्वांचा उत्पन्नकर्ता कोणी एकच असेल तर असा भेद कां, हा प्रश्न साहजिक उद्भवतो. परमेश्वर जर न्यायी आणि दयाशील म्हणवितो, तर त्यानें उत्पन्न केलेल्या पदार्थांत इतकें जमीनअस्मानाचें अंतर कां दिसावें ? बरें, आज जे दुःखी आहेत ते पुढें केव्हां तरी सुखी होतील अशी कल्पना करावी, तर त्याची खातरजमा कोणीं केली आहे काय ? म्हणजे न्यायी आणि दयाशील परमेश्वरानें निर्माण केलेल्या सृष्टींत इतका भेद कां, हा प्रश्न शेवटीं कायमच राहतो.

‘ हें सर्व ईश्वरनिर्मित आहे ’ ह्या कल्पनेनें वरील अनेक प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागण्याचें बाजूस राहून, उलट सर्वांवर ताबा चालविणारा असा एक नवा प्राणी म्हणजे परमेश्वर आणखी निराळा कल्पावा लागतो. ह्यावरून प्रत्येक प्राण्याला सुखांत अथवा दुःखांत जन्म येण्यास जन्मापूर्वींच कांहींतरी कारणें घडलीं पाहिजेत हें उघड होतें ; आणि हीं कारणें म्हणजे त्याच प्राण्याचीं पूर्वजन्माचीं कर्में होत.

प्रत्येक प्राण्यास पूर्वसंस्कार आहेत हें कबूल केलें म्हणजे प्रत्येकाची निरनिराळी मनःप्रवृत्ति कां, ह्या प्रश्नाचा समाधानकारक उलगडा होतो. प्रत्येक प्राण्यांत आपणांस दोन भिन्नधर्मी पदार्थांचें मिश्रण आढळून येतें. ह्या पदार्थांपैकीं एक पदार्थ जड शरीर आणि दुसरा चैतन्यात्मक मन हा होय. आपणापुढें जी प्रश्नपरंपरा उभी राहते तिचा समाधानकारक निकाल जड

पदार्थांच्या शास्त्रसिद्धान्तांनीं लागण्यासारखा असेल, तर आत्म्याचें निराळें अस्तित्व मानण्याचें कारण उरत नाहीं; परंतु जड पदार्थांत विचारशक्ति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे ही गोष्ट सिद्ध करितां येत नाहीं.

प्रत्येक प्राण्याच्या शरीरावर आनुवंशिक संस्कारांचीं उघड चिन्हें दिसतात, ही गोष्ट आपणांस नाकबूल करितां येणार नाहीं; तथापि हीं चिन्हें केवळ बाह्य स्वरूपाच्या विशिष्टतेचीं दर्शक असतात. ह्यांशिवाय अंतःस्वरूपाचीं निदर्शक अशीं निराळीं चिन्हें प्रत्येक जीवात्म्यास असतात. हीं चिन्हें त्याच्या पूर्वकर्मांनुसार उत्पन्न झालेलीं असतात; आणि पूर्वीं जी इच्छा केली, ती फलद्रूप करण्यास योग्य अशा शरीराचा, आत्मा स्वीकार करतो.

एक गोष्ट पुन्हापुन्हा करण्यामुळें सवय लागते; आणि अनंत कालाच्या सवयीनें प्राण्याच्या शरीररचनेंत बदल होतो ही गोष्ट अर्वाचीन शास्त्रांसही संमत आहे. ह्यामुळें जन्मतःच कित्येक प्राण्यांस असलेल्या ज्या संवयी आढळून येतात, त्या त्यानें पूर्वीं अनेक जन्मीं पुन्हापुन्हा केलेल्या कर्मांमुळें उत्पन्न झालेल्या असतात. ह्या जन्मीं त्यानें त्या संवयी आपणांस नवीन लावून घेतल्याचा दाखला नसतो; म्हणून त्या पूर्वजन्मांतरींच्या असल्या पाहिजेत असें मानणें भाग पडतें.

'आपण म्हणतां त्या सर्व गोष्टी गृहीत धरल्या, तर माझ्या अनेक जन्मांपैकीं एकाचेंही मला स्मरण नाहीं हें कसें' अशी शंका कोणीं काढली, तर तिचें समाधान करणें फारसें कठीण नाहीं. मी ह्या वेळीं इंग्रजी भाषा बोलत आहें. ही माझी जन्मभाषा नव्हे. तरी पण माझ्या मनांत ह्या वेळीं माझ्या जन्मभाषेचा एकही शब्द येत नाहीं. म्हणजे चालू क्षणीं माझी जन्मभाषा मी विसरलों असें झालें आहे, परंतु माझी जन्मभाषा मला आठवावी इतकी नुसती इच्छा मीं केली, कीं शब्दामागें शब्द येऊन माझ्या चित्तांत एकच गर्दी करून सोडतात. ह्यावरून आठवण अथवा स्मृति ही माझ्या चैतन्यसमुद्राच्या पृष्ठभागावरील एक तरंग आहे. त्या समुद्राच्या

पोटांत अनेक वस्तु सांठविलेल्या आहेत. तुम्हीं भगीरथ प्रयत्नांनीं आपली इच्छा तितकी शक्तिमती केली, तर ह्या समुद्राच्या पोटांत तळापर्यंत शिरून पूर्वींचे अनेक जन्म पाहणें ही मोठीशी अवघड गोष्ट नाहीं.

कोणत्याही गोष्टीचा अनुभव होणें, हा तिच्या सिद्धीचा प्रत्यक्ष आणि सरळ मार्ग आहे. अमुक तत्त्वविचार खरा आहे हें प्रत्यक्ष अनुभवानेंच निःसंशय पटतें. आम्ही काय म्हणतों ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहा, असें आमच्या ऋषिवर्गानें साऱ्या जगास मुक्तकंठानें आव्हान केलें आहे. आपल्या चैतन्यसमुद्रांत बुडी कशी मारावी आणि दम न कोंडतां तळापर्यंत प्रवेश करून तेथील कोश कसा हस्तगत करावा, ही गुरुकिल्ली आम्हांपाशीं आहे.

आत्मा अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य आणि अशोष्य आहे, अशी आम्हां हिंदूंची कल्पना आहे; म्हणजे तो तरवारीनें तुटत नाहीं, विस्तवानें जळत नाहीं, पाण्यानें भिजत नाहीं आणि वाऱ्यानें कोरडा होत नाहीं असें आम्ही समजतों. प्रत्येक जीवात्मा म्हणजे एक वर्तुळ. त्या वर्तुळाचा परिघ निश्चित नाहीं, त्या त्या वेळेपुरता त्याचा मध्यबिंदु मात्र शरीरांत असतो; आणि मृत्यु म्हणजे हा बिंदु एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत जातो असें प्रत्येक हिंदु मनुष्य समजतो. तसेंच तो जड पदार्थांच्या संगानें बांधला जात नाहीं. तो अत्यंत शुद्ध, बुद्ध, मुक्त आणि पूर्ण असा आहे; परंतु कांहीं कारणानें तो जड पदार्थाशीं संयोग पावतो व भ्रमानें 'मी जड पदार्थ आहें' अशी भावना करतो.

जर आत्मा नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त आणि पूर्ण असा आहे तर तो जड पदार्थांनीं पक्का बांधिला गेल्यासारखा कां दिसतो असा प्रश्न येथें ओघानेंच उद्भवतो. पूर्ण ज्ञानरूप आत्म्यास 'मी अपूर्ण आहें' असा भ्रम तरी कां होतो? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास हिंदु तत्त्ववेत्ता कचरतो असें कोणी म्हणतात. कित्येकांनीं हिंदु अद्वैतसिद्धान्ताच्या जागीं द्वैतादि अनेक प्रकारच्या कल्पनांनीं

हे प्रश्न सोडविण्याची खटपट केली आहे ; परंतु वरील प्रश्नाचें समर्पक उत्तर कोणींही दिलें नाहीं. ह्या प्रश्नासंबंधानें हिंदु तत्त्ववेत्ता सरळ उत्तर देतो कीं अत्यंत पूर्णावस्थेला पोंचलेला आत्मा स्वतःस अपूर्ण व जड कां कल्पितो ह्याचें कारण मला सांगतां येत नाहीं. त्याला उत्तर देतां आलें अथवा न आलें, तरी त्याच्याशीं आपणांस प्रस्तुत कांहीं करावयाचें नाहीं. आपण कोण, ह्या प्रश्नाचें उत्तर आपण म्हणजे देह असें प्रत्येकजण प्रत्येक क्षणीं देत असतो, हा आपला नेहमींचा अनुभवच आहे. ' परमेश्वराची तशी मर्जी ' असेंही उत्तर कोणी कोणी देतात. परंतु वस्तुतः ' मला ठाऊक नाहीं ' ह्या उत्तरांत आणि ' ईश्वराची मर्जी ' ह्या उत्तरांत फारसा भेद नाहीं. असो.

जीवात्मा नित्य आणि पूर्ण आहे व मृत्यु म्हणजे त्याच्या निवासस्थानाचा बदल होण्याशिवाय अधिक कांहीं नाहीं, असा हिंदुशास्त्राचा सिद्धान्त आहे. पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचा परिपाक फलरूपानें आपण ह्या जन्मीं भोगीत असतों, आणि वर्तमान अथवा चालू कर्मानें पुढील जन्माची तयारी आपण करीत असतों, असाही आमचा सिद्धान्त आहे. ह्या रीतीनें जीवात्मा स्वतःच्या कर्मानुरोधानें पूर्वीपेक्षां अधिक चांगल्या अथवा अधिक वाईट अवस्थेंत जात असतो. आतां येथें आणखीही एक प्रश्न उद्भवतो. प्रचंड वादळांत ज्याप्रमाणें एखादी नौका सांपडावी व ती एका क्षणीं पर्वताइतक्या उंच लाटेच्या शिखरावर तर दुसऱ्या क्षणीं अत्यंत खोल अशा डोहाच्या तळाशीं लोटली जावी अशाच प्रकारच्या स्थितींत मनुष्याचा जीवात्मा सांपडला आहे काय ? त्या नौकेला ज्याप्रमाणें जवळपास कोठेंही आधार म्हणून दिसत नाहीं, त्याचप्रमाणें जीवात्म्याला ह्या प्रचंड संसारचक्रांतून सुटण्यास कांहींच उपाय नाहीं काय ? कारण आणि कार्य ह्या द्वयींचा तडाखा असा प्रचंड आहे कीं त्यांतून कोणीही सुरक्षितपणें बाहेर पडतोसें दिसत नाहीं. कालचक्र इतक्या जोरानें आणि निर्भयतेनें फिरतांना दिसतें कीं त्यांत निराश्रित विधवा, पोरकीं पोरें आणि उन्मत्त सत्ताधीश एकसारख्या प्रमाणानेंच चिरडले जातात. ह्या प्रचंड संसारचक्राची नुसती कल्पनाही भयजनक आहे. अशा वेळीं सृष्टींतून

अत्यंत करुणाजनक आवाज निघाला कीं 'ह्यांतून सुटण्यास मार्ग काय ?' ह्या प्रश्नास वेदरूपी उत्तर आलें कीं "बाळांनो, भिऊं नका; तुम्ही सच्चिदानंदरूपच आहां. ज्या मूळ सनातन–प्राचीन–रूपांतून तुमचा उद्भव झाला आहे, त्याचें ज्ञान तुम्हांस झालें म्हणजे ह्या जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून तुम्ही मुक्त व्हाल." माझ्या अमेरिकन बंधू-भगिनींनो, 'सच्चिदानंदाचीं अपत्यें' हें नांवच किती मनोहर आहे ! अहाहा ! आपण पापी असें तुम्ही आजवर ऐकत होतां, परंतु तुमचे हिंदुबांधव आज तुम्हांस पुण्यात्मे म्हणून हाका मारीत आहेत. तुम्ही पापी असें तुमचे हिंदुबांधव तुम्हांस कधीं स्वप्नांतही म्हणणार नाहींत. तुम्ही पूर्ण आहां, अत्यंत पवित्र आणि पूर्णानंदरूप आहां असें ते तुम्हांस सांगत आहेत. तुम्हांला पापी कोण म्हणेल ? तुम्ही पापी असें उच्चारणें हेंच महापाप आहे. सिंहाच्या बच्चांनो, उठा, जागे व्हा. आपण मेंढरें आहोंत असें तुम्ही स्वप्नांत बरळत आहां. तुम्ही जड शरीर नव्हत. शरीर हें तुमच्या नोकरासारखें आहे, तुम्ही नित्य, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त आहां.

सृष्टीच्या कायद्याच्या तडाक्यांतून सुटण्यास मार्ग नाहीं असें वेद सांगत नाहींत. हे सर्व कायदे ज्याच्या अनुरोधानें चालतात आणि जें सर्व जड आणि चैतन्ययुक्त पदार्थांस व्यापून उरलें आहे, ज्याच्या हुकमानें वारा वाहतो, अग्नि दहन करितो, मेघ वर्षाव करितात आणि मृत्यु हरण करितो असें सर्वव्यापी आणि सर्वांहून निराळें असें एक महत्तत्त्व आहे. "तूंच आमचा पिता, तूंच आमची माता, तूंच आमचा सखा, तूंच सर्व शक्तींचें अधिष्ठान, म्हणून शक्तीसाठीं तुझी आम्ही याचना करितों. ह्या विश्वाचें ओझें तूं वाहतोस; आम्हांला जीविताचें ओझें वाहण्यास सामर्थ्य दे." असें ऋषींनीं ह्या तत्त्वाचें वर्णन केलें आहे. ह्या स्वरूपावर सदैव इतकें प्रेम असावें कीं त्याहून ह्या जन्मीं अथवा जन्मांतरीं अन्य कांहींच प्रिय नाहीं असें उत्कटतेनें वाटूं लागावें. अशी उत्कट भावना बाळगणें हाच ह्या स्वरूपाच्या पूजनाचा मार्ग आहे. हा मार्ग भगवान् श्रीकृष्णांनीं पूर्णत्वानें व्यक्त करून दाखविला

आहे. श्रीकृष्ण हे प्रत्यक्ष परमेश्वरच मानवस्वरूपानें पृथ्वीवर आले, असा आमचा समज आहे. ज्याप्रमाणें पाण्यांत कमळाचें पान असतें, त्याप्रमाणें मनुष्यानें जगांत राहावें असें भगवानांनीं सांगितलें आहे. कमळाचें पान पाण्यांत असतांही जसें ओलें होत नाहीं, तसें जगांत सर्व कर्में करीत असतांही त्यांपासून उद्भवणाऱ्या सुखदुःखांपासून अलग राहावें. ‘ हातानें कर्म घडत असतां मनानें परमेश्वरचिंतन करावें ’ असा भगवान् श्रीकृष्णाचा उपदेश आहे.

आपलें बरें व्हावें अशा इच्छेनें परमेश्वराचें भजन-पूजन करणें वावगें नाहीं; परंतु अत्यंत निरिच्छ मनानें केवळ त्याच्याच प्राप्तीसाठीं त्याच्यावर निर्व्याज प्रेम करावें हें अधिक चांगलें नाहीं काय ? “ भगवंता, मला संतति, संपत्ति किंवा विद्वत्ता ह्यांपैकीं कांहींही नको. तुझ्या इच्छेनुसार वारंवार मला जन्म घ्यावा लागला तरी हरकत नाहीं. मी तुजवर निरपेक्ष भक्ति, प्रेम करीत राहीन. तशी वृत्ति जन्मोजमीं माझ्यांत राहावी एवढेंच तुजकडे माझें मागणें आहे.” अशी प्रार्थना एक भक्त करतांना आढळतो.

भगवान् श्रीकृष्णाचा युधिष्ठिर नांवाचा भक्त होता. तो समस्त आर्यावर्ताचा राजा होता. त्याच्या भाऊबंदांनीं त्याचें सर्वस्व हरण करून त्यास वनवासास धाडिलें. तो हिमालयाच्या आसमंतात् असलेल्या एका वनप्रदेशांत राहिला असतां एकदा त्याच्या राणीनें त्यास विचारिलें, “ महाराज, आपण परमेश्वराचे अनन्यभक्त असतां आपणावर मोठमोठीं संकटें कोसळतात हें कसें ? ” युधिष्ठिरानें उत्तर दिलें, “ देवी, मी ह्या हिमालयाचीं उत्तुंग आणि रमणीय शिखरें पाहून त्यांवर प्रेम करितों. असें करण्यांत त्या पर्वतराजापासून कांहीं प्राप्त करून घेण्याची माझी अपेक्षा आहे काय ? सुंदर आणि उदात्त स्वरूपाची वस्तु नजरेस पडल्यावर तिजवर प्रेम करावें असा माझा स्वभावच आहे. तसेंच जो सर्व सौंदर्याचा निधि आणि उदात्ततेचा परमावधि, त्यावर प्रेम केल्याशिवाय माझ्यानें कसें राहावेल बरें ! जगांत प्रेमास योग्य असें तें

एकच स्थान आहे. ह्या माझ्या प्रेमाच्या मोबदल्यांत मी कशाचीही अपेक्षा करीत नाहीं. त्याची मर्जी असेल तसें त्यानें मला ठेवावें. माझें त्यावरील प्रेम अगदीं निर्व्याज आहे. प्रेम ही गूळखोबऱ्यासारखी क्रय-विक्रयाची वस्तु आहे काय ? ''

आत्मा हा पूर्ण ईश्वररूप असून जड शरीरानें बद्ध असल्यासारखा दिसतो. हा पाश तुटला म्हणजे आत्मा मुक्त होतो ह्याचा अर्थ जन्म-मरण, दुःखपरंपरा आणि अपूर्णता ह्यांतून तो सुटतो, असें वेदांचें सांगणें आहे. परमेश्वराच्या कृपेवांचून मुक्तीचीं साधनें उपलब्ध होणें शक्य नाहीं; आणि आपण अत्यंत पवित्र झाल्यावांचून परमेश्वराची कृपा होणें शक्य नाहीं; त्याच्या ह्या कृपेचें स्वरूप म्हणजे शुद्ध अंतःकरणांत परमेश्वर स्वतः उदय पावतो. जें शरीर पूर्वी आपणांस केवळ जड, त्याज्य — मृत्पिंड — वाटत होतें, त्याच शरीरांत परमेश्वराचा उदय होतो. अंतःकरणांतील सर्व बरे-वाईट विचार लय पावतात. कसल्याही प्रकारच्या शंका उदय पावत नाहींत. ज्याच्या हृदयांत परमेश्वर उदय पावतो तो जन्म-मरणाच्या कारणपरंपरेंतून कायमचा बाहेर पडतो. हिंदुधर्माचें सार ह्या एका कल्पनेंत सांठविलें आहे असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. केवळ कल्पनेचीं चित्रें पाहून आणि शब्द ऐकून हिंदूंचें कधींही समाधान होणार नाहीं. आमच्या दशविध इंद्रियांच्या आटोक्याबाहेर असणारा कोणी प्राणी असला, तर तो प्रत्यक्ष नजरेस पडला पाहिजे असा हिंदूंचा हट्ट आहे. जर जड सृष्टीच्या बाहेर असणारा केवळ चैतन्यात्मक असा कोणी असेल, तर कोणाच्याही मध्यस्थीवांचून त्याची भेट घेण्यासाठीं हिंदु धडपड करितील. जर एखादा हिंदु साधु आपणांस भेटला आणि आपण त्यास विचारिलें कीं, "बावाजी, परमेश्वर खरा आहे हें खरें कशावरून ?" तर त्यावर तो उत्तर देईल कीं, "माझ्या मुला, मीं त्याला प्रत्यक्ष पाहिलें आहे. त्याची आणि माझी भेट झाली आहे." असें स्पष्टपणें सांगणारा मनुष्यच पूर्णत्वास पोहोंचला असें समजावयाचें. अमूक एक मत खरें मानावें, अथवा अमूक एक सिद्धान्त खरा समजावा असें हिंदुधर्म कधींही सांगत

नाहीं. " आम्ही जें कांहीं म्हणतों, त्याचा तूं स्वतः अनुभव घे, किंबहुना तेंच तूं स्वतः हो " असें आमच्या ऋषींचें सांगणें आहे. ह्याप्रमाणें धर्ममार्गात जे जे प्रयत्न ऋषींनीं केले, त्यांचा अंतिम हेतु मनुष्यानें स्वतःच्या एकांतिक परिश्रमानें पूर्णत्व पावावें, अत्यंत पवित्र व्हावें – परमेश्वर व्हावें असा आहे. ख्रिस्तीधर्मांतील आकाशस्थ पित्याची जी कल्पना आहे, ती कल्पना स्वतःच्या ठिकाणींच खरी करणें हें हिंदुधर्माचें अंतिम साध्य आहे. पूर्णत्व पावलेल्या योग्याची स्थिति कशी असते म्हणाल तर तो सर्वकाल पूर्णानंदाच्या स्थितींत असतो. सर्व सुखांचें माहेरघर जो परमेश्वर, त्याच्या सान्निध्यांत दुःखाचा स्पर्शही होणें शक्य नाहीं. येथपर्यंत हिंदुतत्त्वज्ञानांतील निरनिराळ्या पंथांच्या आचार्यांची एकवाक्यता आहे. निरनिराळ्या पंथांस सामान्यत्वेंकरून संमत झालेलीं अशीं तत्त्वें येथवर सांगितलीं; परंतु ' पूर्णत्व हें भिन्नभिन्न रूपाचें असणें शक्य नाहीं. तें दोन अथवा तीन रूपांनीं अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. पूर्णत्व हें नेहमीं एकच असूं शकेल. तसेंच त्याला कांहीं विशिष्ट गुणधर्म असणेंही संभवत नाहीं. ह्याकरितां जीवात्मा पूर्णत्व पावला म्हणजे पूर्णरूप जें ब्रह्म, त्या ब्रह्माशीं त्याचें ऐक्य होतें. येथें आपण स्वतः पूर्णरूप आहों – सच्चिदानंदरूप आहों – असा जीवात्म्यास अनुभव येतो. आपलें व्यक्तित्व नाहींसें होणें म्हणजे काष्ठ-लोष्टवत् होण्यासारखें आहे असें कित्येकांस वाटतें; परंतु तरवारीचा घाव पाहिलाही नाहीं अशा क्लीबानें धारातीर्थीं स्नान करणाऱ्या वीरपुरुषाच्या अंगावरील जखमांची थट्टा करावी ह्यांत नवल नाहीं. आपणांस मी त्रिवार बजावून सांगतों कीं ब्रह्मरूप होणें म्हणजे काष्ठ-लोष्टवत् होणें नव्हे. आपल्या ह्या एकाच देहांत अनुभवास येणाऱ्या चैतन्याचा सुखास्वाद किती आहे हें आपण प्रत्यहीं अनुभवितों. जर दोन–तीन देहांतील चैतन्यरस एकाच देहांत आपणांस अनुभवितां येईल, तर नेहमींपेक्षां दुप्पट-तिप्पट आनंदाचा अनुभव आपणांस होईल. मग ह्या साऱ्या दृश्य विश्वांतील चैतन्यरसांत बुडून जाणें, किंबहुना तो चैतन्यरसच

आपण होऊन जाणें, म्हणजे कशी स्थिति असेल तिची कल्पना करणें आपणांवरच सोंपवितों.

जर आपण स्वतः विश्वरूप व्हावें असें वाटत असेल, तर आपल्या ह्या क्षुद्र देहांतील 'स्वत्व' आपणांस विसरण्यावांचून गत्यंतर नाहीं हें उघड आहे. मला मृत्यूच्या जडत्वापलीकडे जावयाचें असेल, तर स्वतः केवळ चैतन्यरूप झालें पाहिजे. दुःखाचें वारें लागूं नये अशी माझी इच्छा असेल तर मला स्वतःच सुखरूप झालें पाहिजे. कोणतेंही अज्ञान माझ्या ठिकाणीं संभवूं नये अशी माझी इच्छा असेल, तर मला स्वतःला ज्ञानरूप झालें पाहिजे. ही विचारपरंपरा मीं सांगितली, ती तर्कशास्त्रासही पूर्णपणें संमत अशीच आहे. सांप्रत जें शरीर मी धारण करितों, तें कायम स्वरूपाचें नसून प्रत्येक क्षणीं बदलत आहे — नवें होत आहे — असें आज भौतिक शास्त्रें मला सांगतात. हें शरीरही कायमचें माझें एकट्याचें नसून त्यांत होणाऱ्या फेरबदलावर माझी सत्ता नाहीं; त्याला स्वतंत्र असें अस्तित्व नसून विश्वांतील अनंत दृश्य आकारांतील तो एक घटक आहे आणि म्हणून त्याचें कांहीं काल अनुभवास येणारें स्वतंत्र अस्तित्व स्वप्नस्वरूप आहे असें अर्वाचीन शास्त्रें मला मोकळ्या मनानें सांगत आहेत. माझें शरीर जर स्वतंत्रपणें माझें नव्हे हें सिद्ध झालें आहे, तर माझें चैतन्य — माझा आत्मा — स्वतंत्र आहे, विश्वचैतन्याहून निराळा आहे असें मीं कसें म्हणावें ? आणि हाच अद्वैतसिद्धान्त वेदान्तमतानें प्रतिपादिला आहे.

प्रत्येक शास्त्राचें अंतिम साध्य पाहिलें, तर एक मूलतत्त्व शोधून काढण्याचें आहे, हें मूळचें तत्त्व सांपडलें कीं त्या शास्त्राची पुढली गति बंद झालीच पाहिजे; कारण, मग तें शास्त्र पूर्णत्वास पोहोंचलें. पृथ्वीवर अनेकविध दिसणारे पदार्थ एकाच पदार्थापासून निर्माण करितां येऊं लागले, तर रसायनशास्त्राची प्रगति खुंटणार नाहीं काय ? तसेंच विश्वांत अनेकविध रीतींनीं प्रत्ययास येणाऱ्या शक्ति एका मूलशक्तीचींच अनंत रूपें आहेत असें

सिद्ध झालें तर पदार्थविज्ञानशास्त्राची प्रगति बंद झालीच पाहिजे. तसेंच मृत्यूचें साम्राज्य सर्वत्र अनुभवास येत असतां सदोदित राहणारें चैतन्य सांपडलें, कीं धर्माची वाढही संपलीच पाहिजे. प्रत्येक क्षणीं बदलत जाणाऱ्या विश्वाचें मूळ स्वरूप शोधून काढणें, अनंत रूपांनीं दिसणारे जीवात्मे एकाच विश्वात्म्याचीं भ्रामक अशीं अनंत रूपें आहेत हें सिद्ध करणें, सृष्टीच्या अनंत दृश्य रूपांत वास्तविक एकरूप पाहणें, हें धर्माचें अंतिम साध्य आहे. हें साधलें, म्हणजे धर्मशास्त्राचा शेवटच झाला. त्यापुढें धर्मशास्त्र जाऊंच शकणार नाहीं. केव्हांना केव्हां तरी सर्व शास्त्रांस हा सिद्धान्त मान्य करावाच लागले.

कशाचाही नाश होत नाहीं आणि अगदीं नवें असें कांहीं निर्माणही होत नाहीं, असा अलीकडील शास्त्रांचा शोध आहे. हीच गोष्ट आर्यांच्या भाषेंत सांगावयाची म्हणजे 'धाता यथापूर्वमकल्पयत्' ह्या शब्दांनीं सांगतां येईल. आपण कित्येक शतकें–सहस्रकें–जी गोष्ट आपली म्हणून उराशीं बाळगली तिची सत्यता अधिक स्पष्टपणानें आणि दृश्य अनुभवांच्या शास्त्रांनीं सिद्ध होत आहे, हें पाहून आम्हां हिंदूंस आनंदाचें आणि अभिमानाचें भरतें आलें तर त्यांत नवल नाहीं.

येथवर तुम्हांस हिंदुधर्माच्या अत्यंत उज्ज्वल अशा स्वरूपाची माहिती दिली. आतां हिंदूंतील अज्ञजनसमूहाच्या धर्मकल्पनांकडे वळूं. हिंदुस्थानांत अनेक देवांची कल्पना अस्तित्वांत नाहीं हें आरंभींच आपणांस सांगणें इष्ट आहे. जर आपण थोडा वेळ एखाद्या देवळांत उभे राहिलों आणि तेथील पूजेचा विधि लक्षपूर्वक पाहिला, तर तेथील इष्टदेवतेची स्तुति करितांना सर्वसाक्षित्वादि जे गुण परमात्म्यास लाविले आहेत, त्याच गुणांची योजना तेथील भक्त आपल्या इष्टदेवतेवर करीत असल्याचें आपणांस आढळून येईल. जर अशी स्थिति आहे, तर हिंदुस्थानांत अनेक देव मानण्यांत येतात ह्या म्हणण्यांत काय तात्पर्य आहे? गुलाबाला निरनिराळीं अनेक

नांवें दिल्यानें त्याच्या सुवासांत कांहीं उणीव येते काय? नुसतीं निराळीं नांवें देणें ह्याचा अर्थ निराळें मत प्रतिपादन करणें असा होत नाहीं.

माझ्या लहानपणीं एक ख्रिस्ती उपदेशक एका लहानशा जमावापुढें व्याख्यान देत असतां तेथील मंडळीस उद्देशून म्हणाला, " अहो, जर मीं तुमच्या मूर्तीवर माझी काठी मारून ती मूर्ति फोडून टाकली तर ती माझें काय वाकडें करणार आहे ? " ह्यावर मंडळींतील एकानें त्या पाद्र्यास उलट प्रश्न विचारला, " पाद्रीबुवा, तुमच्या आकाशांतील बापाला जर मीं शिव्या दिल्या, तर तो तरी माझें काय करील ? " पाद्री म्हणाला, " तूं मेल्यावर तो तुला शासन करील. " हिंदूनें ह्यावर म्हटलें, " तूं मेलास म्हणजे माझी मूर्ति तुला शासन करील. "

ज्यांना तुम्ही ख्रिस्ती लोक मूर्तिपूजक असें म्हणतां आणि मूर्तिपूजा म्हणजे पापाचा मार्ग समजतां, त्याच मूर्तिपूजकांत अत्यंत पवित्र असे महात्मे मीं पाहिले आहेत. इतकी पवित्रता माझ्या अवलोकनांत दुसऱ्या कोठेंही आली नाहीं; असें असतां मूर्तिपूजा म्हणजे पापाचा मार्ग हे शब्द उच्चारतांना बराच विचार करावा लागेल. पापांतून अत्यंत पावित्र्याची उत्पत्ति शक्य आहे काय ह्याचा तुम्हीच विचार करा.

धर्मभोळेपणा हा मनुष्याच्या उन्नतीच्या आड येणारा शत्रु आहे, ही गोष्ट मी कबूल करतों; परंतु धर्मवेडा हा त्याहूनही भयंकर शत्रु नाहीं काय ? ख्रिस्ती मनुष्याला प्रार्थनेसाठीं देऊळच कशास पाहिजे ? क्रुसाच्या खुणेंत पवित्रता कशी आली ? प्रार्थना करतांना आकाशाकडे डोळे लावण्याची काय गरज आहे ? जुन्या कॅथॉलिक पंथाच्या ख्रिस्त्यांस अनेक मूर्तींची आवश्यकता कां वाटली ? परमेश्वराचें गुणवर्णन करतांना प्रॉटेस्टंट ख्रिस्ती अनेक मूर्तींची कल्पना मनांत आणतात ती कां ? माझ्या प्रिय बंधूंनो, श्वासोच्छ्वास केल्यावांचून जगणें जसें अशक्य, तसें कोणत्या-ना-कोणत्या तरी रूपानें गुणांची मानसिक मूर्ति उत्पन्न केल्याशिवाय त्या गुणांचें चिंतन

करणें अशक्य आहे. आपलें चित्त केवळ निराकारांत लीन होत असल्याचा आपणांस केव्हांही अनुभव येत नाहीं. आपणांस चोहोंकडे जड विषय आणि गुण ह्यांची संलग्न अवस्था पाहाण्याची संवय लागलेली आहे. ह्यामुळें जड विषय मनांत आणल्यावांचून गुण अथवा गुणावांचून जड विषय ह्यांचें चिंतन करणें आपणांस शक्य नाहीं. ह्याच तत्त्वावर हिंदूंनीं मूर्तिरूपानें गुणांना दृश्य स्वरूप दिलें आहे. मूर्ति ह्या गुणांचें स्मरण देणाऱ्या खुणा आहेत. सद्गुणैकमूर्ति परमेश्वराकडे चित्त लागावें आणि तें इकडे-तिकडे भटकूं नये म्हणून मूर्तीची योजना आहे. केवळ मूर्ति म्हणजे परमेश्वर नव्हे ही गोष्ट आपल्याइतकीच प्रत्येक हिंदूस पक्की ठाऊक आहे. आपण प्रार्थना करतांना " परमेश्वरा, तूं सर्वव्यापी आहेस " असें म्हणतां, ह्याचा वास्तविक अर्थ काय ? आपण अनुभवानें हें म्हणत असतां काय ? आकाशाचा अनंत विस्तार अथवा समुद्राचा प्रचंड विस्तार आपल्या मनांत त्या वेळीं येत नाहीं काय ? म्हणजे सर्वव्यापी ह्या शब्दाचें हें मूर्तरूपच झालें नाहीं काय ?

वास्तविक विचार केला, तर ह्यांत मनुष्यस्वभावास विसदृश असें कांहीं नाहीं. हें आपल्या ध्यानांत येईल. आमच्या मनोभूमिकेची रचनाच अशी आहे कीं कोणत्या तरी दृश्य पदार्थाशीं जोडल्याशिवाय केवळ गुणांचें चिंतन आम्हांस करतांच येत नाहीं. मग तो दृश्य पदार्थ समुद्र असो, आकाश असो, अग्नि असो, ख्रिस्ती देऊळ असो, क्रूसचिन्ह असो, अगर मशीद असो. ईश्वरविषयक सर्व उच्च कल्पना हिंदूंनीं आपल्या विशेष प्रकारच्या मूर्तींशीं जोडल्या आहेत इतकेंच. आपण निराकाराची स्तुति करतों म्हणून मोठ्या आढ्यतेनें इतरांस तुच्छ समजणारे लोक अद्यापि देवळाच्या चारी भिंतींच्या आंतच कोंडले असल्यासारखे दिसतात. त्यांची अत्यंत मोठी कल्पना म्हटली, तर आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस मदत करावी इतकीच दिसते. मनुष्याला प्रत्यक्ष परमेश्वर होणें शक्य आहे, ह्या कल्पनेचा नुसता स्पर्शही त्यांस झाल्याचें दिसत नाहीं. मूर्तिपूजकांची मुख्य कल्पना

म्हटली तर स्वयमेव परमेश्वर होण्याची आहे. एखादें देऊळ, एखादी मूर्ति, अथवा एखादें पुस्तक, हीं केवळ साधनरूप आहेत. ह्यांच्या साहाय्यानें एकेका कल्पनेचा ग्रास करून शेवटीं परमात्म्याची भेट घ्यावयाची आहे ही गोष्ट हिंदुमात्रास ठाऊक आहे. अमूक मतें संमत आहेत असें म्हटलें म्हणजे धार्मिक जीवनाचा परमावधि झाला असें कोणाही हिंदूस वाटत नाहीं. परमेश्वराची भेट होईपर्यंत मध्यें कोठें थांबण्यास जागाच नाहीं असें त्यास वाटतें. बाह्योपचारांनीं मूर्तिपूजा करणें ही अगदीं शेवटची पायरी आहे; प्रार्थना ही दुसरी पायरी आहे; आणि स्वतः परमेश्वर होणें हें मुक्कामास पोहोंचणें आहे, असें श्रुतींनींही सांगितलें आहे. एखादा मूर्तिपूजक आपल्या मूर्तीपुढें बसला असतां म्हणतो, " सूर्याचा प्रकाश, चंद्राचा प्रकाश, ताऱ्यांचा अथवा अग्नीचा प्रकाश, ह्यांपैकीं एकही तुझें स्वरूप दाखवूं शकत नाहीं. हे सर्व तुझ्या प्रकाशानें प्रकाशतात." हिंदु स्वतः मूर्तिपूजक असले, तरी दुसऱ्या कोणीं दुसऱ्या पद्धतीनें पूजा केली असतां त्यांस ते पापी समजत नाहींत, अगर त्यांचा पूजनमार्ग खोटा असेंही म्हणत नाहींत. मूर्तिपूजा ही खालची पायरी असें म्हणून ती करणारास अधिक श्रेष्ठ म्हणविणाऱ्यांनीं हसावें हें योग्य आहे काय? एखाद्या तरुणानें लहान मुलास तें लहान म्हणून हसावें अथवा वृद्धानें तरुणास तरुण म्हणून हसावें अशाच बालिशतेचा हा प्रकार आहे. मूर्तिदर्शनाबरोबर मनुष्यांच्या अंतःकरणांत जर सात्त्विक भाव उत्पन्न होत असतात, तर मग मूर्तिदर्शन करणें पाप आहे कीं काय, ह्याचा आपणच विचार करा. अशा मनुष्याला पुढें मूर्तिपूजेची जरूर वाटेनाशी झाली, तरी तो मूर्तिपूजकास खचित नांवें ठेवणार नाहीं. आपण पूर्वीं कांहीं चूक करीत होतों – कांहीं वाईट गोष्ट करीत होतों – ती आतां सुधारावयाची आहे अशी हिंदूंची कल्पनाच नाहीं. धर्ममार्ग म्हणजे सत्याच्या अंधुक कल्पनेंतून निघून अत्यंत उज्ज्वल – प्रकाशमय – अशा सत्यांत प्रवेश करावयाचा मार्ग अशी हिंदूंची कल्पना आहे. आपण मूळचे पापी आहों असें हिंदु लोक समजत नाहींत, तर

आपण अत्यंत पुण्यमय व पूर्णस्वरूपाचीं अनंतरूपें आहोंत असें ते समजतात. ह्यामुळें अगदीं रानटी मनुष्याच्या धर्ममार्गापासून तों थेट वेदान्ताच्या अद्वैतसिद्धान्तापर्यंत सर्व मार्ग निरनिराळे दिसणारे, परंतु एकाच केंद्राकडे पोहोंचणारे रस्ते आहेत, असें हिंदु मनुष्य समजतो. भिन्न परिस्थिति आणि भिन्न देश-काल-वर्तमान ह्यांस अनुसरून हे निरनिराळ्या प्रकारचे मानवी प्रयत्न एकाच सत्याच्या शोधांत गुंतले आहेत. हे निरनिराळे लहान-मोठे गरुडपक्षी एकाच सूर्यबिंबाकडे धाव घेत आहेत. त्यांतील लहान पक्षी विश्रांतीसाठीं एखाद्या मुक्कामावर क्षणभर थांबतात, कांहीं कालानें पुन्हा उडूं लागतात व शेवटीं बिंबावर सर्व एकत्र जमतात असा हिंदूंचा सिद्धान्त आहे.

दृश्य विश्व अनेकतेनें भासलें, तरी शेवटीं त्यांत एकतानता आहे असें हिंदूंनीं जाणलें आहे. आपलीं विशिष्ट मतें म्हणून तीं साऱ्या समाजास एकसहा स्वीकारावयास लावावयाचीं असा इतर धर्मांचा कटाक्ष आहे. जणूं काय एकच आकाराचा अंगरखा सर्वांनीं घातला पाहिजे असा त्यांचा हट्ट आहे. मग तो अंगास बरोबर बसो अगर न बसो. ज्याच्या अंगास बरोबर बसत नसेल त्यानें उघडें भटकावें. प्रतिमा अथवा पुस्तकें हीं केवळ मूलरूप व्यक्त करण्याचीं साधनें आहेत एवढेंच हिंदूंचें म्हणणें आहे. ह्या साधनांचा प्रत्येकानें अवश्य उपयोग केलाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष नाहीं. ह्याचा उपयोग न करणारा मूर्ख असेंही त्यांचें म्हणणें नाहीं. तसेंच ह्या साधनांचा उपयोग केला म्हणजे पाप घडतें असेंही त्यांस वाटत नाहीं.

येथें आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. मूर्तिपूजेंत कांहीं भयंकर विधि आहे असा कोणीं आपला समज करून दिला असल्यास तो सर्वथैव चुकीचा आहे. हिंदूंतही इतर लोकांप्रमाणेंच अनेक दोष आहेत; परंतु आपण एवढें पक्कें लक्षांत ठेवा कीं त्यांच्या सदोष कल्पनांचें पर्यवसान इतरांस त्रास देण्यांत झालें नाहीं. सती जाणें पुण्यकारक म्हणून एखादी स्त्री पतीच्या शवाबरोबर आपणास स्वतःस जाळून घेईल, परंतु कांहीं शतकां-

पूर्वीं धर्माच्या नांवाखालीं मनुष्यास जिवंत जाळण्याचे जे अत्याचार युरोपांत घडले, तसली गोष्ट हिंदुस्थानांत स्वप्नांतही घडून येणें शक्य नाहीं. कित्येक ख्रिस्ती लोकांनीं पूर्वकालीं डाकिणी म्हणून कित्येक स्त्रियांस जिवंत भस्मसात केलें हें आपणांस इतिहासावरून कळून येतें. हें पातक ख्रिस्ती धर्माच्या माथीं मारणें जसें बरोबर नाहीं, तसेंच कांहीं हिंदूंनीं धर्माच्या खोट्या कल्पनांनीं अत्याचार केले, तर त्याचा दोष हिंदुधर्मावर लादणें बरोबर होणार नाहीं.

जगांतील यच्चयावत् धर्मपंथ परमेश्वराकडे जाण्याचे निरनिराळे रस्ते आहेत असें हिंदूंचें मत आहे. त्यांत अनेक प्रकारचे मतभेद दिसले, तरी परिस्थितीप्रमाणें एकच सत्य अनेक रूपें धारण करितें असें हिंदु म्हणतात. एकाच सूर्याचे किरण निरनिराळ्या रंगाच्या कांचेंतून आल्यामुळें जसे भिन्नवर्णी आहेत असें वाटतें, तसेंच धर्मपंथांचेंही आहे. इतके भिन्न आणि परस्परांस विसदृश असे पंथ असणें अनिष्ट नसून उलट इष्टच आहे. त्यामुळें आपणास काय पाहिजे ह्याची बरोबर निवड करण्यास प्रत्येकास अवसर सांपडतो. बाह्यरूपें निराळीं दिसलीं, तरी अंतःस्वरूप व अंतिम हेतु हीं एकच आहेत. "मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय। मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव॥" तसेंच "यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥" असें जें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे त्याचाही अर्थ हाच आहे. अनेक युगांच्या परंपरेनें निर्माण झालेल्या ह्या हिंदुधर्माचा मानवजातीवर केवढा उपकार झाला आहे! परमतासहिष्णुता हिंदूस आजपर्यंत केव्हांही शिवली नाहीं. "फक्त हिंदूंसच मुक्ति मिळेल" अशा आशयाचें एक तरी वाक्य साऱ्या हिंदुधर्माच्या ग्रंथांतून काढून दाखवा, असें साऱ्या जगास मी आव्हान करितों. उलट महर्षि व्यास म्हणत आहेत कीं, "आमच्या जातीच्या आणि धर्माच्या बाहेरचे असे अनेक लोक पूर्णत्वास पावलेले मीं पाहिले आहेत."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33455 वि: ...
... नों. दि. ...

प्रिय भगिनी–बंधूंनो, ह्याप्रमाणें हिंदुधर्माचें सामान्यरूप काय आहे ह्याची माहिती मीं आपणांस दिली आहे. हिंदूंनीं आजपर्यंत केलेले बेत फलद्रूप झाले नसतील, त्यांच्या हातून अनेक चुकाही झाल्या असतील; परंतु सर्व जगाचा कधीं काळीं जर एकधर्म होणें शक्य असेल, तर तो कालस्थलाबाधित अशा रूपाचाच असला पाहिजे. त्यांतील तत्त्वें विशिष्ट स्थलीं अथवा विशिष्ट कालींच खरीं ठरतील अशीं नसावीं. जाती अथवा वर्ण ह्यांचा यत्किंचितही भेद मनांत न आणतां सर्वांस सारखाच ज्ञानमार्ग दाखविणारा असा तो धर्म असला पाहिजे. तसेंच अत्यंत पुण्यवान् अथवा अत्यंत पापी ह्यांस सारखीच दया दाखविणारा तो धर्म असला पाहिजे. ब्राह्मणाचा धर्म, बुद्धाचा धर्म, येशू ख्रिस्ताचा धर्म आणि महंमदाचा धर्म ह्या सर्वांचें स्वरूप जेथें आत्यंतिक ऐक्यानें नजरेस येईल, असा तो धर्म असला पाहिजे. पशूंपेक्षां फारसे अधिक श्रेष्ठ नाहींत अशा रानटी लोकांपासून तों परमेश्वरस्वरूपाच्या जवळ-जवळ पोंचलेल्या मनुष्यापर्यंत सर्वांस सारख्याच ममतेनें त्यानें पोटाशीं धरलें पाहिजे. प्रत्येक मनुष्यांत गुप्तपणें ईश्वरत्व वास करीत आहे, हें त्याचें खरें स्वरूप त्याच्या अनुभवास आणणें, हेंच धर्माचें काम असलें पाहिजे. आपण असा धर्म जगास दिलात तर सारें जग आपलें अनुयायी होईल. अशोकानें अशा एकीकरणाचा प्रयत्न केला, परंतु तो एकट्या बौद्धधर्मासच चिकटून राहिला. बादशहा अकबर ह्यानें ह्या गोष्टीचा उपक्रम केला होता, परंतु त्याचें प्रमाण अगदींच अल्प होतें. हें काम अमेरिकेनेंच शेवटास न्यावें असा संकेत दिसतो.

हिंदूंचें ब्रह्म, झरतुष्ट्रांचा अहूर-मझ्द, बौद्धांचा बुद्ध, यहुद्यांचा यशाया आणि ख्रिस्ती लोकांचा आकाशस्थ पिता, हे आपल्या ह्या प्रयत्नास आशीर्वाद देवोत, धर्मकल्पनेचा तारा पूर्वेस उदय पावला व पश्चिम दिशेकडे संक्रमण करूं लागला. केव्हां त्याचा प्रकाश अंधुक तर केव्हां देदीप्यमान् दिसत होता. अशा रीतीनें आपला प्रवास संपवून तो पुन्हा पूर्वदिशेकडे

येत-येत सँपो नदीच्या कांठीं आला आहे. येथें त्याच्या तेजाची परमावधि झाल्याचें दिसत आहे.

स्वतंत्रतेची जन्मभूमि जी कोलंबिया तिचा जयजयकार असो! ज्या कोलंबियानें आपले हात आपल्या शेजाऱ्याच्या रक्तांत कधींही माखले नाहींत, ज्या कोलंबियानें शेजाऱ्यांना लुटून आपले खिसे कधींही भरले नाहींत, त्या कोलंबियाला मानवी कुलाच्या अत्युच्च संस्कृतींत साहेब नौबतीचा मान मिळावा हें योग्यच आहे. शांतताचिन्हांकित जरीपटका घेऊन कोलंबिया आज सर्व राष्ट्रांच्या आघाडीस चालत आहे! कोलंबिया, तुझा त्रिवार जयजयकार असो!

## हिंदुलोकांस धर्मज्ञानाची उणीव नाहीं

२० सेप्टेंबर, १८९३

आपल्या वर्तनावर कांहीं टीका झाली तर ती सहन करण्यास प्रत्येक खऱ्या ख्रिस्तानुयायानें नेहमीं तयार असलें पाहिजे. मी आज तशा प्रकारची टीका करणार आहें आणि तीबद्दल आपणांस कांहीं विषाद वाटणार नाहीं असें मला वाटतें. ख्रिस्ती धर्माचे अनुयायी नाहींत अशा लोकांच्या आत्मोद्धारासाठीं आपण जगभर उपदेशक पाठवितां, त्याऐवजीं आपण प्रथम त्यांचें मृत्यूपासून रक्षण करण्याची तजवीज केली तर अधिक बरें होणार नाहीं काय? हिंदुस्थानांत लहानसा दुष्काळ पडल्याबरोबर हजारो लोक मृत्युमुखीं जातात. आपण ख्रिस्ती म्हणविणारांनीं त्यांस वांचविण्याचा कांहीं

प्रयत्न केला आहे काय ? साऱ्या हिंदुस्थानभर ख्रिस्ती देवळें उभारण्याबद्दल आपण फार दक्ष आहां, परंतु हिंदुस्थानला आज धर्मज्ञानाची गरज आहे असें नाहीं. क्षुधेनें त्याचें पोट आणि पाठ ह्यांची एकी झाल्यामुळें भाकरीचा एखादा तुकडा मिळेल ह्या आशेनें तो टाहो फोडीत आहे. तो भाकरी मागत असतां त्याच्या पदरांत धोंडा बांधण्यासारखें आपण करीत आहां. भुकेनें प्राण व्याकुळ होत असतां कोरड्या धर्मज्ञानानें त्याची भूक भागवूं पाहणें म्हणजे खरोखर त्याचा अपमान करण्यासारखें आहे. हिंदुस्थानांत केवळ पैशासाठीं धर्मज्ञानाचा जर कोणीं उद्योग केला तर लोक त्यास खरोखर शेणमारा करतील. माझ्या बुभुक्षित बांधवांकरितां मीं येथें याचना केली, परंतु ख्रिस्ती देशांत ख्रिस्ती लोकांकडून इतर जातींच्या लोकांकरितां मदत मिळविणें किती कठिण आहे, ह्याचा मला चांगला अनुभव आला.

## बौद्धधर्म हा हिंदुधर्माची पुरवणी आहे

२६ सेप्टेंबर, १८९३

मी बौद्धधर्मी नाहीं हें आपणांस विदितच आहे; तथापि मी भगवान् बुद्धाचा खरा अनुयायी आहें हें मात्र खरें आहे. चिनी, जपानी अथवा सिलोनी लोक बुद्धानुयायी म्हणवितात, परंतु हिंदु लोक त्याला प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार मानून त्याची पूजा करितात. बौद्ध-धर्मासंबंधीं कांहीं टीकात्मक भाषण मी आज करणार आहें, परंतु त्यांत भगवान् बुद्धावर टीका करण्याचा माझा उद्देश नाहीं. ज्याला परमेश्वरस्वरूप समजून

मी भजतों त्याजवर टीका करण्यास मी धजेन तरी कसा? त्या वेळीं जे बुद्धानुयायी झाले, त्यांस बुद्धाचें खरें ज्ञान लाभलें नाहीं इतकेंच आमचें म्हणणें आहे. यहुदी धर्म आणि ख्रिस्ती धम ह्यांत जें परस्पर नातें आहे, तशाच प्रकारचें नातें वैदिक हिंदुधर्म आणि बौद्धधर्म ह्यांमध्यें आहे. येशू ख्रिस्त यहुदी होता, तसाच शाक्यमुनि हिंदु होता. यहुदी लोकांनीं येशू ख्रिस्ताचा अत्यंत छळ केला; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं त्यास क्रूसावर खिळून ठार मारलें. परंतु हिंदूंनीं शाक्यमुनि हा अवतार आहे असें मानून त्याचें पूजन केलें. शाक्यमुनीनें अगदीं नवें असें कांहीं सांगितलें नाहीं, तर वैदिकधर्मतत्त्वेंच त्यानें अधिक स्पष्ट रीतीनें प्रकट केलीं, इतकेंच आम्हां हिंदु लोकांचें म्हणणें आहे. यहुदी धर्म नष्ट करण्याकरितां नव्हे, तर तो प्रत्यक्ष आचरून दाखवून त्यांत दिसणाऱ्या उणीवा भरून काढण्याकरितां ज्याप्रमाणें येशू ख्रिस्ताचा अवतार झाला, त्याच प्रकारच्या कार्यासाठीं शाक्यमुनि अवतरला. येशू ख्रिस्ताची खरी ओळख तत्कालीन इतर लोकांस जशी पटली नाहीं, तशीच बुद्धाची खरी ओळख खुद्द त्याच्या अनुयायांसही बरोबर पटली नाहीं. शाक्यमुनि हिंदूधर्माचा विध्वंस करण्याकरितां अवतरला नाहीं, त्याची पूर्तता करण्याकरितां तो अवतरला. धर्माचा प्रत्यक्ष आचार कसा असतो आणि त्याच्या तत्त्वांना दृश्यस्वरूप कसें द्यावें, हें दाखविण्यासाठीं त्याचें आगमन घडलें.

हिंदुधर्माचे प्रमुख असे दोन भाग आहेत : कर्मकांड आणि ज्ञानकांड. होमहवनादि क्रियांचा विचार कर्मकांडांत प्रधान असून, ज्ञानकांडांत तत्त्वविचार सांगितला आहे. संन्यस्तवृत्तीनें राहणारे लोक केवळ ज्ञानकांडाचाच विचार करतात.

ह्या धर्मविचारांत जातिभेदास फांटा दिलेला आहे. अत्यंत उच्च जातीचा अथवा अगदीं नीच जातीचा असा कोणीही मनुष्य असला, तरी त्यागी होण्यास त्यास हिंदुस्थानांत आडकाठी नाहीं. दोघेही खरे त्यागी झाले तर त्यांच्यांत कांहींच भेद मानण्यांत येत नाहीं. धर्ममार्गांत जातीचा अथवा

वर्णांचा भेद नाहीं. जात ही केवळ व्यावहारिक आचाराची बाब आहे. शाक्यमुनि स्वतः त्यागी होता. वेदांतील धर्मज्ञान कालांतरानें गुप्त झालें होतें, तें त्यानें पुन्हा उज्ज्वल स्वरूपानें लोकांस दाखविलें. अत्यंत कनिष्ठ दर्जांच्या मनुष्यापर्यंत हें ज्ञान पसरावें अशा उदार बुद्धीचा तो होता. धर्मप्रचारक तयार करून त्यांच्याकडून लोकांस धर्मज्ञानाचा उपदेश करण्याचा मार्ग बुद्धानेंच प्रथम प्रचारांत आणला.

प्रत्येक मनुष्याबद्दल आणि विशेषेंकरून प्रत्येक गरीब आणि अज्ञानी मनुष्याबद्दल त्याच्या मर्मांत अनुपमेय प्रेम वसत होतें. हाच त्याच्या एकंदर चरित्रांतील अत्यंत उज्ज्वल आणि रमणीय असा विशेष होय. कित्येक ब्राह्मण त्याचे शिष्य झाले होते. बुद्धाचा जन्म झाला त्या वेळीं संस्कृत भाषा प्रचारांतून गेली होती. ती फक्त पुस्तकरूपानें जिवंत राहिली होती. त्यानें सांगितलेलें धर्मज्ञान संस्कृतांत ग्रथित करावें अशी त्याच्या ब्राह्मणशिष्यांस इच्छा होऊन तसें करण्यास त्यांनीं आपल्या गुरूची परवानगी मागितली. त्यावर बुद्ध म्हणाला, " माझा जन्म माझ्या गरीब आणि अज्ञान बांधवांसाठीं झाला आहे; ह्याकरितां त्यांस त्यांच्याच भाषेच्या द्वारा धर्मज्ञान सांगणें मला इष्ट वाटतें. " ह्यामुळें बौद्धधर्माची बहुतेक पुस्तकें त्या वेळच्या प्रचलित भाषेंत लिहिलेलीं आढळतात.

तत्त्ववेत्त्यांनीं कोणत्याही मताचें प्रतिपादन केलें अथवा मानसशास्त्रवेत्त्यांनीं कोणतेही सिद्धान्त सिद्ध केले तरी जोंपर्यंत मृत्यूचें साम्राज्य ह्या भूतलावर कायम आहे, जोंपर्यंत मानवी अंतःकरणांतून भीतीचें समूळ उच्चाटन झालें नाहीं, आणि जोंपर्यंत दुर्बलतेमुळें आपणांस कोणाची तरी मदत असावी ही इच्छा मानवी हृदयांत शिल्लक आहे, तोंपर्यंत परमेश्वरावरील भरंवसा जगांतून नष्ट होणारच नाहीं.

बुद्धानुयायांनीं आपल्या धर्मप्रचाराच्या कार्यांत दोन मोठ्या चुका केल्या. वेदान्तावर हल्ले करून जुन्या इमारतीचा पाया ढांसळविण्याचा त्यांनीं यत्न केला; परंतु वेदांवर हल्ला करून यश मिळवूं पाहाणें आणि डोक्यानें खडक

फोडण्याचा प्रयत्न करणें हीं सारख्याच शहाणपणाचीं कामें आहेत. हीच त्यांची पहिली मोठी चूक झाली. तसेंच सामान्य कर्मसंगी जनतेचा परमेश्वरावरील भरंवसा नाहींसा करण्याचा त्यांनीं यत्न केला ही दुसरी मोठी चूक त्यांजकडून घडली. ह्याचा साहजिक परिणाम, बौद्धधर्माचा हिंदुस्थानांतून नायनाट झाला हा होय. ज्या देशांत बौद्धधर्माचा जन्म झाला, त्याच आर्यावर्तांत आपणास बौद्ध म्हणवून घेणारा एकही इसम आज सापडणार नाहीं.

परंतु ह्यामुळें ब्राह्मणी धर्माचें मात्र थोडेंसें नुकसान झालें ही गोष्ट खरी. बौद्धधर्मामुळें खालच्या वर्गांत झपाट्यानें सुधारणा झाली. लोकांत परस्परसहानुभूति आणि औदार्य ह्यांची वाढ झाली. त्या वेळच्या एका ग्रीक प्रवाशानें – " हिंदूंत खोटें बोलणारें कोणी आढळत नाहीं व परद्वार करणारी अशी एकही हिंदु स्त्री आढळत नाहीं. " – असें वर्णन लिहून ठेवलें आहे. ह्यावरून त्या वेळचा हिंदुसमाज बुद्धाच्या अवतारामुळें किती उच्च पदवीस पोहोंचला होता ह्याची कल्पना होते. हेंच कार्य पूर्वीं ब्राह्मण-धर्म करीत होता; परंतु त्याचें कार्य बुद्धावतारानें उचलल्यामुळें, तो धर्म कांहीं काल मागें पडला ही गोष्ट खरी.

तात्त्विकदृष्ट्या हिंदुधर्म आणि बौद्धधर्म ह्यांचा इतका एकजीव झाला आहे कीं, एकावांचून दुसऱ्यास जिवंत राहाणें शक्य नाहीं. ब्राह्मणांनीं पूर्णतेस आणलेल्या तत्त्वविचारांचें साहाय्य नसल्यास बौद्धधर्म मृतप्राय होणारच. तसेंच प्राणिमात्रावर दया करणें हा जो बौद्धधर्माचा विशेष, त्याचें ब्राह्मणांनीं ग्रहण केल्याशिवाय त्यांच्या कोरड्या ब्रह्मज्ञानाचें तेज कसें पडणार? ह्या दोन धर्मांनीं निर्माण करून दिलेल्या दोन तत्त्वांचें एकीकरण कायम होतें, तोंवर हिंदुसमाज संस्कृतीच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झालेला दिसत होता; परंतु दुर्दैवानें हीं दोन तत्त्वें भिन्न झालीं आणि हिंदुसमाजाची भव्य इमारत कडाडून कोसळली. हिंदुस्थान आज तीस कोटि भिकाऱ्यांनीं व्यापिला आहे ह्याचें कारण ही विभक्तताच. आज हजारों वर्षें

आर्यभूमि वाटेल त्या जेत्याची दासी बनून राहिली आहे ह्याचेंही कारण हेंच. प्रिय बंधूंनो, इतका वेळ मीं सांगितलेली गोष्ट ध्यानांत धरून ब्राह्मणांची तेजस्वी बुद्धिमत्ता आणि त्या थोर जगद्गुरूच्या अंतःकरणांत वास करणारी कणव, उदारता, माणुसकी जागृत करणारी अपार शक्ति ह्यांचें आपण सम्मीलन घडवून आणूं या.

## धर्मपरिषदेंतील शेवटचें व्याख्यान

२७ सेप्टेंबर, १८९३

कल्पनासृष्टीच्या उदरांतून सुरक्षितपणें बाहेर पडून 'सर्व-धर्म-परिषद्' प्रत्यक्ष सृष्टींत अवतरली. ही परिषद् यशस्वी व्हावी म्हणून ज्यांनीं अहेतुक चित्तानें अत्यंत परिश्रम केले, त्यांच्या श्रमांचें दयाळू परमेश्वरानें चीज केलें ज्यांच्या उदार अंतःकरणांत ह्या परिषदेची कल्पना प्रथम उद्भवली व ज्यांनीं तिला प्रत्यक्ष रूप दिलें, त्यांचेही आभार मानणें उचित आहे. ज्यांनीं भाषणें करून आपलें मनौदार्य व्यक्त केलें, त्यांचेही आभार मानले पाहिजेत. माझ्या भाषणाचें कौतुक करून ज्यांनीं मला प्रोत्साहन दिलें, त्या माझ्या प्रिय श्रोतृगणांचेही मी आभार मानितों. त्याचप्रमाणें प्रसंगास अनुचित अशीं भाषणें कोणीं केलीं असलींच तर त्यांचेही आभार मानणें अवश्य आहे; कारण त्यामुळें तुलनात्मक दृष्टीनें उचित भाषणांचें तेज अधिक उज्ज्वलतेनें पडण्यास मदतच झाली असेंच म्हटलें पाहिजे.

सर्व धर्मांचें एकीकरण कोणत्या तत्त्वांवर करितां येईल ह्याचा बराच ऊहापोह झाला. मी सध्या कांहीं नवीन उपाय सुचविणार आहें असें

नाहीं; परंतु एकाच धर्माचा पूर्ण विजय होऊन बाकीचे धर्म नष्ट व्हावे अशी जर कोणाची इच्छा असेल, तर त्यास मला एवढेंच सांगावयाचें आहे, " बाबा रे, तुझी इच्छा तृप्त होणें अशक्य आहे. ख्रिस्त्यांनीं हिंदुधर्म स्वीकारावा अशी इच्छा मीं कां करावी ? तसेंच हिंदूनें अथवा बौद्धानें ख्रिस्ती व्हावें असें तरी कां वाटावें ? "

जमिनींत बीजारोपण केलें म्हणजे त्या बीजाभोंवतीं पृथ्वी, पाणी आणि हवा ह्यांचा पक्का गराडा असतो; म्हणून पृथ्वी, पाणी आणि हवा ह्यांपैकीं कोणत्या तरी एका पदार्थाचें रूप त्या बीजास प्राप्त होतें काय ? नाहीं. त्या बीजाचा वृक्षच निर्माण होतो. ह्याचा अर्थ हाच कीं पूर्वसंकेतानें ठरविलेल्या दिशेनेंच त्याची वाढ होते. तें बीज पृथ्वी, पाणी आणि हवा ह्यांतील पोषक द्रव्यें घेऊन त्यांचें रूपांतर करून, पानें आणि फुलें निर्माण करितें. तसेंच धर्माचेंही आहे. हिंदूचे ख्रिस्ती झाले अथवा ख्रिस्त्यांचे हिंदु झाले, तर त्यांत कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं; परंतु एकमेकांच्या सहानुभूतीनें परस्परांत जें चांगलें म्हणून आढळेल तें परस्परांनीं घेऊन, आपल्या मूळ संस्कारांशीं त्याचा एकजीव करून टाकला पाहिजे. कोणींही आपलें स्वत्व विसरणें फायद्याचें नाहीं. अंतःकरणाचें पावित्र्य आणि मनौदार्य हीं निर्माण करण्याचें सामर्थ्य कोणत्याही एकाच विशिष्ट धर्मास आंदण दिलेलें नाहीं, ही गोष्ट विशेषेंकरून ह्या परिषदेंत निःसंशय सिद्ध होऊन जगाच्या प्रत्ययास आली. अत्युच्च दर्जाचीं स्त्री-पुरुषें सर्व धर्मांत निर्माण झालेलीं आहेत असा प्रत्यक्ष पुरावा दिसत असूनही जर आपलाच धर्म तेवढा खरा व जगण्यास योग्य आणि बाकीचे धर्म नष्ट होण्यास योग्य असें कोणास वाटत असेल तर असल्या व्यक्ति केवळ अनुकंपनीय मात्र होत. त्यांस माझें एवढेंच सांगणें आहे कीं, ह्यापुढें प्रत्येक धर्माच्या ध्वजावर ' संघर्ष नको, सहकार हवा. विध्वंस करूं नका, परस्परांना सामावून घ्या ' ' विभक्ततेचें विसर्जन करा, शांतता प्रस्थापा ' अशा घोषणा झळकत राहतील.

॥ ॐ ॥

क
र्म
यो
ग

प्रकरण पहिलें

# कर्माचा दानतीवर परिणाम

कर्म हा शब्द मूळ संस्कृत धातु कृ म्हणजे करणें ह्यापासून उत्पन्न झाला आहे. आपण जें जें कांहीं करतों तें तें सर्व कर्म होय. आपल्या हातून घडणाऱ्या कृतीचा परिपाक, असाही कर्म ह्या शब्दाचा दुसरा अर्थ आहे. पूर्वजन्मार्जित क्रियांचें वर्तमान फल अशा अर्थानेंही कर्म ह्या शब्दाचा उपयोग करतात; परंतु पुढील विवेचनांत कर्म हा शब्द चालू क्रिया ह्या अर्थाचाच दर्शक आहे असें समजावें. पूर्ण ज्ञानी होणें हा मानवी संस्कृतीचा अंतिम हेतु आहे. ह्यावांचून दुसरें साध्य कांहीं नाहीं असें प्राचीन पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांचें मत आहे. इंद्रियजन्य सुखासाठीं अनेक साधनें निर्माण करणें हें मनुष्याचें साध्य नसून, पूर्ण ज्ञानी होऊन स्वतः सुखरूप होणें हेंच साध्य आहे. जगांत दुःख आढळून येतें त्याचें कारण, मनुष्य भ्रमानें सुखसाधनें मिळविण्याच्या मागें लागतो हें होय. सुख हें साधनान्तर्गत आहे असें वाटणें हा भ्रम होय. सुखाचीं साधनें हस्तगत करण्याचा उद्योग करीत असतां, मनुष्य सुख आणि दुःख ह्यांच्या द्वंद्वांत सांपडतो व केव्हां सुखांतून दुःखांत तर केव्हां दुःखांतून

सुखांत हेलकावे खात असतांच त्याची चूक त्याच्या लक्षांत येते. साधनान्तर्गत सुखदु:खांचा आस्वाद घेतल्यानंतर सुख हें वस्तुतः साधनांत नाहीं हें त्याच्या लक्षांत येऊं लागतें. हें ज्ञान होण्याकरितां सुख आणि दु:ख ह्या दोहोंचीही सारखीच अपेक्षा आहे. सुख आणि दु:ख हीं दोन्ही साधनांतर्गत असल्यामुळें चिरस्थायी नसून कांहीं कालानें तीं नष्ट होतात असा त्यास अनुभव येतो; तथापि सुख अथवा दु:ख नष्ट झालें, तरी त्याचा कांहीं परिणाम जीवात्म्यावर कायमचा राहातो. सुख अथवा दु:ख आलें कसें आणि नष्ट झालें कसें ह्याचें ज्ञान कायम स्वरूपाचें असून, तें ज्ञानरूपानें जीवात्म्याच्या ठिकाणीं कायम राहून त्याच्या वागणुकींत दिसूं लागतें. मनुष्याच्या सामान्य व्यवहारांत प्रतिबिंबित झालेल्या ह्या ज्ञानास, दानत असें म्हणतात. सुखदु:खाचा अनुभव घेत असतां मनुष्याच्या मनोवृत्ति निरनिराळें वळण घेत असतात; व ह्या निरनिराळ्या मनोवृत्ति एकत्र मिळून त्यांची दानत बनत असते. ही दानत बनविण्यांत सुखाचा व दु:खाचा सारखाच उपयोग आहे; किंबहुना कित्येक वेळां तर, सुखापेक्षां दु:खामुळें होणारी ज्ञानप्राप्तिच अधिक वरच्या दर्जाची असते. जगांत विशिष्ट दानतीमुळें प्रसिद्धीस आलेल्या अशा व्यक्तींचा इतिहास पाहिला, तर त्यांत सुखापेक्षां दु:खप्रसंगच त्यांस अधिक भोगावे लागल्याचें दिसून येतें. लक्ष्मीपेक्षां तिच्या वडील बहिणीच्या राज्यांत ज्ञानी लोक अधिक आढळतात. स्तुतीपेक्षां निंदेच्या तडाक्यानेंच अधिक ज्ञानी लोक निर्माण झाल्याचा दाखला आहे. ह्याचसाठीं '**निंदकाचें घर असावें शेजारीं**' अशी मागणी, सत्पुरुष परमेश्वराजवळ करतात.

प्रत्येक मनुष्यांत जन्मतःच ज्ञान वास करीत असतें. ज्ञान ही कोठून बाहेरून येणारी चीज नव्हे. तिचा वास प्रत्येकाच्या अंतर्यामीं सदोदित असतो. 'अमूक मनुष्यानें अमूक जाणलें' असें आपण सामान्य भाषेंत म्हणतों. हेंच वाक्य तात्त्विक भाषेंत बोलायचें झालें, तर 'अमूक मनुष्यानें अमुक व्यक्त केलें, गूढांतून निदर्शनास आणलें,' असें म्हणावयास पाहिजे.

जीवात्मा हा स्वभावतः ज्ञानपूर्ण व अज्ञानानें केवळ आच्छादलेला असा आहे. हा अज्ञानाचा पडदा ज्या मानानें दूर होतो, त्या मानानें ज्ञान दृग्गोचर होऊं लागतें. " अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः " ज्ञान हें अज्ञानानें आवृत झाल्यामुळें मनुष्यप्राणी मूर्ख असल्यासारखा दिसतो; हा सिद्धान्त नित्य लक्षांत बाळगिला पाहिजे. न्यूटननें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला असें आपण म्हणतों. हा नियम, जगाच्या कोणत्या तरी कोपऱ्यांत लपून बसला होता काय ? तो न्यूटनच्या अंतर्गत ज्ञानभांडारांतच होता. त्याची बाहेर येण्याची वेळ झाल्याबरोबर एका क्षुल्लक कारणानें त्या भांडाराचें दार उघडलें व तो नियम बाहेर पडला. जगांत आज दृश्यमान होणारें सर्व ज्ञान एके काळीं मानवी हृदयांतच वास करीत होतें व आतां तें व्यक्त झालें आहे. ह्या सर्व विश्वांत मावणार नाहीं एवढा मोठा ग्रंथसंग्रह तुमच्या एवढ्याशा हृदयांत सांठविलेला आहे. दृश्य जग हें केवळ मनुष्याच्या अंतरंगाला जागृत करणारें एक साधन मात्र आहे; त्यांतून ज्ञानाची निष्पत्ति होत नसून, त्यामुळें चैतन्य जागृत होऊन अज्ञानाचा पडदा फाटण्यास सुरुवात होते व ज्ञान अव्यक्तांतून व्यक्तांत येतें; म्हणून ज्ञानार्जनासाठीं जगाचा अभ्यास करावयाचा नसून, जगरूप साधनानें मनाचा अभ्यास करणें हा ज्ञानार्जनाचा मार्ग आहे. झाडावरून एक फळ पडलेलें न्यूटननें पाहिलें, आणि डोळे मिटून विचार करतां करतां अनेक विचारपरंपरा त्याच्या चित्तांत त्याला दिसून आल्या. ह्या विचारपरंपरेच्या सांखळींतील एका दुव्यास आपण गुरुत्वाकर्षणाचा नियम ह्या नांवानें सांप्रत ओळखतों. ह्या नियमाचें ज्ञान, त्या फळांत नव्हतें आणि पृथ्वीच्या पोटांतील मध्यबिंदूंतही नव्हतें. मनुष्याचें मन हेंच सर्व ज्ञानाचें भांडार आहे. मग तें अध्यात्मज्ञान असो अथवा लौकिक-ज्ञान असो, आपणांत हें ज्ञान गुप्त असतें व त्यावरील पडदा हळूहळू दूर करण्याच्या उद्योगास लागलों म्हणजे आपण शिकूं लागलों असें म्हणतों; आणि जसजसा हा पडदा अधिक दूर होऊं लागतो, तसतसे आपण अधिक ज्ञानी होऊं लागतों. ज्या मनुष्याच्या ज्ञानावरील हा पडदा अधिक दूर झाला

आहे, तो अधिक ज्ञानी; ज्यावर तो पडदा अगदीं घट्ट बसला आहे तो मनुष्य अज्ञानी; आणि ज्याच्या हृदयावरील हा पडदा निखालस गळून पडला, तो परमज्ञानी म्हणजे सर्वज्ञ म्हणवितो. आजपर्यंत असे सर्वज्ञ अनेक वेळां येऊन गेले आहेत आणि पुढेंही येतील. पुढेंही युगानुयुगीं त्यांचे अवतार होणार आहेत. गारगोटीच्या पोटीं अग्नि जसा गुप्त रूपानें राहात असतो, तसेंच सर्व ज्ञान मानवी हृदयांत वसत असतें. घर्षणानें गारेंतून जशी ठिणगी व्यक्त होते, तसेंच साधनांच्या घर्षणानें ज्ञान दृश्य स्वरूपास येतें. हें दृश्य स्वरूप अनेक प्रकारच्या रूपांनीं व्यक्त होतें. आपल्या चित्तांत उद्भूत होणाऱ्या सर्व भावना, आपलीं सर्व कर्में — रडणें, हसणें, इत्यादि क्रिया — आनंददु:खादि मनोव्यापार, आपला क्रोध, आपलें प्रेम, स्तुति आणि निंदा, इत्यादि प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन केलें, तर कोणत्या ना कोणत्या तरी साधनांच्या घर्षणानें हे नानारूप स्फुल्लिंग, आपल्याच चित्तांत जन्म पावल्याचें आपणास आढळून येईल. त्या सर्वांचा समवायी परिणाम म्हणजे आमची दानत. ह्या सर्व प्रकारच्या घर्षणास कर्म अथवा क्रिया असें नांव आहे. ज्या क्रियासाधनानें जीवात्म्यास घर्षण मिळून त्याचें सामर्थ्य आणि ज्ञान दृक्प्रत्ययास येतें, तें सर्व ‘ क्रियासाधनकर्म ’ ह्या एका शब्दानें ओळखलें जातें. ह्या दृष्टीनें विचार केला, म्हणजे कर्म केल्यावांचून आपल्या आयुष्यांतील एक क्षणही जात नाहीं असें दिसून येईल. “ न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ” असा सिद्धान्त भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितला आहे. मी बोलतों तें कर्म, आपण ऐकतां तें कर्म, आपण श्वासोच्छ्वास करतों तें कर्म; सारांश, आपण मनानें अथवा शरीरानें ज्या ज्या क्रिया करतों तें तें सर्व कर्म असून त्यांतील प्रत्येक क्रियेचा परिणाम – संस्कार- जीवात्म्यावर घडल्यावांचून राहात नाहीं.

अत्यंत सूक्ष्म अशा अनेक कर्मपरंपरा एकजीव होऊन एका मोठ्या रूपानें ज्यांत दृश्यमान होतात अशा प्रकारचीं कांहीं कर्में असतात. आपण समुद्रकांठीं

एखाद्या धक्क्याजवळ उभे असतां एखादी मोठी लाट येऊन त्या धक्क्यावर आदळते. त्या वेळीं त्या लाटेनें केवढा मोठा आवाज उत्पन्न केलासें आपणांस वाटतें; परंतु कोट्यवधि सूक्ष्म तरंगांच्या एकीकरणानें ती लाट उत्पन्न झालेली असते; आणि आपण जो मोठा आवाज ऐकला, तो त्या सूक्ष्म तरंगांच्या लहान लहान आवाजांच्या एकीकरणाचेंच फल असतो. ते सूक्ष्म आवाज स्वतंत्रपणें आपल्या प्रत्ययास येत नाहींत. अशाच रीतीनें आपलें हृदय उडणें वगैरे सर्व क्रियाकर्मेंच होत. कित्येक कर्में स्वतंत्रपणें आपल्या प्रत्ययास येतात; परंतु तीं सर्व सूक्ष्म कर्मांच्या समुच्चयाचा परिणाम असतात. कोणत्याही मनुष्याची खरी दानत तुम्हांस समजून घ्यावयाची असेल, तर त्यानें केलेल्या एखाद्या मोठ्या कृत्यावरून तिची योग्य पारख होणार नाहीं. प्रसंगीं एखादा अत्यंत कृपण मनुष्य कर्णालाही लाजवील; परंतु अशा एखाद्या प्रसंगावरून आपण कोणाच्या दानतीचें अनुमान केलें, तर तें पुष्कळ वेळां चुकीचें ठरण्याचा संभव आहे. मनुष्य रोजच्या व्यवहारांत कसा वागतो आणि बारीकसारीक गोष्टी कशा करतो ह्याचें सूक्ष्म अवलोकन केलें, तरच त्याच्या दानतीचें यथार्थ ज्ञान होईल. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत कांहीं प्रसंग असे येतात कीं, त्या वेळीं आपलें लघुत्व विसरून तो कांहीं महत्कार्य करून जातो; परंतु सर्वदा आणि सर्वकाळीं ज्याची वागणूक एकसारखीच मोठी असते, तोच खरा मोठा मनुष्य होय.

कर्मांचा मनुष्याच्या दानतीवर होणारा परिणाम पाहिला म्हणजे कर्म ही एक अचाट शक्तिच आहे असें वाटतें. प्रत्येक मानवी प्राणी हा ईश्वरांश असल्यामुळें जगांतील सर्व शक्ति जणूं काय त्याच्या ठिकाणीं एकवटलेल्या असतात व तो ह्या शक्तींस कर्मांच्या रूपानें पुन्हा जगांत फिरावयास लावतो. जेथें ह्या सर्व शक्ति एकवटतात आणि जेथून पुन्हा कर्मरूपानें बाहेर पडून जगभर वावरतात तीच मनुष्यांतील जीवनकला होय. ह्या चालककलेंत सर्व सामर्थ्य एकवटलेलें आहे. ही कला सर्वशक्तिमती अशा

स्वरूपाची असल्यामुळें गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें विश्वांतील अनेक शक्ति तिच्याकडे ओढल्या जातात आणि तिच्याभोंवतीं फिरत राहातात. त्यांचा उपयोग करून आपल्या दानतीच्या द्वारें मनुष्य ह्या शक्तींस बरें अथवा वाईट रूप देऊन त्यांस जगांत परत पाठवीत असतो. इतर शक्तींस आकर्षण करण्याचें जसें त्यास सामर्थ्य आहे, तसेंच त्यांचें रूपांतर करून त्यांस जगभर फिरावयास पाठविण्याचेंही त्यास सामर्थ्य आहे.

जगांत जें जें कार्य आपण पाहातों तें तें सर्व मानवी विचारांचें दृश्यरूप आहे. मनुष्याची इच्छाशक्ति चित्तांत गुप्तरूपानें असते व तीच कार्यरूपानें दृश्य होते. कार्य हें अव्यक्त इच्छाशक्तीचें व्यक्त रूप होय. ह्या रीतीनें आपणांस दिसणारीं सर्व यंत्रें, कारखाने, शहरें, आगबोटी, वगैरे जिनसा मनुष्याच्या इच्छाशक्तीचीं दृश्यफलें आहेत. मनुष्याच्या दानतीस अनुरूप अशी इच्छा उद्भवते; आणि दानत कर्मानुरूप बनलेली असते. ह्यामुळें जसें कर्म तद्वतच इच्छा हें उघड झालें. आपल्या अचाट इच्छाशक्तीनें जगाचें स्वरूप ज्यांनीं बदलून टाकलें, असे सामर्थ्यवान् पुरुष जबर व्यासंगी होते. सर्व जग सुलट्याचें उलटें व उलट्याचें सुलटें करावें, असें सामर्थ्य युगानुयुगें कर्में करून त्यांनीं आपल्या ठिकाणीं आणून ठेवलें होतें. भगवान् बुद्ध अथवा भगवान् येशू ख्रिस्त ह्यांची अलोट इच्छाशक्ति ही एकाच जन्मांतील कर्माचें फल नसून जन्मजन्मांतरींचीं कर्मफलें जीं त्यांनीं सांठविलीं होतीं, त्यांचें एक दृश्य फल आहे. आपणांतील विशिष्ट मनोवृत्ति आनुवंशिक संस्कारांनीं आपणांस प्राप्त झाल्या आहेत असें म्हणणारांनीं बुद्ध अथवा ख्रिस्तचरिताचा विचार करावा. ख्रिस्ताचा बाप जोसेफ हा एक साधारण दर्जाचा सुतार होता. तत्त्वज्ञानाचा एक शब्दही त्यानें उच्चारला असल्याचें कोणाच्या ऐकिवांत नाहीं. त्याच्यासारखे रंधापटाशीबहाद्दर आजपर्यंत अनेक होऊन गेले व आजही अनेक आहेत. अशा साधारण दर्जाच्या सुताराच्या पोटीं अर्धें जग प्रकाशमय करून सोडणारा ज्ञानदीप पेटविण्यासारखा पुत्र निर्माण व्हावा हें आनुवंशिक संस्कारांचें फल आहे काय? बुद्धाचा बाप एक

सामान्य राजा होता. स्वतःच्या नोकरांवर तरी त्यास ताबा चालवितां येत होता कीं नाहीं कोणास ठाऊक! परंतु त्याच्या पोटीं उत्पन्न झालेल्या पुत्रास ईश्वरावतार मानून अर्धें जग प्रत्यहीं त्याची पूजा करीत आहे. जोसेफ सुतार आणि त्याचा पुत्र ह्या दोघांत दिसून येणारें जमीनअस्मानाचें अंतर, आनुवंशिक संस्कारांच्या उपपत्तीनें भरून येईल काय? बुद्ध आणि ख्रिस्त ह्यांनीं ज्या आपल्या इच्छाशक्तीनें जगांत क्रांति घडवून आणली, ती शक्ति आली कोठून? अनेक लहान लहान शक्ति युगानुयुगें एकवटत होत्या व शेवटीं त्या बुद्ध व ख्रिस्त ह्या रूपानें प्रगट झाल्या असेंच म्हटलें पाहिजे.

आपली जी कांहीं दानत आजमितीस आहे, ती आपल्या सर्व पूर्वकर्मांचा परिपाक आहे. स्वतः श्रम करून मिळविल्याशिवाय कोणासही आयतें असें कांहींच प्राप्त व्हावयाचें नाहीं, असा अनादिसिद्ध नियम आहे. कित्येक वेळां अशा प्रकारचा नियम कांहींच नसावा असें वाटण्यासारख्या गोष्टी घडतात, परंतु आपली दृष्टि जसजशी शुद्ध होत जाते, तसतशी ह्या नियमाच्या अस्तित्वाबद्दल आपली खात्री होत जाते. एखादा मनुष्य पैसा मिळविण्यासाठीं एकसारखी धडपड करीत असतो. प्रसंगीं कोणाची मान मुरगळण्यासही मागेंपुढें पाहात नाहीं; परंतु इतकें करूनही त्यास कांहीं प्राप्ति होत नाहीं; आणि आयुष्य त्याला कंटाळवाणें वाटूं लागतें. पैसा मिळावा अशी त्या मनुष्याची योग्यताच नसते. स्वतःच्या सुखासाठीं हजारों वस्तु आपण जमवून ठेवतों; परंतु त्यांतील जितक्यांचा उपभोग घडण्याची आपली पात्रता असते, तितक्याच आपल्या उपयोगीं पडतात. एखाद्या मूर्खानें जगांतील सर्व पुस्तकांचा संग्रह केला, तरी त्यांतील जितकीं वाचण्याची त्याची योग्यता असते, तितक्यांचाच त्यास उपयोग होतो. ही योग्यता त्याला स्वतःच्या कर्मानुसार प्राप्त झालेली असते. आपली योग्यता काय आहे व आपणास कोणत्या गोष्टी आपल्याशा करतां येतील, ह्याचा आपल्या कर्मानुरोधानें निश्चय होतो. आपली जी कांहीं आज स्थिति आहे, ती आपण स्वतःच प्राप्त करून घेतली असून, आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल ती

स्थिति प्राप्त करून घेण्यास आपणांस मोकळीक आहे. आज आपणांस जी कांहीं स्थिति प्राप्त झाली आहे ती पूर्वकर्मांचें फल असल्यामुळें, पुढें प्राप्त होणारी स्थिति वर्तमान अथवा चालू कर्मानुरूप होणार हें उघड आहे; असें आहे म्हणून कर्म कसें करावें हें समजून घेणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. 'कर्म कसें करावें ह्यांत समजून घेण्यासारखें काय आहे? आम्ही रोज कसें तरी कर्म करीत असतोंच' असें कोणी म्हणेल; परंतु कर्म कसें करावें, तसेंच कर्म कोणतें आणि अकर्म कोणतें, ह्याचा बोध झाला नसल्यामुळें आपल्या कर्तव्यशक्तीचा दुरुपयोग होतो, व प्रसंगीं तर तिचा फुकट व्ययही होतो, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आलेली नसते. '**योगः कर्मसु कौशलम्।**' व '**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।**' असें भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे. कर्म कसें करावें हें जाणून सशास्त्र मार्गानें कर्म केलें, तर तें अत्यंत फलदायी होतें. मानसिक शक्ति अव्यक्तपणांतून व्यक्तपणांत आणणें व निद्रित आत्म्यास चेतना देणें हें कर्मांचें साध्य आहे, हें आपण नित्य लक्षांत धरलें पाहिजे. प्रत्येक मनुष्यांत एकसारखी चिच्छक्ति निद्रित असून ती कर्मरूप आघातांनीं जागृत होते.

प्रत्येक मनुष्य कर्म करूं लागला म्हणजे तें करण्यांत त्याचा कांहीं तरी हेतु असतो. हेतूवांचून कर्मप्रवृत्ति होत नाहीं. कित्येकांना कीर्तिमान् होण्याची इच्छा असते; ते कीर्तिसाठीं कर्म करतात. दुसऱ्या कित्येकांना द्रव्य हवें असतें, ते द्रव्यप्राप्तीच्या हेतूस्तव कर्म करीत असतात. कित्येकांना स्वर्गसुखाच्या प्राप्तीचा हव्यास असतो; व ते तशा दृष्टीनें कर्में करतात. कित्येक आपलें नांव मागें राहावें म्हणून कर्में करतात. चिनी लोकांत मनुष्य मेल्यानंतर त्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें पदवी मिळते. विचारांतीं चीनमधली ही चाल आपल्या चालीपेक्षां बरी आहे असें मला वाटतें. कोणीं एखादें मोठें कृत्य केलें, तर त्याच्या बापाला अथवा आजाला सरदारीची पदवी देण्याची चाल चीन देशांत आहे. तेव्हां तिकडे कित्येक लोक आपल्या बापाचें नांव मोठें व्हावें म्हणून कर्म करतात. आपण मेल्यानंतर आपलें

खूप मोठें थडगें बांधलें जावें अशा हेतूनें, मुसलमानांतील कांहीं विशिष्ट पंथाचे लोक कर्मे करीत असतात. मूल जन्माला आल्याबरोबर त्याचें थडगें बांधणारे कांहीं पंथ मला ठाऊक आहेत. हें थडगें जितकें मोठें आणि सुंदर असेल त्या मानानें आईबापांची पदवी अधिक समजली जाते. सुंदर आणि मोठें थडगें बांधणें हाच हेतु बाळगणारे लोक अशा पंथांत पुष्कळ असतात. दुसरे कित्येक शरीराला खूप त्रास देण्यांतच आनंद मानतात; आणखी कित्येक, लोकांचीं घरें बुडवून देवळें बांधतात व भिक्षुकादिकांस खूप धर्म करतात. जणूं काय स्वर्गद्वारावर दाखविण्यासाठीं भटांपासून ते पासच घेत असतात ! इत्यादि अनेक प्रकारच्या हेतूंनीं प्रेरित होऊन मनुष्य कर्मे करीत असतो.

केवळ कर्तव्य म्हणून कर्म करणारे थोडे. असे लोक कीर्ति अथवा वित्त अथवा दुसरा कांहीं स्वार्थ मनांत न आणतां, केवळ कोणाचें तरी बरें व्हावें ह्याचसाठीं कर्मे करतात. कोणाचें तरी बरें झालेलें पाहिलें म्हणजे त्यांस आनंद होतो. कीर्तीच्या हेतूनें केलेल्या कर्मांचा परिपाक नेहमीं बहुधा सावकाश होत असतो. कीर्तीसाठीं साऱ्या जन्मभर खटपट केली आणि ती कीर्ति अगदीं वृद्धापकाळीं – मरावयाच्या वेळीं – मिळाली असें पुष्कळ वेळां घडतें. जर मनुष्य कोणताही हेतु मनांत न धरतां कर्म करील, तर त्या कर्माचा त्यास कांहींच फायदा मिळणार नाहीं काय ? मिळेल, खचित मिळेल; सर्वांत अत्युच्च दर्जाचा असा फायदा त्यास मिळेल. निर्हेतुक कर्माइतकें फायदेशीर दुसरें कोणतेंही कर्म नाहीं; परंतु तें फलद्रूप होईपर्यंत वाट पाहात बसण्याइतका धीर सामान्य मनुष्याच्या ठिकाणीं असत नाहीं. अशा कर्मांचा शरीरप्रकृतीवरही फारच उत्तम परिणाम होत असतो. प्रेम, सत्य आणि निःस्वार्थबुद्धि हे शब्द केवळ अलंकारिक भाषेनें मीं योजले नसून, आपणांपैकीं प्रत्येकानें तेंच आपलें साध्य आहे असें जाणावें. आपल्या चैतन्यशक्तीस पूर्णपणें जागृत करण्याची शक्ति ह्या तीन गुणांतच आहे. कोणताही हेतु — मग तो कीर्तीचा, पैशाचा, स्वर्गसुखाचा अथवा

दुसरा कसलाही असो — मनांत न धरतां जर कोणीं पांच दिवस किंवहुना पांच मिनिटें कर्म केलें, तर अशा मनुष्यांत उत्तम मानसिक धैर्याचें वीज आहे असें समजावें. अशा प्रकारचें कर्म करणें अत्यंत बिकट आहे, ही गोष्ट खरी; परंतु अशा कर्मांत वसत असणाऱ्या सामर्थ्याचा प्रत्यय, आपणांस कधींच आलेला नसतो असें नाहीं. असें कर्म करण्यासाठीं जी आकलनशक्ति लागते तिची किंमत वास्तविक कर्म करण्यांत दिसून येणाऱ्या शक्तीपेक्षां अधिक आहे. कोणतेंही कर्म करीत असतां, स्वार्थाचा यत्किंचितही उदय न होऊं देण्यासाठीं मनावर केवढा मोठा ताबा असावा लागतो, ह्याची कल्पना नुसत्या वर्णनानें कधींच करतां येणार नाहीं. स्वार्थी कर्म करण्यांत केवढेंही सामर्थ्य दिसून आलें, तरी त्या सामर्थ्याचें महत्त्व वरील प्रकारच्या आकलनांत लागणाऱ्या सामर्थ्यापेक्षां निःसंशय कमी दर्जाचें आहे. चार घोडे जोडलेली एखादी गाडी उतरणीवरून भरधाव जात असतां ती तशीच जाऊं देण्यास जें बळ लागतें, त्याहून ती एकदम थांबविण्यास अधिक बळ निःसंशय लागतें. एखादा गोळा तोफेंतून मोठ्या वेगानें निघाला आणि त्याच्या वाटेंत कोणताच पदार्थ आड आला नाहीं, तर बऱ्याच अंतरावर तो जाऊन पडतो व तेथें त्यांतील विनाशक शक्तीचा फारसा प्रत्यय येत नाहीं; परंतु तो मध्येंच एखाद्या कठीण पदार्थावर आपटला, तर अत्यंत परिमाणाची उष्णता तो उत्पन्न करतो. स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन आपण कोणतेंही कर्म करूं लागलों म्हणजे आपलें जें सामर्थ्य खर्च होतें तें कोणत्याही उपायानें आपणास परत मिळत नाहीं; परंतु स्वार्थबुद्धि टाकून देण्यास — मनावर ताबा ठेवण्यास — जें सामर्थ्य खर्च होतें, तें मात्र किती तरी अधिक वाढून आपणांस परत मिळतें. अशा रीतीनें ज्याचें मन ताब्यांत आलें, त्याची इच्छाशक्ति अत्यंत बळावत जात जात तोच पुढें ख्रिस्ताची अथवा बुद्धाची पदवी पावतो. मनुष्य-मात्रानें आपणापुढें नमावें अशी पुष्कळांची इच्छा असते; परंतु शक्तीच्या वृद्धीचें हें रहस्य त्यांस ठाऊक नसतें. आज अत्यंत मूर्ख असा दिसणारा

मनुष्यही हें रहस्य जाणून व त्याचप्रमाणें वागून जगाचा शास्ता होऊं शकेल. आपणापुढें मनुष्यांनीं नमून राहावें अशी इच्छा मात्र त्यानें प्रथम समूळ टाकली पाहिजे. ज्या दिवशीं अशा इच्छेची त्यास आठवणही नाहींशी होईल, त्याच दिवशीं मनुष्यें त्याजपुढें नमत आहेत असें त्यास दिसेल. ज्याप्रमाणें कित्येक प्राण्यांस कांहीं थोड्याशा पावलांपलीकडील जमीन दिसत नाहीं, त्याचप्रमाणें आम्हां मनुष्यांची नजर कांहीं थोड्या वर्षांपलीकडे जात नाहीं. आमच्या सभोवतीं दिसणाऱ्या परिघापलीकडे आणखी जग आहे, ही गोष्टच आमच्या ध्यानांत येत नाहीं. दृष्टीच्या ह्या आकुंचितपणा-मुळेंच आम्ही दुष्ट आणि अनीतिमान् बनलों आहों. हाच आमचा मोठा दुर्बळपणा आहे. कर्म कितीही हलक्या दर्जाचें असलें तरी त्याचा विषाद मानूं नये. हलकें कर्म झालें तरी तें शक्य तितक्या उत्तम रीतीनें करण्यास शिकलें पाहिजे. केवळ कीर्तीसाठीं कोणी कांहीं कर्म करीत असतील तर असोत. परंतु आपलें कर्तव्य करतांना कीर्तीची दृष्टि ठेवूं नये. आपल्या स्वतःचें मानसिक सामर्थ्य वाढावें ही दृष्टि नेहमीं जागृत असली पाहिजे. '**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन**' ही भगवंताची उक्ति सतत ध्यानांत वागविली पाहिजे. एखाद्याला मदत करण्याची तुम्हांस इच्छा झाली, तर तो पुढें आपल्याशीं कसा वागेल असल्या प्रकारचे विचार चित्तास शिवूंही देऊं नयेत. कोणत्याही चांगल्या कार्यास आरंभ करावा असें वाटलें, तर तें शेवटास जाईल कीं नाहीं ह्याची चिंता करीत न बसतां कार्यास आरंभ करावा.

अशा प्रकारचें कर्म करण्याचा निश्चय केला तर एक नवीन अडचण दिसूं लागते. सदोदित कार्यरत राहावयाचा आम्ही निश्चय करूं; वस्तुतः कर्माशिवाय आमचा एक क्षणही जात नाहीं, हें तुमचें म्हणणें आम्हीं कबूल केलें, तर सदोदित कार्यरत राहिल्यावर आम्हांस विश्रांति केव्हां मिळणार? जगांत राहून कर्म करावयाचें म्हटलें, तर निवळ चरितार्थासाठींसुद्धा इतका उद्योग करावा लागतो, कीं त्याखालींच आमचा चुराडा होऊन जातो.

संसार सोडून अरण्यवास पत्करावा म्हटलें, तर तेथील शांतताही सहन करण्याची आम्हांस मानसिक शक्ति नाहीं. पशुपक्ष्यांवांचून इतरांचा शब्दही ऐकूं येण्याची मारामार, अशा स्थितींत ह्या दोन्ही स्थिति अर्धवट वाटतात, एखाद्या अरण्यवासी मनुष्याला संसारांत आणलें तर भोंवतालच्या गडबडीनें तो बिचारा भांबावून वेडा व्हावयाचा; उलट पक्षीं एखाद्या संसाऱ्याला अरण्यांत पाठविलें, तर तेथल्या निस्सीम शांततेनें तो वेड्यासारखा व्हावयाचा. समुद्राच्या खोल पाण्यांत राहाणाऱ्या माशाला पृष्ठभागावर आणलें, तर त्याच्या शरीराचे तुकडे होतात; कारण, त्याच्या शरीरावर जें पाण्याचें प्रचंड वजन असतें, तें नाहींसें झाल्यामुळें त्याचें शरीर विस्कळित होतें. अशी स्थिति दिसत असतां ह्या दोहींचा योग्य संयोग करावयाचा कसा ? जगांतील एकसारख्या चालू राहाणाऱ्या गडबडींत ज्याला अत्यंत स्थिर राहातां येतें आणि अरण्याच्या निस्सीम शांततेंत ज्याला अत्यंत कार्यरत राहातां येतें, अशी मानसिक स्थिति आम्हांस प्राप्त करून घ्यावयाची आहे. माणसांनीं गजबजून गेलेल्या रस्त्यांत अरण्यांतील गुहेची शांतता मिळविणें आणि अरण्यांतील गुहेंत अत्यंत कार्यरत राहतां येणें, अशी संयुक्त स्थिति आपणांस प्राप्त करून घ्यावयाची आहे. कर्मयोगाचें हेंच ध्येय आहे. ही स्थिति तुम्हांस प्राप्त करून घेतां आली तरच कर्मयोगाचें रहस्य तुम्हीं जाणलें असें होईल.

ही स्थिति प्राप्त करून घेण्याकरितां, आपल्या चालू परिस्थितींत राहूनच आपणांस आरंभ करावयास पाहिजे. कोणताही उद्योग निःस्वार्थी मनानें करावयाला शिकणें, हा ह्या शाळेंतील पहिला धडा आहे. आपल्याला कोणतेंही काम करण्याची इच्छा उद्भवली कीं तिच्यापलीकडे असणारा हेतु शोधावा. हेतूवांचून इच्छा उद्भवत नाहीं. इच्छा उद्भवली कीं तिचें स्वरूप अधिक व्यक्त असल्यामुळें हेतूपुढें पडदा आल्यासारखा होऊन तो अदृश्य होतो; तो हेतु शोधून काढून त्याचें वास्तविक स्वरूप अवलोकन करावें. पहिल्या पहिल्यानें आपली प्रत्येक इच्छा स्वार्थी हेतूनें प्रेरित असते

असें आपणांस आढळून येईल; परंतु आपल्या इच्छाशक्तीनें ह्या स्वार्थाच्या निःपाताचा उद्योग निश्चयानें आरंभिला, तर केव्हांना केव्हां तरी यश खचित येईल. ह्या दुस्तर संसृतींतून आपला रस्ता काढीत असतां, हळूहळू प्रयत्न करून शेवटीं सर्वथा निःस्वार्थी बनणें हें प्रत्येकाला शक्य आहे. ज्या दिवशीं आपण पूर्ण निःस्वार्थी बनूं त्या दिवशीं आमचें सर्व सामर्थ्य एकवटलें आहे असा प्रत्यय येऊन आपली मूळची केवळ ज्ञानमय स्थिति आपणांस प्राप्त होईल.

## प्रकरण दुसरें

## स्वकर्तव्यदक्ष प्रत्येक मनुष्य सारखाच मोठा आहे

सांख्यमताप्रमाणें विश्व हें त्रिगुणात्मक आहे. ह्या तीन गुणांस सत्त्व, रज आणि तम अशीं नांवें आहेत. ह्या तीन गुणांचें सृष्टींतील प्रत्यक्ष अथवा दृश्यस्वरूप अनुक्रमें स्थैर्य, चापल्य आणि जाड्य अशा तीन अवस्थांत दिसून येतें. दगडासारखी जडावस्था हें तमोगुणाचें दृश्यस्वरूप आहे. रागलोभादि विकारांस वश होऊन कार्यास प्रवृत्त होणें हें रजोगुणाचें दृश्यस्वरूप आहे. ह्या दोहोंस ताब्यांत ठेवून त्यांच्यांत समतोलपणा उत्पन्न करणारा तो सत्त्वगुण.

प्रत्येक मनुष्यांत हे तीन गुण असतात. त्यांपैकीं जो गुण ज्या वेळीं प्रबल असेल त्यास अनुसरून प्रत्येक मनुष्य त्या वेळीं कर्में करीत असतो.

मराठी ग्रंथ सं...
३३५५५ दि: ...१४/८...
अनुक्रम ...

जेव्हां तमोगुण प्रबल असतो तेव्हां आपणांस आळस येतो — आपण अगदीं स्तब्ध आणि क्रियाशून्य होतों. अशा वेळीं आळसामुळें कोणताच विचार उत्पन्न होत नाहीं. कित्येक वेळां विलक्षण चपलतेचा आपल्या अंगीं संचार होऊन एखादें अवघड कामही त्रास वाटल्याशिवाय आपण पार पाडतों; अशा वेळीं रजोगुणाचें प्राबल्य असतें; आणि कित्येक वेळीं आळस बिलकूल नसतां आपली वृत्ति अगदीं शांत असते; अशा वेळीं सत्त्वगुण अधिक प्रबल असतो. ह्याहून अधिक स्थिर असेंही ह्या गुणाचें दुसरें एक स्वरूप आढळून येतें. कित्येक मनुष्यांत ह्या तिहींपैकीं कोणत्या तरी एका गुणाचें प्राबल्य नेहमींच विशेष असतें. कित्येक स्वभावतःच आळशी असतात; कित्येक स्वभावतः अत्यंत उद्योगप्रिय आणि चळवळे असतात; आणि कित्येक शांत स्वभावाचे आणि मित व मधुरभाषी असतात. हे तीन स्वभावविशेष, अनुक्रमें तम, रज आणि सत्त्व ह्या गुणांचे द्योतक आहेत. ह्या त्रिगुणांवांचून असणारा एकही पदार्थ ह्या सृष्टींत नाहीं. झाडेंझुडपें पशुपक्षी आणि मनुष्यें, ह्यांत कमीअधिक प्रमाणानें ह्या गुणत्रयाचें मूर्तस्वरूप दृग्गोचर झालें आहे.

कर्मयोगांत मुख्यत्वेंकरून ह्या त्रिगुणांचाच विचार केला आहे. ह्यांच्या गुणांचें स्वरूप काय आहे, आणि त्यांचा यथायोग्य उपयोग कसा करतां येईल ह्याचें ज्ञान आपणांस झालें म्हणजे आपलें कर्तव्य अधिक सशास्त्र मार्गानें कसें करावें हें आपणांस समजतें. मानवसमाजाची रचना देशकालानुरूप निरनिराळ्या प्रकारची झालेली आहे. नीति म्हणजे काय ह्याचें सामान्य ज्ञान आम्हांस सारखेंच असतें. तसेंच कर्तव्य म्हणजे काय हेंही आम्हांस सामान्यपणें समजतें; तथापि निरनिराळ्या देशांच्या निरनिराळ्या चालीरीतींस अनुसरून ह्या शब्दांच्या व्याख्यांत बदल होत असतो. जी गोष्ट एका देशांत नीतीची अशी समजली जाते, तीच दुसऱ्या देशांत नीतीस अगदीं विघातक समजली जाते. कांहीं देशांत चुलतबहिणीशीं लग्न करणें ही सामान्य व्यवहारांतील गोष्ट आहे, परंतु दुसऱ्या देशांत

तीच चाल नीतीस अगदीं विरुद्ध अशी मानली जाते. कित्येक देशांत मेहुणीशीं लग्न करणें पाप आहे असें समजतात. तर दुसऱ्या कित्येकांत तसें समजत नाहींत. कित्येक देशांत एका पुरुषास एका वेळीं एकच पत्नी असणें हें नीतीचें दर्शक मानलें जातें, तर दुसऱ्या कित्येकांत एकाच वेळीं चार, पांच अथवा शेंपन्नास बायका असणें ही चाल आहे. अशाच रीतीनें नीतीच्या इतर तत्त्वांचेंही व्यवहार्य रूप प्रत्येक देशांत निरनिराळें आढळतें.

ह्याचप्रमाणें कर्तव्याचीही गोष्ट आहे. मनुष्यानें कांहीं एखादी गोष्ट केली नाहीं, तर तो कर्तव्यच्युत झाला असें कांहीं ठिकाणीं समजलें जातें; परंतु दुसऱ्या कित्येक देशांत तीच गोष्ट करणारा मनुष्य मूर्ख समजला जातो. अशी वस्तुस्थिति आहे तरी नीतीच्या व कर्तव्याच्या सामान्य कल्पना, आपणा सर्व मानवजातीच्या एकच आहेत अशी जाणीव आपल्या अंतर्यामीं नेहमीं जागरूक आहे. अंतर्यामीं असणाऱ्या जागरूकतेचा अनुभव आणि त्याच गोष्टींचा व्यवहार्य स्वरूपांतील भिन्नपणाचा अनुभव, ह्यांचा मेळ कसा घालावयाचा हा प्रश्न आपणापुढें उभा राहातो. ह्या परस्परविरोधी अनुभवांची एकवाक्यता करण्यास दोन मार्ग मोकळे आहेत. ‘ मी म्हणतों अथवा करतों तेंच बरोबर, तसें न करणारे इतर लोक मूर्ख आणि अनीतिमान् ’ अशा रीतीनें एकवाक्यता करणें हा एक मार्ग आहे; परंतु हा मूर्खांचा मार्ग झाला. शहाण्यांचा मार्ग ह्याहून भिन्न आहे. भिन्न देशकालवर्तमान आणि भिन्न परिस्थिति ह्यांमुळें एकाच सिद्धान्ताच्या व्यवहार्य स्वरूपांत भेद दिसतो. हा बाह्यतः दिसणारा भेद खरा नसून, तो त्या सिद्धान्ताचें वैयर्थ्य न दाखवितां केवळ भिन्न परिस्थिति मात्र दाखवितो. एकवाक्यतेचा हा शहाण्या पुरुषांचा दुसरा मार्ग आहे. सिद्धान्त एकच असला तरी त्याचें व्यवहार्य स्वरूप परिस्थित्यनुरूप बदलणें शक्य आहे; एवढेंच नव्हे तर तसें होणें इष्टही आहे असें पंडितांचें मत आहे.

उदाहरणार्थ, ‘ दुष्टाचा प्रतिकार करूं नये ’ असा उपदेश येशू ख्रिस्ताप्रमाणें इतर धर्मप्रवर्तकांनींही केला आहे. स्वसंरक्षणार्थसुद्धा

कोणालाही दुखवावयाचें नाहीं, हें ध्येय निःसंशय उच्च दर्जाचें आहे, ही गोष्ट आपणांस अंतर्यामीं पटते. आतां आपण हें ध्येय नित्याच्या व्यवहारांत आणूं लागलों, तर केवढे अनर्थ ओढवतील ह्याची कल्पना करा. आमचें वित्त आणि जीवितही सुरक्षित राहाणार नाहीं. सर्व समाजसंघटना विस्कळित होऊन, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी स्थिति होऊन जाईल. फार काय सांगावें, आपण एकच दिवस वरील तत्त्वास अनुसरून वागावयाचें ठरविलें, तरी सर्वत्र झोटिंगशाही माजेल. ह्यासाठीं ह्या तत्त्वाचा उच्चपणा आपणांस अंतर्यामीं पटला असला, तरी त्याला व्यवहार्यरूप देणें आजच्या समाजाच्या स्थितींत अनिष्ट आहे. हें तत्त्व चांगलें आहे त्या अर्थीं, ह्याप्रमाणें न वागणारा तो पापी असें आपण म्हणूं लागलों, तर ह्या पापांतून मुक्त असे मनुष्य फारसे आढळणार नाहींत; म्हणजे ह्या दृष्टीनें बहुतेक सर्व मानवजात पापी असें म्हणावयाची पाळी येईल. आपण पापी अशी कल्पना जर एक वेळ खरोखर रूढ झाली, तर ती केवढे अनर्थ करील व आपणां मनुष्यांस कोणत्या खाड्यांत नेऊन टाकील, ह्याचा नेम सांगवत नाहीं.

'मी पापी आहें' असें मनापासून कोणास वाटूं लागलें कीं त्याचा पहिला घातक परिणाम मनोदौर्बल्य हा होय. अशा दुर्बल मनुष्याच्या हातून कोणतीही गोष्ट निश्चयानें पार पडणें सर्वथा अशक्य आहे; आणि मनुष्य एक वेळ असा घसरणीस लागला कीं प्रतिक्षणीं त्याचा वेग वाढत जाऊन, तो अगदीं तळाशीं जाईपर्यंत, मध्यें कोठें थांबण्यास त्यास अवसरच सापडत नाहीं. मनोदौर्बल्याइतकें मोठें पाप जगांत दुसरें कोणतेंही नाहीं. मनुष्यजातीचा ह्याच्याएवढा दुसरा मोठा शत्रु नाहीं. ज्याप्रमाणें मनोदौर्बल्य हें एका व्यक्तीच्या घातास कारण होतें, त्याचप्रमाणें तें सबंध राष्ट्राच्या नाशासही कारण होतें. 'आम्ही मूर्ख, आम्ही पापी,' असें पठण करीत बसणारे लोक दुर्गतिपंकांत असावयाचेच, ह्यांत कांहीं शंका नाहीं.

आपल्या स्वतःबद्दल आपलें कधींही अनिष्ट मत होऊं देऊं नये. मला असाध्य असें ह्या जगांत कांहीं नाहीं असा अत्यंत दृढ विश्वास, चित्तांत प्रथम उत्पन्न झाला पाहिजे; आणि नंतर परमेश्वरावर विश्वास पाहिजे. परमेश्वर जें जें कांहीं करतो तें तें सर्व आपल्या बऱ्यासाठींच आहे, असा भरंवसा परमेश्वरावर पाहिजे. ज्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास नाहीं, त्याचा विश्वास परमेश्वरावरही नाहींच, असें तुम्ही पक्कें समजा. सारांश, नीति आणि कर्तव्य ह्यांचें स्वरूप देशकालानुरूप बदलतें ही गोष्ट नित्य ध्यानांत बाळगून, कोणासही त्यांच्या चालीरीतीबद्दल दूषण देऊं नये. 'दुष्टाचा प्रतिकार करूं नये' हें जसें कर्तव्य आहे, तसेंच परिस्थिति बदलली तर 'दुष्टाचा प्रतिकार' करावा हेंही आपलें कर्तव्यच होईल.

भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला दांभिक व भित्रा म्हणून दूषण दिलें आहे, ह्याबद्दल कित्येकांना मोठें नवल वाटत असेल. आपले आप्त, स्नेही ह्यांजबरोबर युद्ध करणें हें अर्जुनाला मोठें पाप वाटलें. सर्व विश्वावर प्रेम करणें हें आपलें कर्तव्य असतां, स्वजनांचा वध करावयाचा म्हणजे प्रेमाला उघड्या डोळ्यांनीं तिलांजलि द्यावयाची असें होतें, अशा कल्पनेनें अर्जुन युद्धास प्रवृत्त होईना. ह्या प्रसंगापासून आपणा सर्वांस बोध घेतां येण्यासारखा आहे.

उजेड अत्यंत मंद असला, तर तो आपणांस दिसत नाहीं. तसेंच तो अत्यंत तीव्र असला, तरीही आपणांस दिसत नाहीं. त्याचप्रमाणें आवाजाचें आहे. आवाज अगदीं लहान असला, तर जसा आपणांस ऐकूं येत नाहीं, त्याचप्रमाणें अत्यंत मोठा आवाजही आपणांस ऐकूं येत नाहीं. गतीची गोष्टही अशीच आहे. घड्याळांतील तासकांट्याची गति आपणांस दिसत नाहीं, तसेंच एखाद्या अत्यंत झपाट्यानें फिरणाऱ्या भोवऱ्याची गतीही आपणांस दिसत नाहीं. तो भोवरा निश्चळ उभा आहे असेंच आपणांस वाटतें. ह्यावरून कोणत्याही स्थितीचीं आत्यंतिक रूपें बाह्यतः अगदीं एकसारखींच असतात असें सिद्ध होतें. अत्यंत हळू आणि अत्यंत

झपाट्याची गति, हीं गतीचीं वस्तुतः परस्पर अगदीं विरुद्ध अशीं स्वरूपें असतां, आत्यंतिकपणामुळें अगदीं एकसारखीं दिसतात. हा बोध आपणांपैकीं कित्येकांनीं मनन करण्यासारखा आहे. जड पदार्थासंबंधीं जसा हा नियम खरा आहे, तसाच तो चैतन्ययुक्त पदार्थांसही लागू पडतो. रस्त्यानें जाणारा कोणी मनुष्य आपणांस अपशब्द बोलत आहे हें पाहून एखादा स्तब्ध राहिला, तर त्या कृतींत परस्परविरुद्ध असे दोन हेतु संभवतात. आपला शत्रु धष्टपुष्ट आहे हें पाहून भीतीनें गप्प राहाणें निराळें आणि त्याचें तोंड एका तडाक्यानें बंद करतां येण्याची शक्ति आपल्या मनगटांत आहे अशी पूर्ण जाणीव असतांही, त्याला केवळ क्षमा करून गप्प राहाणें हें निराळें. बाह्यतः कृतीचें स्वरूप एकच आहे, परंतु हेतूंत मात्र जमीनअस्मानाचें अंतर आहे. ह्यामुळें वरील कृति एकच असतां, तिजपासून उद्भवणाऱ्या पापपुण्याचें स्वरूप मात्र अगदीं भिन्न होतें. भीतीनें गप्प राहाणें ही कृति पापपरिणामी असून दुसरी कृति पुण्यकारक आहे. बुद्ध जन्मतः राजपुत्र असून सुखविलासांत वाढलेला असतांही, त्यानें त्या सर्वांवर लाथ मारली, ह्याचें नांव खरा त्याग. परंतु खायला मिळत नाहीं म्हणून एखादा भिकारी, पुण्यवान् म्हणतां येईल काय ? ह्यास्तव ज्या वेळीं आपण प्रतिकार करणें हें पाप आहे असें म्हणतों, तेव्हां तें कोणत्या हेतूनें म्हणतों ह्याचा विचार केला पाहिजे. येथें हेतु प्रधान असून कृति गौण आहे. ही गोष्ट नित्य लक्षांत बाळगली पाहिजे. प्रतिकार करण्याची ताकद आपल्यांत आहे कीं नाहीं, ह्याचा विचार प्रथम केला पाहिजे. आपणांत सामर्थ्य आहे अशी पक्की जाणीव असतांही आपण दुष्टाचा प्रतिकार केला नाहीं तर, आपण खरोखर मोठें पुण्य केल्यासारखें होईल; परंतु अप्रतिकाराच्या तत्त्वामागें आपला भेकडपणा लपवूं पाहाणें ह्यासारखें दुसरें कोणतेंही मोठें पाप नाहीं. आपणासमोरील प्रचंड सेना पाहून अर्जुनाचें चित्त क्षणभर कंपित झालें, आणि चित्त असें कंपित होत असतां त्यास अप्रतिकाराच्या तत्त्वाचें स्मरण झालें, परंतु ह्या तत्त्वाच्या स्मरणाबरोबर

तो स्वतःचें कर्तव्य विसरला; अथवा ही विस्मृति तरी कसली? अप्रतिकाराच्या तत्त्वामागें तो आपली भीति लपवूं पाहात होता; परंतु भगवान् श्रीकृष्णांनीं ती स्थिति ओळखूनच त्यास "अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।" असें म्हटलें; व "क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप।" असा उपदेश केला.

ह्याप्रमाणें कर्मयोगाची प्रमुख कल्पना आहे. अप्रतिकाराचें तत्त्व अतिशय उच्च आहे ही गोष्ट प्रत्येक कर्मयोगी जाणत असतो. प्रतिकाराचें पूर्ण सामर्थ्य अंगीं असतांही मनावर ताबा ठेवून, प्रतिकार न करण्यांत उत्पन्न होणाऱ्या शक्तीची जाणीवही त्याला पूर्ण असते; परंतु इतकी अत्युच्च दशा प्राप्त होईपर्यंत, प्रतिकार करूनच आपलें सामर्थ्य वाढविलें पाहिजे हें ओळखून तो तदनुरूप वागत असतो. अत्युच्च ध्येय साध्य होईपर्यंत, मधील मुक्कामावर थांबून आपल्या सामर्थ्याचा आढावा काढणें हाच मार्ग प्रत्येकास श्रेयस्कर आहे. जोंपर्यंत भेकडपणाची यत्किंचितही छाया शिल्लक आहे, तोंपर्यंत अप्रतिकाराची कांस धरणें म्हणजे बुडत्या गलबतावर नांगराला मिठी मारण्यासारखें आहे.

माझ्या देशांत एक अत्यंत आळशी आणि मूर्ख मनुष्य मला भेटला. तो दोन पायांवर चालणारा प्राणी असल्यामुळेंच त्यास मनुष्य अशी संज्ञा प्राप्त झाली होती. तो मला म्हणाला, "अहो, परमेश्वरप्राप्तीचा कांहीं मार्ग मला दाखवाल काय? मी मुक्त कसा होईन तें मला सांगाल काय?" मीं त्याला विचारलें, "तुला खोटें बोलतां येतें काय?" तो म्हणाला "नाहीं." ह्यावर मीं त्याला म्हटलें, "तर मग अगोदर खोटें बोलायला शीक. लाकडाच्या ठोकळ्यासारखा होऊन बसण्यापेक्षां खोटें बोलणेंही कांहीं वाईट नाहीं. बाह्यतः अत्यंत निश्चल दिसणारी तुझी स्थिति, स्थितप्रज्ञाची नसून दगडाची आहे. त्यामुळें कांहीं वाईट कृत्यही तुझ्या हातून घडत नाहीं; तर प्रथम कांहीं वाईट कृत्य तरी करावयाला शीक." मित्रांनो, ह्यांतील थट्टेचा भाग सोडून दिला तर केवळ दगडाच्या स्थैर्यांतून स्थितप्रज्ञाच्या

स्थैर्याला पोचण्याकरितां, कर्मयोगाच्या अगदीं तळच्या पायरीपासून आरंभ करणें जरूर आहे, हें माझ्या सांगण्याचें तात्पर्य तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

दगडासारखी निश्चल स्थिति कधींही स्पृहणीय नाहीं; एवढेंच नव्हे तर, सर्वथैव त्याज्य आहे. स्थितप्रज्ञाची शांतता प्राप्त होईपर्यंत प्रत्येकानें उद्योग हा केलाच पाहिजे आणि उद्योग म्हटला कीं त्यांत प्रतिकार उत्पन्न होणारच. ह्यास्तव उद्योगरत राहून वाइटाचा प्रतिकार करतां करतां स्थितप्रज्ञता तुम्हांस प्राप्त करून घेतली पाहिजे. 'कोणाचाही द्वेष करूं नका, आणि वाइटाचा प्रतिकार करूं नका' हें म्हणणें फार सोपें आहे; परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणें किती धोक्याचें आहे, ह्याचें विवरण अगोदर केलेंच आहे. ह्या तत्त्वाच्या अंमलबजावणीचा परिणाम आपल्या स्वतःवरही अत्यंत अहितकरच होतो. आपल्या कृतीकडे सर्व जग पाहात आहे ही जाणीव असेपर्यंत, प्रतिकार न करण्याचें सोंग आपण आणूं; परंतु ह्या सोंगाची बतावणी करीत असतां आपणांस किती त्रास होतो, व तोंड बांधून बुक्क्यांचा मार कसा सोसावा लागतो, ह्याचा अनुभव ज्याचा त्यालाच विचारला पाहिजे. स्थितप्रज्ञाचा निरिच्छपणा, समता व शांतता, ह्यांचें कवच नसतां जगाचे तीक्ष्ण बाण सोसावयाचे ही गोष्ट अशक्य आहे, असा आपणांस त्या वेळीं अनुभव येतो; व आपलें ढोंग सोडून देऊन जोराचा प्रतिकार करून पुढें सरावें असें मनांत आल्यावांचून राहात नाहीं. आपण श्रीमंत व्हावें अशी इच्छा तुम्हांस झाली, आणि पैशाच्या मागें लागणें हें जगाच्या दृष्टीनें पाप आहे असें समजून तुम्हीं पैशांकरितां उद्योग केला नाहीं, तरी तुमचें मन सदोदित 'कवडी कवडी' असा जप केल्यावांचून कधींही राहणार नाहीं. असा जप अहोरात्र चालू असतां, त्यागी म्हणून स्वस्थ बसण्यांत काय शहाणपणा आहे बरें! अशा वेळीं स्वस्थ न बसतां व जगाच्या बरें अथवा वाईट म्हणण्याकडे लक्ष न देतां सपाटून उद्योग करा; म्हणजे संपत्तीच्या

प्राप्तीकरितां भोगावीं लागणारीं सुखदुःखें कशीं असतात ह्याचा प्रत्यक्ष अनुभव येऊन, तुमचें मन आपोआप शांत होऊं लागेल; व त्यागाचा सरळ रस्ता तुम्हांस दिसूं लागेल. कोणतीही इच्छा अति प्रबळ झाली तर तिची तृप्ति करून घेणें, हें ढोंगीपणापेक्षां परिणामीं अधिक हितकर असतें. इच्छातृप्तीनंतर जो थोडा शांततेचा काल सापडतो त्या वेळीं विचार जागृत झाला, तर आपण एवढी खटपट करून मिळविलेलें सुख तुच्छ आहे असें तुमचें तुम्हांसच वाटूं लागतें; आणि ही जाणीव एक वेळ पक्की उत्पन्न झाली, म्हणजे त्यागापासून मिळणाऱ्या अननुभूत सुखाची खरी गोडी तुम्हांस कळेल. प्रखर उन्हाचा ताप अनुभवल्यावांचून सावलीच्या सुखाची खरी किंमत कळत नाहीं. त्यागापासून शांति मिळते असा उपदेश आज हजारों वर्षें साधुसंत करीत आले आहेत. आपल्या जन्मापासून हे शब्द आपल्या कानांवर नेहमीं आदळत आहेत. असें असतांही खरे त्यागी आपणांस कितीसे दिसतात? मीं अर्ध्या जगावर हिंडून अनुभव घेतला; परंतु असे वीस इसमसुद्धां आजपर्यंत माझ्या पाहाण्यांत आले नाहींत.

आपल्या नजरेपुढें कांहीं तरी साध्य ठेवून,त्याच्या प्राप्तीकरितां यत्न करण्यास प्रत्येकानें प्रथम सुरुवात करावी. हाच मार्ग नेहमीं हितपरिणामी असतो. कोणीं एखाद्यानें अमुक साध्य इष्ट आहे असें सांगितलें, म्हणून त्या साध्याच्या मागें लागणें हें निःसंशय अनिष्ट आहे. उदाहरणार्थ, आपण एखाद्या लहान मुलाला त्याच्या शक्तीचा विचार न करतां आठदहा कोसांची मजल मारावयास सांगितलें, तर मुक्कामास पोचण्यापूर्वींच त्या बिचाऱ्याचा अंत होईल. जगांत वागतांना आपण पुष्कळ वेळां अशाच प्रकारचें वर्तन करीत असतों. कोणत्याही एका समाजांतील सर्व स्त्रीपुरुषें मनाच्या एकाच अवस्थेचीं अशीं कधींही असावयाचीं नाहींत. त्या सर्वांकडून एकच गोष्ट एकाच मार्गानें होणें शक्य नाहीं. त्यांपैकीं प्रत्येकाचें ध्येय निराळें असणार व त्याच्या सिद्धतेचे मार्गही निराळे होणार हें उघड आहे; म्हणून, कोणाच्याही साध्यसाधनांसंबंधानें त्यास नांवें ठेवण्यास अथवा त्याचा

तिरस्कार करण्यास, आपणांस अधिकार नाहीं. प्रत्येकानें आपल्या मार्गानें चालून इतरांसही बिनहरकत त्यांच्या मार्गानें जाऊं देणें हें योग्य आहे. आंब्याचें लाकूड सागवानाइतकें चांगलें नाहीं म्हणून, अथवा सागवानाला आंब्यासारखीं मधुर फळें येत नाहींत म्हणून, त्या दोहोंसही वाईट ठरविणारा मनुष्य स्वतः शहाणा ठरेल काय ?

जगांत कितीही भिन्नता दिसली तरी तिच्या मुळाशीं एकात्मता आहे. सृष्टि आकाराला आली म्हणजे तींत भिन्नता आणि वैचित्र्य यावयाचेंच असा नियम आहे. किंबहुना भिन्नतेवांचून सृष्टि आकाराला येणेंच अशक्य आहे. तेव्हां ह्या भिन्नतेस अनुसरून प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र ध्येय आणि स्वतंत्र मार्ग असावे हें सृष्टिनियमास अनुसरूनच आहे. सर्वांपुढें एकच ध्येय आणि एकच मार्ग ठेवला, तर त्यांत कांहीं मागें पडणारच. तसें झालें म्हणजे समाजांत निष्कारण द्वेष आणि दुही ह्यांचें पीक येणार. आपण ह्या मार्गांत मागें पडतों असें दिसलें, म्हणजे अशा मनुष्यांच्या ठिकाणचा आत्मविश्वास नाहींसा होतो ; आणि आत्मविश्वास नाहींसा झाला, म्हणजे असा मनुष्य प्रायः स्थितप्रज्ञाची स्थिरता सोडून दगडाची स्थिरता पावण्याच्या मार्गास लागतो. ज्याचें जें साध्य असेल त्याला तदनुरूप मार्ग दाखविणें आणि त्याच्या उन्नतींत त्यास शक्य ती मदत करणें, इतकेंच आपलें कर्तव्य आहे. त्याचें ध्येय चुकीचें असेल, तर हळूहळू ती चूक त्याच्या लक्षांत आणून दिली पाहिजे. हिंदु महात्म्यांनीं हें तत्त्व जाणल्यास आज फार काळ लोटून गेला आहे. ह्या तत्त्वाची अंमलबजावणी करण्याकरितां त्यांनीं निरनिराळे आश्रम कल्पून, तदनुरूप आश्रमधर्मांची योजना केली आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम असे हे चार आश्रम आहेत.

सर्वसामान्य मनुष्यजातीला आवश्यक असें जें आचरण असेल त्याशिवाय, ह्या प्रत्येक आश्रमास उचित असे निराळे धर्म हिंदु शास्त्रग्रंथांत सांगितले आहेत. ह्यांतील पहिला, ब्रह्मचर्याश्रम हा आहे. ह्यानंतर

लग्न होऊन मनुष्य संसार करूं लागला म्हणजे पहिल्यां आश्रमांतून निघून तो गृहस्थाश्रमांत प्रवेश करतो. ह्यानंतर वृद्धापकाळीं संसारांतून विरक्त झाल्यावर तो वानप्रस्थाश्रमी होतो; व शेवटीं सर्वसंगपरित्याग करून, तो संन्यासाश्रमाचा स्वीकार करतो. ह्या सर्व आश्रमांस निरनिराळे धर्म म्हणजे कर्तव्यें सांगितलेलीं आहेत. ह्यांपैकीं अमूक आश्रम अमक्यापेक्षां मोठा असा मात्र भाव नाहीं. ब्रह्मचर्याश्रम आजन्म स्वीकारून धर्मज्ञानदानाचें काम करणारा मनुष्य आणि लग्न करून – गृहस्थाश्रमांत पडून – त्या आश्रमास अनुरूप अशा धर्मानें वागणारा मनुष्य, हे आध्यात्मिक दृष्ट्या सारख्याच योग्यतेचे आहेत. फार काय सांगावें, पण स्वधर्मरत असणारा रस्त्यांतील झाडूवाला आणि स्वधर्मपरायण तक्ताधिपति ह्यांचीही योग्यता आध्यात्मिक दृष्टीनें अगदीं एकसारखीच आहे. क्षणभर झाडूवाल्याला राजा केलें आणि राजाला झाडूवाल्याचें काम सांगितलें, तर काय मौज होईल ह्याची तुम्हीच कल्पना करा. कोणी त्यागी होऊन अरण्यांत जाऊन राहिला; म्हणून तो संसारी मनुष्यापेक्षां मोठा होतो, असें नाहीं. वास्तविक विचार केला, तर संसारांत स्वधर्मरत राहून परमेश्वराची उपासना करणें, हें अरण्यवासाहून अधिक कठीण आहे. पूर्वींचे चार आश्रम सांप्रत नष्ट होऊन त्यांच्या जागीं सध्या दोनच आश्रम मुख्यत्वेंकरून आढळतात. एक गृहस्थाश्रम आणि दुसरा संन्यासाश्रम. गृहस्थाश्रमी मनुष्यानें संसारी होऊन लौकिक आचार पाळावे व ईशचिंतन करावें. संन्याशानें केवळ धर्मपरायण राहून परमेशाचिंतन करावें आणि लोकांस धर्ममार्ग दाखवावा. महानिर्वाणतंत्रांतील कांहीं वचनें मी तुम्हांस सांगतों, म्हणजे गृहस्थाश्रमाचे धर्म तंतोतंत पाळणें हें किती दुष्कर आहे ह्याची तुम्हांस कल्पना येईल.

प्रत्येक गृहस्थानें ईशनिष्ठ असावें. ईशज्ञान हेंच साध्य त्याच्या नजरेसमोर सदोदित असावें, असें आहे; तरी त्यानें नित्यकर्मांत कधीं अंतर पडूं देऊं नये. कर्म करणें तें फलाशा बाळगून न करतां केवळ कर्तव्य म्हणून करावें.

ह्या जगांत कर्म करीत असतां फलाची यत्किंचितही अपेक्षा न बाळगणें हें किती दुष्कर आहे ह्याचा अनुभव घेतलाच पाहिजे. एखाद्याला मदत करून नुसत्या कृतज्ञतादर्शक शब्दांचीही अपेक्षा न करणें, तसेंच एखादें कृत्य करून कीर्ति आपल्या पाठीमागून येत आहे कीं काय, हें कळण्यासाठीं नुसतें मागें वळूनही न पाहाणें हें खरोखर असिधाराव्रतच आहे ह्यांत संदेह नाहीं. जगाचा स्तुतिपाठ ऐकून एखाद्या क्लीबाचे बंदही तटातट तुटतील. जगांत आपलें नांव राहील अशी आशा दिसली, तर एखादा यःकश्चित् मनुष्यही प्रसंगीं मोठी कृति करील! कीर्तीची प्रचंड लालसा मानवी हृदयांत आहे; ती लालसा निखालस नष्ट करून जगाच्या स्तुतीची यत्किंचितही पर्वा न करतां लोकांचें बरें करण्यासाठीं सदोदित झटावयाचें, हें कर्म सोपें म्हणतां येईल काय? वास्तविक विचार केला तर हा यज्ञ सर्व यज्ञांत मोठा आहे. आपला व आपल्या कुटुंबीयांचा चरितार्थ चालविण्याकरितां धनसंपादन करावयाचें, हें गृहस्थाश्रमधर्माचें एक कर्तव्यच आहे, परंतु खोटें बोलून, कोणास फसवून अथवा चोरून धनसंपादन करतां कामा नये. परमेश्वर आणि गरीब मनुष्यें ह्यांच्या सेवेकरितांच आपलें जीवित आहे, ही गोष्ट गृहस्थानें नित्य लक्षांत बाळगिली पाहिजे.

आपलीं मातापितरें हीं प्रत्यक्ष परमेश्वराचीं स्वरूपें आहेत, असें समजून गृहस्थानें त्यांना सदोदित संतोष होईल असें वागलें पाहिजे. मातापितरांचा संतोष तोच परमेश्वराचा संतोष होय. आपल्या मातापितरांस एकही कटु शब्द जो चुकूनसुद्धां बोलत नाहीं, तोच खरा सुपुत्र होय.

थट्टेचा अगर फाजील शब्द मातापितरांदेखत उच्चारूं नये, अधीरपणा दाखवूं नये अथवा क्रोध येऊं देऊं नये. मातापितरांस नमन करून त्यांच्यासमोर उभें राहावें व बसण्याबद्दल त्यांची आज्ञा झाल्यावांचून बसूं नये.

आपलीं मातापितरें, आपलीं मुलेंलेंकरें व आपली धर्मपत्नी ह्यांच्या अन्नवस्त्राची प्रथम तरतूद केल्याशिवाय त्या पदार्थांचा जो गृहस्थ उपभोग घेतो, तो पातकी समजावा. मातापितरें ह्या देहाच्या उत्पत्तीचें कारण

असल्यामुळें, कितीही कष्ट पडले तरी ते सोसून त्यांस संतोष देणें हा पुत्रधर्म आहे.

आपल्या धर्मपत्नीस कठोर शब्दांनीं गृहस्थानें ताडन करूं नये व आपल्या मातेप्रमाणेंच तिची चांगली तरतूद ठेवावी. आपणास कितीही त्रास पडत असला अथवा कष्ट सोसावे लागत असले, तरी तिच्यादेखत त्रासिक मुद्रा धारण करूं नये अथवा क्रोधाचा शब्द उच्चारूं नये.

आपल्या पत्नीवांचून इतर स्त्रीबद्दल मनानें देखील व्यभिचार घडला, तर असा गृहस्थ दारुण नरकवासाचा धनी होतो.

कोणत्याही स्त्रीसमक्ष गृहस्थानें अनुचित शब्द उच्चारूं नये, आणि आत्मश्लाघा करूं नये.

द्रव्य, कपडे, प्रेम आणि अमृतोपम भाषण, ह्यांनीं आपल्या पत्नीस सदोदित तुष्ट करीत असावें. तिच्या शांततेचा भंग होईल असें कोणतेंही कृत्य करूं नये. ज्याला सुशील धर्मपत्नीचें प्रेम संपादितां आलें, त्यानें धर्मार्थकाममोक्षादि चारी पुरुषार्थ संपादिले असें समजावें. आपल्या मुलांबाळांसंबंधीं वर्तणुकीचे नियम सांगितले आहेत ते असे :—

पुत्र चार वर्षांचा होईपर्यंत त्याचें प्रेमानें लालनपालन करावें. सोळा वर्षांचा होईपर्यंत त्याला शिक्षण द्यावें. तो वीस वर्षांचा झाल्यानंतर त्यास उद्योगधंद्यास लावावें आणि नंतर त्याशीं मित्राप्रमाणें प्रेमानें वागावें. ह्याचप्रमाणें कन्येलाही काळजीपूर्वक शिक्षण द्यावें व तिच्या विवाहप्रसंगीं तिला वस्त्रें-भूषणें द्यावीं.

आपले बंधु, आपल्या भगिनी आणि त्यांचीं मुलें, तसेंच इतर बांधव व चाकरनोकर ह्यांसंबंधींही विशिष्ट कर्तव्यांचा निर्देश केलेला आहे. त्याचप्रमाणें आपल्या मदतीची अपेक्षा करणारास गृहस्थानें योग्य मदत करावी. जवळ पैसा असतां जो गृहस्थ गरीबगुरिबांस मदत करीत नाहीं, तो पशुवृत्तीचा समजावा. खरोखर तो मनुष्यच नव्हे.

स्वतःच्या शरीरावरील वस्त्रप्रावरण व स्वतःचें शरीर ह्यांवर गृहस्थानें अति प्रेम ठेवूं नये. केस तुळतुळीत राखण्याचा हव्यास गृहस्थास नसावा. अंतःकरणानें पवित्र व देहानें स्वच्छ राहावें; तसेंच त्यानें उद्योगप्रिय आणि उद्योगरत असावें.

आपल्या शत्रूंशीं निकरानें सामना करावा. शत्रूंचा प्रतिकार करणें हें गृहस्थाचें कर्तव्यच आहे. त्यानें कोपऱ्यांत बसून अप्रतिकाराचें रडगाणें गाऊं नये. शत्रूला पाठ दाखविणारा गृहस्थ स्वकर्तव्यभ्रष्ट होतो. 'आपले मित्र आणि आप्त ह्यांशीं अत्यंत लीनतेनें राहावें.

दुष्टांपुढें न वाकणें हें गृहस्थाचें कर्तव्य आहे. दुष्टांपुढें मान वाकविणारा गृहस्थ, जगांतील दुष्टपणा वाढविण्यास पर्यायानें कारण होतो. जे मानार्ह असतील त्यांस मान द्यावा. मित्राशीं उच्छृंखल वर्तन करूं नये. मित्र करण्यासाठीं जिकडे तिकडे फिरूं नये. आपल्या परिचितांपैकीं आपल्या कसाला कोणी उतरला असेल तेवढ्यासच मित्र म्हणावें.

स्वतःच्या सत्कृत्याचा स्वतः उच्चार करूं नये. आपल्या सामर्थ्याची स्वतः टिमकी वाजवूं नये. स्वतःच्या संपत्तीबद्दल बोलूं नये, तसेंच कोणाचा रहस्यस्फोट करूं नये.

'मी गरीब आहें, अनाथ आहें,' असें गृहस्थानें कधींही म्हणूं नये. तसेंच 'मी संपत्तिमान् आहें' असाही उच्चार करूं नये. विहिताविहिताचा स्वतःशीं विचार करून जें करणें तें करावें; दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिऊं नये. ह्याप्रमाणें न वागणारा गृहस्थाश्रमी अनीतिमान् समजला जातो.

प्रत्येक गृहस्थाश्रमी मनुष्य समाजाच्या आधारस्तंभांपैकीं एक मानला जातो. गरीब आणि अशक्त माणसें, मुलें व स्त्रिया इत्यादिकांचा तो पोषणकर्ता आहे; इतक्यांच्या पोषणाचा भार उचलण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं पाहिजे; आणि हें सामर्थ्य सदोदित वाढतें राहिलें पाहिजे. ह्याकरितां

प्रसंगीं त्याच्या हातून चूक झाली, तरी तिजबद्दल सर्वांसमक्ष त्यानें कांहीं बोलूं नये. अशा रीतीनें त्यानें स्वतःस उणेपणा आणला, तर त्यामुळें त्याच्या ठिकाणीं हृदयदौर्बल्य उत्पन्न होण्याचा संभव असतो. दुर्बल मनुष्याकडून आश्रमधर्म पाळण्याचें काम बरोबर होणार नाहीं. तसेंच वित्त आणि ज्ञान ह्यांच्या प्राप्तीसाठीं त्यानें खटपट केली पाहिजे; हीं मिळविणें हें त्याचें कर्तव्यच आहे. तें तो न करील तर तो गृहस्थाश्रमास नालायक ठरेल. पैशाकरितां मेहनत न करणारा गृहस्थ अनीतिमान् आहे. जो आळशी आहे आणि आळसांत आयुष्य घालविणें ज्याला आवडतें, तो गृहस्थाश्रमी मनुष्य अनीतिमान् समजावा. तो श्रीमान् झाला, तर शेकडों लोकांच्या उपयोगीं पडतो. तुमच्या ह्या शहरांत शेकडों लोकांनीं श्रीमंत होण्याचा जर प्रयत्न केला नसता, तर येथें दिसणारीं हीं सदावर्तें आणि इतर लोकोपयोगी कृत्यें कधीं तरी नजरेस पडतीं काय? परोपकारीं लागणारा पैसा मिळविण्यासाठीं श्रम करणें हा गृहस्थाचा धर्मच आहे; कारण, जेथून सर्व लोकोपयोगी कार्यास मदत होते असें मध्यवर्ति ठिकाण म्हणजे गृहस्थाचें घरच होय. नीतीनें पैसा मिळवून तो परोपकारार्थ खर्च करणाऱ्या मनुष्याची योग्यता, सर्वसंगपरित्याग करून परमेश्वरप्राप्तीसाठीं तप करणाऱ्या योग्याहून तिळभरही कमी नाहीं. योग्यांत आढळून येणारा आत्मत्याग, आणि परोपकारार्थ पैसा खर्च करणाऱ्या गृहस्थाचा आत्मत्याग ह्यांत काय फरक आहे?

आपली कीर्ति वाढविण्याची खटपट योग्य मार्गानें करणें हा गृहस्थाचा धर्म आहे. गृहस्थानें जुगार खेळूं नये; दुष्टांच्या संगतींत राहूं नये, मिथ्या भाषण करूं नये; आणि दुसऱ्यास त्रास होईल असें कोणतेंही काम करूं नये.

एखादी गोष्ट आपल्या हातून होण्यासारखी नसली तरी ती करावयाची हांव पुष्कळांस असते. अशा प्रकारची एखादी गोष्ट करावयास ते आरंभ करितात; व तिच्या पूर्ततेसाठीं दुसऱ्या कोणास तरी फसवून आपला

कार्यभाग साधतात. कोणतीही गोष्ट करतांना युक्तायुक्ततेचा विचार अवश्य केला पाहिजे. एखादे वेळीं जी एक गोष्ट करणें युक्त असेल तीच गोष्ट दुसऱ्या प्रसंगीं अयुक्त ठरण्याजोगी असेल.

परक्याशीं भाषण करतांना तें अनुद्वेगकर, सत्य, प्रिय आणि हितकर असें असावें. परक्याच्या कामाविषयीं गृहस्थानें चर्चा करीत बसूं नये.

तळीं व विहिरी खणणारा, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लावणारा, धर्मशाळा बांधणारा आणि रस्ते व पूल बांधणारा गृहस्थ, योगमार्गानें प्राप्त होणाऱ्या लोकीं जातो.

ह्याप्रमाणें गृहस्थाश्रमधर्मापैकीं एका बाजूचें निरूपण केलें आहे. तसेंच आपल्या देशासाठीं व धर्मासाठीं धारातीर्थीं देह ठेवणारा गृहस्थ, ध्यानी योग्याच्या गतीस जातो, असेंही म्हटलें आहे.

ह्या एकंदर निरूपणाचा मथितार्थ असा आहे कीं प्रत्येकानें आपापल्या आश्रमधर्माप्रमाणें वागावें. तसेंच योग्य आश्रमधर्म आस्थेनें आचरणाऱ्या सर्व मनुष्यांची योग्यता सारखीच आहे. आपापल्या परिस्थितीप्रमाणें प्राप्त होणारीं कर्तव्यें आचरणें हेंच धर्माचें रहस्य आहे.

ह्याप्रमाणें सर्व आश्रमधर्मांचें निरूपण पाहिलें, तर सर्वांत प्रमुखत्वानें आढळणारें असें एकच तत्त्व आहे. मनोदौर्बल्य नाहींसें करणें हेंच मुख्यतः धर्माचें कार्य आहे असें विचाराअंतीं दिसून येईल. आश्रमधर्म म्हटला कीं मग तो गृहस्थाचा असो अथवा संन्याशाचा असो, पहिली बाब मनोदौर्बल्य नाहींसें करणें हीच आहे. आपण सर्व वेद पाहिले, तर ही हृदय-दौर्बल्यत्यागाची कल्पना चोहोंकडे व्यापून राहिली आहे असें आपणांस आढळून येईल. भीति ही दौर्बल्याची सूचक अशी वृत्ति आहे, जग काय म्हणतें, मला कोणी हसतें कीं काय, असल्या क्षुद्र विचारांस थारा न देतां स्वतःला योग्य वाटेल तें कर्म नित्य आचरणें, हें सर्व जीविताचें रहस्य आहे.

कोणी एखादा वनवासी होऊन राहिला, तर जगांतील संसारी लोक पापी आणि अभक्त असें त्यानें स्वतःस वाटूं देऊं नये. तसेंच संसारी लोकांनीं, त्यागी मनुष्य म्हणजे निरुद्योगी व परान्नपुष्ट आहे असें म्हणूं नये. जो कोणी स्वीकृत तत्त्वाचा कोणासही न भितां आचार करीत असेल तो मोठाच आहे. ह्याबद्दल एक गोष्ट सांगतों, म्हणजे तिजवरून ह्या तत्त्वाचें मर्म आपल्या ध्यानीं येईल.

एका शहरीं एक राजा होता. तेथें कोणी संन्यासी आला कीं राजानें त्याला बोलावून आणून प्रश्न करावा कीं 'यतिमहाराज, संसारी मोठा कीं संन्यासी मोठा?' ह्यावर अनेकांकडून अनेक प्रकारचीं उत्तरें येत असत. कोणी म्हणत कीं 'संन्यासी मोठा'. परंतु त्यांचें म्हणणें त्यांना सप्रमाण सिद्ध करतां न आलें, म्हणजे राजानें त्यास लग्न करून संसारी होण्याचा हुकूम करावा.

असें होतां होतां एके दिवशीं एक संन्यासी त्या शहरीं आला असतां, राजानें त्यास बोलावून आणून हाच प्रश्न विचारला. तेव्हां संन्यासी म्हणाला, 'राजा, अमूक एक आश्रम मोठा असें नाहीं. जो कोणी स्वीकृत आश्रमधर्म पाळतो तो मोठा'. राजा म्हणाला, 'आपण म्हणतां ह्या गोष्टीची सत्यता प्रत्यक्ष प्रमाणानें आपण मला पटवून दिली पाहिजे'. राजाचें हें बोलणें संन्याशानें कबूल करून, तो त्या नगरांतून राजासह बाहेर पडला.

ह्याप्रमाणें फिरतां फिरतां ते दुसऱ्या एका मोठ्या राजाच्या नगरांत गेले. तेथें जिकडेतिकडे गर्दी उडून गेली होती. ताशे, तर्फे आणि ढोल, मोठमोठ्यानें वाजत होते. त्या दिवशीं तेथील राजकन्येचा स्वयंवरसमारंभ होता. मंडपांत उंची पोषाख करून हजारों प्रजाजन जमले होते. हें कौतुक पाहाण्यासाठीं आपला राजा व संन्यासी हेही तेथेंच उभे राहिले. ह्याप्रमाणें स्वयंवर करण्याची चाल पुरातनकाळीं आर्यावर्तांत होती. प्रत्येक राजकन्या आपल्या पसंतीप्रमाणें वराची निवड करीत असे. कोणी राजकन्या उत्तम

रूपावर लुब्ध होत असे, तर दुसरी एखादी अप्रतिम शौर्याची चाहती असे. आसपासचे सर्व राजपुत्र अशा समारंभास यावयाचे व त्यांतून एकाला राजकन्येनें आपल्या पसंतीनें वरावयाचें, अशी पद्धत होती. राजकन्येला तिची सखी प्रत्येक राजपुत्राचे गुण सांगत तिच्याबरोबर फिरत असे. असें होतां होतां जो राजपुत्र कन्येच्या पसंतीस उतरे, त्याला ती माळ घालीत असे.

आपला राजा व संन्यासी ज्या नगरांत आले होते, तेथील राजकन्या अप्रतिम लावण्यवती होती. तसेंच त्या राजास पुत्रसंतान नसल्यामुळें राजाच्या पाठीमागें सर्व राज्यही त्याच्या जांवयासच मिळावयाचें होतें. ही राजकन्या अप्रतिम रूपाची चाहती असल्यामुळें, आपला पति अतुल सौंदर्यवान् असावा अशी तिची इच्छा होती. हजारों लोक व देशोदेशींचे राजपुत्र त्या ठिकाणीं जमले होते. राजकन्या त्या सभामंडळींत सखीसह फिरूं लागली. कित्येक राजपुत्रांस व इतरांस तिनें पाहिलें. परंतु कोणीच तिच्या पसंतीस उतरेना. मोठ्या आशेनें जमलेल्या त्या राजपुत्रांचा आशाभंग झाला. शेवटीं, स्वयंवर न होतांच सभा विसर्जन होते कीं काय अशी सर्वांस भीति वाटूं लागली. अशा समयीं एक यति – संन्यासी – तेथें आला. सूर्यालाही लाजविणारी कांति त्याच्या मुखावर झळकत होती. त्याला पाहातांच राजकन्येनें त्याच्या गळ्यांत माळ घातली, परंतु यतीनें तत्क्षणींच ती माळ गळ्यांतून काढून दूर फेकून दिली व म्हटलें, ‘ राजकन्ये, मी संन्यासी आहें हें तुला दिसत आहे ना ? मला लग्न करून काय करावयाचें आहे ?’ त्याचें भाषण ऐकून तिच्या बापाला असें वाटलें कीं यति भिकारी असल्यामुळें राजकन्येशीं लग्न करण्यास भीत असेल; म्हणून तो त्या यतीला म्हणाला, ‘ माझ्या मुलीबरोबरच आपण अर्ध्या राज्याचेही मालक आतांच होणार आहां ; व माझ्या पश्चात् सर्व राज्य आपणासच मिळणार आहे. ’ राजानें असें म्हणतांच, राजकन्येनें ती माळ पुन्हां यतीच्या गळ्यांत घातली ; परंतु यतीनें ती पुनः काढून फेकून दिली

व ‘ राजा, लग्न करणें हा माझा धर्म नव्हे, ’ असें म्हणून तो यति झपाट्यानें तेथून निघून गेला. त्या यतीच्या दर्शनानें राजकन्या अत्यंत मोहित झाली होती. ती म्हणाली, ‘ लग्न करावयाचें तर ह्याच्याशींच करीन अथवा तशीच मरून जाईन, ’ असें म्हणून ती त्याच्या मागोमाग जाऊं लागली.

हा सर्व प्रकार आपला राजा व संन्यासी पाहात होते. संन्यासी राजास म्हणतो, ‘ राजा, आपणही ह्या दोघांच्या मागें जाऊन काय चमत्कार होतो तो पाहूं. ’ संन्याशानें असें म्हणतांच आपला राजा व संन्यासी, त्या दोघांच्या मागें थोड्या अंतरावरून चालूं लागले. चालतां चालतां तो यति बराच लांब गेल्यानंतर त्यास एक घोर अरण्य लागलें. त्या यतीनें त्या अरण्यांत प्रवेश केला. त्याच्या मागोमाग आलेली राजकन्याही त्या अरण्यांत शिरली. हें पाहून आपला राजा व संन्यासी हे दोघे त्यांच्या मागोमाग त्या अरण्यांत शिरले. हें अरण्य त्या यतीच्या चांगलें माहितीचें असल्यामुळें त्यांतील सर्व आडवाटा त्यास अवगत होत्या. त्यांपैकीं एका आडवाटेनें जाऊन तो यति दिसेनासा झाला. त्या बिचाऱ्या राजकन्येस त्याचा कोठें मागमूसही लागेना; तेव्हां ती भयभीत होऊन एका वृक्षाखालीं बसली. तिला तिच्या पित्याचें स्मरण होऊन ती अश्रु ढाळूं लागली. इतक्यांत आपला राजा व संन्यासी हे त्या ठिकाणीं आले व तिला म्हणाले, ‘ राजकन्ये, भिऊं नको. ह्या अरण्यांतून आम्ही तुला सुरक्षित बाहेर नेऊन तुझ्या पित्याच्या स्वाधीन करूं; परंतु आतां काळोख होऊं लागल्यामुळें मागें फिरणेंही सुरक्षित नाहीं. ह्या शेजारच्या मोठ्या वृक्षाखालीं एक रात्र काढून सकाळींच आपण मागें फिरूं. ’ राजकन्येला त्या दोघांचें हें म्हणणें बरोबर वाटलें व तीं तिघें त्या वृक्षाच्या आश्रयास येऊन बसलीं.

त्या वृक्षावरील एका कोटरांत लहान पक्ष्यांचें एक घरटें होतें. त्यांत एक पक्षी, त्याची मादी व तीन लहान पिलें, असें कुटुंब होतें. नरानें घरट्यांतून सहज बाहेर डोकावून पाहिलें, तों त्यास हे तीन अतिथि

आढळले. तेव्हां तो गृहस्थाश्रमी पक्षी आपल्या पत्नीस म्हणाला, 'प्रिये, आपल्याकडे तीन अतिथि आल्याचें दिसतें. थंडी तर मी म्हणते ! आणि आपल्या घरांत विस्तव नाहीं !' असें म्हणून तो पक्षी उडून बाहेर गेला, व जळत्या लाकडाचा एक तुकडा चोंचींतून आणून त्यानें त्या तिघांपुढें टाकला. तो घेऊन व जवळ पडलेला पाचोळा त्यावर घालून त्यांनीं शेकोटी तयार केली. त्या पक्ष्याचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. तो पुन्हा म्हणाला, 'हे तर बिचारे उपवासी दिसतात ! ह्यांस खावयास देण्यासारखें आपल्या घरांत कांहीं नाहीं. प्रिये, आपण गृहस्थाश्रमी आहों आणि क्षुधार्त अतिथि आला असतां त्याला विमुख परत लावणें आपला धर्म नव्हे. आपणांजवळ जें कांहीं असेल तें त्यांस द्यावें. माझ्याजवळ माझा देह मात्र आहे. तोच मी त्यांस अर्पण करतों.' असें म्हणून त्यानें पेटलेल्या आगींत उडी घेतली. हें पाहून त्याची स्त्री विचार करूं लागली कीं, 'एवढासा लहान पक्षी खाऊन तिघांची तृप्ति कशी होईल ? माझ्या पतीच्या मार्गानें जाऊन त्यांची तृप्ति करणें माझें कर्तव्य आहे.' असें म्हणून तिनेंही त्या आगींत उडी टाकली. हें सर्व कृत्य तीं पक्ष्यांचीं तीन मुलें पाहात होतीं. तींही आपल्या मनाशीं विचार करूं लागलीं कीं 'अजूनही ह्या आपल्या पाहुण्यांची तृप्ति होईलसें वाटत नाहीं. आईबापांच्या मागें त्यांची तरतूद ठेवण्याचें काम आमच्याकडे आलें आहे" असें म्हणून त्या तिघांनींही आगींत उडी घेतली.

हें सर्व कृत्य पाहून तीं तिघेंही थक्क होऊन गेलीं. दिवस उगवल्यानंतर तीं सर्व अरण्याच्या बाहेर आलीं. राजा व संन्यासी ह्यांनीं राजकन्येला तिच्या बापाकडे पोचविलें. नंतर संन्यासी राजाला म्हणाला, 'राजा, आपलें कर्तव्य करणारा कोणत्याही परिस्थितींत असला, तरी तो मोठाच समजावा. गृहस्थाश्रमधर्म स्वीकारण्याची तुझी इच्छा असेल, तर त्या पक्ष्याप्रमाणें परहितासाठीं आपल्या देहावरही पाणी सोडण्यास तुला तयार असलें पाहिजे. तसेंच, संन्यस्त व्हावें असें तुला वाटत असेल तर

त्या यतीप्रमाणें राज्यलक्ष्मी आणि रतीलाही लाजविणारी स्त्री हीं उपेक्ष्य मानण्याची तुझी तयारी असली पाहिजे. परहितासाठीं देहाचीही आहुति देण्याची गृहस्थाची तयारी असली पाहिजे. ज्याला संन्यासी व्हावयाचें असेल त्यानें रूपवती स्त्री, पैसा आणि सत्ता ह्यांजकडे ढुंकूनही पाहूं नये. जो तो आपापल्यापरी मोठाच आहे. ज्याचें जें कर्तव्य तें त्यानें करावें' 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।' हेंच खरें धर्मरहस्य.

* * * * * * * * * * * * *

## प्रकरण तिसरें

## कर्मरहस्य

* * * * * * * * * * * * *

दुसऱ्याच्या अडचणी दूर करण्यासाठीं आपण अंगमेहनत करणें हें खरोखर थोरवीचें लक्षण आहे. परंतु परक्याची अडचण ज्या मानानें अधिक महत्त्वाची असेल, व ज्या मानानें मदतीचे परिणाम अधिक काल टिकणारे असतील, त्या मानानें मदत करणाराची थोरवीही अधिक होईल, हें उघड आहे. आपण एखाद्याची एखाद्या घटकेपुरती अडचण निवारण केली, तर आपण त्यास मदत केली, हें तर खरेंच; परंतु जर आपण एका वर्षापुरती त्याला मदत केली, तर त्या मानानें आपल्या मदतीचें श्रेयही अधिक झालें हें उघडच आहे. त्याचप्रमाणें जर आपण त्याची एखादी चिरकालिक अडचण दूर केली, तर खरोखर त्या मदतीचें मापही करतां येणार नाहीं! आपलें अनंतकालाचें दुःख सर्वथैव नष्ट करण्याचें सामर्थ्य एकट्या अध्यात्मविद्येंतच आहे. ह्याचसाठीं

'अध्यात्मविद्या विद्यानाम्' असें म्हणून भगवान् श्रीकृष्णांनीं त्या विद्येला प्रत्यक्ष परमेश्वराच्या पायरीस पोचविलें आहे. दुसऱ्या कोणत्याही विद्येचें सामर्थ्य कांहीं थोड्याशा कालापलीकडे जात नाहीं. मनुष्यदेहांत सदैव वास करणाऱ्या इच्छा व आशा आणि त्यामुळें उद्भवणारी अतृप्ति, ह्यांचा समूळ नाश करून त्याला स्वानंदसाम्राज्यपदीं आरूढ करणें, हें सामर्थ्य एकट्या अध्यात्मविद्येंतच आहे. असें आहे तर अध्यात्मज्ञानदानाइतकें मोठें पुण्यकृत्य दुसरें कोणतें असणार आहे? "य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति। भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः॥"

अशी अध्यात्मज्ञानाची थोरवी भगवंतांनीं स्वतः वर्णिली आहे. परमार्थ-मार्ग दाखविणारे महात्मे, हेच मानवजातीचे खरे हितचिंतक होत. अशा महात्म्यांच्या ठिकाणीं अनुपमेय सामर्थ्य वास करीत असल्याचें आपणांस आढळून यत. ह्या जगांत आपण जें जें कांहीं करतों, तें तें आपल्या चिच्छक्तीच्या बळावर करतों. ह्या शक्तीवांचून नुसता देह म्हणजे केवळ मातीचा गोळा आहे. ह्याकरितां स्वतःच्या ह्या शक्तीचें काय सामर्थ्य आहे ह्याची पूर्ण जाणीव ज्याला उत्पन्न झाली आहे, असा मनुष्य कोणतेंही कार्य नेटानें पार पाडण्यास लायक असतो. मग तें कार्य लौकिक असो, वैयक्तिक असो, अगर दुसऱ्या कोणत्याही प्रकारचें असो. ज्या मनुष्याला आपणांत सदैव वास करणाऱ्या ह्या शक्तीची जाणीव झाली नाहीं, तो संसार आणि परमार्थ ह्या दोहोंतही निरुपयोगी ठरतो. अध्यात्मज्ञानाच्या खालोखाल उपयोगी असें बौद्धिक ज्ञान होय. वस्त्रदान अथवा अन्नदान ह्यांहून वैदिक ज्ञानदान फार श्रेष्ठ आहे. फार काय सांगावें, पण जीवदानापेक्षांही ज्ञानदानाचें पुण्य अधिक आहे; कारण पुरुषार्थसंपादन ही जी मानवी जीविताची इतिकर्तव्यता तिची पूर्ति ज्ञानावांचून होणें नाहीं. ज्यानें कोणताही पुरुषार्थ संपादिला नाहीं, तो जगला आणि मेला सारखाच. अज्ञान आणि त्यापासून उद्भवणारी दुःखपरंपरा ह्यांच्या संगतीनें कसेंबसें आयुष्य ढकलणाऱ्या मनुष्याचें जीवित वस्तुतः कितीशा महत्त्वाचें आहे बरें? ह्या दोहोंच्या खालच्या

पायरीची मदत म्हणजे शारीरिक मदत होय. आपल्या अंगबळानें दुसऱ्यास मदत करावयाची व त्याच्या उपयोगी पडावयाचें, हेंही एक प्रकारचें दानच आहे. परक्यांचें दुःख निवारण करण्याकरितां केवळ शारीरिक मदत करणें म्हणजेच त्याला खरी महत्त्वाची मदत केल्यासारखेंच होतें असें समजूं नये. वास्तविक शारीरिक मदत ही अगदीं खालच्या पायरीची आहे; कारण तीपासून होणारा उपयोग केवळ तात्कालिक असतो. त्याला कोणतेंही चिरकालिक स्वरूप नसतें. भुकेच्या वेळीं कोणाला अन्न दिलें, तर त्या वेळेपुरता त्याला आनंद होईल हें खरें; पण पुन्हा लवकरच भूक आणि दुःख हीं परत येणार ! हीच गोष्ट आपल्या इतर गरजांसही लागू पडते. जेथें कसली तरी गरज उत्पन्न झाली, तेथें तिच्या पाठोपाठ तिचें लेकरूं दुःख हें ठेवलेलेंच असतें. जर मला खरोखर सुखी व्हावयाचें असेल, तर गरजेच्या पलीकडे मला गेलें पाहिजे. ज्या दिवशीं मला कशाचीही गरज लागणें नाहींसें होईल, त्या दिवशीं मी खरा सुखी होईन. अशा स्थितींत मला भुकेची बाधा होणार नाहीं व जगांतील कोणतीही स्थिति मला माझ्या पदापासून ढळवूं शकणार नाहीं. अशा प्रकारची स्थिति प्राप्त होण्याजोगी मदत मला मिळाली, तर ती अत्यंत श्रेष्ठ प्रकारची मदत होय. तिच्या खालोखाल बौद्धिक आणि अगदीं शेवटच्या पायरीची म्हणजे शारीरिक मदत होय.

जगांत जें दुःख आढळतें, तें नुसत्या शारीरिक मदतीनें कधींही नष्ट होणार नाहीं. सध्या जो मनुष्यस्वभाव आपण पाहातों, तो सर्व बदलून जाईपर्यंत अनेक प्रकारच्या गरजा उद्भवणार; आणि त्या न भागल्या म्हणजे दुःखप्राप्ति ही होणारच. नुसत्या शारीरिक मदतीनें असल्या दुःखाची निवृत्ति कायमची होणार नाहीं. खऱ्या ज्ञानदानानें चित्तशुद्धि करणें हेंच ह्या रोगावर रामबाण औषध आहे. "चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥" अशी चित्तशुद्धीची महति संतांनीं वर्णिली आहे. जगांतील सर्व पाप आणि दुःख ह्यांची उत्पत्ति

मराठा ग्रंथ स[illegible], ठा[illegible]. स्थळप्रत
अनुक्रम....32655.... दि: ......[illegible]......

अज्ञानापासून झाली आहे. खऱ्या ज्ञानप्राप्तीनें ज्या दिवशीं मनुष्यमात्रास आपल्या चैतन्यशक्तीची ओळख पटेल आणि त्याच्यांत पूर्ण आत्मविश्वास निपजेल त्या दिवशीं मानवजाति पूर्ण सुखी होईल. त्याच्या अगोदर अशा स्थितीची आशाही करूं नये. राष्ट्रांतील प्रत्येक घर सदावर्त झालें आणि प्रत्येक घराआड एक एक फुकट दवाखाना झाला, तरी मानवजातीची आज आढळणारी दुःस्थिति नाहींशी होणार नाहीं. मनुष्यजातीचा आज दिसून येणारा स्वभाव अगदीं बदलून जाईपर्यंत हीच स्थिति नित्य राहाणार.

कर्म हें नित्य केलेंच पाहिजे असें श्रीकृष्णांनीं आपल्या गीतेंत जागोजाग सांगितलें आहे. "कर्मणैवहि संसिद्धिमास्थिता जनकादयः।" असें भगवान् श्रीकृष्णांचें निश्चित मत आहे. आपल्या प्रत्येक कर्मापासून सुख आणि दुःख ह्याची मिश्र उत्पत्ति होत असते. तुम्ही कोणतेंही काम करा, त्यापासून कोणाला सुख आणि कोणाला दुःख हीं होणारच. ज्यापासून कोणाला सुख नाहीं आणि कोणाला दुःख नाहीं असें एकही काम करणें शक्य नाहीं. प्रत्येक कर्मांच्या पोटीं सुख आणि दुःख ह्यांची मिश्र संतति निपजत असते आणि असें आहे, तरी आम्हांस कर्म हें केलेंच पाहिजे. जर कर्मापासून सुखदुःखाची उत्पत्ति होते, तर आपण कर्मच करूं नये, म्हणजे सुखदुःखाच्या द्वंद्वांतून आपण मुक्त होऊं, असें जर कोणास वाटत असेल तर तो त्याचा निव्वळ भ्रम होय. प्रत्येक कर्म ज्या मानानें सुष्ट अथवा दुष्ट असेल, त्या मानानें त्यांतून सुखाची अथवा दुःखाची प्राप्ति होते. सत्कर्मापासून सुख आणि दुष्कर्मापासून दुःख निपजतें. दुःख हें जसें आत्म्याला बद्धक आहे तसेंच सुखही बद्धकच आहे. सत्कर्मानें सुख होतें ही गोष्ट जरी अनुभवाची आहे, तरी तें सुख कर्मापासून नवीन उत्पन्न झालेलें असतें; तर आपल्याच ठिकाणीं असलेलें सुख सत्कर्मांमुळें आपल्या अनुभवास येतें, अशी वस्तुस्थिति आहे. सत्कर्मापासून सुख उत्पन्न होतें हा भ्रम आहे आणि हा भ्रम अंशतःही जोंपर्यंत शिल्लक आहे, तोंपर्यंत सुखदुःखाच्या द्वंद्वांतून आत्म्याची मुक्ति

होणार नाहीं. ह्यासाठीं, 'मी अमूक कर्म करतों आणि त्यापासून मला अमूक प्रकारची सुखप्राप्ति होईल ' ही भावनाच टाकून द्यावी, असें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. प्राप्तकर्म केलेंच पाहिजे असें आहे तर तें अवश्य करावें; परंतु त्यापासून सुखप्राप्ति होईल ही भावना सोडावी. " कर्मण्यवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । " 'कर्म करावें परंतु त्यापासून अमूक फळ मिळेल अशी आसक्ति ठेवूं नये ' असा ह्याचा अर्थ आहे. आतां अनासक्ति म्हणजे काय ह्याचा आपण विचार करूं.

अनासक्तीनें प्रत्येक कर्म केलें पाहिजे, हें भगवद्गीतेंतील एक मुख्य प्रतिपादन आहे. प्रत्येकानें कर्म हें केलेंच पाहिजे ; परंतु फलाची इच्छा न धरतां तें केलें पाहिजे. प्रत्येक प्राण्याला कोणत्या तरी प्रकारचे जन्मजात संस्कार असतात. मनाची तळ्याशीं तुलना केली, तर त्यांतील पाण्यावर जसे बारीक बारीक तरंग उठतात, तसेच तरंग मनावर एकसारखे उठत असतात. मनाचे तरंग भासेनासे झाले, तरी ते कधींही समूळ नष्ट न होतां गुप्तरूपानें मनांत राहातात व कांहीं कारण घडल्याबरोबर पुन्हा त्यांचा उदय होतो. ह्याच गुप्तरूपास संस्कार अशी संज्ञा आहे. आपण जी जी क्रिया करतों, अथवा जो जो विचार मनांत आणतों, त्या प्रत्येकाचा ठसा मनावर उमटून, तो त्याच्या तळाशीं बुडी मारून बसलेला असतो व अशा गुप्त स्थितींतही मनाला चलन देण्याची त्याची क्रिया चालू असते आपण चालू व्यवहार करीत असतां, आपलें जें कांहीं स्वरूप प्रत्ययास येतें, तें ह्या प्रकारच्या संस्कारांच्या संघटनेनें उत्पन्न झालेलें असतें. ह्या स्वरूपाला नित्यव्यवहारांत आपण स्वभाव असें म्हणतों.

आतां मी स्वतः ज्या कांहीं स्वरूपानें आपणांस दिसत असेन, तें माझें स्वरूप पूर्वसंस्कारांच्या संघटनेपासूनच उत्पन्न झालें आहे. प्रत्येक मनुष्याच्या ह्या स्वभावविशेषास दानत असें नांव आहे. पूर्वसंस्कार चांगले असले तर मनुष्य चांगल्या दानतीचा व वाईट संस्कारांनीं वाईट दानतीचा होतो. एखादा मनुष्य नित्य वाईट शब्द ऐकत असला, मनांत नित्य वाईट विचार

92330

घोळवीत असला व नित्य वाईट कृति करीत असला तर त्यापासून निघणारे संस्कारही वाईटच असणार हें उघड आहे. अशा संस्कारांनीं तयार झालेली दानतही वाईटच असली पाहिजे. एकाच प्रकारच्या संस्कारांची सवय एकवार मनांत जडली, म्हणजे वाईटाचा वाईटपणाही त्यास दिसेनासा होतो व अशा मनुष्याच्या हातून वाईट कर्में अगदीं सहजासहजीं घडून येतात. पुढें पुढें तर ह्या संस्कारांचें प्राबल्य इतकें होतें कीं एखादी गोष्ट वाईट आहे असें समजूनउमजूनही तो मनुष्य ती गोष्ट करण्यास प्रवृत्त होतो. वाईट संस्कारांच्या प्राबल्यापुढें चांगल्या वृत्तीचा जोरच चालेनासा होतो. ह्याचप्रमाणें मनानें चांगलें चिंतणाऱ्या आणि चांगलीं कामें करणाऱ्या मनुष्याचे चांगले संस्कार उत्तरोत्तर अधिक चांगलीं कामें त्याजकडून करवितात. चांगल्या संस्कारांनीं त्याच्या दानतीचें स्वरूप इतकें पक्कें बनून गेलेलें असतें कीं एखादें वाईट कर्म करण्याचें त्यांच्या क्षणभर मनांत आलें तरी त्याचें शरीर तें कर्म करण्यास पुढें सरसावतच नाहीं. इतकी स्थिति झाली म्हणजे मनुष्याची दानत पक्की झाली असें समजावें.

आपले अवयव पाठीखालीं मिटून घेण्याची शक्ति कांसवाला असते. पाठीवर केवढेही तडाखे बसले, तरी जसें तें निग्रहानें आपल्या अवयवांस बाहेर येऊं देत नाहीं, तसें ज्या मनुष्याचें आपल्या इंद्रियांवर स्वामित्व असतें तो मनुष्यही कांसवासारख्या निग्रहानें आपल्या हातून कोणतेंही वाईट कर्म घडूं देत नाहीं. "तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः । इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥" असें भगवान् श्रीकृष्णांचें वचन आहे. सदोदित सद्विचार ठेवून सत्क्रिया आचरल्यानें उत्पन्न होणारे संस्कार बळावत जाऊन जी दानत बनते, तिच्या साहाय्यानें इंद्रियनिग्रह करणें फार जड जात नाहीं. ह्या ठिकाणीं इंद्रियशब्दानें केवळ दृश्य आणि जड इंद्रियांचा निर्देश केला आहे असें समजूं नये; कारण, केवळ जड शरीर जाग्यावरून न

हालवितांही नित्य वाईट गोष्टींचें चिंतन केलें, तरी दानत विघडावयास उशीर लागत नाहीं. ह्यासाठीं कर्मेंद्रियांबरोबरच ज्ञानेंद्रियांचाही निरोध आवश्यक आहे. हा निरोध पक्का झाला म्हणजे मनुष्य स्थितप्रज्ञ झाला असें म्हणतां येईल. स्थितप्रज्ञासच सत्याची भेट होते व तो द्वंद्वातीत होऊन अगदीं सुरक्षित अशा जागीं जाऊन बसतो. त्याच्या हातून कोणतेंही वाईट कृत्य घडणेंच अशक्य होतें. जगांतील अत्यंत दुष्ट अशा नरपशूंचा गराडा त्याच्या भोवतीं असला तरी त्याच्या दानतींत यत्किंचितही बदल होण्याची भीति नको. अशा प्रकारच्या स्थितीला ब्राह्मी स्थिति असें म्हणतात. ही स्थिति एकदा प्राप्त झाली म्हणजे पुन्हा कसल्याही मोहांत न पडतां, तो मनुष्य मुक्ताच्या स्थितींत प्रवेश करतो. सर्व योगांचें ध्येय ही मुक्त स्थिति प्राप्त करून घेण्याचें आहे व प्रत्येकानें दाखविलेले मार्ग जरी निरनिराळे दिसले, तरी त्यांचें पर्यवसान एकाच ठिकाणीं होतें. ज्ञानयोगानें बुद्धाला अथवा भक्तियोगानें येशू ख्रिस्ताला जी स्थिति प्राप्त झाली, तीच निवळ कर्मयोगानेंही एखाद्याला प्राप्त करून घेतां येईल. बुद्ध ज्ञानी असून कर्मयोगी होता व येशू ख्रिस्त शुद्ध भक्त होता; परंतु दोघांनाही एकाच स्थितीची प्राप्ति झाली. ही स्थिति म्हणजे पूर्ण मुक्ताची स्थिति होय. मुक्तावस्था म्हणजे काय, ह्याचा येथें थोडासा खुलासा करणें अवश्य आहे. सुखदुःख, पापपुण्य, सत्कर्मदुष्कर्म, इत्यादि जीं द्वंद्वें आपण नित्य पाहातों, त्या द्वंद्वांतून पलीकडे गेलेला तो मुक्त. ज्याप्रमाणें दुःख, पाप आणि दुष्कर्म हीं मुक्तीला विघातक आहेत, त्याचप्रमाणें सुख, पुण्य आणि सत्कर्म हींसुद्धा खऱ्या मुक्तीच्या आड येणारीं आहेत. एकाला लोखंडाच्या सांखळीनें बांधलें आणि दुसऱ्याला बांधावयास सुवर्णशृंखलेचा उपयोग केला, तरी ज्याप्रमाणें त्यांच्या बंधनाचें स्वरूप वस्तुतः सारखेंच आहे, त्याप्रमाणें पुण्यकृत्यें करून सुख भोगणारा मनुष्य आणि दुष्कृत्यें करून दुःख भोगणारा मनुष्य, हे दोघेही मुक्ताच्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेचे आहेत. आपल्या पायांत शिरलेला कांटा काढावयास जसा आपण दुसऱ्या कांट्याचा उपयोग

करतों व काम झाल्यावर जसे ते दोन्ही कांटे टाकून देतों, तसेंच दुष्कर्माकडे वळलेलें आपलें मन, त्यापासून परत फिरविण्याकरितांच सत्कर्मांचा उपयोग आपणांस करावयाचा आहे. तें एक वेळ पक्कें परत फिरलें, म्हणजे सत्कर्मांचाही आपणास कांहीं उपयोग नाहीं. सत्कर्मांपासूनही आपलें मन आपणांस पुढें आवरावयाचें आहे. कोणतेंही कर्म करण्याची आवश्यकता न वाटणें हीच अनासक्ति होय. कर्म करा, परंतु त्याचा कोणताच परिणाम मनावर विशेष असा होऊं देऊं नका. ज्याप्रमाणें एखाद्या तळ्याच्या पृष्ठभागावर तरंग येतात व जातात, परंतु त्यामुळें जसा त्या तळ्याच्या शांतीचा भंग होत नाहीं, त्याचप्रमाणें तुम्ही कर्मे करूनही आपल्या मनाचा क्षोभ होऊं देऊं नका, असें भगवान् श्रीकृष्णांचें सांगणें आहे. हें शक्य तरी आहे काय? आम्हीं कांहीं कर्म केलें, तर त्याचें कांहीं सुखदुःख आमच्या चित्तावर राहाणारच, हा आमचा नित्याचा अनुभव आहे. असा अनुभव असतांही आजच्या स्थितींत अशक्य वाटणारी गोष्ट शक्य कोटींत कशी आणतां येईल, ह्याचा आतां विचार करूं.

माझ्या नित्यक्रमांत शेकडों मनुष्यें रोज मला भेटतात आणि त्यांतच एखाद्यावर माझें प्रेम असतें. रात्रीं बिछान्यावर पडलों आहें, अशा वेळीं दिवसा पाहिलेले सर्व चेहेरे मी आठवूं लागलों, तर ज्यावर माझें प्रेम आहे, त्या मनुष्याखेरीज इतरांपैकीं एकही चेहेरा माझ्या ध्यानांत येत नाहीं. ह्याचें कारण असें कीं माझें प्रेम ज्यावर जडलें, त्या मनुष्याचा चेहेरा माझ्या मनःपटावर पक्का कोरला गेला. ती प्रतिमा माझ्या चित्तांतून सहसा निघून जाऊं नये अशा रीतीनें तेथें चित्रित झाली. बाकीचे शेकडों चेहेरे मीं पाहिले, परंतु माझें मन त्यांविषयीं आसक्त नसल्यामुळें त्या प्रतिमा माझ्या मनावर उमटल्या नाहींत व त्या न उमटल्यामुळें त्यांचें स्मरण करणें मला अशक्य झालें. केवळ बाह्यदृष्टीनें पाहिलें तर माझ्या नेत्रांतील कनीनिकेवर सर्व चेहेरे सारखेच चित्रित झाले होते. असें असतां त्यांपैकीं एकच मला आठवतो आणि बाकीच्यांचें यत्किंचितही स्मरण कां राहिलें

नाहीं ? ह्याचें कारण असें कीं एकाशिवाय बाकीचे चेहेरे मीं कदाचित् पूर्वी कधींही पाहिले नसल्यामुळें, त्यांच्यासंबंधीं माझ्या मनांत पूर्वग्रह असा कांहींच नव्हता; परंतु प्रेमाच्या मनुष्याची गोष्ट निराळी आहे. त्याला मीं पूर्वी अनेक वेळां पाहिलें असल्यामुळें त्याच्यासंबंधीं कांहीं पूर्वग्रह माझ्या मनांत अगोदरच होते, त्यामुळें त्या विशिष्ट दिवशीं त्याची प्रतिमा माझ्या चित्तांत शिरतांच, तिचे जुने स्नेही तेथें आढळल्यामुळें ती तेथेंच त्यांच्या सहवासांत राहिल्यासारखी झाली. त्या मनुष्याबद्दल शेकडों प्रकारच्या गोष्टी अनेक प्रसंगीं माझ्या कानांवरून गेल्या होत्या व शेकडों मीं माझ्या मनांत स्वतः तयार केल्या होत्या. हा सर्व कल्पनासमूह माझ्या चित्तांत निद्रित होता व त्या दिवशीं त्या मनुष्याच्या चेहेऱ्याच्या प्रतिमेचा आघात माझ्या चित्तावर होतांच तो निद्रित कल्पनासमूह खडबडून जागा झाला व त्यानें ह्या नव्या पाहुण्याचें प्रेमानें स्वागत केलें. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं जी गोष्ट कोणत्या तरी कारणानें माझ्या मनांत घोळत राहाते, तिचा ठसा तेथें खोल उमटून राहातो व यत्किंचित् आघातानें तो जागृत होतो.

ह्यासाठीं प्रत्येक गोष्ट करतांना तूं ती अलिप्त चित्तानें कर. ती तुझ्या मनांत घोळीत वसूं नको, असा भगवान् श्रीकृष्णांचा उपदेश आहे. तुझीं कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें एकसारखीं उद्योगरत असतां त्या उद्योगाचा ठसा आपल्या मनावर उमटूं देऊं नको. आपण कोणाच्या घरीं पाहुणे म्हणून गेलों तर तेथील वस्तूंकडे ज्या बुद्धीनें आपण पाहातों, त्याच बुद्धीनें ह्या सृष्टींतील यच्चयावत् पदार्थांचें अवलोकन करावें. तूं एकसारखा उद्योग अवश्य कर, परंतु त्यांत लिप्त होऊं नको. नुसता उद्योग करणें हें बाधक नसून लिप्तपणा हा बाधक आहे. हें दृश्य जग आपल्या नित्य वास्तव्याचें ठिकाण नसून, आपल्या प्रवासांतील मधल्या मुक्कामाची एक जागा आहे. ह्यापूर्वीं आपण अनेक ठिकाणीं मुक्काम केला होता व पुढेंही अनेक ठिकाणीं मुक्काम करावयाचा आहे. 'ही सर्व सृष्टि आत्म्यामुळें

उत्पन्न झाली आहे; सृष्टीपासून आत्मा उत्पन्न झाला नाहीं.' हें सांख्यवचन नित्य लक्षांत बाळगिलें पाहिजे. ही सारी सृष्टि जीवात्म्याच्या शिक्षणासाठीं दृश्य स्वरूपास आली आहे. त्याशिवाय तिचा दुसरा कोणताही हेतु नाहीं. जीवात्म्याला ज्ञान होऊन त्या ज्ञानाच्या योगें तो मुक्त व्हावा, हाच सृष्टीचा उद्देश आहे. हा सृष्टिरूप ग्रंथ वाचून जीवात्म्यानें ज्ञानी व्हावें व नंतर ग्रंथ टाकून द्यावा; परंतु तसें न करतां आम्हीं आपली स्थिति अगदीं उलटी करून घेतली आहे. आम्ही स्वतःला स्वतंत्र न समजतां सृष्ट पदार्थांपैकींच एक घटक आहों असें समजतों. जणूं काय देहाकरितां आत्म्याची योजना असून, देहाचें संरक्षण करणें आणि त्याला सुखी ठेवणें हेंच आत्म्याचें काम आहे! एखाद्या खादाड मनुष्याची थट्टा करावयाची असली, तर तो जगण्यासाठीं खात नसून खाण्यासाठीं जगतो, अशा अर्थाच्या एका इंग्रजी म्हणीचा उपयोग करतात; परंतु आपली सर्वांची नेहमींची वागणूक पाहिली तर ती वस्तुतः ह्या खादाड मनुष्याच्या वागणुकीहून फारशी उच्च दर्जाची नसते. ह्यामुळें, आपल्या साऱ्या आयुष्याची आपण प्रत्यहीं थट्टा करून घेत आहों, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. आपण सृष्ट पदार्थांपैकींच एक, ही भावना पक्की करून घेतल्यामुळें सहोदरत्वाच्या नात्यानें आम्हांस सृष्ट पदार्थांबद्दल लिप्तपणा वाटूं लागतो व ह्या लिप्तत्वाची मिठी एकवार आपणाभोवतीं पडली कीं ती जीवात्म्यास पक्का बांधून गुलामाप्रमाणें राबविते. 'सदैव कर्म कर' ह्या गीतेच्या अनुज्ञेप्रमाणें आम्ही सदैव कर्म करीत असतों खरे, परंतु तें मालकासारखें कर्म नसून, गुलामाचें कर्म आम्ही करीत असतों, ह्यामुळें कर्मयोगाचें साध्य म्हणजे मोक्ष, ह्यापासून आम्ही दिवसेंदिवस अधिकच लांब जातों.

तुम्ही स्वतंत्र होऊन कर्म करा, हा कर्मयोगाचा मुख्य उपदेश आहे. एकसारखें कर्म करा परंतु त्या कर्मांचें पर्यवसान मुक्तींत झालें पाहिजे, हें लक्षांतून जाऊं देऊं नका. आपल्याभोवतीं शेकडा नव्याण्णव लोक कार्यरत असल्याचें आपण पाहातों, परंतु ते कोणत्या प्रकारचें कर्म करितात

ह्याचा विचार केला तर स्वदेहसुखाच्या अभिलाषांचे बंदे गुलाम होऊन तो सांगेल तें काम हे लोक करीत असतात, असें आपणांस आढळून येईल. अशा प्रकारच्या गुलामगिरीमुळें जगांत जिकडेतिकडे रुदनस्वर ऐकूं येतात. स्वदेह विसरून त्याच्या सुखाभिलाषेची बुद्धि बाजूस ठेवून केवळ प्रेमानें प्रेरित होऊन कार्य करा. येथें प्रेम हा शब्द न कळण्याजोगा आहे. पूर्ण स्वतंत्रतेशिवाय खरें प्रेम उत्पन्न होणें अशक्य आहे. तुम्हीं एखाद्याला गुलाम म्हणून विकत घेतलें आणि हातापायांत बिड्या ठोकून त्यास कामास लाविलें, तर काम केलें पाहिजे म्हणून तो काम करील; परंतु तुमच्याबद्दल त्याच्या मनांत प्रेम उत्पन्न होणें कधीं तरी शक्य आहे काय? तसेंच स्वतःच्या इंद्रियांचा जो दासानुदास बनून गेला आहे, त्याच्या चित्तांत प्रेमाचा उद्भव होणें शक्य नाहीं. इंद्रियसुखार्थ कोणाचाही बळी द्यावयास तो मागेंपुढें पाहाणार नाहीं. अशा मनुष्यानें केवढालेही उद्योग केले तरी तात्विकदृष्ट्या खऱ्या कर्मांची योग्यता त्याच्या उद्योगास येऊं शकतच नाहीं. त्यानें स्वःकरितां केलेले उद्योग असोत, अथवा आपल्या आप्तेष्टांकरितां म्हणून केलेलीं कामें असोत, त्यांची किंमत खऱ्या कर्मांच्या योग्यतेच्या मानानें पाहिली तर जवळजवळ शून्य इतकीच असते. ह्यासाठीं प्रत्यक्ष अथवा परंपरेनें जोंपर्यंत आमचीं कर्में स्वसुखाभिलाषेनें प्रेरित होऊन केलीं जात आहेत, तोंपर्यंत तीं कर्में त्या गुलामाच्या कर्मांसारखींच आहेत. खऱ्या प्रेमानें प्रेरित होऊन केलेल्या कर्मांचा मोबदला आपणांस सुखसंवेदनांच्या रूपानें मिळत असतो. ज्यापासून आपल्या चित्तास शांतीचा आणि तज्जन्य सुखाचा लाभ होत नाहीं असें एकही प्रेमप्रेरित कार्य नाहीं. चिरकालिक चैतन्य, चिरकालिक ज्ञान आणि चिरकालिक प्रेम ह्यांचा सदैव एकत्र वास असतो; जणूं काय हीं तिन्ही एकजीवच होऊन गेलीं आहेत. ह्या तिहींपैकीं कोणतेंही एक तुम्हांस कोठेंही आढळलें, तर बाकीचीं दोन तेथें अवश्य सापडलींच पाहिजेत. वस्तुतः एकाच मूलरूपाचीं तीं तीन अंगें आहेत. त्या मूलरूपास सच्चिदानंद असें नांव आहे. ह्या मूलरूपापैकीं सत् हें

आपणांस प्रत्यक्ष सृष्टीच्या रूपानें नटलेलें आढळतें, चित् हें सृष्टपदार्थांच्या ज्ञानाच्या रूपानें दिसतें, आणि प्रत्येक सजीव हृदयांत जें प्रेम अंशतः दिसतें त्याची उत्पत्ति आनंदापासून झाली आहे. ह्यासाठीं खऱ्या प्रेमापासून दु:खाची उत्पत्ति संभवतच नाहीं. खरें प्रेम करणाऱ्याला, अथवा ज्या वस्तूवर त्याचें प्रेम जडलें आहे त्या वस्तूला, त्या प्रेमापासून दु:ख होईल ही गोष्ट सर्वथैव अशक्य आहे. हें जर खरें, तर प्रेम करणारा आणि त्याचा प्रेमविषय, हीं दोघेंही दु:खांत चूर झाल्याचें आपणांस हरघडीं दिसतें हें कसें, असा प्रश्न येथें उद्भवतो. ह्याच्या उत्तरासाठीं, जगांत सर्वत्र आढळणारें असें एखादें उदाहरण आपण घेऊं. एका पुरुषाचें एका स्त्रीवर अत्यंत प्रेम असतें, इतकें कीं ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, तिच्याशिवाय दुसरें त्याला कांहींच दिसत नाहीं. अहाहा! स्वर्गीय प्रेम! स्वर्गीय प्रेम! परंतु जरा थांबा. ह्या प्रेमाचें आपण सशास्त्र पृथक्करण करूं म्हणजे त्याचें खरें स्वरूप आपणांस समजून येईल. तिनें सदोदित जवळ असावें, जवळच उभें राहावें, जवळच खावें आणि प्यावें असें त्यास वाटतें. म्हणजे तिनें जवळ जवळ ह्या स्वारीचा गुलामच बनून राहिलें पाहिजे. तिला जणूं काय स्वतंत्र अशी कांहीं हालचालच नाहीं. तिच्या तोंडांतून पडणारा प्रत्येक शब्द झेलण्यास हा तयार असतो. ह्या कृतीचा खरा अर्थ म्हणजे तिला स्वत:चा गुलाम करून हा स्वतः तिचा गुलाम बनतो. आतां ह्या दोन गुलामांच्या प्रेमाचें खरें स्वरूप कितपतसें चिरस्थायी असणार बरें? ती कोण क्षणभर बाहेर गेली, तर ह्यानें वेड्यावाकड्या कल्पना करून स्वत:स दु:खी करून घ्यावें. मित्र हो, हें खऱ्या प्रेमाचें स्वरूपच नव्हे. इंद्रियजन्यसुखाच्या अभिलाषेनें वेडावलेल्या मनुष्याची ती एक लहर आहे आणि तो बोलूनचालून वेडा झालेला असल्यामुळें, भ्रमानें तें प्रेम आहे असा त्यास भास होतो आणि त्या लहरीच्या भरांत स्वर्गीय प्रेम म्हणून तो नाचूं लागून दुसऱ्यासही आपणासारखाच क्षणभर वेडा करतो. जर ह्याच्या म्हणण्याप्रमाणें एखादी गोष्ट करण्याचें तिनें नाकारलें, तर ह्याची तबियत बिघडली! खऱ्या प्रेमापासून उद्भवणाऱ्या चैतन्यतरंगांतून दु:ख कधींही आपली वाट काढूं

शकणार नाहीं. ज्या ठिकाणीं दुःखाची उत्पत्ति होतांना आढळते, तें खरें प्रेमच नव्हे; ती वास्तविक भलतीच कांहीं वस्तु असून भ्रमानें प्रेम म्हणून आपण तिला कवटाळीत असतों. ज्या दिवशीं कोणत्याही वस्तूवर अथवा प्राण्यावर तुमचें खरें प्रेम जडेल – मग तें स्त्रीवर असो, पुत्रावर असो अगर दुसऱ्या कोणावर असो – त्या दिवशीं तुम्हांस विश्वव्यापी प्रेमाची गुरुकिल्ली सापडेल व त्याच दिवशीं अलिप्तपणा म्हणजे काय ह्याचाही बरोबर उलगडा होईल.

भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, " न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन। नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एवच कर्मणि ॥ यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः। मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेद्हम्। संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ " ह्याचा भावार्थ असा आहे कीं ' मला ह्या जगापासून कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें आहे म्हणून मी कर्म करीत नाहीं. परंतु ह्या जगावर माझें प्रेम असल्यामुळें त्याच्या बऱ्यासाठीं मी कर्म करतों. मीं कर्म न केलें तर हे लोकही कर्म न केल्यामुळें अनेक प्रकारें नाश पावतील.' ह्यावरून प्रेम आणि अलिप्तपणा ह्यांची बरीच कल्पना आणांस होते. स्वतःला कसलीच इच्छा नसतां केवळ प्रेमानें वश होऊन भगवान् कर्म करतो, म्हणूनच तें कर्म अलिप्तपणानें होतें. त्यांत इंद्रियजन्यसुखाच्या अभिलाषेची यत्किंचित् छटा उत्पन्न झाली कीं अलिप्तता आणि प्रेम ह्या दोहोंचाही बरोबरच नाश होतो. इंद्रियसुखार्थ प्रेम करणाऱ्या मनुष्याचें लक्ष बहुधा जडविषयापलीकडे जात नाहीं. एखाद्या पुरुषाचें अमूक स्त्रीवर प्रेम जडलें असें आपण म्हणतों; परंतु वस्तुस्थिति पाहिली तर तें प्रेम त्या स्त्रीच्या शरीरावर जडलेलें असतें. तो तिच्या निरनिराळ्या अवयवांचें चिंतन करतो; म्हणजे प्रेम ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या विकाराचें स्वरूप, जड विषयांत जें आकर्षण नित्य असतें त्या आकर्षणाच्याच स्वरूपाचें आहे. लोखंडाचें जसें

लोहचुंबकावर प्रेम असतें, तसेंच मनुष्यांतील प्रेमाचेंही वास्तविक स्वरूप असतें. ह्यामुळें एखाद्या यःकश्चित् कारणानेंही अशा प्रेमाचा विपर्यास होऊन त्यांतून दुःखाची उत्पत्ति होते. खऱ्या प्रेमाचें स्वरूप ह्याहून फार निराळें आहे. तें जडविषयाशीं कधींही संलग्न होऊन राहात नाहीं; तर जडविषयांपलीकडे असलेल्या चैतन्यरूपांत तें एकजीव होऊन राहातें. खरें प्रेम करणारीं अशा प्रकारचीं दोन मनुष्यें हजारों मैलांवर एकमेकांपासून निराळीं असलीं, तरी त्यांच्या प्रेमांत अंतर पडत नाहीं; तें कधीं नष्ट होत नाहीं; अथवा त्यांतून दुःखाचीही उत्पत्ति होत नाहीं.

अशा प्रकारची अलिप्तता स्वतःच्या ठिकाणीं आणणें ही गोष्ट सोपी नाहीं. ह्याचा क्षणोक्षणीं अभ्यास केला तर एक आयुष्य पुरें होईपर्यंत ह्याची प्राप्ति झाली तर होईल; परंतु ह्याची प्राप्ति झाल्याबरोबर खरें प्रेम आणि मुक्ति हीं प्राप्त होतात. सध्या आपणाभोवतीं पक्केसे दिसत असलेले जगाचे पाश खटाखट तुटून पडतात आणि सृष्टीचें खरें स्वरूप काय आहे ह्याचा आपणांस बोध होतो. आपणांसाठीं शृंखला बनविण्याचें काम सृष्टि सोडून देते. ह्यानंतर जें कांहीं आपण करतों, त्याचीं भलींबुरीं फळें आपणांस सेवन करावीं लागत नाहींत. आपल्या कृतीचें फळ गोड आहे कीं कडू आहे, हें पाहाण्याची आपणांस जरूरच राहिलेली नसते.

वास्तविक विचार केला तर आपण ज्यांना ' आपले ' असें म्हणत असतों, त्यांवर तरी आपलें खरें प्रेम असतें काय? खुद्द आपलें आपल्या मुलांवरील प्रेमही खरोखर प्रेम ह्या नांवास पात्र नसतें. त्यांत कोठें ना कोठें स्वार्थाचा अंश असतोच. सूक्ष्म विचार करून पाहिलें तर आपली दृष्टि स्वार्थापलीकडे फारशी कधीं गेलेलीच नसते. ' केवळ लोकांसाठीं ', ' केवळ देशासाठीं ' अशी भाषा आपण तोंडानें वापरीत असतां अंतःकरणाच्या अगदीं खोल भागांत कीर्तीची अपेक्षा दडून बसलेली असते. ज्या ठिकाणीं कसल्या तरी प्रकारची फलाशा असते, तेथें खऱ्या प्रेमाचा प्रवेशच होऊं शकत नाहीं आणि जेथें खरें प्रेम नाहीं, तेथें अलिप्तता तरी कशी येणार? तसेंच जेथें अलिप्तता

नाहीं तेथें मुक्तिही नाहीं, अशी ही परंपरा आहे. ह्यासाठीं आपण जेव्हां कोणतेंही कर्म करतों, तेव्हां तें केवळ कर्तव्य ह्या दृष्टीनें केलें पाहिजे. त्यांत प्रतिफलाची कोणतीच आशा असतां उपयोगी नाहीं. अशी कर्म करण्याची सवय जसजशी पक्की होत जाईल, तसतशी आपल्या अंगीं खरी अलिप्तता येईल.

आपल्या इंद्रियसुखाभिलाषेचे आपण नित्य गुलाम असतों असें पूर्वीं सांगितलेंच आहे. ज्याप्रमाणें गुलाम होऊन काम केल्यामुळें तें काम फलरूपानें आपणास बाधक होतें, तसेंच आपल्या इंद्रियांवर ताबा चालवून, त्यांचा धनी होऊन निरपेक्षपणानें केलेलें कर्म मोक्षदायक होतें. "वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।" असें भगवान् श्रीकृष्णाचें वचन आहे. हक्क आणि न्याय हे शब्द व्यवहारांत आपल्या कानांवरून अनेक वेळां जात असतात ; परंतु खऱ्या दृष्टीनें पाहातां, ह्या शब्दांना लहान पोरांच्या बडबडीपेक्षां अधिक महत्त्व कोणी देतोसें दिसत नाहीं. मानवजातीचा नित्य व्यवहार अवलोकन केला, तर तींत मुख्य असे दोन मनोधर्म आढळतात. एक सामर्थ्य आणि दुसरी दया. मनुष्याच्या सामान्य वर्तणुकींत ह्यांपैकीं कोणत्या तरी एका मनोधर्माचें प्राबल्य आढळतें. दया विसरून जेव्हां आपलें सामर्थ्य मनुष्य प्रकट करूं लागतो, तेव्हां त्याची स्वार्थबुद्धि अत्यंत बळावलेली असते. अगदीं सामान्य प्रतीच्या मनुष्याचा व्यवहार पाहिला असतां तो आपल्या ठिकाणीं असलेल्या सामर्थ्याचा उपयोग एकसारखा करीत असतो असें आढळून येईल. दया ही क्वचित् आढळणारी चीज आहे. दयाशील अंतःकरण म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गच आहे. ज्याच्या अंतःकरणांत दयेचा विपुल सांठा आहे, असा मनुष्य खरोखर परम भाग्यवान् आहे. खरी न्यायबुद्धि जगांत फार थोडी आढळते ; ह्यासाठीं हक्क आणि न्यायपद्धति ह्यांची रचना दयेच्या पायावर केलेली असावी. आपल्या धर्मबुद्धीच्या वाढीला आड येणारा फार मोठा अडथळा म्हटला म्हणजे आपल्या कर्मांपासून

अनुक्र. 33८५५

प्रतिफलाची अपेक्षा करणें हा होय. अशा अपेक्षेमुळें केवळ धर्मबुद्धीची वाढ खुंटते, इतकेंच नाहीं, तर तीमुळें आपणांवर अनंत दुःखपरंपराही कोसळतात. कोणत्याही प्रकारच्या फलाची अपेक्षा न करतां कर्म करून तें ईश्वरास अर्पण करणें, हा साकार परमेश्वराच्या पूजनाचा अत्यंत श्रेष्ठ असा विधि आहे. आपण देवाला वाहिलेले जिन्नस जसे परत घेत नाहीं, तसेंच कर्म करीत असतां तीं सर्व–बरीं अथवा वाईट–परमेश्वरास अर्पण करावीं. कर्म करीत असतां ही गोष्ट नित्य लक्षांत बाळगली, तर आपल्या चित्तास हळूहळू तशी सवय लावतां येईल. प्रत्येक कर्म 'कृष्णार्पण' म्हटलें म्हणजे कोणत्याही मनुष्याकडून प्रतिफळ मिळावें ही इच्छाच आपणांस करतां येत नाहीं. श्रीकृष्ण म्हणतात, "यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥" स्वतः परमेश्वरही अशाच प्रकारें नित्य कर्म करूनही फलाची अपेक्षा न केल्यामुळें नित्य मुक्त असतो. अशा रीतीनें कर्म करणारा मनुष्य एखाद्या मोठ्या शहरांतील अत्यंत पापी लोकांच्या वस्तींत राहिला, तरी पाप त्याला स्पर्शही करूं शकणार नाहीं. कमळाचें पान जसें पाण्यांत राहूनही ओलें होत नाहीं, तसेंच असा मनुष्य प्रत्यक्ष पापकूपांत राहिला, तरी त्याला पापाचा स्पर्श होऊं शकत नाहीं. "ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः। लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥" असें गीतेंत सांगितलें आहे.

ह्यासंबंधानें महाभारतांतील एक कथानक तुम्हांस सांगतों. कौरव व पांडव ह्यांजमधील युद्ध संपून कौरवांचा निःपात झाल्यावर, राज्यपद प्राप्त झालेल्या पांडवांनीं एक मोठा यज्ञ केला. त्या यज्ञांत गोरगरिबांस मोठमोठीं दानें करण्यांत त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. तें दानशौर्य पाहून लोकांनीं तर तोंडांत बोटच घातलें. असा यज्ञ आमच्या ऐकण्यांतही झाला नाहीं असें जो तो म्हणूं लागला. तो यज्ञ समाप्त होण्याच्या

वेळीं एक मुंगूस तेथें आला. त्याचें अर्धें शरीर सुवर्णाचें होतें व बाकीचें अर्धें नेहमींप्रमाणें साधें होतें. तेथें आल्यावरोबर यज्ञाच्या जागीं जाऊन तो मुंगूस गडवडा लोळूं लागला; व लोळतां लोळतां म्हणूं लागला, ‘काय हो, हे लोक किती खोडसाळ आहेत तरी! मला सांगतात कीं येथें मोठा यज्ञ झाला! परंतु येथें यज्ञ झाल्याचें कांहींच चिन्ह नाहीं!’ लोक म्हणाले, “मूर्खा, येथें यज्ञच झाला नाहीं असें कसें म्हणतोस? आज ह्या हस्तिनापुरांत गरीब असा कोणीच राहिला नाहीं. कारण यज्ञांतील दान घेऊन प्रत्येकजण गबर होऊन बसला आहे; असें असतां, तूं यज्ञ न झाल्याचें सांगतोस त्या अर्थीं तूं पक्का वेडाच असला पाहिजेस.” त्यावर मुंगूस म्हणाला, “मी सांगतों ती गोष्ट ऐका. एका लहानशा खेड्यांत एक गरीब ब्राह्मणाचें कुटुंब होतें. ब्राह्मण, त्याची पत्नी आणि मुलगा व सून अशीं चार माणसें त्या कुटुंबांत होतीं. त्या गरीब ब्राह्मणास जी कांहीं थोडी प्राप्ति अध्यापनामुळें होत असे, तींत त्या कुटुंबाचा कसाबसा निर्वाह चाले. अशा स्थितींत एके वेळीं तीन वर्षें अवर्षण पडल्यामुळें मोठा दुष्काळ पडून, त्या बिचाऱ्या ब्राह्मणाच्या यातनांस पारावार राहिला नाहीं. अशा स्थितींत कित्येक दिवस उपवास पडला असतां, एके दिवशीं थोडें सातूचें पीठ त्या ब्राह्मणास मिळालें. त्या पिठाचें त्यानें चार भाग केले. त्याच्या भाकरी तयार करून त्या आतां तो खाणार इतक्यांत दारांत एक अतिथि येऊन उभा राहिला. ‘अतिथिदेवो भव’ अशी धर्माज्ञा असल्यामुळें तो ब्राह्मण अतिथीस म्हणाला, ‘यावें महाराज, भोजनाची तयारी आहे,’ असें म्हणून त्यानें आपलें ताट त्या अतिथीपुढें ठेविलें. अतिथीनें त्या अन्नाचा एकच घास करून म्हटलें, ‘भल्या गृहस्था, मी दहा दिवसांचा उपवासी आहें. तुझ्या ह्या थोड्याशा अन्नानें माझी क्षुधा अधिक प्रदीप्त मात्र झाली.’ त्या अतिथीचें हें भाषण ऐकून ब्राह्मणपत्नी पुढें येऊन म्हणाली, ‘महाराज, हा माझा भागही आपण भक्षण करावा.’ ब्राह्मणानें तिला तसें न करण्याविषयीं सांगितलें, पण ती

धर्मनिष्ठ स्त्री म्हणाली, ‘ आपण गृहस्थाश्रमी आहों, त्या अर्थी क्षुधिताला अन्न देणें हा आपला धर्म आहे. ’ अतिथीनें तेंही अन्न भक्षण केलें तरी त्याची क्षुधा शांत होईना; तेव्हां ब्राह्मणपुत्र म्हणाला, ‘ महाराज, हा माझा भाग घेऊन मजवर अनुग्रह करावा. पित्याच्या धर्माचरणांत सहाय होणें हा पुत्र-धर्म आहे ’ अतिथीनें तोही भाग भक्षण केला, तरी त्याचें समाधान झालें नाहीं. तेव्हां ब्राह्मणस्नुषेनें आपलाही भाग त्याला दिला. तो भाग खाऊन अतिथि तृप्त झाला व त्या कुटुंबास आशीर्वाद देऊन चालता झाला. त्याच रात्रीं क्षुधेनें तें सर्व कुटुंब मरण पावलें. तो अतिथि जेवला त्या ठिकाणीं भाकरीचे कांहीं कण पडले होते, त्यांत लोळल्यामुळें माझें अर्धें शरीर सुवर्णाचें झालें, हें तुम्ही पाहातच आहां. तसाच यज्ञ आणखी कोठें होत असले तर पाहावा म्हणून सर्व जगभर मी फिरलों; परंतु असा यज्ञ कोठेंच न झाल्यामुळें माझें अर्धें शरीर अद्यापि सुवर्णाचें झालें नाहीं. येथें मोठा यज्ञ झाला असें ऐकल्यामुळें, मी येथें आलों, तरी माझें शरीर अद्यापि सुवर्णाचें झालें नाहीं, ह्यावरून मीं म्हटलें कीं येथें यज्ञ झालाच नाहीं. ”

मित्रहो, हिंदुस्थानांतील हें सुवर्णयुग आतां काळाच्या पोटांत गडप झालें आहे. आर्यभूच्या पोटीं खरीं पुत्ररत्नें आतां कमीच निपजतात. मी नवीनच इंग्रजी शिकूं लागलों होतों, त्या वेळीं एक इंग्रजी गोष्टींचें पुस्तक माझ्या वाचनांत आलें होतें. त्यांतील एक गोष्ट मला आठवते ती अशी : एका गांवीं एक मुलगा राहात होता. तो कोठें कामावर लागलेला होता. त्याला मिळणाऱ्या वेतनांतला कांहीं भाग तो आपल्या आईला देत असे आणि ह्या त्याच्या कृतीचें वर्णन लेखकानें मोठ्या कौतुकानें तीन चार पानें केलें होतें. तुम्हांस खरेंच सांगतों कीं आमच्या हिंदु मुलांस ह्या गोष्टीचें तात्पर्य समजणें फार जड जाईल. “ जो तो आपापल्या पुरता ” ही तुमची म्हण त्या वेळीं मला ठाऊक नव्हती. म्हणून त्या वेळीं त्या गोष्टीचें महत्त्व माझ्या ध्यानांत नीटसें आलें नव्हतें; परंतु तें आतां मला समजलें. आईबाप उपाशी मेले आणि बायकापोरांनीं भीक मागितली, तरी स्वतः अजीर्ण होईपर्यंत जेवणारे लोक

मला ह्या तुमच्या देशांत प्रथमच आढळले! छे! छे! कोणत्याही गृहस्थाश्रमी मनुष्यानें असलें राक्षसी ध्येय आपल्यापुढें ठेवूं नये.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून कर्मयोगाचें रहस्य तुमच्या ध्यानांत बरेंच आलें असेल. देहपात होण्याची वेळ आली, तरी आश्रमधर्मापासून पराङ्मुख न होतां आणि कसलीही बडबड न करतां, कोणाच्याही मदतीस पुढें होणें हा कर्मयोगानें सुचविलेला एक महत्त्वाचा मुद्दा आहे. हजारों लोकांनीं तुम्हांला फसविलें तरी मागणारा कोणी भेटला कीं जवळ असेल तें त्यास द्यावयाचें हा तुमचा धर्मच आहे. आपल्या दानाचा आपल्या तोंडानें कधींच उच्चार करूं नये आणि दान घेणाराकडून नुसत्या कृतज्ञतेचीही अपेक्षा करूं नये. संन्यासापेक्षांही गृहस्थाश्रम किती कठीण आहे, ह्याची तुम्हांस आतां चांगलीच कल्पना झाली असेल. खरा त्यागी होऊन कांहींच न करतां राहाणें हें जितकें कठीण आहे, तितकेंच, किंबहुना त्याहून अधिक असें गृहस्थाश्रमधर्मानें राहाणें हें आहे.

## प्रकरण चौथें

## कर्तव्य

कर्तव्य म्हणजे काय ह्याचा विचार कर्मयोगाच्या विवेचनांत करणें अवश्य आहे. मला कोणतीही गोष्ट करावीशी वाटली, तर तें माझें कर्तव्य आहे कीं नाहीं, ह्याचा प्रथम विचार करून नंतर तें कर्म मी करीत असतों. नीतिविषयक कल्पना निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारच्या

असतात हें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या देशांत, निरनिराळ्या कर्तव्यविषयक कल्पना प्रचलित असतात. कुराणांत ज्या गोष्टी कराव्या म्हणून सांगितलें आहे, त्या करणें हें माझें कर्तव्य असें मुसलमान म्हणेल. हिंदु म्हणेल कीं वेदाची जी अनुज्ञा तें माझें कर्तव्य. तसेंच, बायबलांत सांगितल्याप्रमाणें वागणें हें माझें कर्तव्य, असें एखादा ख्रिश्चन मनुष्य म्हणेल. निरनिराळ्या काळीं, निरनिराळ्या देशांत आणि निरनिराळ्या परिस्थितीस अनुरूप अशा कर्तव्याच्या कल्पना प्रचलित असल्याचें इतिहासादि ग्रंथांवरून दिसून येतें. जिचें प्रत्यक्ष स्वरूप अमूक म्हणून दाखवितां येत नाहीं, अशा कोणत्याही भावरूप कल्पनेची निश्चित व्याख्या सांगणें कठीण आहे. कर्तव्य ही कल्पनाही अशाच विषयांपैकीं आहे. रोजच्या सामान्य व्यवहारांत घडून येणाऱ्या कारणकार्यांवरून, आपल्या कर्तव्याची फक्त कल्पना मात्र आपणांस करतां येते. आपल्या डोळ्यांसमोर ज्या ज्या गोष्टी घडत असतात, त्या अवलोकन केल्याबरोबर त्या त्या प्रसंगीं आपलें कर्तव्य काय आहे, ह्याची जाणीव आपोआपच आपल्या ठिकाणीं उत्पन्न होते. हें कदाचित् आपल्या उपजत बुद्धीनें होत असेल अथवा पूर्वानुभवही कदाचित् ह्याचें कारण असेल. तें कसेंही असलें, तरी ही जाणीव जागृत झाल्याबरोबर मन त्या गोष्टीचा आपोआप विचार करूं लागतें. एखाद्या विशिष्ट प्रसंगीं ज्या प्रकारें वागणें आपलें कर्तव्य आहे असें आज आपल्या मनांत येतें, तसाच प्रसंग उद्यां आला, तर कदाचित् आजच्या अगदीं उलट वागणें हेंच कर्तव्य आहे, असें आपल्या मनांत येण्याचा संभव आहे. कर्तव्य म्हणजे काय असा प्रश्न केला, तर 'आपल्या सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून वागणें' असें उत्तर सामान्यतः बहुतेकांकडून आपणांस मिळेल; परंतु ह्या उत्तरानें सर्व प्रसंगीं निर्वाह होतो असें नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या ख्रिस्ती मनुष्याजवळ गोमांसाचा कांहीं पदार्थ असला, आणि तो त्यानें कोणा क्षुधार्तास दिला नाहीं अथवा स्वतःही क्षुधार्त असतां भक्षण केला नाहीं, तर तो ख्रिस्ती मनुष्य स्वतःच्या

दृष्टीनें कर्तव्यभ्रष्ट ठरेल. उलटपक्षीं एखाद्या हिंदूजवळ तें गोमांस असलें आणि केवळ भुकेनें जीव गमावण्याची वेळ आली म्हणूनच त्यानें तें भक्षण केलें अथवा अशा वेळीं दुसऱ्यास दिलें, तर आपण कर्तव्यभ्रष्ट झालों असें त्या हिंदूस खचित वाटेल. गाईच्या पूज्यतेसंबंधीं ज्या गोष्टी लहानपणापासून त्यानें ऐकलेल्या असतात, त्यांचा परिणाम चित्तावर होऊन गोमांस भक्षण करणें म्हणजे घोर पातक असें त्यास वाटलें, तर त्यांत नवल नाहीं. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत ठग ह्या नांवाचे लोक राहात असत. मनुष्यें मारणें हाच त्यांचा जन्मजात व्यवसाय होता. ह्यामुळें खून करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें प्रत्येक ठगास वाटे. जो सर्वांत अधिक खून करील, तो सर्वांत अधिक पुण्यवान् असें ते समजत. एखादा मनुष्य रस्त्यानें जात असतां त्यानें आपली बंदूक रोखून दुसऱ्या एखाद्या मनुष्याचा प्राण घेतला तर त्याला साहजिकपणें आपल्या कृत्याबद्दल वाईट वाटेल; निदान तसें वाटण्याचा बराच संभव आहे; परंतु तोच एखाद्या पलटणींत शिपाई असला आणि लढाईंत त्यानें वीस मनुष्यें मारलीं, तर अशा वेळीं आपण आपल्या जन्मभूमीची मोठीच कामगिरी बजावली असें वाटून त्यास मोठा आनंद होईल. ह्यावरून केवळ कृत्यावरूनच कर्तव्याचें क्षेत्र निश्चित होत नाहीं. ह्यामुळें अमूक एक कृत्य कर्तव्य आणि अमूक एक अकर्तव्य असें निश्चितपणें सांगतां येणें शक्य नाहीं; तथापि कर्तव्य कशास म्हणतां येईल ह्याचें विवेचन भावरूपानें करतां येण्याजोगें आहे. ज्या कृत्यानें आपलें हृदय शुद्ध होऊन त्यांत परमेश्वराचा उदय होण्यास अवसर सापडतो, तें पुण्यकर्म असून आपलें कर्तव्य आहे; तसेंच, ज्या कृत्याच्या योगानें आपलें अंतःकरण मलिन व दुष्ट होण्याचा संभव असतो, तें दुष्कृत्य असून त्याज्य आहे असें समजावें. ही पापपुण्याची अथवा कर्माकर्माची भावरूप व्याख्या झाली. तरी हिजवरून अमूक कृत्य करावें अथवा अमूक कृत्य करूं नये असें विधिनिषेधात्मक वचन सांगणें शक्य नाहीं. असें आहे तरी सर्व काळीं, सर्व स्थळीं आणि सर्व धर्मांचें जिच्याबद्दल एकमत

झालेलें दिसतें, अशी पापपुण्याची एकच व्याख्या आहे. ती "परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥" ह्या संस्कृत उक्तींत उत्तम प्रकारें व्यक्त झाली आहे.

धर्म कोणता आणि अधर्म कोणता ह्याविषयींचें विवेचन भगवद्गीतेंत वर्णधर्मानुसारें केलें आहे. वर्णानुरोधानें प्रत्येकाचें गुणकर्म व मनोधर्म कोणत्या प्रकारचे असण्याचा संभव आहे, ह्याचा साधारण निर्णय होतो. ह्यामुळें ज्या परिस्थितींत आणि वर्गांत आपला जन्म झाला असेल, त्या वर्णाला त्या परिस्थितींत कोणतीं कर्मे अभिमत होतात ह्याचा विचार करून, त्यांतून स्वतःला कल्याणप्रद आणि मनःशुद्धिकर अशीं कर्मे निवडून काढतां येतात; तथापि सर्व देशांत आणि सर्व काळीं, एकाच प्रकारच्या स्थितींतील निरनिराळ्या समाजांत पापपुण्याच्या कल्पना एकसारख्याच असत नाहींत. ही वस्तुस्थिति लक्षांत न आल्यामुळें एक राष्ट्र दुसऱ्याचा द्वेष करतें. अमेरिकन चालीरीतींप्रमाणें वागणें आपलें कर्तव्य आहे असें एखादा अमेरिकन म्हणतो. तसेंच एखादा हिंदु आपल्या चालीरीती सर्वोत्कृष्ट असून त्या चालींप्रमाणें न वागणारा तो पापी होय असें म्हणत असतो. अशा प्रकारची चूक तुमच्या आमच्यासारख्या सामान्य मनुष्याच्या हातून होणें साहजिक आहे; तथापि असल्या क्षुल्लक वाटणाऱ्या चुकीचे परिणाम फार वाईट होतात. शिकागो प्रदर्शनांत मी प्रथमच गेलों असतां, पाठीमागून एका अमेरिकन गृहस्थानें माझ्या पटक्याचें टोक धरून ओढलें. मीं मागें वळून पाहिलें, तेव्हां त्याच्या पोषाखावरून तो सभ्य गृहस्थ असावा असें मला वाटलें. मीं त्याच्याशीं भाषणास सुरवात केल्याबरोबर मला इंग्रजी भाषा येते असें पाहून तो गृहस्थ फार ओशाळला. त्याच प्रदर्शनांत दुसऱ्या वेळीं एका गृहस्थानें मला धक्का दिला. मीं त्याला तसें करण्याचें कारण इंग्रजींत विचारलें, तेव्हां तोही फार खजील झाला आणि 'असा पोषाख कां करितां?' असें कांहीं पुटपुटत स्वारीनें तेथून पाय काढला. सामान्यतः कोणत्याही मनुष्याला

दुसऱ्या मनुष्याबद्दल वाटणारा आत्मभाव ह्या गृहस्थांच्या मतें जणूं काय भाषेंत किंवा पोषाखांतच असतो. आरंभीं असल्या गोष्टी अगदीं क्षुल्लक वाटल्या, तरी त्यांचे परिणाम कित्येक वेळां फारच वाईट होत असतात. बलिष्ठ राष्ट्रें एखाद्या दुर्बळ राष्ट्राचा छळ कित्येक वेळां ह्याच प्रकारच्या क्षुल्लक कारणासाठीं करीत असतात. केवळ भिन्न चालीरीती पाहून त्यांच्या मनांतील सहानुभूतीचा झरा जणूं काय आटूनच जातो. फार कशाला, माझा पोषाख पाहून बुजलेला गृहस्थ कदाचित् खरोखरच चांगल्या स्वभावाचा असेल; आपल्या आप्तेष्टांशीं व मुलांबाळांशीं तो फार चांगल्या प्रकारें वागत असेल; तसेंच आपलीं इतर लौकिक कर्तव्येंही तो चांगल्या रीतीनें पार पाडीत असेल; परंतु आपल्या चालीपेक्षां निराळ्या चालीचा पोषाख दृष्टीस पडतांच त्याचा चांगुलपणा एकदम कोठें नाहींसा झाला ! मनुष्य परठिकाणीं गेला म्हणजे तेथील लोकांकडून त्याला अनेक प्रकारचा उपसर्ग पोचतो, असें सर्वत्र आढळतें; आणि असें होण्याचें कारण पाहिलें, तर त्या त्या देशांतील चालीरीती त्याला माहीत नसल्यामुळें, त्याला स्वतःचें संरक्षण करणें दुरापास्त होतें इतकेंच. पण त्यामुळें आपल्या देशास परत जातांना परकीयांबद्दल अत्यंत अनिष्ट ग्रह आणि द्वेष तो बरोबर घेऊन जातो. जहाजावरील खलाशी, सैन्यांतील शिपाई आणि बारीकसारीक व्यापारी परक्या देशांत गेले म्हणजे किती विक्षिप्तपणें वागतात हें तुम्हांस ठाऊक असेलच. ज्या गोष्टी स्वतःच्या देशांत करण्याचें त्यांच्या स्वप्नांतही येणार नाहीं, अशा गोष्टी परक्या देशांत ते बिनदिक्कत करतात. युरोपियन आणि अमेरिकन लोकांस चिनी लोक 'परकीय पिशाचें' म्हणतात, तें बहुधा अशा कारणांमुळेंच असावें. अमेरिकन अथवा युरोपियन लोकांत असणारे चांगले गुण त्या बिचाऱ्यांच्या प्रत्ययासच आले नसावे.

ह्यासाठीं आपली अंतर्दृष्टि जागृत करून परकीयांचें वर्तन त्यांच्या स्वतःच्या चालीरीतींशीं सुसंगत आहे कीं नाहीं हें पाहाण्यास शिकलें पाहिजे. आपल्या चालीरीतींवरून परक्यांच्या वागणुकीवर टीका करणें

कधींही इष्ट होणार नाहीं. सर्व सृष्टीनें माझ्या वर्तणुकीप्रमाणें चालावें, असा एखादा ताम्रपट मीं मिळविला आहे काय ? सारें जग कांहीं माझ्या सुखासाठीं निर्माण झालें नाहीं, ही गोष्ट प्रत्येक मनुष्यानें नित्य लक्षांत बाळगून सर्वत्र सहानुभूति ठेवली पाहिजे. भोवतालच्या परिस्थित्यनुरूप आपल्या कर्तव्याची दिशा बदलते, हें ध्यानांत ठेवून विशिष्ट प्रसंगीं स्वतःच्या मनास पवित्र व युक्त वाटेल असें वर्तन ठेवणें, हेंच आपलें कर्तव्य आहे. आपला जन्म ज्या परिस्थितींत झाला, तिला अनुरूप अशीं कांहीं सामान्य कर्तव्यें लावून दिलेलीं असतात; तीं प्रथम नीट करणें हें आपलें कर्तव्य आहे. तसेंच ज्या समाजांत आपण लहानाचे मोठे झालों, त्या समाजाच्या स्थितीस आणि स्वतःच्या दर्जास अनुरूप अशीं कांहीं सामाजिक कर्तव्यें असतात. तीं नीटपणें पार पाडणें हें आपलें दुसरें कर्तव्य आहे. असें करीत असतां जो एक मोठा अडथळा आपल्या वाटेंत नेहमीं येत असतो, त्याचा आतां विचार केला पाहिजे. हा मोठा अडथळा म्हटला म्हणजे आत्मप्रौढी हा होय. आपल्या हातून कधीं कांहीं चूक होत असेल असें आपणांस वाटत नाहीं. आपल्याला ह्याच क्षणीं राज्यावर बसविलें, तरी तितकी आपली योग्यता आहेच असें आपणांस नित्य वाटतें. ही भावना नित्य जागृत राहिल्यामुळें आपला आत्मपरीक्षणाचा मार्ग बंद झालेला असतो. एखादें राज्य चालविण्याची पात्रता खरोखरच आपल्या अंगीं असली, तरी चालू परिस्थितींत प्राप्त होणारीं कर्तव्यें उत्कृष्ट रीतीनें बजावून आपली पात्रता आपण प्रथम सिद्ध केली पाहिजे. आपण हलक्या दर्जाचे असलों तरी त्या दर्जाचीं कर्तव्यें उत्तम प्रकारें केलीं म्हणजे वरचा दर्जा आपणांस आपोआप प्राप्त होतो. लौकिक व्यवहाराच्या भोवऱ्यांत शिरून आपलीं कर्तव्यें आपण करूं लागलों म्हणजे चोहोंकडून जे धक्केचपेटे आपणांस सोसावे लागतात, त्यांमुळें आपली स्वतःची खरी योग्यता काय आहे हें आपणास समजतें. आपल्या डोळ्यांवर आत्मप्रौढीची जी धुंदी असते ती अशा धक्क्यांनीं खाड्कन उतरते. यदृच्छेनें प्राप्त झालेल्या उच्च दर्जाचीं कर्तव्यें उत्तम

प्रकारें चालविण्याची एखाद्याला पात्रता नसली, तर त्याचा तो उच्च दर्जा फार दिवस टिकून राहाणें शक्य नाहीं. ज्याला त्याला त्याच्या योग्यतेनुरूप त्याच्या जागीं बसविणें हें सृष्टीचें कामच आहे. तेव्हां त्याबद्दल रिकामी कुरकूर करून फायदा नाहीं. ह्याकरितां कोणाचीही खरी योग्यता केवळ त्याच्या दर्जावरून पारखतां येत नाहीं. एखादा मनुष्य हलकें काम करीत असला, तर केवळ तेवढ्यावरून त्याची योग्यता कमी लेखणें अनुचित आहे. कार्य कसलेंही असो, तो मनुष्य तें कोणत्या प्रकारें आणि किती उत्साहानें पार पाडतो ह्याचा विचार करणें अवश्य आहे.

ह्यानंतर कर्तव्याविषयींच्या आपल्या कल्पनेंत आणखीही थोडा बदल केला पाहिजे, असें आपणांस आढळून येईल. अत्यंत निरपेक्षबुद्धीनें प्रेरित असल्याशिवाय कोणतेंही महत्त्वाचें काम आपल्या हातून नीटपणें पार पडत नाहीं. असें आहे तरी अमूक एक काम कर्तव्य म्हणून मला केलें पाहिजे, अशी भावना नसेल तर एखाद्या कार्याचा आरंभही आपणाकडून व्हावयाचा नाहीं. ह्यासाठीं प्रथम कर्तव्य म्हणूनच एखाद्या कार्यास आरंभ करावयास पाहिजे व शेवटीं स्वार्थबुद्धीचा पूर्ण नाश होऊन जगांतील हरएक कर्म म्हणजे परमेश्वराचें प्रत्यक्ष पूजनच आहे, असें वाटूं लागलें म्हणजे खरें निष्काम कर्म आपल्या हातून होऊं लागतें व आपणांस अलिप्तता म्हणजे काय ह्याचा खरा अर्थ कळतो. अनेक प्रकारचीं स्वार्थी कर्मे अनंतकालापासून आपण करीत असल्यानें, आपल्या ज्ञानमय मूलरूपावर अज्ञानाचा जो दाट पडदा पडला आहे, तो नाहींसा करून आपल्या ज्ञानस्वरूपास पूर्णपणें व्यक्त होण्यास अवसर करून देणें, हेंच सर्व योगमार्गांचें ध्येय आहे व कर्मयोगाचें तरी वास्तविक रहस्य हेंच आहे. ज्ञानदृष्ट्या आपण आपल्या चालू स्थितींत अगदीं खालच्या दर्जाचे लोक आहों व जीं कर्में स्वसुखासाठीं म्हणून आपण करतों, त्यांत आपल्या शक्तीचा व्यर्थ व्यय फार होऊन आपल्याभोवतीं असलेल्या जाळ्यांत अधिकच गुंतागुंत होत जाते. अशी गुंतागुंत न होतां पहिल्या जाळ्याचीं बंधनें

मराठा ग्रंथसंग्रहालय, ठाणे.

अनुक्रम ........ दि: ..................

हळूहळू ढिलीं कशीं करावयाचीं व शेवटीं अज्ञानरूपी जाळ्यांतून आपणांस कसें मुक्त करून घ्यावयाचें, हें रहस्य कर्मयोगानें आपणांस प्राप्त करून घ्यावयाचें आहे. कर्तव्य म्हणून कोणतेंही कार्य आरंभिलें म्हणजे त्याच्या पूर्ततेकरितां हलक्या प्रतीच्या सुखकल्पनांवर आपणांस पाणी सोडावें लागतें. प्रथम लहानसहान सुखें सोडावयास आपण तयार झालों, म्हणजे संवयीनें आपली कर्तव्याची कल्पना अधिक विस्तृत होऊन, मोठ्या सुखाच्या कल्पनाही हळूहळू विराम पावूं लागतात. ज्या मूलतत्त्वांवर सांप्रतची समाजाची रचना झाली आहे, तीं तत्त्वेंही ह्याच स्वरूपाचीं आहेत. मनुष्यप्राणी संघ अथवा समाज करून राहूं लागला, म्हणजे त्याच्याभोवतीं कांहीं सामाजिक बंधनें आपोआपच उद्भवतात; त्यामुळें त्याचा उच्छृंखलपणा आपोआप नाहींसा होतो. तसेंच केवळ स्वतःच्या सुखापुरताच उद्योग करावयाचा ही त्याची पशुबुद्धि हळूहळू कमी होत जाते. इतरांसाठींही कांहीं तरी कर्तव्य म्हणून मला करावयाचें आहे, ही जाणीव त्याच्या ठिकाणीं उद्भवते. शेवटीं स्वतःच्या एकाच देहाशीं संलग्न असणारा आकुंचितपणा टाकून देऊन विश्वव्यापक व्हावयाची संधिही सध्याच्या समाजरचनेंत त्यास प्राप्त होते. अशी ही समाजरचना कोणीं जाणूनबुजून निर्माण केली असेल अथवा अनंतकालाच्या अनुभवानें तीस हें स्वरूप प्राप्त झालें असेल. तें कसेंही असलें, तरी सांप्रतच्या समाजरचनेचें स्वरूप वर दाखविल्याप्रमाणें झालें आहे ही गोष्ट खरी.

केवळ कर्तव्य म्हणून कोणतेंही काम करावयाचें म्हटलें म्हणजे तो मार्ग अगदीं अकंटक नाहीं, असा आपणांस अनुभव येऊं लागतो. ज्या मनुष्या-बद्दल आपल्या मनांत यत्किंचितही प्रेमबुद्धि नाहीं, अशा मनुष्यासाठीं एखादें काम कर्तव्य म्हणून करण्याची वेळ आली म्हणजे आपल्या मनाची स्थिति कशी होते, ती अनुभवानेंच जाणली पाहिजे. गाडीच्या चाकाला वंगण नसलें म्हणजे प्रत्येक फेरीला जसें तें कर्णकटु आवाज काढतें, तसेंच आपलें मनही अशा प्रसंगीं हरघडी आपणाशीं भांडूं लागतें. केवळ प्रेमाच्या

वंगणानें हें कर्मचक्र सुरळीत चालतें. हें वंगण मनुष्याजवळ नसतें तर आईबाप मुलांसाठीं ज्या खस्ता खातात, पुरुष पत्नीसाठीं जो स्वतःला प्रसंगीं विकूनही घेतो, तें त्यानें केलें असतें काय? जेथें प्रेमाचा अभाव असतो, अशा एखाद्या कुटुंबांत होणारे तमाशे आपण नेहमीं पाहातोंच. केवळ प्रेमामुळेंच आपला कर्तव्यमार्ग सुखकर होतो आणि प्रेमाचा प्रवाह ज्या मानानें अनिरुद्ध व स्वतंत्रपणें चालेल, त्या मानानें तो अधिक अधिक विस्तृत व खोल होत जातो. येथें अनिरुद्धता – स्वतंत्रता – म्हणजे काय ह्याचा विचार केला पाहिजे. इंद्रियजन्य सुखासाठीं त्यांचा गुलाम होऊन राहाणें, क्रोधास वश होणें व व्यवहारांत नित्य उद्भवणाऱ्या हजारों विकारांस बळी पडणें, हें स्वातंत्र्य आहे काय? अगदीं खालच्या पायरीच्या मनुष्याच्या दृष्टीनें स्वातंत्र्याचा असाच अर्थ असतो असें वाटतें. त्याच्या इंद्रियजन्यसुखतृप्तीच्या आड कांहीं आलें, तर तो आपलें स्वातंत्र्य गमावलें म्हणून शेंडी उपटण्याच्या बेतास येतो. पण वास्तविक विचार केला, तर हें स्वातंत्र्यही नव्हे आणि ही अनिरुद्धताही नव्हे. अशा प्रसंगीं सहनशीलता दाखविणें हें खरें स्वातंत्र्य प्रगट करणें होय. परक्यासाठीं स्वतःच्या क्रोधादि भावनांवर ज्याचा पूर्ण ताबा चालतो, तो परतंत्र नसून स्वतंत्र आहे — गुलाम नसून धनी आहे — असें समजावें. पतीनें एखादी गोष्ट आपल्या मनासारखी केली नाहीं असें वाटतांक्षणींच स्वातंत्र्य गेलें म्हणून ओरड करणारी स्त्री स्वतःच्या क्षुद्र मनोविकारांची पक्की दासी बनलेली असते. तिला खऱ्या स्वातंत्र्याची प्राप्ति स्वप्नांतही शक्य नाहीं. आपल्या स्त्रीस सदोदित नांवें ठेवीत असलेल्या पुरुषाचीही स्थिति वास्तविक अशीच आहे. केव्हांही परद्वार न करणें, हें स्त्रीपुरुषांचें पहिलें कर्तव्य आहे. खऱ्या पतिव्रतेच्या प्रेमाचा प्रभावच असा आहे कीं पुरुष कितीही बिघडला असला तरी तिच्या अमृततुल्य मधुर वाणीनें तो सन्मार्गवर्ती झाल्यावांचून राहाणार नाहीं. स्त्रीच्या शुद्ध आणि क्षमाशील वर्तनानें ज्याचें हृदय यत्किंचितही द्रवणार नाहीं, इतका पशुतुल्य मनुष्य क्वचितच असेल. खरोखर जग अद्यापि इतकें बिघडलेलें नाहीं. पुरुषजात भ्रष्ट व

पशुतुल्य झाली आहे अशी ओरड आपण सर्वत्र ऐकतों; परंतु स्त्रियांच्या-संबंधानें विचार केला तर बऱ्याच स्त्रियांवरही हा आक्षेप लागू होणार नाहीं काय ? स्त्रिया तोंडानें बोलून दाखवितात तितक्या जर त्या खरोखर पवित्र असत्या, तर सर्व जगांत एकही वाईट पुरुष सापडला नसता, ह्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. पावित्र्याला अजिंक्य असा एकही दुर्गुण जगांत नाहीं. स्वतःच्या पतीशिवाय इतर सर्व पुरुषांकडे केवळ पुत्रदृष्टीनें अवलोकन करावयाचें, इतकी जिची दृष्टि पवित्र झाली आहे, तिला भ्रष्ट करण्याला चंग बांधून कोणी आला तरी तिच्या समोर आल्याबरोबर त्याचे अपवित्र विचार मावळून तो तिजकडे केवळ मातृभावानेंच अवलोकन करील. पतिव्रता अनसूयेच्या गोष्टीचें तात्पर्य हेंच आहे. त्याचप्रमाणें स्वतःच्या पत्नीशिवाय इतर सर्व स्त्रीजातीकडे केवळ मातृभावानें अगर भगिनीभावानें अवलोकन करावयाचें असें पुरुषानें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. तसेंच धर्मज्ञान देण्याचें ज्यानें पत्करिलें असेल त्यानें सर्व स्त्रियांस मातेसमान पूज्य मानून तदनुरूप प्रत्येक स्त्रीशीं आपलें वर्तन ठेविलें पाहिजे.

मातृत्व हें सर्व जगांत अत्यंत श्रेष्ठ असें मानलें आहे. स्वार्थ अथवा आपलपोटेपणा विसरावयास शिकावयाचें असेल, तर तें मातेपाशीं शिकावें. ईश्वरी प्रेमावांचून जगांतील दुसरें कोणतेंही प्रेम मातृप्रेमापेक्षां श्रेष्ठ नाहीं. मातृप्रेमाहून प्रेमाचे इतर सर्व प्रकार निःसंशय हलक्या प्रतीचे आहेत. स्वतःच्या सुखाकडे न पाहातां आपल्या मुलांच्या सुखाकडे प्रथम लक्ष पुरविणें हें मातेचें आद्य कर्तव्य आहे. मुलाच्या सुखाकडे प्रथम लक्ष न पुरवितां जीं आईबापें स्वसुखार्थ अत्यंत दक्ष असतात, तीं जवळ जवळ पशुपक्ष्यांच्या कोटींत बसविण्यास योग्य आहेत असें समजावें. पिलांना पंख फुटून तीं स्वसंरक्षणास योग्य झालीं म्हणजे ज्याप्रमाणें आईबाप व पिलें हीं परस्परांची ओळख विसरतात, त्याचप्रमाणें मुलें मोठीं व मिळवतीं झालीं म्हणजे आईबापांनीं घालून दिलेला धडा गिरवून वृद्ध

मातापित्यांकडे तीं दुर्लक्ष करतात. परमेश्वराचें सृष्टीवरील प्रेमच स्त्रीरूपानें उद्भवलें आहे असें ज्या पुरुषास वाटतें, तो पुरुष धन्य होय! परमेश्वराचें पितृत्व पुरुषरूपानें व्यक्त झालें आहे असें ज्या स्त्रीस वाटतें, ती स्त्री धन्य होय! आणि मातापितरें हीं खचित परमेश्वररूपेंच आहेत असा ज्या मुलांचा निश्चय आहे, तीं मुलेंही धन्य होत!

आत्मविकासाचा निश्चित मार्ग म्हटला म्हणजे प्राप्तकर्तव्यें निश्चयानें पार पाडण्यास प्रथम शिकलें पाहिजे. अशीं कर्तव्यें करीत असतां निश्चय पक्का होत गेला म्हणजे आत्मश्रद्धा व निश्चयाचें बळ हीं वाढत जातात व त्यामुळें स्थितप्रज्ञाची स्थिति प्राप्त होते. ह्याविषयीं महाभारतांत एक कथा आहे, ती मी आपणांस सांगतों: एके वेळीं एक तरुण संन्यासी अरण्यांत तप आचरीत होता. बरींच वर्षें योगसाधन केल्यानंतर एके दिवशीं तो एका वृक्षाखालीं बसला असतां वरून कांहीं वाळलेलीं पानें व काटक्या त्याच्या अंगावर पडल्या. तेव्हां त्यानें वर पाहिलें, तों दोन पक्षी भांडत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. त्यांजकडे पाहून संन्याशास क्रोध येऊन तो म्हणाला, 'अरे, मी खालीं बसलों असतां मला त्रास देण्यास तुमची छाती तरी कशी झाली?' असें म्हणून मोठ्या क्रोधानें त्या पक्ष्यांकडे त्यानें अवलोकन केलें. त्या वेळीं त्याच्या ठिकाणीं असलेलें योगसामर्थ्य अग्निज्वालेच्या रूपानें प्रगट होऊन, क्षणार्धांत ते बिचारे पक्षी जळून भस्म झाले! स्वतःच्या तपःसामर्थ्याची ही प्रतीति पाहून त्या योग्यास मोठा हर्ष झाला. कांहीं वेळानें तो नेहमींप्रमाणें भिक्षा मागण्यास गांवांत गेला. गांवांतील एका घरीं जाऊन 'माई, भिक्षा वाढा' असा त्यानें पुकारा केला. 'बावाजी, जरा धीर धरा.' असा आंतून आवाज आला. संन्यासी मनांतल्या मनांत फार संतप्त होऊन म्हणाला, 'अग भिकारडे, मला वाट पाहावयाला लावतेस काय? तुला अद्यापि माझ्या सामर्थ्याचा प्रभाव कळला नाहीं, म्हणून तूं इतकी उद्दाम झालीस अं!' अशा प्रकारें तो मनांत विचार करीत आहे इतक्यांत आंतून पुन्हा

आवाज निघाला, 'यतिराज, इतका अहंकार असणें अनुचित आहे. मी रानांतील पक्षी नव्हे.' हे शब्द ऐकून संन्यासी अगदीं चकित झाला. परंतु तेथून निघून न जातां तो तसाच वाट पाहात उभा राहिला. आणखी कांहीं वेळ गेल्यानंतर आंतून बोलणारी स्त्री भिक्षान्न घेऊन आली. तिजकडे पाहून मनांत ओशाळलेला तो संन्यासी तिला वंदन करून म्हणाला, 'माते, रानांतील हकीकत तुला कशी समजली?' ती स्त्री म्हणाली, 'माझ्या मुला, तुझा योगबीग मला कांहीं समजत नाहीं. अगदीं सामान्य-प्रतीची अशी मी एक स्त्री आहें. माझे पति थोडेसे आजारी असल्यामुळें त्यांची शुश्रूषा मी करीत होतें, इतक्यांत तूं आलास. त्यामुळें त्यांचें पथ्यपाणी होईपर्यंत तुला थांबावयास सांगणें मला भाग पडलें. माझ्या पत्नित्वाचीं कर्तव्यें उत्तम तऱ्हेनें पार पाडावीं इतकेंच मला समजतें; आणि आजपर्यंत सर्व जन्म मी तेवढेंच करीत आहें. माझें लग्न झालें नव्हतें, तेव्हां कन्या ह्या नात्यानें माझ्या मातापितरांची मीं सेवा केली. लग्न झाल्यापासून माझ्या प्रिय पतीची सेवा मी करीत आहें. माझें योगसाधन म्हणशील तर इतकेंच. मला सध्या जें कांहीं थोडेंबहुत ज्ञान प्राप्त झालें आहे तें ह्या सेवेमुळेंच होय. त्या ज्ञानानेंच रानांतील सर्व इतिवृत्त मला कळलें. तुला ह्याहून कांहीं अधिक जाणण्याची इच्छा असली, तर ...गांवीं एक व्याध असतो त्याची भेट घे म्हणजे तुझी इच्छा तृप्त होईल. बाजारांत चवाठ्यावर त्याचें दुकान आहे.' व्याधाचें नांव ऐकून तो तरुण संन्यासी मनांत प्रथम थोडा खजील झाला. परंतु त्य वेळेपर्यंत जें कांहीं त्याच्या अवलोकनांत आलें होतें, त्यामुळें उत्पन्न झालेली जिज्ञासा त्याला स्वस्थ बसूं देईना. तो तेथून निघून त्या स्त्रीनें सांगितलेल्या गांवीं गेला व बाजारांत जाऊन त्या व्याधाचें दुकान त्यानें शोधून काढलें. दुकानांत एक भला लठ्ठ व्याध, हातीं मोठा सुरा घेऊन बसला आहे व मांसाचा विक्रय करीत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याला पाहून संन्यासी मनांत म्हणाला, 'देवा! आतां ह्या खाटकापासून ज्ञान प्राप्त होणार! हा तर निव्वळ यमदूत दिसतो!!'

तो असा विचार करीत आहे, इतक्यांत त्या व्याधाचीही नजर संन्याशाकडे जाऊन त्यानें म्हटलें, 'स्वामीमहाराज, आपणास ... गांवच्या एका स्त्रीनें मजकडे पाठविलें आहे, नाहीं का? आपण कृपा करून जरा थांबा. थोड्या वेळानें दुकान बंद करून आपण घरीं जाऊं.' आतां येथें कोणता चमत्कार नजरेस पडणार ह्याचा आपल्या मनाशीं विचार करीत तो संन्यासी तेथें उभा राहिला. थोड्या वेळानें गिऱ्हाईक येण्याचें बंद झालें, तेव्हां दुकान बंद करून व्याध त्या संन्याशाला बरोबर घेऊन आपल्या घरीं गेला. ओसरीवर कांहीं बसावयास घालून व त्या संन्याशाला त्यावर बसवून व्याध आंत गेला. आंत जाऊन आपल्या वृद्ध मातापितरांस त्यानें स्नान घातलें व नंतर जेवूं घालून तीं तृप्त झाल्यानंतर तो बाहेर संन्याशाजवळ येऊन म्हणाला, 'स्वामीमहाराज, आपण येथपर्यंत येण्याची तसदी घेतली, हा मजवर मोठा अनुग्रह आहे. आतां आपली कोणत्या प्रकारची सेवा करूं ह्याबद्दल आज्ञा व्हावी.' ह्यानंतर संन्याशानें अध्यात्मविद्येंतील अनेक कूट प्रश्न त्यास केले व व्याधानें त्या सर्वांचीं समर्पक उत्तरें दिलीं. तो कथाभाग वेदान्तरसानें ओथंबलेला असून त्यालाच महाभारतांत व्याधगीता असें नांव आहे. त्या व्याधाचें तें ज्ञान पाहून संन्यासी अगदीं थक्क होऊन त्याला म्हणाला, 'तुम्हांला एवढ्या विमल ज्ञानाची प्राप्ति झाली असतां, व्याध जातींत तुमचा जन्म कां झाला? आणि तसा जन्म झाला असला, तरी मांस विकण्याचें ओंगळ कर्म तुम्ही कां करतां?' व्याध म्हणाला, 'माझ्या बेट्या, अमूक कर्म चांगलें आणि अमूक कर्म वाईट म्हणणें ही दृष्टिच खोटी आहे. जगांतील कोणतेंही कर्तव्य वाईट अथवा अमंगल नाहीं. पूर्वकर्मानुसार मला ज्या परिस्थितींत जन्म आला, त्या परिस्थितीचीं कर्तव्येंही मला जन्मदारभ्यच प्राप्त झालीं आहेत. लहानपणीं मी हाच धंदा शिकलों. ह्या धंद्यांत होणाऱ्या नफ्यानें मला जसा आनंद होत नाहीं, तसाच प्रसंगीं होणाऱ्या तोट्यानें मला शोकही होत नाहीं. ह्या दोहोंपासूनही अलिप्त राहून मी माझें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावितों. गृहस्थाश्रमाला

अनुरूप अशीं माझीं कर्तव्यें नीट सांभाळून, माझ्या मातापितरांची मी सेवा करतों. मी कसल्याही प्रकारचें योगसाधन करीत नाहीं अथवा मी संन्यासीही झालों नाहीं, हें तुला दिसतच आहे. मला जें कांहीं थोडें फार ज्ञान प्राप्त झालें आहे, तें मी आपलीं कर्तव्यकर्मे अलिप्तपणें परंतु उत्तम रीतीनें पार पाडल्यामुळेंच प्राप्त झालें आहे.'

हिंदुस्थानांत सध्या एक महायोगी राहात आहेत. माझ्या साऱ्या आयुष्यांत त्यांच्या तोडीची विभूति माझ्या पाहाण्यांत आली नाहीं. त्यांची वृत्ति थोडी विलक्षण आहे. कोणी कांहीं प्रश्न विचारला तर ते त्याचें सरळ उत्तर तावडतोब कधींच देणार नाहींत. कोणाचा गुरु होण्याची आपली योग्यताच नाहीं असें त्यांस वाटतें. परंतु एखादा प्रश्न विचारून कांहीं दिवस तुम्ही वाट पाहात बसलां तर एखादे दिवशीं बोलण्याच्या ओघांत तुमच्या प्रश्नाचें उत्तर ते अशा प्रकारें देतील कीं अननुभूत अशी ज्ञानप्राप्ति आपणांस झाली असें तुम्हांस वाटेल. कर्माचें मुख्य रहस्य काय, असा प्रश्न त्यांना मीं एक वेळ केला. कांहीं दिवसांनीं ते सहज एकदा म्हणाले, "साध्य आणि साधनें हीं चित्तांत एकरूप झालेलीं असावीं." ह्याचा अर्थ असा आहे कीं ज्या वेळीं तुम्ही कांहीं कार्य करीत असाल त्या वेळीं साध्य आणि साधनें ह्यांशिवाय इतर कोणत्याही गोष्टीचा विचार करूं नका. साधनांनीं साध्य सिद्ध होईपर्यंत मध्यंतरीं जो वेळ जातो त्या वेळांत इतर भलत्याच गोष्टीचा विचार करूं नका. व्याधाच्या गोष्टींतील तात्पर्य हेंच आहे. प्राप्तकर्तव्य उत्तम रीतीनें पार पाडणें हाच परमेश्वराची पूजा करण्याचा उच्च मार्ग आहे. अशा रीतीनें प्रत्येक कर्म म्हणजे त्याचें पूजन, आणि त्याचें आज्ञापालन आहे अशी भावना पक्की झाली म्हणजे ज्ञान आपोआपच प्राप्त होऊं लागतें. आपली परिस्थिति आणि आपला दर्जा ह्यांस अनुरूप अशीं जीं प्राप्तकर्तव्यें असतील तीं निष्काम मनानें – अलिप्तपणानें – पार पाडलीं म्हणजे अशा कर्मांतून ज्ञान उदय पावूं लागतें व ज्ञानानें आत्म्यास मोक्ष मिळतो.

ज्याच्या हृदयांत फलापेक्षा आहे, अशा मनुष्याच्या हातून आनंदी वृत्तीनें कोणतेंही काम होणें शक्यच नाहीं. जरा कोठें कांहीं अडचण आल्याचा भास झाला कीं अशा मनुष्याचें डोक ठिकाणावर राहात नाहीं. ह्यामुळें ज्ञानप्राप्तीचा प्रसंग आला तरी तो वायां जातो. ज्याला फलापेक्षा नाहीं त्याला सर्व कर्तव्यें सारख्याच योग्यतेचीं वाटतात. ह्यामुळें प्रचंड उद्योग करीत असतांही एखाद्या गुहेंत राहिल्याप्रमाणें निःसीम शांतता त्याच्या हृदयांत वास करते. ह्यामुळेंच त्याचें प्रत्येक कर्म म्हणजे तीक्ष्ण हत्यारच होऊन बसतें व ह्या हत्यारानें स्वार्थ आणि इंद्रियसुखलोलुपता ह्यांचा समूळ उच्छेद करून तो ज्ञानवान् होतो. '**यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः। ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः॥**' अशी पंडिताची व्याख्या भगवान् श्रीकृष्णांनीं केली आहे. स्वतःच्या ज्ञानाबद्दल घमेंड वाटणें हा मनुष्यजातीचा सामान्य स्वभाव आहे. ह्यामुळें कोणतेंही कर्तव्य प्राप्त झालें म्हणजे तें कमी दर्जाचें असें आपणांस वाटतें. परंतु कर्मांची वांटणी योग्यतेनुरूपच झालेली असते, हा त्रिकाला-बाधित सिद्धान्त आपणांस ठाऊक नसतो; अथवा ठाऊक असला तरी 'मी मोठा' ह्या भावनेनें अंध झालेल्या मनुष्यास तो दिसत नाहीं. मोठेपणाच्या भावनेनें मोह पावलेल्या बुद्धीला ह्या सिद्धान्ताचा उमजच पडत नाहीं. ह्यामुळेंच नित्य व्यवहारांत चढाओढ सुरू होते. अगोदरच मोहानें व्यापलेली बुद्धि चढाओढीनें अधिक भ्रष्ट होते व राग, द्वेष, असूया, इत्यादिकांचा प्रवेश होण्याजोगें महाद्वार तेथें उघडतें. रागद्वेषांचा प्रवेश बुद्धींत झाल्याबरोबर दयाक्षमादि दैवी गुणांचा झरा कोरडा होतो. कुरकुऱ्या स्वभावाच्या मनुष्याला जगांतील प्रत्येक कर्म नावडतेंच असतें. त्याला कोणीं राजा केलें तरी तो रडणार! आणि रंकाच्या अवस्थेचाही त्याला हेवा वाटणार! अशा मनुष्याच्या हातून कर्तबगारी तो कशाची होणार! ह्यासाठीं प्राप्तकर्तव्यें आनंदानें आणि नेटानें पार पाडून आपण ज्ञानवान् होऊं या. आपण ज्ञानवान् झालों म्हणजे मोक्ष आपल्या मागच्या दारींच आहे.

## प्रकरण पांचवें

# परोपकार स्वतःसच कल्याणप्रद आहे

आपल्या आध्यात्मिक उन्नतीस कर्मयोग किती पोषक आहे ह्याचा विचार पुढें चालू करण्यापूर्वी 'कर्म' ह्या एका शब्दांत ज्या अनेक कल्पनांचा अंतर्भाव आम्ही हिंदु लोक करितों, त्यांपैकीं आणखी एक कल्पना तुम्हांस प्रथम सांगणें इष्ट आहे. धर्माचीं प्रमुख अशीं तीन अंगें असतात. तत्त्वविचार, पुराणें अथवा दंतकथा आणि आचार. ह्यांपैकीं तत्त्वविचार हा भाग सर्वांत अत्यंत महत्त्वाचा असतो हें उघड आहे. तत्त्वविचारांत ज्या तत्त्वांचें उद्घाटन असत, त्यांचें प्रत्यक्ष आचरण कसें करावें ह्याचा बोध दंतकथा व काल्पनिक गोष्टी ह्यांवरून होतो. ठराविक आचारांमुळें तत्त्वविचारांत प्रत्यक्ष दृश्य स्वरूप येतें. किंबहुना आचार हें अमूर्त तत्त्वविचारांचें मूर्त रूपच होय. अगदीं सामान्य बुद्धीच्या मनुष्यास आचारामुळें तत्त्वविचारांचें आकलन करणें सोपें जातें. कर्म ह्या शब्दांत अशा प्रकारच्या आचारांचा अंतर्भाव होतो. प्रत्येक धर्ममार्गांत अशा प्रकारच्या आचारांची जरूर असते. आमची बुद्धि विचारानें तीव्र होईपर्यंत केवळ भावरूप सिद्धान्तांचें पूर्ण आकलन करण्याची तिला शक्ति नसते. कोणताही विषय लवकर कळतो असें आपल्या अहंकारामुळें आपणास वाटत असतें; परंतु प्रत्यक्ष प्रसंग आला म्हणजे निव्वळ भावरूप सिद्धान्तापुढें आपल्या बुद्धीची कशी त्रेधा उडते हें अनुभवानेंच कळण्याजोगें आहे. ह्या कारणामुळें प्रत्येक धर्मांत कांहीं विशिष्ट खुणा अथवा चिन्हें ह्यांचा उपयोग केलेला असतो. ह्या चिन्हांच्या साहाय्यानें आपला मार्ग बराच सोपा होतो. सर्व धर्मांत आणि सर्व काळीं अशा

प्रकारच्या कांहीं विशिष्ट चिन्हांची योजना केलेली आहे. फार काय पण विशिष्ट चिन्हांवांचून तत्त्वविचार मनांत आणणेंही अशक्य आहे. शब्दसृष्टि ही विचारांचीं चिन्हेंच आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं, किंबहुना, सर्व दृश्य विश्वांतील प्रत्येक पदार्थ हें एक चिन्हच आहे. अदृश्य चैतन्यात्मक अधिष्ठानावर ही सर्व दृश्य सृष्टि उत्पन्न झाली आहे. म्हणजे अदृश्य परमेश्वराचें सृष्टि हें दृश्य चिन्ह आहे. अशा रीतीनें अस्तित्वांत आलेली चिन्हसृष्टि ही केवळ मनुष्यकृतच आहे असें नाहीं. एखाद्या धर्मांचे कांहीं विद्वान् एकत्र जमले आणि त्यांनीं हीं चिन्हें एकत्र विचार करून तयार केलीं असें नाहीं. अनेक सृष्ट पदार्थांप्रमाणेंच ह्या चिन्हांचीही आपोआप वाढ झालेली आहे. असें नसतें तर कांहीं विशिष्ट चिन्हें पाहून अनेक व्यक्तींच्या चित्तांत एकाच प्रकारच्या कल्पना उद्भवल्या नसत्या. कित्येक चिन्हांचा तर सर्वत्र आणि सर्वकाळीं सारखाच उपयोग होत असल्याचें आढळून येतें. ख्रिस्ती धर्माच्या उदयाबरोबर क्रुसाचें चिन्ह प्रचारांत आलें असावें असा तुम्हांपैकीं बऱ्याच जणांचा समज असेल; पण वस्तुस्थिति तशी नाहीं. ख्रिस्ती धर्म जन्मास येण्यापूर्वी व मोझेसच्याही जन्माच्या पूर्वीं, वेद प्रचारांत आले नव्हते तेव्हांही हें चिन्ह अस्तित्वांत होतें. इतकेंच नव्हे पण मनुष्यकृतीची कोणतीही नोंद नव्हती तेव्हांही हें चिन्ह अस्तित्वांत होतें. फिनीशियन आणि ॲझटेक्स लोकांतही ह्या चिन्हाचा उपयोग होत असल्याचें आढळतें. जगांतील सर्व जातींच्या लोकांस थोड्याशा फरकानें हें क्रुसाचें चिन्ह ठाऊक होतें. त्याचप्रमाणें वर्तुळाचें चिन्हही फार प्राचीन काळापासून सर्वत्र प्रचारांत असल्याचें आढळतें. त्याचप्रमाणें स्वस्तिकाची आकृतिही बहुधा सर्व देशांत आणि सर्वकाळीं आढळते. बौद्धधर्माच्या प्रसाराबरोबर स्वस्तिकाच्या चिन्हाचा प्रसार झाला असावा असा समज होता; परंतु बुद्धाच्या जन्माच्याही अगोदर ह्या चिन्हाचा सर्वत्र उपयोग होत होता, असें आढळून आलें आहे. जुन्या बाबिलोन आणि मिसर देशांत हें चिन्ह अस्तित्वांत होतें. हीं चिन्हें कोणी [illegible].

मराठी ग्रंथ सं[illegible]
नि: [illegible]

व्यक्तींनीं विशिष्ट कारणापुरतींच प्रचारांत आणलीं नसावीं, एवढी गोष्ट ह्या हकीकतीवरून सिद्ध होते, एवढेंच नव्हे, तर मानवी मन आणि चिन्हें ह्यांमध्यें कांहीं तरी अदृश्य संकेत असावा असें वाटतें. अशीच गोष्ट भाषेचीही आहे. चार पुढाऱ्यांनीं जमून अमक्या पदार्थास अमूक म्हणावें असें ठरविल्याचें कोणास माहीत नाहीं. भाषेची रचना अशा प्रकारें झालीच नाहीं. तिची उत्पत्ति आणि वाढ हीं मनुष्यजातीबरोबर आपोआपच झालीं आहेत. ज्या कल्पनेला शब्द नाहीं अशी कल्पना अस्तित्वांतच आली नाहीं; तसेंच जे शब्द प्रचारांत आले ते कल्पनेवांचून आलेले नाहींत; कल्पना आणि शब्द ह्यांचें अविभाज्य संमेलन झालेलें आहे. ह्यांस केव्हांही विभक्त करतां येणार नाहीं. कल्पना व्यक्त करण्याकरितां दोन प्रकारच्या चिन्हांचा उपयोग होतो. एक प्रकार ध्वनिचिन्हांचा आणि दुसरा वर्णचिन्हांचा. जन्मापासून बहिरे आणि मुके अशा लोकांस ध्वनिचिन्हांचा कांहीं उपयोग नाहीं. त्यांना ध्वनिचिन्हांहून निराळ्या चिन्हांचा उपयोग करावा लागतो. जो जो विचार मनांत येतो त्याचें दृश्यचित्र मनःपटावर ताबडतोब उमटतें. पर्वताचें, नदीचें अथवा दुसरें कसलें तरी चित्र काढावयाचें एखाद्या चिताऱ्याच्या मनांत आलें तर कागदाला त्याची कुंचली लागण्यापूर्वीं तें सर्व चित्र पूर्णपणें त्याच्या चित्तपटावर प्रथम रंगविलें जातें व नंतर त्याची नक्कल तो कागदावर काढतो. अशा प्रकारें मनःपटावर प्रत्येक विचाराचें दृश्यस्वरूप प्रथम चित्रित होतें. ह्या चित्राला आर्यतत्त्वज्ञांनीं नाम-रूप अशी संज्ञा दिली आहे. ज्याप्रमाणें कांहीं विशिष्ट मनुष्यांनीं भाषा निर्माण केलेली नाहीं, त्याचप्रमाणें चिन्हेंही कोणीं निर्माण केलेलीं नाहींत. धर्मतत्त्वांचा प्रत्यक्ष आचार सुरू होतांच त्याबरोबर विशिष्ट चिन्हेंही आपोआप प्रचारांत येत गेलीं. धर्मांचे विशिष्ट आचार आणि देवळें, मशिदी वगैरे विशिष्ट जागा असण्याचें काय कारण आहे, असा प्रश्न अलीकडे अनेक लोक करतात. धर्मविचारांत तान्ह्या मुलांपेक्षां ज्यांची योग्यता अधिक नाहीं, अशा लोकांनाही धर्मविषयक हवे ते प्रश्न विचारण्याची जणूं काय पूर्ण मुभा मिळाली

आहे ! तथापि देवळांत जाऊन मूर्तीस नमस्कार करणाऱ्या अथवा प्रार्थना करणाऱ्या लोकांच्या वर्तणुकीची, तसें न करण्यांत अभिमान बाळगणाऱ्या लोकांच्या वर्तणुकीशीं सूक्ष्म तुलना केली तर त्यांजमधील फरक कळतो. देवळें व पूर्वीं सांगितलेलीं चिन्हें ह्यांच्यासंबंधीं ज्या विशिष्ट भावना मानवी मनोवृत्तींत अत्यंत संलग्न आहेत, त्या देवळांत जाण्याबरोबर अथवा चिन्हदर्शनाबरोबर जागृत होऊन त्यांचा परिणाम चित्तावर होतो. ह्याकरितां अशा प्रकारच्या विशिष्ट चिन्हांचा त्याग करणें युक्त नाहीं. चिन्हांचा वास्तविक अर्थ समजून त्यांचा उपयोग करणें हाही कर्मयोगाचाच एक भाग आहे.

कर्मयोगशास्त्रांत महत्त्वाचीं अशीं दुसरीं अनेक अंगें अंतर्भूत होतात. विचार आणि उच्चार ह्यांजमधील परस्पर संबंध काय आहेत व उच्चारांत म्हणजे विचाराच्या शब्दस्वरूपांत काय सामर्थ्य आहे, ह्याचा निश्चय करणें हें कर्मयोगाचेंच एक अंग आहे. प्रत्येक धर्मांत शब्दाचें अतिशय महत्त्व मानण्यांत आलें आहे ; इतकें कीं "आरंभीं शब्द होता, आणि शब्दांतून सृष्टि निर्माण झाली" असें कित्येक तत्त्ववेत्त्यांनीं अनुमान केलें आहे. परमेश्वराच्या चित्तांत उद्भूत झालेला विचार शब्दरूपानें बाहेर पडतांक्षणींच त्यानें सृष्टीचें रूप धारण केलें. परमेश्वराच्या मनांत प्रथम विचार उद्भवला, विचाराचें इच्छेंत रूपांतर झालें, इच्छेनें शब्द उत्पन्न झाला आणि त्यानें सृष्टीच रूप धारण केलें, अशी सृष्टीची उपपत्ति कांहीं तत्त्वज्ञ सांगतात. वारंवार जूं घासल्यामुळें बैलाच्या मानेस घट्टा पडून जसे तेथील ज्ञानतंतु मरून गेलेले असतात, तसेच आपले ज्ञानतंतुही चालू व्यवहाराच्या रोजच्या घर्षणानें मठ्ठ बनतात. जों जों वृद्धापकाल अधिक होतो तों तों हा मठ्ठपणा वाढतच जातो. तशांतून सांप्रतच्या काळीं जडवाद अधिक मोहक रूपानें नटलेला असल्यामुळें आपल्या ज्ञानदृष्टीवर एक आवरण अधिकच पडल्यासारखें झालें आहे. ह्यामुळें आपल्या सभोवतीं प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींचें नुसतें महत्त्वही आपणांस समजत नाहींसें होतें. तथापि मनुष्य कितीही मठ्ठ असला तरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.

कित्येक वेळां असे कांहीं चमत्कारिक प्रकार घडून येतात कीं त्याची जिज्ञासा जागृत झाल्यावांचून राहात नाहीं. अमूक गोष्ट अशी कां घडली हा विचार मनावर वारंवार आघात करून निद्रित जिज्ञासेस जागृत करतो. जिज्ञासा जागृत होणें ही ज्ञानार्जनाच्या मार्गांतील पहिली पायरी आहे. शब्द आणि सृष्टीची उत्पत्ति ह्यांविषयीं जें नुकतेंच विवेचन केलें, त्यांतील तात्त्विक विचार क्षणभर बाजूस ठेवले तरी ध्वनिचिन्हांकडून रोजच्या व्यवहारांत बजावली जाणारी कामगिरी कमी महत्त्वाची आहे असें नाहीं. ह्या क्षणीं मी तुम्हांशीं बोलत आहें. तुम्हांपासून मी बऱ्याच अंतरावर आहें. माझा स्पर्श तुम्हांस होत नाहीं; तथापि माझ्या भाषणानें हवेवर उत्पन्न होणारे तरंग तुमच्या कानांत शिरून मनावर कांहीं परिणाम उत्पन्न करितात. हा परिणाम होण्याचें बंद करणें तुमच्या हातांत नाहीं. तुम्हांस यत्किंचित् स्पर्शही न करतां तुमच्या मनांत मी इतक्या अंतरावरून खळबळ उत्पन्न करूं शकतों ही गोष्ट चमत्कारिक नाहीं काय ? एक मनुष्य दुसऱ्यास मूर्ख म्हणतो. इतक्यांत तो दुसरा मनुष्य उभा राहून संतापानें दुसऱ्याच्या तोंडावर गुद्दा मारतो. हें शब्दाचें — ध्वनिचिन्हाचें — प्रत्यक्ष सामर्थ्य पाहा ! एखादी स्त्री दुःख-व्याप्त होऊन रडत असली आणि इतक्यांत दुसरी स्त्री येऊन तिनें तिच्याशीं थोडेंसें गोड भाषण केलें तर दुःखी स्त्रीचें अवनत मुख एकदम वर होतें. तिजकडे पाहावें, तों क्षणापूर्वींचा तो म्लान चेहरा जाऊन मंदहास्य त्या जागीं विलसूं लागल्याचें आढळून येतें. शब्दांत काय सामर्थ्य आहे ह्याचा प्रत्यय ह्याप्रमाणें क्षणोक्षणीं आपणांस येतो. तत्त्वविचारांत काय अथवा सामान्य व्यवहारांत काय शब्दांचें, ध्वनिचिन्हांचें, सामर्थ्य सारखेंच प्रगट होतें. आपल्या जाग्रदवस्थेंत ह्या आपल्या सामर्थ्याचा मन मानेल तसा उपयोग आपण करीत असतों. ह्या शक्तीसंबंधीं कसल्याच प्रकारचा विचार आपल्या मनांत येत नाहीं, किंवा तिचें कांहीं कौतुकही आपणांस वाटत नाहीं. आपल्या ह्या सामर्थ्याची उपपत्ति समजून घेऊन तदनुरूप त्याचा योग्य उपयोग करणें हेंही कर्मयोगाचेंच एक अंग आहे.

रोजचा व्यवहार सुरळीत चालण्याकरितां आपणांस जीं कांहीं कर्तव्यें करावीं लागतात, त्यांचे प्राय: दोन प्रकार आपण कल्पितों. एक स्वत:साठीं करावयाचीं कर्में आणि दुसरा प्रकार म्हणजे लोकांसाठीं करावयाचीं कर्में. ह्या दुसऱ्या प्रकारच्या कर्तव्यांस परोपकाराचीं कामें असें आपण नांव देतों. हीं परोपकाराचीं कामें करीत असतां आपण केवळ लोकांच्याच उपयोगी पडतों असें बाह्यत: दिसतें ; तरी वस्तुत: आपण आपल्या स्वत:च्या कल्याणासाठींच तीं कामें करीत असतों. केवळ परोपकारासाठीं कांहीं उद्योग करण हें चांगलें आहे व प्रत्येकानें ही इच्छा सदोदित करावी हें इष्ट आहे ; परंतु परोपकारी कृत्यांचा तत्त्वदृष्ट्या विचार केला तर आपल्यावांचून जगाचें यत्किंचितही अडत नाहीं असें आपणांस दिसून येईल. आपण जन्मास येण्यापूर्वीं जग सुरळीत चाललें होतें व आपल्या पाठीमागेंही तें सुरळीत चालणारच. त्यानें आपल्या मदतीची केव्हांही अपेक्षा केलेली नव्हती व सध्याही तें करीत नाहीं. एका ख्रिस्ती उपदेशकाचें एक धार्मिक प्रवचन माझ्या वाचनांत आलें. त्यांत तो म्हणाला, "ही सर्व सुंदर सृष्टि फार चांगली आहे. कारण तिजमुळें परोपकाराचीं कृत्यें करावयास आपणांस संधि मिळते." केवळ वरवर पाहिलें तर ह्या विचारांत नांवें ठेवण्यासारखें कांहीं नाहीं. पण आमच्या मदतीसाठीं जग जणूं काय वाटच पाहात आहे असा जो ध्वनि ह्या भाषणांत निघतो तो जगाला आणि परंपरेनें परमेश्वराला उपमर्दकारक नाहीं काय? जग इतकें लंगडें लुळें आहे काय, कीं तुमच्या मदतीवांचून त्याचें त्याला कांहीं करतां येऊं नये? जग अनंत प्रकारच्या दु:खांनीं व्यापिलें आहे, ही गोष्ट खरी व दु:खितांचें संकट नाहींसें करण्यास आपण त्यांस मदत करावी हेंही युक्त आहे; पण त्या आपल्या मदतीचा शेवटीं आपणांसच उपयोग होत असतो ही गोष्ट विसरतां येत नाहीं. मीं लहानपणीं कांहीं पांढरे उंदीर बाळगले होते. त्यांच्या पिंजऱ्यांत एक पितळेचा रहाट बसविला होता. ते उंदीर त्यावर चढूं लागले म्हणजे तो रहाट गरगर फिरूं लागे. उंदीर जों जों जलदीनें पाय उचलीत तों तों रहाट अधिक झपाट्यानें

फिरूं लागे; परंतु ह्या सर्व गतीचा शेवट पाहिला तर उंदीर आणि रहाट जागच्या जागींच असलेले आढळावयाचे. रहाटावरून पलीकडे जाण्यासाठीं निघालेला उंदीर चालून चालून थकला तरी शेवटीं जागच्या जागींच राहावयाचा. जगाच्या कल्याणासाठीं हातीं वीरकंकण बांधून निघालेल्यांची गोष्टही अशीच आहे. अशा कृत्यांचा वास्तविक उपयोग म्हटला तर ती करणाराची नीतिमत्ता सुधारते व दृढ होते, हा होय. तत्त्वदृष्ट्या जगाला चांगलें अथवा वाईट असें कांहीं निश्चित स्वरूपच नाहीं. जो ज्या दृष्टीनें त्याजकडे अवलोकन करतो त्याप्रमाणें तें त्यास दिसतें. 'ना जानुं तेरा राम कैसा है।' असें कोणीं कविरास म्हटलें, तेव्हां त्यावर त्यानें उत्तर दिलें, 'राम जैसेकु वैसा है.' हीच गोष्ट जगासही पूर्णपणें लागू पडते. ह्या दृष्टीनें पाहातां प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतःचें निराळेंच जग निर्माण करीत असतो असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जन्मांधाला दृक्प्रत्यय नसल्यामुळें जग थंड आहे, उष्ण आहे, कठीण आहे अथवा मृदु आहे, अशा प्रकारचा स्पर्शानुभव तो जगाविषयीं सांगेल. एकाच मनुष्याविषयीं विचार केला तरी त्याचें निश्चित स्वरूप अमूक असें ठरवितां येणार नाहीं. एक म्हणेल, 'हा लुच्चा आहे.' दुसरा म्हणेल, 'हा चांगला मनुष्य आहे.' तिसरा म्हणेल, 'हा फार प्रेमळ आहे.' चौथा म्हणेल, 'हा दुष्ट आहे.' ह्याचा अर्थ असा कीं त्या विशिष्ट मनुष्याविषयीं ज्याला जसा अनुभव असेल तसें तो त्याचें स्वरूप समजेल. वस्तुतः आपण मनुष्यें म्हणजे सुखदुःखाचे डोल्हारे आहों; आपण म्हणजे सुखाचीं आणि दुःखाचीं राहावयाचीं घरें. ह्या माझ्या म्हणण्याचा अनुभव आपल्या आयुष्यांत आपणांस हजारों वेळ आला असेल. तरूण पुरुष आशावादी आणि म्हातारीं माणसें निराशावादी असावयाचीं असा सामान्य नियम आहे. तरूणांपुढें आयुष्याचा बराच काळ शिल्लक असतो; आपलें आयुष्य निघून गेलें ही जाणीव वृद्धांत असते. आपल्या पुढील काळांत आपल्या इच्छा तृप्त होतील असा भरंवसा तरुणाच्या हृदयांत असतो, आणि अतृप्त राहिलेल्या

अशा वृद्धाच्या हृदयास आंच लावीत असतात. वास्तविक विचार केला तर अशा निरनिराळ्या अवस्थांतले तरुण काय अथवा वृद्ध काय, सारखेच मूर्ख असतात. आपण ज्या दृष्टीनें विचार करतों तीप्रमाणें आपलें चरित्र सुखाचें अथवा दुःखाचें असें आपणांस वाटतें. सुख अथवा दुःख वस्तुगत नसून आत्मगत आहे, ही जाणीव नसल्यामुळें अमूक जीवित सुखाचें आणि अमूक दुःखाचें अशी भावना करून कोणी हसत असतो आणि कोणी रडत असतो ! उदाहरणार्थ, अग्नि हा स्वतः सुखमय नाहीं व दुःखमयही नाहीं. परंतु कडाक्याची थंडी पडली असतां शेकोटीजवळ बसून आपण म्हणतों, "अहाहा ! अग्नि किती सुखदायक आहे !" पण इतक्यांत एखाद्याचा निखाऱ्याला हात लागून बोटें भाजलीं म्हणजे त्याच अग्नीला दोष देण्यासही आम्ही तयार होतों. परंतु वास्तविक पाहिलें तर अग्नीनें आम्हांस सुख अथवा दुःख ह्या दोहोंपैकीं स्वतः कांहीं दिलें नसून दोन्ही भावना आमच्याच ठिकाणीं होत्या; त्या प्रसंगानुरोधानें जागृत मात्र झाल्या. आपण ज्याप्रमाणें अग्नीचा उपयोग केला त्याप्रमाणें तो आपणांस सुखदायक अथवा दुःखदायक झाला. हीच गोष्ट जगासंबंधींही खरी आहे. जग हें स्वतः अत्यंत पूर्णावस्थेंत आहे. पूर्णावस्था म्हणजे ज्या कार्याकरितां जगाची उत्पत्ति झाली, त्या कार्याच्या पूर्तीकरितां लागणाऱ्या साधनांनीं तें पूर्ण आहे असा अर्थ समजावा. आम्ही जगलों अथवा मेलों तरी त्यामुळें त्या साधनांत कांहीं भर पडत नाहीं अथवा त्यांत कांहीं उणीवही येत नाहीं. जगाच्या बऱ्याचा विचार करून मेंदूला शीण देण्याचें आम्हांस कांहीं कारण नाहीं.

हें जरी खरें आहे तरी आपण सदोदित परोपकार करीत असलें पाहिजे हेंही खरें आहे. तरी परोपकाररत राहाणें हें स्वतःच्याच फायद्याचें आहे व हा एक मोठा हक्कच आपणांस प्राप्त झाला आहे, अशी जाणीव आपल्या अंतःकरणांत सदोदित असली तर त्या परोपकार बुद्धीचा एखाद्या प्रचंड चालक शक्तीसारखा आपणांस उपयोग होतो. एखाद्या भिकाऱ्याला कांहीं

द्यावयाचें तुमच्या मनांत आलें तर छाती काढून डौलानें एखादें नाणें त्याच्याकडे भिरकावूं नका. तुमची उपकारबुद्धि त्याच्यामुळें जागृत झाली ही गोष्ट लक्षांत ठेवून त्याला जें देणें असेल तें द्यावें. अशा कृत्यापासून जी कांहीं मानसिक उन्नति होते व मनाला शक्ति प्राप्त होते ती दान घेणाऱ्यास होत नसून दान देणाऱ्याला होत असते. परोपकाराच्या कृत्यांनीं अहंकार मावळूं लागतो व अहंकार मावळूं लागला म्हणजे मनुष्य आपल्या पूर्णरूपाकडे जाऊं लागतो. कोणी तरी उपकार घेण्याच्या स्थितींत आहेत म्हणून पूर्णरूप पावण्याच्या साधनांतील एकाचा आपणांस उपयोग करून घेतां येतो, ह्याजबद्दल उपकार घेणाऱ्याचे आपण आभार मानले पाहिजेत. प्रत्येक परोपकाराच्या कृत्यानें आपल्या क्षुद्रवृत्ति नाश पावण्यास मदत होत असते. त्यामुळें आपण पवित्र होऊन पूर्णावस्थेस जातों. ह्यासाठीं आपल्या दातृत्वाचा गर्व वाहाण्यासारखी त्यांत कांहींच थोरवी नाहीं. तुमच्याजवळ पांच चार लाख रुपये असले तर मोठा परोपकार तो तुम्ही काय कराल? एखादें इस्पितळ बांधाल, एखादें नगरभवन बांधाल, एखाद्या अधिकाऱ्याचा पुतळा उभाराल, अथवा कोणाला मोठी मेजवानी द्याल; पण विश्वशक्तीच्या दृष्टीनें ह्या लांबलचक यादीची खरी किंमत काय आहे? 'बाडी बीचमें बंगला बनाया, रचा कमलका फूल।' ही गोष्ट खरी, पण जर पांचच मिनिटें प्रचंड झंझावात सुटला – विश्वांतील अनेक शक्तींपैकीं एकच जागृत झाली – तर 'दो घडीसे देखना, तो आखर धूलकी धूल।' असेंच म्हणण्याची पाळी यावयाची! एखादा ज्वालामुखी पर्वत लीलेनें फूत्कार करूं लागला तर तुमचीं प्रचंड शहरें, लांबच लांब रस्ते आणि हजारों इमारती जागच्या जागींच भस्मसात् होतील. ह्यासाठीं जगाचे उपकारक म्हणून गर्व वाहाणें ह्यासारखें दुसरें मूर्खत्व कोणतेंच नाहीं. तुमच्या अथवा माझ्या मदतीवांचून जगाचें अडलें आहे असें नाहीं. तर परोपकारामुळें आपल्या स्वतःच्या उन्नतीस मदत होते ही गोष्ट नित्य लक्षांत बाळगून आपण नेहमीं परोपकाररत राहिलें पाहिजे. स्वत्व विसरून

पूर्णत्व पावण्याचा हाच मार्ग आहे. एखादा भिकारी आमचें कांहीं देणें लागत नसतो, पण आमची उपकारबुद्धि जागृत करून तो मात्र आम्हांस ऋणी करून ठेवतो. माझ्यामुळें जगाचें अमूक बरें झालें अथवा अमक्या-तमक्याला माझ्यामुळें मदत झाली, हा विचारच मूर्खपणाचा आहे. ज्यामुळें अहंकार वाढतो असा प्रत्येक विचार मूर्खपणाचाच असतो व दुःखप्राप्ति होणें हें मूर्खत्वाचें निश्चित पर्यवसान आहे. एखाद्याला आपण कांहीं दिलें आणि त्याच्याकडून कृतज्ञतादर्शक शब्दांची अपेक्षा केली असतां तो कांहींच बोलत नाहीं, म्हणजे आपल्या अहंकारास ताबडतोब एक धक्का बसतो व आपणांस क्षणभर तरी दुःख होतें. आपण जें कांहीं करतों त्याचें कांहीं तरी प्रतिफल आपणांस मिळावें अशी इच्छा करणेंच चुकीचें आहे. ज्यानें उपकार करावयास संधि दिली त्याचे आभार मानणें रास्त आहे. परमेश्वराच्या पूजनाचा हा एक अत्युत्कृष्ट मार्ग आहे. दातृत्वबुद्धि असणें हें भाग्य सर्वांच्याच वांट्यास येत नाहीं. अशी बुद्धि हा एक मोठा हक्क आहे. हा हक्क आपणांस प्राप्त झाला आणि तो अमलांतही आला ह्याबद्दल आपणच कृतज्ञ असलें पाहिजे. कोणत्याही प्रतिफलाची अपेक्षा न करण्याइतकी आपली अलिप्तता जागृत असली म्हणजे निराशेचें दुःख प्राप्त होण्याची भीति नको. अलिप्त राहून केलेल्या कर्मांपासून दुःखाची प्राप्ति होणें ही गोष्ट सर्वथैव अशक्य आहे. आपण कांहीं केलें अथवा न केलें तरी सुखदुःखांचे अनुभव घेत घेत हें जग असेंच अनंत कालपर्यंत चालावयाचें आहे.

एके गांवीं एक मनुष्य राहात होता. तो फार गरीब असल्यामुळें त्याला पैसा मिळविण्याची इच्छा होती. त्याला कोणीं असें सांगितलें कीं जर एखादें भूत तुला वश होईल तर तें तूं मागशील तें तुला आणून देईल. त्यालाही हें सांगणें बरें वाटून तो भूत वश करून देणाऱ्या मांत्रिकाचा शोध करूं लागला. शोध करतां करतां त्याला शेवटीं एक सत्पुरुष भेटला. त्या सत्पुरुषाला सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. तेव्हां त्याजजवळ जाऊन तो

म्हणाला, "महाराज, मला एखादें भूत वश करून द्याल काय?" सत्पुरुषानें विचारलें, "बाबा, तुला भुताशीं काय करावयाचें आहे?" त्यानें उत्तर दिलें, "वाटेल तें काम पार पाडण्याची शक्ति भुताला असते असें मीं ऐकलें आहे. तर कृपा करून मला माझ्या कामासाठीं एखादें भूत मिळवून द्या." त्यावर सत्पुरुष म्हणाला, "वेड्या, असल्या भलत्याच नादाला लागूं नको. आपल्या घरीं जाऊन स्वस्थ बस." दुसऱ्या दिवशीं तो मनुष्य पुन्हा त्या सत्पुरुषाकडे जाऊन रडून आणि त्याची करुणा भाकून म्हणाला, "महाराज, कसेंही करून एखादें भूत मला मिळवून द्याच." तेव्हां त्याच्या रडण्याला कंटाळून सत्पुरुष म्हणाला, "हा ताईत घेऊन जा आणि मी सांगतों तो मंत्र म्हण, म्हणजे एक भूत ताबडतोब तुजपाशीं येईल. तें तूं सांगशील तें काम करील. पण सांभाळ हो, भुतें मोठीं भयंकर असतात. त्यांस एकसारखें कामास लावलें पाहिजे. जर एक क्षणभर तूं त्यास रिकामें ठेवलेंस तर तें ताबडतोब तुला खाऊन टाकील." तो मनुष्य म्हणाला, "अंः, त्यांत काय मोठें कठीण आहे? त्याच्या जन्माला पुरून उरेल इतकें काम मी त्याला देईन." असें म्हणून व सत्पुरुषानें दिलेला ताईत घेऊन तो एका अरण्यांत गेला आणि मंत्र म्हणूं लागला. बराच वेळ मंत्राचा जप झाल्यानंतर एक मोठें धिप्पाड भूत त्याच्याजवळ येऊन म्हणालें, "अरे, मी तुझा सेवक झालों आहें. तूं सांगशील तें काम मी करीन; पण जर क्षणभर मी रिकामा राहिलों तर ताबडतोब तुला खाऊन टाकीन." मनुष्य म्हणाला, "बरें तर, माझ्यासाठीं एक प्रचंड राजवाडा बांध." तो इतकें म्हणत आहे तोंच भुतानें उत्तर दिलें, "राजवाडा बांधून तयार झाला. आतां आणखी काम सांग." मनुष्य म्हणाला, "पुष्कळसें द्रव्य घेऊन ये." भुतानें उत्तर दिलें, "राजवाड्यांत द्रव्यकोश आणून ठेवला. आतां आणखी काम सांग." त्या बिचाऱ्या गरीब मनुष्याची छाती धडधडूं लागली. जें सांगावें तें काम झालेंच आहे, असें हें भूत म्हणतें तर आतां त्यास काय

काम सांगावें ? असा विचार करतां करतां तो मनुष्य एकदम पळत सुटला व सत्पुरुषाजवळ येऊन त्याला त्यानें सर्व हकीगत सांगितली. त्याची हकीकत संपते न संपते तोंच पाठोपाठ तें भूतही यऊन हजर झालें आणि त्या मनुष्याला म्हणालें, " आतां काम सांग; नाहीं तर तुला खाऊन टाकतों. " त्यानें त्या मनुष्यास खाऊन टाकलें असतें; परंतु सत्पुरुष इतक्यांत म्हणाला, " अरे मनुष्या, त्या कुत्र्याचें शेपूट कापून आण आणि ह्या भुताला तें सरळ करावयास सांग. " सत्पुरुषाच्या सांगण्याप्रमाणें त्या मनुष्यानें कुत्र्याचें शेपूट कापून आणलें आणि तें भुताजवळ देऊन म्हटलें, " हें मला सरळ करून दे. " भुतानें मोठ्या कुशलतेनें तें जमिनीवर ठेवून सरळ केलें. परंतु त्याजवरील बोटें काढतांच तें पुन्हा वाकडें झालें. भुतानें ह्याप्रमाणें बराच वेळ खटपट करून पाहिली, परंतु तें शेपूट सरळ होईना. तेव्हां त्रासून तें म्हणालें, " खरोखर, साऱ्या जन्मांत मला कोणतेंही काम इतकें अवघड वाटलें नाहीं. अरे मनुष्या, जर तूं आतां ह्या कामांतून मला मुक्त करशील तर तुला दिलेली दौलत बक्षीस देईन आणि पुन्हा कधींही तुला त्रास देणार नाहीं. " तो मनुष्य आनंदानें म्हणाला, " बरें, तुझी अट मला मान्य आहे. "

हें जग कुत्र्याच्या शेपटासारखें सदोदित वाकडें आहे आणि हजारों वर्षें त्यास सरळ करण्याचा उद्योग अनेकजण करीत आले आहेत, पण त्याच्यावरचा दाब ढिला पडल्याबरोबर तें पुन्हा लगेच वाकड होतें. हें असेंच चालावयाचें आहे. ह्यासाठीं जग सरळ करण्याच्या खटपटीस लागूं नका. ह्या इच्छेनें प्रेरित होऊन तुम्ही कोणतेंही काम करूं लागलां, तर जग सरळ होत नाहींच पण तुम्ही मात्र वेडे होतां – आततायी होतां. जर हें आततायित्व जगांत उत्पन्न झालें नसतें, तर जगाची प्रगति सध्याहून अधिक झपाट्यानें झाली असती. हट्टानें आणि आततायीपणानें कोणतीही सुधारणा जगावर लादण्याचा प्रयत्न करणें मूर्खपणाचें आहे. ह्यामुळें क्रोधादि शत्रूंची वाढ मात्र झपाट्यानें होऊन मारामाऱ्या आणि रक्तपात होतात. तुमच्या

हट्टामुळें तुम्हांबद्दल असलेली सहानुभूति मात्र लोकांच्या मनांतून नाहींशी होते. आपण जें कांहीं करतों तें उत्तम; आपणाजवळ जें कांहीं आहे त्याला जगांत कोठें तोड नाहीं; तसेंच इतरांचें जें कांहीं म्हणणें असेल तें सर्व चुकीचें, असें वाटणें हा मानवी स्वभावच आहे. ह्यासाठीं जगावर सुधारणा लादण्याची इच्छा तुम्हांस होईल तेव्हां कुत्र्याच्या शेपटाच्या गोष्टीचें स्मरण करा. जगाच्या नादीं लागून आपलें डोकें फिरवून घेऊन आपल्या विश्रांतीचा भंग करावा ह्यांत काय शहाणपण आहे बरें ? तुम्ही जन्मभर निजून राहिलांत व जगाकडे ढुंकूनही पाहिलेंत नाहीं, तरी जग जसें चालावयाचें तसेंच चालणार. ह्यासाठीं आपलें सुखदुःख जगाच्या बऱ्यावाइटावर न ठेवतां व आततायीपणा न करतां अलिप्त मनानें कर्म करीत राहाणें इतकेंच आपलें कर्तव्य आहे. यत्किंचितही हटवादीपणा अंगीं आहे, तोंपर्यंत खरें चांगलें कार्य आपल्या हातून कधींही होणें नाहीं. ज्याच्या चित्तांतून अहंकार नष्ट झाला आहे, निस्सीम शांतता ज्याच्या हृदयांत वास करीत आहे, खरें प्रेम आणि सहानुभूति ज्याच्या हृदयांत उत्पन्न झाली आहे, तोच पुरुष सत्कर्म करून इतरांच्या उपयोगी पडतो आणि स्वतःचेंही कल्याण करून घेतो. आततायी मनुष्याला सहानुभूति म्हणजे काय ह्याची ओळखही नसते. जगाचीं दुःखें हलकीं करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं कधींही येत नाहीं. अथवा तो स्वतःचेंही कल्याण करून घेत नाहीं.

ह्यासाठीं थोडक्यांत तुम्हांस इतकेंच सांगावयाचें कीं जग आपलें ऋणी नसून आपण जगाचे ऋणी आहों, ही गोष्ट प्रथम लक्षांत बाळगली पाहिजे. परोपकार करणें म्हणजे पर्यायानें स्वतःच्या कल्याणाचाच प्रयत्न करणें होय. हा दुसरा मुद्दा ध्यानांत धरण्यासारखा आहे. तसेंच जग तुमच्या आमच्या मदतीसाठीं अडून राहिलें नसून त्याचा नेता व शास्ता परमेश्वर आहे, ह्याचा विसर पडूं देऊं नये. त्याची तेथें नित्य वस्ती असून त्याच्या उद्योगास कधींही खळ पडत नाहीं. तो यच्चयावत् प्राणिमात्राची काळजी वाहून त्याच्या बऱ्याचा मार्ग त्याला दाखवितो. सर्व विश्व झोपीं

गेलें तरी तो जागृत असतो. जगांत जें जें कांहीं दृष्टीस पडतें तें तें त्याच्यामुळेंच होय, ह्या गोष्टी नित्य लक्षांत बाळगल्या पाहिजेत. आणखी असें कीं जग जसें आजवर चालत आलें आहे तसेंच अनंत काळपर्यंत राहाणार. ह्यासाठीं कोणावर रागावण्यांत अथवा कोणाचा द्वेष करण्यांत फायदा नाहीं. गरीबदुबळ्यांस शक्य तितकी मदत करणें आणि दुष्टावरही प्रेम करणें इतकेंच आपलें कर्तव्य आहे. जग हें मोठ्या तालीमखान्यासारखें आहे. कसरतीनें जसें शरीर धष्टपुष्ट होतें, तसें ह्या तालीमखान्यांत कसरत करून मन धष्टपुष्ट होतें. तसेंच कोणत्याही कार्यांत हट्ट आणि माथेफिरूपणा करूं नये. कारण त्यामुळें नफा कांहींच न होतां नुकसान मात्र हटकून होतें. धर्माभिमानाचा आव घालणारे कांहींजण असें म्हणतात कीं “ आम्ही पाप्यांचे द्वेष्टे नसून पापाचे द्वेष्टे आहों.” असे धर्माभिमानी अथवा धर्मवेडे तुमच्याही पाहाण्यांत आले असतील. पापी मनुष्य आणि त्यानें केलेलें पाप हीं स्वतंत्रपणें पाहाण्याइतकी ज्याची दृष्टि दिव्य झाली आहे, त्याच्या दर्शनासाठीं जगाच्या दुसऱ्या टोकापर्यंत मी चालत जाईन. पाप आणि पापी मनुष्य हीं भिन्न आहेत असें तोंडानें बडबडणें फार सोपें आहे ; परंतु अंतःकरणांत तसा अनुभव येऊन त्याप्रमाणें कृति घडणें दुष्कर आहे. तसेंच आपलें चित्त सदोदित शांत ठेवलें तर प्रेमाचा उदय आपल्या हृदयांत लवकर होऊन निष्काम कर्म आपल्या हातून होऊं लागेल.

* * * * * * * * * * * * * *

# प्रकरण सहावें

# अनासक्ति हाच अहंकारनाश

* * * * * * * * * * * * * *

ज्याप्रमाणें आपल्या कृतीचे परिणाम फलरूपानें आपणांकडे येतात, त्याचप्रमाणें आपल्या कृतीचे परिणाम परक्यावर व परक्याच्या कृतीचे परिणाम आपणांवर घडत असतात. कोणत्याही मनुष्यानें कांहीं वाईट कर्म केलें तर त्याच्या प्रतिफलानें त्याची बुद्धि भ्रष्ट होऊन दिवसेंदिवस तो अधिकच वाईट होत जातो; तसेंच शुभकर्मानें बुद्धि शुद्ध झालेल्या मनुष्याची प्रवृत्ति दिवसें-दिवस अधिक चांगल्या कर्माकडे आपोआप वळते. हा अनुभव आपल्यापैकीं बहुतेकांस आलाच असेल. आपण जीं कर्में करतों त्यांचे परिणाम परस्परांवर घडत नसते तर वर दाखविलेली बुद्धीची वाढ अधिक चांगल्या अगर अधिक वाईट दिशेनें झाली नसती. जडपदार्थासंबंधीं केलेल्या अवलोकना-वरूनही वरील प्रमेयाची सिद्धि होते. एखाद्या खोलींत एका जातीचीं दोन तीन तंतुवाद्यें असलीं आणि आपण त्यांपैकीं एखादें वाद्य वाजवून कांहीं विशिष्ट स्वर उत्पन्न केला तर त्या स्वरानें हवेवर जे तरंग उत्पन्न होतात ते बाकीच्या वाद्यांवर आदळून त्यांतून सजातीय स्वरांची उत्पत्ति करितात, ही गोष्ट पदार्थविज्ञानशास्त्रानें सिद्ध केली आहे. तसेंच माझ्या मनांत कांहीं विचारतरंग उठले तर त्यांचा परिणाम सजातीय मनांवर होऊन तेथेंही तत्सदृश विचारांची उत्पत्ति होते. प्रत्यक्ष आघातानें वाद्यांतून निघणारा स्वर जितका स्पष्ट असतो तितका तरंगांच्या आघातानें स्पष्ट न निघतां सूक्ष्म निघतो. पहिल्या वाद्यापासून दुसरें वाद्य बऱ्याच अंतरावर असेल तर हा ध्वनि अत्यंत सूक्ष्म होईल हें उघडच आहे. तसेंच माझ्या विचारतरंगांनीं

दुसऱ्यांच्या मनावर उमटणारे तरंग कमी अथवा अधिक स्पष्ट उमटणें हें अंतरावर व इतर परिस्थितीवर अवलंबून राहील, हेंही उघड आहे. ह्यावरून आपल्या मनावर बाह्य तरंगांचा परिणाम कधीं सूक्ष्म, तर कधीं व्यक्त, परंतु निश्चितपणें होत असतो, एवढी गोष्ट सिद्ध होते. माझ्या मनांत एखादें वाईट कर्म करण्याचा विचार उद्भवला तर ह्या विश्वांत जीं मनें माझ्याशीं सदृश अशा स्थितींत असतील त्यांजवर त्या विचारतरंगांचा परिणाम घडणें शक्य आहे. त्याचप्रमाणें कांहीं शुभ कर्म आचरावें अशी इच्छा मनांत उद्भवली तर तीमुळें दुसऱ्या प्रकारचे तरंग उद्भवतात व सदृश स्थितींतील मनांवर आघात करतात. हा तरंगाघात किती सूक्ष्म अथवा किती जोराचा होईल, हें पहिल्या मनाच्या शक्तीवर अवलंबून आहे. दुर्बळ मनापासून निघणारे तरंग दुर्बळच असणार व त्यांच्या आघातानें होणारा परिणामही अत्यंत सूक्ष्म होईल हें उघड आहे. तसेंच स्वतःच्या चैतन्यशक्तीची पूर्ण ओळख होऊन जें मन अत्यंत शक्तिमान् झालें असेल त्यांतून उद्भूत होणारे तरंग अति सामर्थ्यवान् असलेच पाहिजेत.

ज्याप्रमाणें ध्वनीचे तरंग एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात, त्याचप्रमाणें प्रकाशकिरणही एकापासून दुसऱ्या स्थळीं जातात. कमी अधिक अंतराच्या मानानें प्रकाशकिरण पोचावयास कमी अथवा अधिक वेळ लागतो. कित्येक ताऱ्यांचा प्रकाश पृथ्वीवर पोचण्यास कित्येक लक्ष वर्षें लागतात. ज्यांचा प्रकाश आपल्या पृथ्वीवर अद्यापि पोचला नाहीं व त्यामुळें जे अद्यापि आपल्या दृष्टिपथांत आले नाहींत, असे तारे विश्वांत आहेत असें ज्योतिषशास्त्राचें मत आहे. त्याचप्रमाणें एका मनावर उठणारे विचारतरंग सदृश स्थितींतील मन सापडून त्यावर प्रतितरंग उमटवीपर्यंत कदाचित् कित्येक लक्ष वर्षेंही उलटून जाण्याचा संभव आहे. ह्यावरून आपल्याभोंवतीं असलेलें वातावरण चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या विचारतरंगांनीं भरून गेलेलें असण्याचा संभव आहे. प्रत्येक मेंदूंतून निघणारा तरंग ह्याप्रमाणें हिंडत असतो आणि योग्य ठिकाण सापडतांच तेथें

शिरून बसतो. जें मन स्वतःच्या विचारतरंगांनीं विशिष्ट स्थितीस प्राप्त झालेलें असतें, तें आपल्याशीं सदृश असणारे बाहेरील विचारतरंग ताबडतोब ग्रहण करतें. ह्याकरितां कोणतीही वाईट गोष्ट करावी असें एखाद्याच्या मनांत आलें म्हणजे त्याचें मन कांहीं विशिष्ट प्रकारच्या स्थितीला प्राप्त झालेलें असतें व त्या स्थितींत त्या वेळीं स्वतःशीं सदृश अशा वातावरणांतील दुष्ट विचारतरंगांचें तें ग्रहण करतें. ह्यामुळें दुष्ट मनुष्य नेहमींच दुष्कृत्यें करतांना आपणांस आढळतो. दुष्कृत्यें करण्याची त्याची मनःप्रवृत्ति दिवसेंदिवस वाढतच जाते. ह्यासाठीं दुष्कृत्यें करण्याचा विचार आपल्या मनांत येतो त्या वेळीं एक दुधारी शस्त्रच आपण तयार करीत असल्यासारखें होतें. एक तर, अशा वेळीं बाहेरील दुष्ट तरंगांस आपल्या मनांत घुसावयास दरवाजा उघडून दिल्यासारखें होतें; आणि दुसरें असें कीं आपल्या मनांतून बाहेर पडणारे दुष्ट तरंग दुसऱ्या कोणास तरी अधिक दुष्ट करण्यास कारणीभूत होण्याचा संभव असतो. हा दुसरा परिणाम होण्यास कदाचित् कित्येक वर्षांचा काळ लोटावा लागेल. पण तसा परिणाम केव्हां ना केव्हां तरी होईल, हें निश्चित आहे. ह्याकरितां आपण जेव्हां एखादें दुष्कृत्य करतों, त्या वेळीं आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकुन केल्यासारखें होतें. तसेंच आपण शुभ कर्म केलें तर तें आपणांस जसें कल्याणप्रद होतें, तसेंच त्याचा इतरांवरही इष्ट परिणाम घडतो. मनुष्यांत ज्या कांहीं शक्ति गुप्तपणें वास करीत आहेत त्या स्वतःशीं सदृश असे तरंग बाहेरून गोळा करतात आणि स्वतः अधिक सामर्थ्यवान् होऊन प्रगट होतात. ' दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ' हा भगवद्गीतेचा सिद्धान्त प्रत्येकानें नीट लक्षांत बाळगावा.

कोणतेंही कर्म एक वेळ कर्त्याच्या हातून घडलें म्हणजे तें फळाला पोचेपर्यंत मध्यंतरीं त्याचा नाश होऊं शकतच नाहीं असा कर्मयोगाचा सिद्धान्त आहे. तें फलद्रूप होण्याच्या आधीं त्याचा नाश करण्यास समर्थ अशी एकही शक्ति विश्वांत जन्मास आली नाहीं. जर मीं कांहीं दुष्कृत्य

केलें तर त्यापासून उत्पन्न होणारें दुष्ट फळ मलाच भक्षण केलें पाहिजे. माझें दुष्कृत्य फलद्रूप होऊं न देणें हें जसें अशक्य आहे, तसेंच तें कटु फळ माझ्या तोंडीं न पडेसें करणें हेंही अशक्यच आहे. तसेंच मीं कांहीं चांगलें कर्म केलें तर त्याचें शुभ फळ प्राप्त न होणें हेंही अशक्य आहे. कारण उत्पन्न झालें कीं त्याचें कार्य हें घडलेंच पाहिजे. ह्यांत कमीअधिक करण्याचें कोणास सामर्थ्य नाहीं. आतां येथें एक अत्यंत सूक्ष्म विचाराचा प्रश्न उद्भवतो. आपण कोणतेंही कर्म केलें तरी त्यांत चांगल्या व वाईट अशा दोन्ही परिणामांची अत्यंत संलग्न अशी स्थिति आढळते. कोणत्याही एका कर्माचे चांगलेच परिणाम होतात व वाईट कांहींच होत नाहींत, असें सांगतां येणें आपणांस अशक्य आहे. ज्याचे चांगले आणि वाईट परिणाम एकाच वेळीं होत नाहींत असें कोणतेंही कर्म करतां येणें शक्य नाहीं. ह्याचें प्रत्यंतर पाहावयास फार लांब जावयास नको. मी ह्या क्षणीं आपणांशीं बोलत आहें, माझें हें कृत्य चांगलें आहे असें तुम्हांपैकीं कांहींना वाटत असेल, पण ह्याच वेळीं माझ्या भाषणाच्या आघातानें हवेंतील हजारों सूक्ष्म जंतु मृत्यु पावत असतील. म्हणजे माझ्या एकाच कर्मापासून चांगला आणि वाईट असे परस्परविरुद्ध परिणाम एकाच वेळीं घडत आहेत. एखाद्या कृत्याचे परिणाम प्रत्यक्ष आपल्या नजरेसमोर होत असले आणि त्यामुळें आपल्या ओळखीच्यांपैकीं कोणाचें बरें होत असलें तर तें कर्म सत्कर्म आहे असें तुम्ही म्हणाल ; पण माझ्या आवाजानें मृत्युमुखीं जाणारे हजारों कीटक काय म्हणत असतील बरें ! तुम्ही आपणा स्वतःस पाहात आहां आणि माझ्या भाषणानें तुमच्या चित्तावर काय परिणाम होतो ह्याचा स्वतः अनुभव घेत आहां; परंतु सूक्ष्म कीटक तुम्हांस दिसत नाहींत आणि त्यांजवर होणारा परिणामही तुमच्या दृष्टिपथाबाहेरचा आहे. ह्यामुळें माझ्या कृतीचा एकच परिणाम पाहून तुम्ही त्याला सत्कर्म असें नांव देतां. अशाच रीतीनें एखाद्या दुष्कृत्याचें सूक्ष्म अवलोकन केलें तर त्यांतूनही कदाचित् एखादा चांगला परिणाम कोठें तरी घडत असल्याचें आढळून येईल. स्थूल

दृष्टीनें चांगल्या दिसणाऱ्या कर्मांचे वाईट परिणाम पाहाण्याइतकी सूक्ष्म दृष्टि ज्याला आहे आणि कर्मांतूनही उद्भवणारे चांगले परिणाम जो पाहूं शकतो, त्यानेंच कर्मयोगाचें रहस्य खरोखर जाणलें असें समजावें. 'कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः । स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥' अशी बुद्धिमानाची व्याख्या गीतेंत सांगितली आहे. असो.

ह्यावरून एवढेंच लक्षांत ठेवावयाचें कीं परक्यांच्या सुखदुःखानुरोधें आपल्या कर्मांचा विचार केला तर केवळ सुखोत्पादक अथवा केवळ दुःखोत्पादक असें कोणतेंही कर्म आपणांस करतां येणें शक्य नाहीं. दुसऱ्या कोणा तरी जीवास दुःख दिल्याशिवाय आपणास जगणें अथवा श्वासोच्छ्वास करणेंही शक्य नाहीं. अन्नाचा एक घास आपण भक्षण करणें म्हणजे तेवढें अन्न दुसऱ्या कोणाच्या तरी तोंडून बाहेर काढण्यासारखेंच आहे. आम्ही स्वतः जगणें म्हणजे पृथ्वीची जागा अडवून दुसऱ्या कोणास तरी जगण्याचा अवसर न देणें असेंच होतें. आपल्यामुळें ज्यांस दुःख होतें ते मनुष्य असोत, पशुपक्षी असोत, अथवा अत्यंत सूक्ष्म जंतु असोत ; पण आपल्या जगण्यामुळें त्यांस उपसर्ग पोचतो व प्रसंगीं त्यांचा प्राणनाशही होतो ही गोष्ट खरी. ह्यावरून सिद्धान्त असा निघतो कीं केवळ कर्म करून पूर्णत्वास पोचणें आपणांस शक्य नाहीं. विश्वाच्या अंतापर्यंत आपण कर्मच करीत राहिलों तर ह्या चक्रव्यूहांतून सुटण्यास आपणांस मार्ग नाहीं. कोणतेंही आणि कितीही कर्म केलें तरी त्यांतून सुख आणि दुःख म्हणजे अनुक्रमें पुण्य आणि पाप ह्यांची उत्पत्ति टाळतां येण्यास मार्ग नाहीं.

आतां ह्यापुढें दुसरा प्रश्न असा उद्भवतो कीं आपल्या ह्या साऱ्या कर्मांचें पर्यवसान तरी कोठें होणार ? युगानुयुगें एकसारखें कर्म करून आम्ही साधणार तरी काय ? कित्येक असें म्हणतात कीं पुढें केव्हां तरी हें जग पूर्णत्वास पोचणार आहे. म्हणजे ह्या जगांत दुःख, दुष्टपणा, रोग, मृत्यु, इत्यादिकांचें जें पूर्ण साम्राज्य आपणांस दिसत आहे तें नाहींसें होऊन सर्व

सृष्टि सुखानें नांदत असण्याचा काळ पुढें येईल, असें उत्तर देणारे शेकडों लोक तुम्हांस प्रत्येक देशांत आढळतील. ही कल्पना मोठी सुखकर आहे खरी; अज्ञजनांस चांगल्या कर्मांस उत्तेजित करण्यास आणि दुःखप्रसंगीं आधार म्हणून ह्या कल्पनेचा उपयोग करतां येईल हेंही खरें; परंतु ती केव्हां तरी सत्यत्वास येणें शक्य आहे काय, एवढाच काय तो विचाराचा प्रश्न आहे. क्षणभर विचार केला तर जग अशा स्थितीस येईल ही कल्पना निव्वळ अशक्य कोटीपैकीं आहे, असें आपणांस आढळून येईल. अगदीं वरवर विचार करणारासही ह्या कल्पनेची अशक्यता दिसून येण्याजोगी आहे. एका धातूच्या तुकड्यावर दोन बाजूंस दोन शिक्के मारले म्हणजे त्यास नाणें अशी संज्ञा प्राप्त होते. हे शिक्के निघून गेले म्हणजे त्याबरोबर त्या तुकड्यांचें नाणेंपणही नष्ट झालें नाहीं काय? तसेंच जगाची उत्पत्ति आणि स्थिति ही जर सुख आणि दुःख ह्या द्वंद्वाच्या अस्तित्वावरच अवलंबून आहेत तर ह्यांपैकीं कोणतेंही एक नष्ट झालें कीं जगाचेंही अस्तित्व संपलेंच. सुख आणि दुःख ह्या दोन्ही कल्पना सापेक्ष आहेत. ह्यांपैकीं कोणत्याही एकीमुळेंच दुसरीचा अनुभव होतो. ह्यांतील कोणतीही एक नष्ट झाली तर दुसरीचें अस्तित्व संपुष्टांत आलेंच म्हणून समजावें. केवळ सुखोत्पादक असें एकही कर्म करतां येणें शक्यच नाहीं, हें नुकतेंच आपण पाहिलें. तर मग पूर्णत्व ह्या शब्दाचा अर्थ काय? पूर्ण जीविताची कल्पना म्हणजे वंध्यासुताची कहाणी आहे. आपलें सर्व जीवित केवळ चढाओढीवर अवलंबून आहे. सुखाची इच्छा उद्भवली कीं तदनुरूप आपण कर्म करूं लागतों. आपण कर्म करूं लागलों म्हणजे कोणा ना कोणास तरी तें दुःखप्रद होणारच. मग सर्व जग सुखी होईल ही कल्पना म्हणजे वंध्यासुताची कहाणी नव्हे तर काय? प्रत्येक क्षणीं आपल्या सुखासाठीं आपण कोणा ना कोणाबरोबर तरी लढत असतोंच. आपला जय झाला तर आपल्या कल्पनेप्रमाणें कांहीं सुखप्राप्ति झाल्यासारखें होतें. पराभव झाला तर एक तर जीवित नष्ट होणार अथवा पुन्हा दुसऱ्या लढाईस सुरुवात होणार! आपल्या जीवितास अत्यंत आवश्यक असें अन्न

आणि हवा हींसुद्धा लढाई केल्यावांचून आपणांस प्राप्त होत नाहींत. ह्यांपैकीं कोणतेंही एक आपणांस प्राप्त झालें नाहीं तर आपलें जीवत चालू राहाणें शक्य नाहीं; कारण आपलें जीवित हें कोणत्याही एकाच वस्तूमुळें झालेलें नसून अनेक वस्तूंच्या समीकरणाचा तो परिणाम आहे. हा देहांतर्गत वस्तुसमुच्चय एकीकडे आणि बाह्य जग दुसरीकडे असून ह्यांजमधील युद्धास जीवित अशी संज्ञा आहे. ह्या युद्धाचा शेवट आणि जीविताचा शेवट हीं दोन्ही बरोबरच घडतात. ह्यावरून सुखमय अथवा पूर्ण जगाची कल्पना म्हणजे केवळ मृगजलाभास आहे.

तर मग चिरंतन सुखमय स्थिति शक्यच नाहीं असें तुमचें म्हणणें आहे काय? नाहीं, असें आमचें म्हणणें नाहीं. ज्या वेळीं सुख आणि दुःख, पाप आणि पुण्य, इत्यादि द्वंद्वें पूर्णपणें नाहींशीं होतील, त्या वेळीं सुखमय स्थिति तुम्हांस प्राप्त होईल. पण अशी स्थिति प्राप्त होण्याबरोबर चालू जीवनक्रमाचा मात्र अंत होईल. चालू जीवनक्रमाचा अंत झाल्याशिवाय, द्वंद्वें बंद झाल्याशिवाय, सुखमय स्थितीची प्राप्ति नाहीं, अशी ही परंपरा आहे. आपण परोपकारार्थ म्हणून जीं कर्में करतों तीं वस्तुतः स्वतःसच उपकारक होतात, हें आपण पूर्वीं सिद्ध केलेंच आहे. जीं जीं कर्में आपण परोपकारार्थ म्हणून करतों त्या सर्वांचा संकलित परिणाम म्हटला तर आत्मशुद्धि हा होय. परोपकाराची इच्छा जों जों बळावत जाते तों तों आपला अहंकार मावळत जातो. परहिताचें चिंतन आपण करूं लागलों म्हणजे स्वसुखलालसा आपोआपच कमी होऊं लागते. स्वसुखलालसा कमी होऊं लागली, म्हणजे आपणांस अत्यंत चिकटून राहिलेल्या देहाध्यासाची मिठी सुटूं लागते. आपणांस आपल्या जीवनक्रमांत अत्यंत महत्त्वाची अशी जी कांहीं गोष्ट शिकावयाची आहे ती अहंकारविस्मृति ही होय. जगाबरोबर एकसारखें युद्ध करून मी स्वतःस सुखी करीन, असा जो आपला समज आरंभीं असतो तो मूर्खपणाचा आहे असा प्रत्यक्ष अनुभव आपणांस येऊं लागतो. सुख हें बाहेरून कोठून मिळविण्याजोगी चीज नसून ती आपल्यापाशींच आहे व

आपलपोटेपणा - अहंकार - विसरल्यावांचून तिची प्राप्ति होत नाहीं, असें ज्ञान आपणांस होतें. परोपकारार्थ केलेलें प्रत्येक कर्म, सहानुभूतीचा प्रत्येक विचार आणि प्रत्येक सत्कर्म आपणांतील अहंकार कमी करण्यास कारणीभूत होतें. आपणांतील अहंकार जसजसा कमी होत जाईल, तसतसें आपलें स्वतःचें क्षुद्रत्व अधिक ढळढळीतपणें आपणांस दिसूं लागतें. परोपकाराचा हा खरा उपयोग आहे. ज्ञान, भक्ति आणि कर्म ह्यांनीं दाखविलेले निरनिराळे मार्ग एकत्र होण्याचा हाच मध्यबिंदु आहे. अहंकार संपूर्णपणें विरून गेला म्हणजे 'मी'–पण नष्ट होतें व त्याजागीं 'तूं' – पण येतें. सर्व प्रकारचीं द्वंद्वें नष्ट झालीं, दृश्य जग नाहींसें झालें आणि शेवटीं जें कांहीं उरलें तें 'मी' नसून 'तूं' उरलें आहे. जिकडे पाहावें तिकडे 'मी' नसून 'तूं' दिसतें आणि अंतर्यामींही 'मी' नसून 'तूं' उरतें. कर्मयोगाच्या आचाराचें शेवटीं हेंच पर्यवसान व्हावयाचें. कर्मयोगाचा आचार तुम्ही समजून करा अथवा न समजतां करा, पण तुमचें आचरण जर कर्मयोगाच्या तत्त्वांस अनुसरून होत असेल तर त्याचा निश्चित परिणाम हाच व्हावयाचा. अशा रीतीनें निराकार परमरूपाशीं ऐक्य होणें हेंच सर्व योगांचें साध्य आहे. धर्मोपदेश हा ज्यानें पोटाचा धंदा केला आहे, अशा उपदेशकाला निराकार परमेश्वर आणि त्याच्याशीं ऐक्य ही कल्पनाच भयंकर वाटेल. परमेश्वर साकार असून भक्त हा त्यापासून नेहमीं निराळाच राहाणार असें तो म्हणेल. आपण बोलतों त्याचा वास्तविक अर्थही त्याला कळणार नाहीं; पण असें म्हणणें हेंच त्याच्या फायद्याचें आहे. त्याच्या नीतिविषयक कल्पना कितीही उच्च दर्जाच्या असल्या तरी 'मी' पण विसरण्याइतकी त्याची मजल कधींही जाणार नाहीं. वास्तविक विचार केला तर 'मी' पण विसरणें हा सर्व नीतिसिद्धान्तांचा पाया आहे. 'मी'पण संपूर्ण विसरल्याशिवाय खरी भक्ति करणें – खरें प्रेम करणें – हेंही शक्य नाहीं. मग हें प्रेम मनुष्यांविषयीं असो, पशुपक्ष्यांविषयीं असो, देवदूतांविषयीं असो, अथवा आत्म्याविषयीं असो, सर्व नीतिसिद्धान्तांच्या पोटीं हेंच तत्त्व ग्रथित असल्याचें आपणांस आढळेल.

ह्या जगांत आपणांस अनेक प्रकारचे लोक आढळून येतात. कित्येक पूर्ण संन्यासी असतात. आयुष्य संपेपर्यंत केवळ लोकांच्या बऱ्याकरितां हे कर्मे करतात. कोणाचें कल्याण ह्यांच्या प्राणनाशानें होत असलें तर तोही करावयास ते मागें पुढें पाहाणार नाहींत. ह्यांना स्वतःच्या देहाविषयीं यत्किंचितही ममता आढळणार नाहीं. सर्वांत हीं अत्युच्च कोटीचीं मनुष्यें होत. एखाद्या राष्ट्रांत जर अशीं शंभर मनुष्यें निर्माण झालीं तर अशा राष्ट्रास अवनतीची भीति नको. परंतु मनुष्यजातीचें बलवत्तर दुर्दैव म्हणून अशीं मनुष्यें फारच क्वचित् आढळतात. ह्यानंतर दुसऱ्या प्रतीचे लोक म्हटले म्हणजे स्वतःला उपाधि न होतां, लोकांच्या उपयोगीं जितकें पडतां येईल तितकें पडावयाचें अशी इच्छा बाळगणारे हे होत. आणि तिसऱ्या प्रतीचे लोक म्हटले तर केवळ आपल्याच सुखाकरितां जगणारे लोक होत. प्रसंगीं परक्याचा जीव गेला तरी हरकत नाहीं, पण हे स्वतःच्या सुखांत कांहींही कमी पडूं देणार नाहींत. ह्यानंतर आणखी एक चौथा प्रकार एका संस्कृत कवीनें सांगितला आहे व त्या लोकांस त्यानें निनांवी कोटींत ढकललें आहे. म्हणजे त्यांस नांव काय द्यावें ह्याची कल्पना कवीस झाली नाहीं. हे लोक केवळ मौजेखातर इतरांस पीडा करतील. लोकांना त्रास दिला म्हणजे ह्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली ! पृथ्वीस जसे परस्परविरुद्ध असे दोन ध्रुव आहेत तसेच मानवसमाजालाही दोन ध्रुव आहेत. स्वतःच्या जिवाची पर्वा न करतां परक्याचें बरें करावयाचें हा एक ध्रुव आणि स्वतःच्या जिवाची पर्वा न करतां परक्याचें अनिष्ट करावयाचें हा दुसरा ध्रुव. परक्याचें इष्ट करावयाचें हा जसा पहिल्याचा स्वभाव, तसेंच परक्याचें अनिष्ट करावयाचें हा दुसऱ्याचा स्वभाव.

प्रवृत्ति आणि निवृत्ति असे दोन शब्द संस्कृत भाषेंत नेहमीं आढळतात. प्रवृत्ति म्हणजे आंत घेणें आणि निवृत्ति म्हणजे बाहेर टाकणें. आंत घेणें म्हणजे सदोदित ‘ मी ’ आणि ‘ माझें ’ हाच विचार करणें. ज्या ज्या कारणांनीं ‘ मी ’ आणि ‘ माझें ’ ह्या विचारास पुष्टि मिळते तीं तीं सर्व कारणें प्रवृत्तिपर

होत. ह्यांत द्रव्य, सामर्थ्य, कीर्ति, इत्यादिकांचा अंतर्भाव होतो. ह्याचा पगडा चित्तावर बसला म्हणजे जगांतील सर्व संपत्ति, सर्व सत्ता आणि सर्व कीर्ति हीं ह्या एका ' मीं 'त सांठवून राहावीं अशी इच्छा उद्भवते. जगांतील सर्व संपत्ति इत्यादिकांचें केंद्रस्थान ह्या ' मीं 'त येऊन राहातें, ह्यालाच प्रवृत्ति असें म्हणतात. जगांतील सर्वसामान्य मनुष्यांची बुद्धि प्रवृत्तीकडे वळलेली असते; ही बुद्धि मावळूं लागली म्हणजे निवृत्तीचा उदय होऊं लागतो व तिच्या उदयाबरोबर नीति आणि धर्म ह्यांच्या कल्पनांचा उदय होऊं लागतो. प्रवृत्ति आणि निवृत्ति हे दोन्ही कर्माचे परिणाम आहेत. सहेतुक कर्मांचा परिणाम प्रवृत्ति आणि अहेतुक कर्मांचा परिणाम निवृत्ति. जगांतील सर्व धर्मांचा आणि नीतिशास्त्रांचा पाया म्हटला म्हणजे निवृत्ति हाच होय. ' माझें ' आणि ' मी ' हे शब्दही विसरून जाणें आणि परक्याकरितां प्रसंगीं जीव देण्यासही न कचरणें ही निवृत्तीची परिपक्व दशा होय. आपल्या मनाची इतकी तयारी झाली म्हणजे कर्मयोगाच्या शेवटच्या पायरीस आपण पोचलों असें होतें. सर्व चांगल्या कर्मांचें हेंच अत्युच्च फळ आहे. एखाद्यानें कोणत्याही तत्त्वग्रंथाचा अभ्यास केला नसला, परमेश्वरावर त्याचा मुळींच विश्वास नसला, साऱ्या जन्मांत त्यानें प्रार्थनापर असा एकही शब्द उच्चारला नसला, तथापि सत्कर्मानें त्याची बुद्धि पूर्ण निवृत्तिपर झाली असली तर अत्यंत धार्मिक असा मनुष्य भक्तीनें ज्या ठिकाणीं जाईल, अथवा मोठा तत्ववेत्ता ज्ञानानें जें ठिकाण हस्तगत करील तें ठिकाण ह्या कर्मयोग्यासही प्राप्त होईल. ह्यावरून ज्ञानी, कर्मयोगी आणि भक्त हे सर्व शेवटीं एकाच ठिकाणीं मिळतात, असें तुमच्या लक्षांत येईल. जेथ ' मी ' आणि ' माझें ' ह्या शब्दांचीही विस्मृति होते तेंच तें ठिकाण. ह्यालाच संन्यस्तवृत्ति असेंही म्हणतात. कोणत्याही धर्माचा, पंथाचा अथवा तत्त्वविचाराचा कोणी मनुष्य असला तरी खऱ्या संन्यस्तवृत्तीच्या मनुष्याबद्दल त्याच्या मनांत अत्यंत आदरबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहाणार नाहीं. परक्याकरितां आपलें सर्वस्व व प्रसंगीं जीवही दान करण्याची ज्याची खरी

तयारी आहे अशा मनुष्याबद्दल कोणाच्याही मनांत अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न झालीच पाहिजे. ह्या ठिकाणीं पंथाचा, मताचा अथवा धर्माचा प्रश्नच उद्भवत नाहीं. अगदीं विरुद्ध मतांच्या धर्माचा अथवा पंथाचा कोणी असला तरी अशा मनुष्याबद्दल त्याला नकळतही त्याच्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न होते. एडविन् आर्नोल्ड ह्यांनीं 'आशियाखंडाचा दीप' (Light of Asia) ह्या नांवानें बुद्धाचें एक चरित्र लिहिलें आहे; तें वाचून एखाद्या आग्रही खिस्त्याच्या मनांतही बुद्धाबद्दल पूज्यभाव उत्पन्न झाल्याचें तुम्हीं पुष्कळ वेळां पाहिलें असेल. बुद्ध निरीश्वरवादी होता. त्यानें भक्तिमार्गाचा कधींही उपदेश केला नाहीं. त्यानें विशिष्ट असा तत्त्वमार्गही शोधून काढला नाहीं. त्यानें केवळ संन्यस्तवृत्तीचा उपदेश केला. परक्यासाठीं आपलें सर्वस्व व प्रसंगीं आपला जीवही अर्पण करा, एवढाच त्याचा उपदेश आहे. सर्व धर्मांचें, सर्व पंथांचें, सर्व मतांचें आणि सर्व तत्त्वदर्शनांचें अंतिम साध्य एकच आहे, ही गोष्ट आग्रही मनुष्याच्या लक्षांत आलेली नसते, म्हणूनच तो एका विशिष्ट मताचा अथवा धर्माचा आग्रह धरून बसतो. भक्तिमार्गाची अगदीं शेवटली पायरी म्हटली म्हणजे सर्वत्र परमेश्वराचेंच अधिष्ठान पाहाणें ही होय. खऱ्या भक्ताच्या मनांत 'मी' आणि 'माझें' ह्या शब्दांची आठवणही शिल्लक उरत नाहीं. कसल्याही स्थितींत 'परमेश्वरा, तुझी मर्जी' असेंच तो म्हणतो. जगांत 'माझें' कांहीं नाहीं. जें कांहीं आहे तें 'तुझें' आहे, हा निश्चय त्याच्या अंतःकरणांत पूर्ण बाणून गेलेला असतो. ही पूर्ण संन्यस्त-वृत्ति नव्हे तर काय? ज्ञानाची शेवटची पायरीसुद्धा ही संन्यस्तवृत्तिच होय. जग हें काय आहें, मी कोण आणि विश्वचैतन्याचें स्वरूप काय आहे, इत्यादिकांचा शोध करतां करतां सर्व जग केवळ मृगजलाभास आहे; दिसतें तसें तें नाहीं; तें प्रत्येक क्षणीं बदलत आहे ह्यामुळें तें अनिश्चित स्वरूपाचें आहे — मायानिर्मित आहे — असा त्याचा पक्का निश्चय होतो. जग अनित्य स्वरूपाचें आहे असा निश्चय एक वेळ बाणून गेल्यावर त्यांतील कोणत्या पदार्थांची त्यानें इच्छा करावी? अशा रीतीनेंच तो पूर्णत्यागी —

पूर्ण संन्यस्तवृत्तीचा – बनतो. त्यावरून कर्म, भक्ति आणि ज्ञान ह्यांचें अंतिम साध्य – अंतिम पर्यवसान – एकच आहे, असें सिद्ध होतें. जगांत जे मोठे धर्मप्रवर्तक होऊन गेले, त्यांनीं निरनिराळया मार्गांनीं ह्या एकाच तत्त्वाचा उपदेश केला आहे. 'परमेश्वर जगांत नाहीं' असें जें त्यांनीं सांगितलें, त्याचा वास्तविक अर्थ जगांतील वस्तूंच्या मागें लागून परमेश्वराची प्राप्ति होणार नाहीं, हाच आहे. जगाचें जें स्वरूप आहे ह्याहून परमेश्वराचें स्वरूप अगदीं भिन्न आहे असें त्यांनीं सांगितलें. 'मी' आणि 'माझें' ही बहुधा सर्वत्र आढळून येणारी प्रवृत्ति हें जगाचें स्वरूप आहे आणि ह्या स्वरूपा-पासून निवृत्त होणें म्हणजे परमेश्वररूप होण्यासारखें आहे. प्रवृत्ति हें जगाचें स्वरूप आणि निवृत्ति हें परमेश्वराचें स्वरूप आहे. एखादा मनुष्य रत्नजडित सुवर्णाच्या राजवाड्यांत राहात असून आणि सर्व प्रकारचे भोग भोगीत असूनही जर त्याच्या मनांतून 'मी' आणि 'माझें' ह्याची आठवण गेली तर त्यालाही पूर्ण संन्यासी म्हणतां येईल. तसेंच पर्णकुटींत राहाणारा आणि अंगावर फाटक्या लंगोटीवांचून दुसरें वस्त्र नसणारा असा कोणी असून जर जगांतील वस्तूंचा हव्यास त्याच्या मनांतून गेला नसेल, तर तो संन्यासी नसून पूर्ण संसारीच म्हटला पाहिजे.

आपण कोणतेंही कर्म केलें तरी त्यांतून चांगला आणि वाईट असे दोन्ही परिणाम घडून येतात. केवळ चांगलें अथवा केवळ वाईट असें एकही कर्म आपणांस करतां येत नाहीं, ह्याचा विचार आपण पूर्वीं केलाच आहे. तर मग आम्हीं कर्म तरी कसें करावें हा प्रश्न साहजिक उद्भवतो. ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या भानगडींत पडून जगांतील कित्येक पंथांचे प्रवर्तक बेसुमार वाहावले आहेत. कोणाला तरी दुःख दिल्यावांचून स्वतःसच सुखाची प्राप्ति करून घेतां येत नाहीं, असें पाहून स्वतःच्या गरजा कमी करतां करतां शेवटीं मरून जावयाचें अशी तोड त्यांनीं काढली. जणूं काय आपण मरून जाणें हीच जन्माची इतिकर्तव्यता आहे! आपण जगावयाचें म्हटलें तर प्रत्यक्ष अथवा परंपरेनें कोणा तरी प्राण्याची हत्या आपणांस करावी लागणारच, त्या अर्थी दे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
२३८५५ दि: १/०६

नाहींसा करावा म्हणजे सर्व पापांचें मूळच नाहींसें होईल असा त्यांचा समज असावा, असें वाटतें. जैन धर्माचें हेंच साध्य म्हणून सांगितलें आहे. वरवर विचार करणारास ही विचारपद्धति सुसंगतशी दिसते; परंतु कर्म म्हणजे काय, कोणत्या कर्माचे काय परिणाम होतात आणि ते कोणावर होतात, ह्याचा विचार केला म्हणजे वरील विचारपद्धतीचा पोरकटपणा तेव्हांच उघड दिसून येतो. ह्याचा उलगडा भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत केला आहे, तो असा : जें जें कर्म तुम्हीं स्वतःच्या इंद्रियसुखलालसेनें कराल तें तें तुम्हांस बद्धक होईल. 'मी'पणा टाकून व कर्ता करविता निराळाच आहे असें पक्केपणीं समजून जें कर्म तुम्ही कराल त्याचें बरें अथवा वाईट फळ तुम्हांस भोगावें लागणार नाहीं. कोणतेंही कर्म करतांना हेतु प्रथम शोधावा. स्वतःच्या सुखेच्छेच्या प्रेरणेनें आपण कर्मास प्रवृत्त होत असलों तर त्याचे परिणाम आपणास भोगलेच पाहिजेत; आणि तसें नसेल तर ते आपणांस भोगण्याचें कारण नाहीं. कर्मयोगदृष्ट्या नुसती कृति गौण असून हेतु प्रधान आहे. स्वसुखेच्छेची प्रेरणा नसतां जर तुम्ही सर्व विश्वाचा वध केलात अथवा स्वतः मारले गेलांत तरी त्या कृत्याचें कोणतेंच बरें अथवा वाईट फळ तुम्हांस भोगण्याचें कारण नाहीं. अशा वेळीं ह्या बऱ्यावाईट कर्माचें कर्तृत्वच तुमच्याकडे नसतें, असा भगवान् श्रीकृष्णांच्या सांगण्याचा सारांश आहे. ह्यासाठीं कर्मयोगाचें सांगणें असें आहे कीं, " बाबांनो, संसार सोडून उगीच रानांत जाऊन राहूं नका; जगांत राहून संसार करतां करतां जगाचे जे जे अनुभव येतील ते ते सर्व घ्या. कर्म करणें तें त्यापासून सुख होईल ह्या आशेनें करूं नका. त्यापेक्षां कर्म न केलेलें बरें. इंद्रियांची तृप्ति ही जीविताची इतिकर्तव्यता नव्हे. म्हणून प्रथम 'मी'पण विसरा, म्हणजे 'मी' आणि जग एकच असा अनुभव तुम्हांस येईल. आपल्या इंद्रियांची तृप्ति करण्याकरितां 'जग' निर्माण झालें आहे ही कल्पना जाळून टाका. कांहीं कांहीं लोक आपल्या मुलांबाळांस असें शिकवीत असतात कीं हें सारें विश्व — सूर्य, चंद्र, वगैरे — परमेश्वरानें मनुष्यांच्या सुखासाठीं रचलें आहे. जणूं काय

परमेश्वराला दुसरा चांगला उद्योगच नव्हता! मित्रांनो, आतां ह्यापुढें मुलांबाळांना असल्या मूर्खपणाच्या गोष्टी शिकवूं नका. दुसरे कांहीं लोक असें म्हणणारे आहेत कीं बकरीं वगैरे जनावरें आमच्या खाण्याच्या उपयोगीं पडावीं म्हणूनच परमेश्वरानें निर्मिलीं आहेत! हा सर्व मूर्खपणाचा बाजार आहे. उद्यां एखादा वाघही असेंच म्हणूं लागेल कीं परमेश्वरानें सर्व मनुष्यें माझ्या पोटासाठीं निर्माण केलीं आहेत. तोही उद्यां प्रार्थना करूं लागेल कीं, 'परमेश्वरा, हीं मनुष्यें मजपुढें येऊन उभीं राहात नाहींत तर तीं केवढीं पापी आहेत! तीं तुझा कायदा मोडीत आहेत!' जर जग आमच्यासाठीं निर्माण झालें असेल तर आम्हीही जगासाठीं निर्माण झालों नाहीं काय? सर्व जग माझ्यासाठीं निर्माण झालें आहे ही घातुक कल्पनाच आमच्या साऱ्या अवनतीच्या मुळाशीं आहे. कोट्यवधि मनुष्यें ह्या जगांतून दरवर्षीं नाहींशीं होतात आणि कोट्यवधि जन्मास येतात. जगाचें हें रहाटगाडगें अनंतकाल चालू आहे आणि अनंतकाल चालू राहाणार.

ह्यासाठीं सशास्त्र कर्म करावयाचें म्हटलें तर अगोदर आशेचा त्याग केला पाहिजे. त्यानंतर मी करतों, मी भोगतों, असल्या भावनांचा त्याग केला पाहिजे. ह्या भावनांमुळेंच तुम्ही आणि कर्म हीं इतकीं एकजीव होऊन बसतां कीं युगानुयुगें तुम्ही कर्म करीत राहिलां तरी ही जोडी फुटणें अशक्य होतें. ह्यासाठीं कर्म करीत असतां तुम्हीं केवळ साक्षित्व स्वीकारलें पाहिजे. अलिप्तपणें प्रत्येक कर्म करावयाचें, म्हणजे त्यांतील यशानें हुरळावयाचें नाहीं अथवा अपयशानें म्लान व्हावयाचें नाहीं, अशा बुद्धीनें तुम्ही कर्म करूं लागलां म्हणजे साक्षित्व ह्याचा बरोबर अर्थ तुम्हांस कळूं लागेल. माझे सद्गुरु म्हणत असत कीं, 'आपल्या मुलांबाळांकडे तुम्ही दाईच्या दृष्टीनें पाहा.' दाईजवळ दुसऱ्या कोणाचें मूल असलें तरी ती त्याच्याशीं इतक्या लडिवाळपणानें बोलेल, खेळेल आणि त्याचे लाड करील कीं जणूं काय तें तिचेंच मूल आहे! परंतु वरधन्यानें तिला नोकरींतून कमी केलें कीं त्याच क्षणीं आपलें लुगडें चोळी कांखोटीस मारून ती तडक घराबाहेर

चालती होईल. त्या घराकडे ती परतून बघणार नाहीं. मुलावरचें तिचें प्रेम एका क्षणांत लयास जातें. तुमच्या मुलांस सोडून दुसऱ्याच्या मुलांस घेण्यासाठीं तिचे हात त्याच क्षणीं तयार असतात ! अशाच रीतीनें तुम्हीं ह्या जगांत सदोदित राहिलें पाहिजे. जी कांहीं चीजवस्त तुमच्यापाशीं आहे ती वास्तविक परमेश्वराची. त्यानें ती कांहीं वेळ संरक्षणार्थ तुमच्या स्वाधीन केली आहे, असेंच तुम्हीं सदोदित समजलें पाहिजे. अमूक चीजवस्त 'माझी' असें तुम्ही म्हणूं लागलां कीं त्याच क्षणीं मोह तुम्हांस पछाडतो व दुर्बळ करतो. तुमचें सुखदुःख त्या वस्तूच्या असण्या-नसण्यावर अवलंबून राहूं लागतें आणि मी 'स्वतंत्र' आहें, 'परमेश्वररूप आहें', ही भावना नाहींशी होऊन तुम्ही आपल्या परमेश्वरस्वरूपापासून लांब जातां.

आतां ह्याहूनही परतंत्रतेचें एक अधिक भयंकर स्वरूप आहे. अमूक मनुष्य आपला शत्रु आहे असें निश्चित समजलें म्हणजे त्याबद्दल सावधगिरी बाळगणें थोडें सोपें होतें; पण तोच जर प्रच्छन्न शत्रु असला, मित्रत्वाचें पक्कें सोंग घेऊन आला असला, तर त्याचा कावा आपणांस केव्हां गळफांस लावील ह्याचा नेम नाहीं. तसेंच जे दुर्गुण म्हणून उघडपणें दिसतात त्यांचा संपर्क आपणांस होऊं नये अशी खबरदारी घेणें सोपें आहे; परंतु दुर्गुणांनीं सद्गुणाचें रूप घेतलें म्हणजे त्याचा मोह अनिवार असतो. असें समजा कीं आपण श्रीमंत आहों आणि परोपकार करण्याची बुद्धि आपणांस आहे. अशा वेळीं अनेक गरीब दुबळे आपला आश्रय करतात. गरीब दुबळ्यांस आश्रय देणें ही गोष्ट वस्तुतः पुण्यकारक आहे. पण तीमुळेंच अभिमानाचें वारें हळूहळू आपल्या मनांत शिरूं लागतें, 'मी इतक्यांचा पोशिंदा आहें', 'इतक्या मनुष्यांचें सुखदुःख मजवर अवलंबून आहे' असले क्षुद्र विचार हळूच आपल्या मनांत शिरून बसतात. सामान्य जनतेकडूनही असल्या विचारांस प्रोत्साहनच मिळतें. 'अमूक मनुष्य मोठा उदार, दिलदार आणि परोपकारी आहे' असा प्रवाद आपल्या कानीं

येऊं लागला कीं आपला अहंकार-अभिमान-बळावूं लागतो आणि सद्गुणाचें स्वरूप हळूहळू पालटावयास लागून शेवटीं त्याचें दुर्गुणांत पूर्ण रूपांतर होतें. वास्तविक विचार केला तर सर्व मनुष्यें परमेश्वरस्वरूप असल्यामुळें त्यांना स्वतःच्या सुखासाठीं दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे पाहाण्याचा प्रसंग यावा ही आनंदाची गोष्ट आहे काय? आपणांवर अवलंबून राहाणारांची ही स्थिति खचित आनंददायक नाहीं. असें असतां त्यांच्या दुःखांत आपण आनंद मानणें हें खचित पाप होय. त्यांच्या स्थितीबद्दल आपणांस वास्तविक वाईट वाटलें पाहिजे. दुसरा विचार असा कीं आपण जन्मासही आलों नसतों तर त्यांचें कांहीं अडून राहिलें असतें काय ? आपणांवर कोणाचेंही सुखदुःख अवलंबून नाहीं. जो तो आपापल्या कर्मानुसार सुखदुःख भोगीत असतो, हें तत्त्व आपल्या हृदयांत पूर्णपणें बाणवून ठेवलें पाहिजे. सर्वांचा पोषक, सर्वांचा साहाय्यकर्ता निराळाच आहे. त्याच्याच योजनेप्रमाणें कांहीं मनुष्यांस तो आपणांकडे पाठवितो. त्यांस आपण आपल्या पदरची एक काडीही देत नसून त्यांचेंच त्यांस आपण परत देत असतों. आम्हांसारखे कोट्यवधि कर्ण जन्मासही आले नाहींत तरी जगांतील दुःखांत रतिभरही भर पडावयाची नाहीं. ह्यासाठीं नित्य लक्षांत बाळगण्यासारखी गोष्ट ही कीं परोपकाराचा हा हक्क परमेश्वराकडून तुम्हांस कांहीं काल प्राप्त झाला आहे, ह्याचा सदुपयोग तुम्ही केलात तर दुसरे हक्कही तुम्हांस प्राप्त होणार आहेत; पण दुरुपयोग केलात तर हा हक्क जाऊन दुसरे मिळावयाचे तेही मिळणार नाहींत. ह्यासाठीं ह्या हक्काचा सदुपयोग करून त्यापासून जें कांहीं शिकावयाचें असेल तें शिकून घेऊन आपल्या ईश्वरत्वाकडे एक पायरी अधिक चढणें हें आपलें कर्तव्य आहे. आपणांस ही अनुपम संधि प्राप्त झाली आहे, तिचा आपण योग्य फायदा करून घेतला तर जगांत आपणांस दुःख प्राप्त होण्यास फारसें कारण उरणार नाहीं. तुम्ही अगदीं राज्यावर बसलां असलां आणि शेकडों नोकरांचे धनी असलां, तरी जोंपर्यंत वरील तत्त्व तुम्ही पक्कें लक्षांत बाळगून वागत

असाल, तोंपर्यंत तुम्हांस दुःख होईल असें कांहीं करण्याची कोणासही इच्छा व्हावयाची नाहीं. तुमचे कांहीं मित्र ह्या वर्षी कालवश झाले असतील, त्यांच्यासाठीं जग वाट पाहात बसलें आहे काय ? त्याच्या सतत चालू असणाऱ्या प्रवाहांत कोठें लहानसा तरी बांध पडला आहे काय ? नाहीं. तो अगदीं पूर्वीप्रमाणेंच चालू आहे. ह्यासाठीं जगाकरितां म्हणून आपणांस कांहीं करावयाचें आहे ही भावना टाकून द्या. जगाला मदत करण्यासाठीं आपला जन्म झाला आहे असें वाटणें हा निर्भेळ मूर्खपणा आहे. हा दुरभिमान सद्गुणांचें सोंग घेऊन आलेला आहे हें पुष्कळ वेळां आपल्या लक्षांत येत नाहीं. कर्मापासून जी दुःखप्राप्ति होते तिचें कारण दुरभिमान हेंच आहे. कोणाचेंही कोणावांचून अडत नाहीं, हा सिद्धान्त आपण एक वेळ पक्का हृदयांत बाळगिला म्हणजे अभिमानयुक्त कर्माचें फळ जें दुःख तें आपणांस मिळण्याचें कारण उरत नाहीं. आपण कोणास कांहीं दिलें व त्याजबद्दल कृतज्ञतेच्या एखाद्या शब्दाचीही अपेक्षा केली नाहीं तर अशा मनुष्याच्या कृतघ्नपणाचें आपणांस वाईट वाटण्याचें कारणच उरत नाहीं. जिची आपणांस अपेक्षाच नव्हती अशी वस्तु मिळाली नाहीं तर त्याचें दुःख काय आहे ? ह्यासाठीं कोणास कसल्याही प्रकारची मदत करतांना केवळ कर्तव्यबुद्धि जागृत ठेवावी. त्याला साहाय्य करण्याचें काम परमेश्वरानें आपणांकडे सोपविलें आहे आणि परमेश्वर दाता असून आपण केवळ साधन आहों असा आपल्या बुद्धीचा निश्चय झाला पाहिजे. आपणांकडून दुसऱ्यास जें कांहीं प्राप्त होतें तें वास्तविक त्याच्या कर्माचें फल असतें. आपल्या कर्मामुळें साधनीभूत होणें हें आपल्याकडे येतें. अशी वस्तुस्थिति असतां मी देणारा आणि तो घेणारा असें म्हणून गर्व वाहाण्याचें तुम्हांस यत्किंचित् तरी कारण आहे काय ? आपण परोपकाराची कांहीं गोष्ट केली म्हणजे जगाचें आपण भलें केलें असें आपल्यास वाटतें ; पण भलें म्हणजे काय आणि वाईट म्हणजे तरी काय ? परिस्थितीच्या दोन विशिष्ट स्वरूपांस हीं नांवें आपणच दिलीं

आहेत. आपल्या मनांत एखादी लालसा उत्पन्न झाली असतां ती ज्यायोगें तृप्त होईल तें भलें आणि ह्याच्या उलट स्थिति असणें म्हणजे तें वाईट, अशा आपल्या व्याख्या आहेत. परंतु कसल्याच प्रकारच्या लालसा ज्याला उरल्या नाहींत त्याला कांहीं भलेंही नाहीं आणि कांहीं वाईटही नाहीं. ह्यासाठीं 'मी' आणि 'माझें' ह्या कल्पनाद्वयापासून उद्भवणाऱ्या इच्छेचा त्याग केला, तर भलें आणि वाईट, सुख आणि दुःख ह्या द्वंद्वांचा नाश आपोआपच होईल. इच्छेचा त्याग करावा हें म्हणणें जितकें सोपें आहे त्याहून तसें करणें शतपट अधिक कठीण आहे, ही गोष्ट मलाही कबूल आहे. परंतु असिधाराव्रत तडीस गेलें तर कोणत्या पदाची प्राप्ति होणार आहे, ह्याची थोडी तरी कल्पना ज्याला होईल तो हें व्रत आनंदानें स्वीकारील. हें व्रत जसजसें सिद्ध होऊं लागतें तसतसे आपण अधिक स्वतंत्र होऊं लागतों. वास्तविक आम्हांवर सत्ता चालवून आम्हांस कर्म करण्यास भाग पाडणारी अशी एकही शक्ति ह्या विश्वांत जन्मास आली नाहीं. आमच्या इच्छेविरुद्ध आम्हांवर सत्ता चालविण्यास कोणीही समर्थ नाहीं; परंतु आम्ही पदभ्रष्ट होतों, अहंकार आम्हांस पछाडतो आणि मी कर्ता, मी भोक्ता असें आम्ही म्हणूं लागतों. कर्म आणि आम्ही ह्यांचा अशा रीतीनें एकजीव झाल्यावर, कर्मापासून उद्भवणारीं दुःखें भोगल्यावांचून सुटका आहे काय ? आपल्याच मूर्खपणानें आपण आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला तर त्याबद्दलचें दुःख आपणांस भोगल्यावांचून गत्यंतर नाहीं. ह्यासाठीं 'मी' आणि 'माझें' ही भावना टाकून केवळ साक्षित्वानें तुम्ही कर्में करूं लागलां म्हणजे सध्या जी शक्ति अनिवार्यपणें तुम्हांस कर्में करावयास लावीत आहे तिचा एक एक अवयव तुटून शेवटीं ती गतप्राण होईल. अशा खऱ्या स्वतंत्र मनुष्याचें लक्षण हेंच आहे कीं जगांत घडून येणाऱ्या गोष्टींपासून त्याला हर्ष अथवा विषाद होत नाहीं. कांहीं प्राप्त झाल्याचा जसा त्याला आनंद होत नाहीं, तसेंच सर्वस्व गेल्यास त्याला दुःखही होत नाहीं. सारें जग इकडचें तिकडे झालें तरी त्याच्या स्थितींत अणुमात्र फरक पडत नाहीं.

'दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥' असें त्याचें लक्षण गीतेंत सांगितलें आहे.

हिंदुस्थानांत पूर्वीं व्यास ह्या नांवाचे एक महर्षि होऊन गेले. वेदान्त-सूत्रांचे कर्ते अशी ह्यांची प्रसिद्धि आहे. हे मोठे साधुवृत्तीचे होते. ह्यांच्या पित्यानें पूर्णत्व मिळविण्यासाठीं फार प्रयत्न केले, पण त्यास यश आलें नाहीं. त्याचप्रमाणें व्यासांच्या आजानें व पणजानेंही प्रयत्न केले, पण त्यांसही सिद्धि प्राप्त झाली नाहीं. खुद्द व्यास महर्षींसही चिरंतन सुखाची प्राप्ति झाली नव्हती; परंतु व्यासांचा पुत्र शुक हा मात्र जन्मतःच सिद्ध होता. व्यासांनीं त्याला सर्व अध्यात्मविद्या सांगितली आणि नंतर पूर्णत्वाकरितां त्यांनीं त्याला जनकराजाकडे पाठविलें. जनक हा एका मोठ्या देशाचा अधिपति होता. ह्याला विदेह जनक असें म्हणत असत. विदेह म्हणजे ज्याचा देहाध्यास संपूर्ण नष्ट झाला आहे असा. जनक हा जरी जन्मतः राजा होता आणि जन्मापासून ऐषआरामांत वाढला होता, तरी त्याची देहावरील आसक्ति पूर्ण नाहींशी झाली होती. 'अहं ब्रह्मास्मि' अशी जनकाची सर्वकाळ भावना असे. अशा प्रकारच्या त्या राजाकडे शुकाची रवानगी व्यासांनीं करून दिली. राजा जनक अंतर्ज्ञानी होता. महर्षींचा पुत्र आपणांकडे येत आहे, ही गोष्ट त्याला अगोदरच समजली व त्याची परीक्षा पाहाण्यासाठीं जनकानें कांहीं आगाऊ योजना करून ठेवली. शुक राजद्वारीं आला आणि आपणांस राजास भेटावयाचें आहे असें सांगूं लागला; परंतु देवडीवरील लोकांनीं त्याच्या म्हणण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. तेथेंच एक आसन देऊन त्यावर त्यांनीं त्याला बसविलें. ह्याहून त्यांनीं त्याची अधिक कांहीं वास्तपुस्त केली नाहीं. वास्तविक म्हटलें तर तो महर्षींचा पुत्र होता. महर्षींची कीर्ति सर्व देशांत पसरली होती व त्यांस सर्व लोक पूज्य मानीत होते. खुद्द शुकही मानार्ह समजला जात होता. असें असतांही त्या देवडीवाल्यांनीं त्याच्याशीं आडदांडपणाचें वर्तन केलें. शुकमुनि बिचारा तीन दिवस देवडीवरच बसला होता. नंतर त्याच्या आगमनाची वार्ता राजास देवडी-

वाल्यांनीं कळविली. तेव्हां राजा जनक आपल्या मंत्र्यांसह तेथें आला व महर्षिपुत्राचें त्यानें मोठ्या सन्मानानें स्वागत करून त्यास राजवाड्यांत नेलें. नंतर अंगास सुवासिक उटणीं लावून त्यानें त्यास मंगलस्नान घातलें व त्याची पूजा केली. इतकें सर्व होत असतां राजा त्याच्याकडे बारीक लक्ष लावून पाहात होता. परंतु शुकाच्या मुखावर सुखाची अथवा दुःखाची यत्किंचित् छायाही त्याला दिसून आली नाहीं. दरवाजावर तीन दिवस बसला असतां जी त्याची वृत्ति, तीच आतांही कायम होती. त्याचें पूजन झाल्यावर राजानें त्यास दरबारांत नेलें. तेथें मोठा समारंभ करून करमणुकीचे अनेक प्रकार चालू केले होते. त्यांत कित्येक सुंदर रमणी नाचत होत्या व कित्येक गात होत्या. दुधानें कांठोकांठ भरलेला एक पेला राजानें शुकाच्या हातीं देऊन, त्यास समारंभाच्या जागेंत सात फेऱ्या करावयास सांगितलें. त्याप्रमाणें शुकानें सात फेऱ्या केल्या; परंतु पेल्यांतील दुधाचा एक थेंबही जमिनीवर पडला नाहीं. रतीला लाजविणाऱ्या त्या चारुगात्रींच्या दर्शनानें शुकाची वृत्ति यत्किंचितही चळली नाहीं. शुक राजापाशीं आला. तेव्हां राजा त्याला म्हणाला, "शुकमुने, तुझ्या वडिलांनीं जें तुला सांगितलें आहे तेंच पुन्हा बोलून दाखविण्यापलीकडे मला कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. तूं पूर्णच आहेस. तूं सत्यरूप आहेस. तर आतां आपल्या पित्याकडे परत जा."

अशा रीतीनें ज्यानें अहंकार समूळ नष्ट केला असेल आणि ज्याची देहबुद्धि नाश पावली असेल, त्याजवर जगांतील कोणतीही वस्तु सत्ता चालवूं शकत नाहीं. स्वतःच्या इंद्रियांचा जो धनी झाला त्याला गुलाम करावयास ह्या विश्वांत कोण समर्थ आहे? असा मनुष्य जगांतील अत्यंत पापमय अशा जागेंत राहिला तरी तो पुण्यवानच राहाणार.

जगाबद्दल आपणांस सामान्यतः दोन प्रकारचीं मतें ऐकूं येतात. निराशावादी लोक म्हणतात कीं, 'जग अत्यंत दुष्ट आहे, पापानें भरलें आहे आणि तें कधींही सुधारावयाचें नाहीं.' दुसरे कित्येक आशावादी

असतात ते म्हणतात, 'अहाहा ! हें जग किती सुंदर वस्तूंनीं भरलें आहे ! ह्याची भव्यता आणि सौंदर्य पाहून मन आनंदांत गर्क होतें.' ज्यांना स्वतःच्या वृत्तीवर ताबा चालवितां येत नाहीं, त्यांना हें जग असेंच दुःखमय भासणार; अथवा फार झालें तर, कांहीं थोडें सुखमय आणि बाकी बरेंच दुःखमय असें भासणार. आपण आपल्या वृत्तीचे धनी झालों म्हणजे जगाचें हें एकेरी स्वरूप नष्ट होऊन जग आहे तसेंच उत्तम आहे असें आपणांस दिसूं लागेल. वरवर दिसणाऱ्या सुखाच्या अथवा दुःखाच्या तरंगांनीं त्याची एकतानता भंग पावत नाहीं, अगर त्याच्या शांतीस बाध येत नाहीं, असा आपणांस प्रत्यय येईल. असा प्रत्यय आला म्हणजे त्यांतील घडणाऱ्या गोष्टींचें आपणांस सुख अथवा दुःखही वाटणार नाहीं. हें जग म्हणजे प्रत्यक्ष नरकवासच आहे असें म्हणणारा मनुष्य इंद्रियांचा धनी झाला, तर तोसुद्धा हें जग म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गभूमि आहे असें म्हणूं लागेल. कर्मयोगाचा मनःपूर्वक अभ्यास करून प्रथम सांगितलेली स्थिति प्राप्त करून घेण्याची आपली इच्छा असली तर तसें करण्यास आपण ताबडतोब आरंभ केला पाहिजे. आरंभ करण्यास कांहीं विशिष्ट परिस्थितीची अपेक्षा नाहीं. कोणत्याही स्थितींत तुम्हीं आरंभ केला आणि निश्चयानें चालला तर तुम्हांस अलिप्ततेची स्थिति प्राप्त होईलच होईल; आणि पूर्ण अलिप्तता प्राप्त होऊन तुमचा अहंकार निखालस मावळला म्हणजे जें जग आज तुम्हांस पापमय दिसत आहे तेंच जग केवळ स्वर्ग आहे आणि त्यांत पापाचा अंशही नाहीं असें तुम्ही म्हणाल. तेथें वाहाणारा वायुही शीतळ आणि पुण्यकारक आहे असें तुम्हांस वाटूं लागेल. कर्मयोगाचें हेंच ध्येय – हेंच साध्य – आहे आणि चालू जीविताची हीच पूर्णावस्था आहे.

प्राचीन आर्य तत्त्वज्ञांनीं अनेक प्रकारचे योग सांगितले आहेत; तथापि प्रकार भिन्न असले तरी सर्वांचें साध्य एकच आहे. मनुष्यमात्रास पूर्णत्वास नेणें हें सर्व योगांचें ध्येय आहे. आपणांस ह्या मार्गांपैकीं कोणता पसंत असेल त्या मार्गानें निश्चयानें आणि अट्टाहासानें आपण गेलें पाहिजे. कोणत्याही योगाचें

रहस्य झालें तरी तें नुसतें समजण्यांत तात्पर्य नाहीं. 'हें मला समजलें' असें नुसतें तोंडानें म्हणून तुम्हांस कांहीं खरी प्राप्ति व्हावयाची नाहीं. तुम्हांस उच्चतम स्थिति प्राप्त करून घेणें असेल तर तुम्हीं समजून उमजलें पाहिजे. उमजून त्याचा अभ्यास दृढनिश्चयानें आणि अट्टाहासानें केला पाहिजे. श्रवण, मनन आणि अभ्यास ह्या तीन पायऱ्यांचा आश्रय करून तुम्हीं कोणताही मार्ग निश्चयानें आक्रमिला पाहिजे. कोणताही योग झाला तरी त्याच्या सिद्धीकरितां निश्चय आणि अभ्यास हीं सतत पाहिजेत. तत्त्वांचें प्रथम श्रवण करून नंतर त्यांचें सदैव चिंतन केलें पाहिजे. प्रथम प्रथम कांहीं प्रमेयें फार अवघडशीं वाटलीं तरी सतत श्रवण, मनन आणि निदिध्यास ह्या त्रयीच्या साहाय्यानें तीं आपोआप समजूं लागतील. एकाच वेळीं सर्व प्रमेयें आपणांस समजतील असें नाहीं. वस्तुतः तुम्हीच सर्वज्ञ आहां, ह्यामुळें कोणीही कोणास कांहीं नवें शिकवूं शकत नाहीं. ह्या गोष्टी ज्याच्या त्यानेंच शिकावयाच्या आहेत. फार झालें तर बाह्य जगाकडून कांहीं सूचना तुम्हांस मिळतील. त्यामुळें तुमच्या अंतरात्म्यास जागृति येऊन तो अज्ञानाचा पडदा टाकून देण्याचा प्रयत्न करतो. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें बुद्धि सदैव जागृत ठेवून बाह्येंद्रियद्वारा येणाऱ्या सर्व सूचनांचा योग्य उपयोग करणें हें आपलें कर्तव्य आपणच केलें पाहिजे. ज्ञान ही बाहेरून येणारी वस्तु नसून अनुभवानें ती आपल्याच ठिकाणीं पाहावयाची आहे. हा अनुभव वाढत गेला म्हणजे आपल्यांतील इच्छाशक्ति जागृत होऊं लागते. प्रथम ज्ञानाची इच्छा उद्भवते. इच्छा पक्की बळावली म्हणजे तोच ध्यास लागून तीच इच्छा बलवत्तर होते. तिला संपूर्ण बळ प्राप्त झाल्यावर ती तुमच्या रोमरोमांतून खेळूं लागते व शेवटीं 'मी' आणि 'माझें' हें भान संपूर्ण नाहींसें होतें. अहंकाराचा यत्किंचित् अंशही उरत नाहीं व अशा रीतीनें तुम्ही पूर्णत्व पावतां. पूर्णत्व पावणें हें कोणात्याही विशिष्ट मतावर अवलंबून नाहीं; अथवा विशिष्ट धर्मावर अगर पंथावरही अवलंबून नाहीं. कोणी आपणास यहुदी म्हणवो, ख्रिस्ती म्हणवो अथवा आणखी

कांहीं म्हणवो, पूर्णत्वाचा त्याशीं कांहीं संबंध नाहीं. तुम्हीं अहंकाराचा त्याग केला आहे कीं नाहीं, हा काय तो महत्त्वाचा प्रश्न आहे. जर तुमचा अहंकार गेला असेल तर कोणत्याही धर्मपुस्तकाची एखादी ओळही न वाचतां अथवा एखाद्या देवळांत पाऊलही न ठेवतां बसल्या जागींच मुक्ति तुम्हांस माळ घालील. प्रत्येक योगानें मार्ग जरी निरनिराळे सांगितले असले तरी एका योगाच्या अभ्यासांत दुसऱ्या एखाद्या मार्गाची मदत घ्यावी लागतेच असें नाहीं. कारण, प्रत्येक योग मनुष्याला पूर्णत्वाचा मार्ग दाखविण्यासाठींच निर्माण झाला आहे. कर्मयोग, ज्ञानयोग अगर भक्तियोग ह्यांपैकीं कोणत्याही एका मार्गानें मोक्ष निश्चित मिळेल. अमक्या एका विशिष्ट मार्गानें मोक्ष मिळेल असें म्हणणारे मूर्ख होत. 'सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः।' म्हणजे ज्ञानमार्ग व कर्ममार्ग हे भिन्न आहेत असें मूर्ख म्हणतात; पंडित तसें म्हणत नाहींत, असा भगवान् श्रीकृष्णांचा अभिप्राय आहे. जरी हे मार्ग बाह्यतः भिन्न दिसले तरी त्यांचें अंतिम पर्यवसान एकच आहे ही गोष्ट पंडितांस ठाऊक असते.

## प्रकरण सातवें

## मुक्ति

आपलें सांप्रतचें जीवित ज्याचें कार्य आहे त्या पूर्वकर्मासही आध्यात्मिक भाषेंत कर्म असें म्हणतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ज्याचा सांप्रतच्या जीवितावर कांहीं परिणाम झाला आहे अशा प्रत्येक कृत्यास व

विचारास कर्म असें नांव दिलें आहे. ज्याप्रमाणें कारण आणि त्याचें कार्य हीं अनादिसिद्ध नियमांनीं बांधलेलीं आहेत, त्याचप्रमाणें कर्म आणि फल हींसुद्धा त्याच नियमांनीं बद्ध आहेत. ज्याप्रमाणें कारण उत्पन्न झालें कीं त्याचें कार्य घडलेंच पाहिजे, तें टाळणें जसें सर्वथा अशक्यच आहे, त्याचप्रमाणें कर्म झालें कीं त्याचें फल येणारच; तें टाळणें अशक्य आहे. हा नियम साऱ्या विश्वरचनेच्या मुळाशीं आहे, असें आमच्या तत्त्ववेत्यांचें म्हणणें आहे. ह्या सिद्धान्ताप्रमाणें चालू कर्माचें स्वरूप दोन प्रकारचें आहे असें सिद्ध होतें. चालू जीवनक्रमांत, पाहाणें, विचार करणें आणि कर्म करणें इत्यादि ज्या ज्या क्रिया आपण करतों त्या त्या सर्व पूर्वकर्मानुरूप घडत असतात हें एक स्वरूप. चालू जीवनक्रमाचें दुसरें स्वरूप असें आहे कीं त्यांत ज्या ज्या क्रिया आपण करतों त्या त्या सर्व कारणरूप होऊन पुढील जन्मींच्या कार्यांची म्हणजे जीवनक्रमाची तयारी करीत असतात. आतां येथें नियम ह्या शब्दाचा अर्थ काय, ह्याचा विचार केला पाहिजे. कोणतीही गोष्ट पुन्हा पुन्हा घडून येणें हें ज्या प्रवृत्तीमुळें होतें त्या प्रवृत्तीस नियम असें म्हणतात. आपण प्रथम कांहीं कार्य घडलेलें पाहातों आणि नंतर त्याच्या पाठोपाठ दुसरें कार्य घडतें हेंही आपण पाहातों. त्या वेळीं तशाच प्रकारची कार्यपरंपरा पुन्हा पुन्हा घडत राहील असें आपल्या मनांत साहजिकच येतें. हिंदु तत्त्वज्ञांपैकीं ज्यांना नैय्यायिक असें म्हणतात त्यांनीं ह्या नियमास व्याप्ति असें नांव दिलें आहे. अमूक एक गोष्ट घडली म्हणजे त्या कारणापासून दुसरी अमूक एक कार्यरूप गोष्ट घडणारच, असें जें आपल्या मनांत येतें त्याचें कारण पूर्वींचा अनुभव आहे, असें नैय्यायिकांचें मत आहे. कांहीं कार्यपरंपरा पूर्वी आपण पाहिलेली असते व ती जशीच्या तशीच आपल्या मनांत बीजरूपानें ग्रथित झालेली असते आणि पुन्हा जेव्हां आपण कांहीं कार्य घडलेलें पाहातों त्या वेळीं त्या कार्याशीं सदृश अशा पूर्वानुभवाशीं तें कार्य आपण तत्क्षणींच मनांत ताडून पाहातों. अशा वेळीं जो विचार अथवा शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हटलें तर जो तरंग आपल्या चित्तांत उद्भूत

होतो तो आपल्या इतर मित्रांसही जागें करतो व अशा रीतीनें ती पूर्वींची सर्व कार्यपरंपरा पुन्हा जशीच्या तशीच आपल्या चित्तांत जागृत होते आणि त्या कार्यपरंपरेशीं सांप्रतचें कार्य ताडून पाहून त्यावरून आतां ह्या कार्यापुढें दुसरें अमूक कार्य घडणार असें आपल्या मनांत येतें. ह्याच पूर्वानुभवास आपण नियम म्हणतों, असें नैय्यायिकांचें मत आहे. ही जी कार्यपरंपरा आपल्या चित्तास व्यापून राहिलेली असते, तिच्याच एका विशिष्ट स्वरूपास आपण कारण असें म्हणतों. ह्याच व्यापून राहाण्याच्या स्थितीस संस्कृत भाषेंत व्याप्ति असें नांव आहे. पूर्वी अमूक प्रकारें कांहीं कार्यपरंपरा घडून आली होती आणि आतांही त्या परंपरेपैकीं एक कार्य घडून आलेलें पाहातांच बाकीचीं कार्येंही पूर्वींप्रमाणेंच घडून येतील अशी जी अपेक्षा आपल्या चितात उद्भूत होते, त्या अपेक्षेलाच आपण नियम अथवा कायदा असें नांव देतों. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं अमूक एक नियम अगर कायदा असा कांहीं अस्तित्वांत नाहीं. ह्यासाठीं पृथ्वीच्या मध्यबिंदूत गुरुत्वाकर्षणाचें सामर्थ्य असणें हा कायदा आहे – नियम आहे – असें म्हणणें चुकीचें आहे. किंबहुना सृष्टींतील अमूक एक वस्तु अमूक एका नियमानें बद्ध आहे असें नाहीं, तर एका विशिष्ट रीतीनें – पद्धतीनें – कांहीं वस्तुसंघात पाहाण्याची आपणांस सवय लागली आहे, असें समजावें. अमूक एक कार्यपरंपरा एकाच विशिष्ट रीतीनें घडते असा अनुभव आपणांस आला म्हणजे आपण त्या रीतीस अथवा पद्धतीस नियम – कायदा – असें म्हणतों. ह्यावरून त्या कायद्यानें अथवा नियमानें वस्तु बद्ध नसून त्या कायद्याची व्याप्ति आपल्या चित्तांतच असते असें सिद्ध होतें.

आतां ह्यापुढें आपण जे कांहीं नियम अगर कायदे विश्वव्यापी आहेत असें समजतों, त्याचा अर्थ काय हें पाहावयाचें आहे. ह्यासाठीं विश्व म्हणजे काय, ह्याचा अर्थ प्रथम निश्चित केला पाहिजे. देश – काल – निमित्त ह्या रेषात्रयीनें एकंदर अस्तित्वाचा जेवढा भाग अंकित केला जातो, त्याला आपण विश्व असें नांव देतों. एकंदर अस्तित्व अनंत आहे. त्यापैकीं

कांहीं भाग देश – काल – निमित्त ह्या उपाधींनीं बद्ध झाल्यासारखा दिसतो आणि त्यास आपण विश्व अशा संज्ञेनें ओळखतों. ह्या उपाधिविरहित असें अनंत अस्तित्व त्यापलीकडे आहे. ज्यांना आपण नियम अथवा कायदे म्हणतों, त्यांचें अस्तित्व वस्तूंत नसून आपल्या मनांतच असतें, हें आपण नुकतेंच सिद्ध केलें आहे. तेव्हां विश्वव्यापी कायदे असें आपण ज्यास म्हणतों त्यांचेंही अस्तित्व देश – काल – निमित्त ह्या उपाधींनीं निगडित असलेल्या विश्वांतच असणें शक्य आहे. ह्या उपाधींबाहेर असलेल्या अस्तित्वांत हे कायदे असणें शक्य नाहीं. विश्व असें आपण ज्याला म्हणतों तें व्यष्टिरूप आहे. व्यष्टि म्हणजे अनेकांपैकीं एक. जसें गांव ही समष्टि आणि घर ही व्यष्टि; अरण्य ही समष्टि आणि झाड ही व्यष्टि. ह्याच प्रकारें अनंत अस्तित्वापैकीं जितका भाग कोणत्या तरी रीतीनें आपल्या मनाच्या हद्दींत येतो, त्याला आपण विश्व असें म्हणतों म्हणजे अनंत अस्तित्व समष्टिरूप असून विश्व हें व्यष्टिरूप आहे. आपल्याला जें जें दिसतें, तें तें स्पर्शितां येतें, जें जें ऐकूं येतें, जें जें विचारांत आणतां येतें आणि ज्याची ज्याची आपण नुसती कल्पना करूं शकतों, त्या सर्व अस्तित्वाला आपण विश्व अशी संकलित संज्ञा देतों. आपण ज्यांना कायदे असें म्हणतों, त्यांची व्याप्ति अशा विश्वापुरतीच असणार हें उघड आहे. ह्याबाहेरील अस्तित्वांत नुसत्या कल्पनेनेंही जर आपल्या मनाचा प्रवेश होत नाहीं, तर तेथें हे आपले कायदे आपण लागू कसे करणार? त्यांत घडून येणाऱ्या कार्यपरंपरेची तुलना करण्यास तिच्याशीं सदृश अशी परंपरा आपल्या मनांतच तयार नाहीं. ह्यामुळें अमूक कारण आणि अमूक त्याचें कार्य असें ठरविण्यास आपणांस कोणतेंही साधन उपलब्ध नाहीं. ह्यावरून जेव्हां कोणतीही वस्तु नाम-रूप धारण करते, तेव्हांच ती कायद्याच्या हद्दींत येते असें उघड झालें. जेथें आपलें मन पोचूं शकत नाहीं, तेथें देश - काल - निमित्त ह्या रेषात्रयीला अस्तित्व नाहीं; आणि जेथें ह्या दोहोंचें अस्तित्व नाहीं, तेथें नाम-रूपही नाहीं. ह्यांतच आणखी एक गोष्ट आपोआप

सिद्ध झाली ती ही कीं स्वतंत्र इच्छा असें मनाच्या कांहीं विशिष्ट स्थितीस जें आपण नांव देतों, त्याला अस्तित्वच नाहीं. 'स्वतंत्र' आणि 'इच्छा' ह्या दोन शब्दांचा संधि होणें, हे दोन शब्द एकत्र उच्चारणें म्हणजे अर्थशून्य शब्द उच्चारण्यासारखेंच आहे. 'स्वतंत्र' आणि 'इच्छा' हे दोन शब्द परस्परविरुद्ध अशा अर्थाचे द्योतक आहेत. इच्छेचें अस्तित्व कल्पनेवर अवलंबून आहे. कल्पना विश्वानें बद्ध आहे आणि विश्व देश - काल - निमित्तानें बद्ध आहे. अशा बद्ध वस्तुसंघांतून मुक्त – स्वतंत्र – इच्छा कशी निर्माण होणार? ज्या कोणत्याही वस्तूबद्दल आपणांस ज्ञान झालेलें असतें अथवा होण्याचा संभव असतो, ती प्रत्येक वस्तु आणि तें ज्ञान हीं पूर्वींच्या निमित्तानेंच उद्भवलेलीं असतात. तीं निमित्तबाह्य म्हणजे स्वतंत्र नसतात. जी वस्तु आज कार्यरूप आहे असें आपणास वाटत असतें, तिजवर दुसऱ्या कांहीं वस्तूंचा आघात होऊन ती स्वतः कारणरूप होण्याचा संभव आहे. ह्यावरून वस्तुनिर्मित ज्ञान स्वतंत्र नाहीं असें सिद्ध झालें. परंतु वस्तूच्या आघातामुळें ज्या मूलरूपानें हें ज्ञानाचें रूप धारण केलें, तें मूलरूप स्वतंत्र आहे. जेव्हां हें ज्ञान देश-काल-निमित्ताच्या हद्दींतून बाहेर जातें, तेव्हां तें स्वतंत्र होतें; म्हणजे आपल्या मूलरूपांत एकजीव होतें. तें मूळचें स्वतंत्र आहे, पण देश-काळ-निमित्तानें बद्ध होऊन वस्तु आणि ज्ञान ह्या स्वरूपास येतें व ह्या देश-काल-निमित्ताचें अस्तित्व संपलें कीं त्याबरोबर त्याचें पारतंत्र्य नष्ट होऊन तें आपल्या स्वतंत्र मूलरूपास जातें.

ह्या विश्वाची उत्पत्ति कोठून झाली, ह्याचें अस्तित्व कशावर अवलंबून आहे आणि ह्याचें पर्यवसान काय होणार, अशा प्रकारची प्रश्नपरंपरा नेहमीं विचारण्यांत येत असते. तिचें उत्तर असें कीं विश्वाची उत्पत्ति पूर्णापासून झाली असून, बद्धता ही त्याची स्थिति – अस्तित्व – आहे आणि पूर्वींच्या पूर्णावस्थेंतच त्याचा लय होणार. ह्यासाठीं मनुष्यप्राणी पूर्ण आहे असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां आपल्या मनांत ह्या अनंत अस्तित्वाच्या एका अत्यंत सूक्ष्म

अशा भागाविषयींच बोलावयाचें असतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्या दृष्टीस पडणारें हें शरीर आणि हें मन, हीं अनंत अस्तित्वांतील एक सूक्ष्म बिंदूइतकीं आहेत. खुद्द हें सर्व विश्व, अनंत अस्तित्वाचा एक सूक्ष्म अंश आहे. आमचे सर्व कायदे, सर्व बंधनें, सर्व सुखें, सर्व दुःखें आणि सर्व आशा अतिशय विशाल झाल्या, तरी ह्या बिंदुरूप विश्वाबाहेर जाऊं शकत नाहींत. आमच्या सर्व संस्कृति आणि विकृति ह्या सूक्ष्म बिंदूंत सांठविल्या आहेत. तर मग ह्यावरून हें सर्व विश्व – कीं ज्याला आपल्या चित्ताबाहेर अस्तित्व नाहीं तें – असेंच चालावें अशी अपेक्षा करणें, आणि स्वर्गसुख भोगण्याची इच्छा करणें हें किती पोरकटपणाचें आहे, ह्याची तुम्हीच कल्पना करा. स्वर्गसुख म्हणजे काय, तर ह्याच जगाची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति. ज्यांना आपण कायदे – नियम – असें भपकेबाज नांव देतों आणि ज्यांवर ह्या बिंदुरूप विश्वाचें अस्तित्व अवलंबून आहे असें आपण समजतों, त्यांवरून अनंत अस्तित्वाचे नियम ठरवूं पाहाणें, किती अशक्य आणि बालिश बुद्धीचें लक्षण आहे, ह्याची तुम्हांस निःसंशय खात्री पटली असेल. ह्या बिंदुरूप विश्वांतच अनंत काल कोंडलेले राहून ह्यांतील पंकाचें पुन्हा पुन्हा चर्वण करण्याची ज्यांना इच्छा असेल आणि ही इच्छा तृप्त करण्याजोगा सवलतीचा धर्ममार्ग ज्यांना हवा असेल त्यांची बुद्धि वठून गेलेल्या झाडासारखी आहे, असें तुम्ही निश्चित समजा. आपल्या चालू स्थितीहून उच्चतर स्थिति असणें शक्य आहे, ही कल्पनासुद्धा त्यांस शिवत नाहीं. चालू स्थिति हीच त्यांच्या दृष्टीनें मानवी जीविताची इतिकर्तव्यता असते. स्वतःच्या अनंत रूपाचा त्यांस पूर्ण विसर पडलेला असतो. चालू क्षणीं जीं सुखदुःखें अनुभवास येतात त्यांहून कांहीं निराळी स्थिति असेल असें त्यांस स्वप्नांतही वाटत नाहीं. रोज अनेक वस्तूंचा नाश होत आहे हें पाहूनही त्याच वस्तु निरंतरच्या आहेत ह्या कल्पनेची मिठी ते सोडीत नाहींत. तृष्णा, तृष्णा म्हणून एकसारखे ते मृगजल पीत सुटतात. आपल्या बिंदुमात्र विश्वाच्या बाहेर अनंत अस्तित्व आहे, त्यांत अनंत सुखकर वस्तु

भरल्या आहेत. तेथें अनंत जीवांची वस्ती आहे, तेथें अनंत प्रकारचे कायदे, अनंत राष्ट्रें आणि अनंत संस्कृति आहेत आणि हें अनंत अस्तित्व सगळें आपल्या विश्वाच्या बाहेर आहे. ह्यावरून आपल्या विश्वाच्या बाहेर आणखी किती विस्तार आहे ह्याची कांहीं अंशीं तरी तुम्हांस कल्पना होईल आणि एवढा मोठा विस्तार आपल्या स्वतःच्या अनंतत्वाचा एक लहानसा भाग आहे.

जर आपणांस खरें स्वातंत्र्य – मुक्ति – मिळवावयाची असेल तर ह्या विश्वांत कोंडून ती मिळणें नाहीं. ती मुक्ति ह्या दृश्य विश्वांत नाहीं, अगर ती अदृश्य स्वर्गांतही नाहीं. तसेंच ज्या ज्या ठिकाणीं आपल्या कल्पनेची धाव पोचूं शकते, अशा कोणत्याही ठिकाणीं जाऊन मुक्ति मिळणार नाहीं. तुम्ही कसल्याही प्रकारच्या स्वर्गांची अथवा दुसऱ्या एखाद्या लोकाची कल्पना केली तरी जेथें आपल्या कल्पनेस अवसर आहे, ती जागा आपल्या विश्वांतच अंतर्भूत होणार आणि विश्व तर देश - काल - निमित्त ह्या रेषात्रयीनें बद्ध आहे. आमच्या ह्या जगाहून आणखी कांहीं निरनिराळ्याच प्रकारचीं जगें असूं शकतील, तेथें येथल्याहून कांहीं अधिक सुखकर वस्तु असतील; परंतु जोंपर्यंत त्यांचें अस्तित्व विश्वाबाहेर नाहीं, जोंपर्यंत तीं त्यांनीं देश - काल - निमित्त ही त्रयी ओलांडली नाहीं, तोंपर्यंत तीं विश्वाच्या कायद्यांनीं बांधलेलीं राहाणारच. ह्यासाठीं मुक्तीची वाट ह्या विश्वाबाहेर जाऊन शोधिली पाहिजे. म्हणून विश्व जेथें संपतें तेथेंच खऱ्या धर्ममार्गास आरंभ होतो. जोंपर्यंत जीविततृष्णा आम्हांस सोडून गेली नाहीं, आणि जोंपर्यंत ह्या क्षुद्र सुखांच्या कल्पनेनें आपण लाळ घोटीत आहों, तोंपर्यंत मुक्तीचा मार्ग स्वप्नांतही दिसण्याची आशा नको. ह्यावरून हें निःसंशय सिद्ध होतें कीं मानवी जीविताचा खरा हेतु जी मुक्ति ती मिळविण्याकरितां आपणांस ह्या विश्वाचा, ह्या जगाचा, ह्या स्वर्गकल्पनेचा, ह्या देहाचा, ह्या मनाचा, ह्या चित्ताचा आणि जें जें म्हणून मर्यादित असेल त्याचा सर्वथा त्याग केला पाहिजे. ज्या क्षणीं इंद्रियजन्यसुखाची ही आसक्ति नाहींशी होईल, त्याच क्षणीं मुक्ति आपणांस माळ घालील. ज्या शृंखलांनीं

सध्या आपण बद्ध झालों आहों त्या तोडण्याचा मार्ग एकच. कल्पनेनें जेथें प्रवेश करतां येतो त्याचा त्याग करा, कल्पनातीत व्हा, म्हणजे तुम्ही मुक्तच आहां.

'कल्पनातीत व्हा' हें म्हणणें सोपें आहे. पण करणें अत्यंत कठीण आहे. हजारों मनुष्यांपैकीं एखादा त्या मार्गास लागतो आणि अशा हजारों मार्गस्थांपैकीं एखादाच त्यांत यश मिळवितो, '**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥**' अशी वस्तुस्थिति आहे. कल्पनातीत होण्यास आमच्या तत्त्ववेत्त्यांनीं दोन मार्ग सांगितले आहेत. एक 'नेति' आणि एक 'इति.' पहिला मार्ग निषेधरूप असून दुसरा विधिरूप आहे. ह्यांपैकीं पहिला निषेधरूप मार्ग अत्यंत दुर्गम आहे. अद्वितीय मनःस्थिति आणि प्रचंड इच्छाशक्ति हीं ज्यांस प्राप्त झालीं असतील, त्यांनाच त्या मार्गांत पाऊल टाकणें शक्य आहे. कोणतीही सुखेच्छा नुसती उत्पन्न झाल्याबरोबर हे म्हणतात, 'जा, तुझी मला जरूर नाहीं' आणि त्यांचें मन व शरीर त्यांची आज्ञा अक्षरशः पाळतात. पण इतक्या प्रचंड शक्तीचे लोक कितीसे असणार? असे लोक क्वचितच असतील. ह्यासाठीं प्रायः सर्व मनुष्यें दुसऱ्या मार्गांचाच स्वीकार करतात. जगांतील सर्व बंधनें पाहून त्यांजबद्दल विचार करून आणि त्याच बंधनांचा उपयोग स्वतःस करून घेऊन ते बंधनमुक्त होतात. कांट्यानें कांटा काढून शेवटीं जसे दोन्ही कांटे फेकून द्यावयाचे, त्याप्रमाणें एक प्रकारच्या बंधनांनीं दुसऱ्या प्रकारचीं बंधनें तोडून शेवटीं दोहोंतूनही सुटावयाचें. हा मार्गही वस्तुतः त्यागाचाच आहे. ह्याचेंही पर्यवसान शेवटीं 'नेति' ह्या मार्गांतच होतें; पण तें फार हळूहळू होत असल्यामुळें फारसें कष्टप्रद होत नाहीं. जगांतील वस्तूंकडे पाहून, त्यांजबद्दल विचार करून, त्यांचा उपभोग घेऊन आणि त्यांजपासून प्राप्त होणाऱ्या सुखाची खरी योग्यता काय आहे, ह्याचा अनुभव घेत घेत त्यांजपासून हळूहळू मनास परावृत्त करावयाचें असा हा

'इति 'चा मार्ग आहे. पहिला मार्ग विवेकप्रधान असून दुसरा कर्मयोगाचा आणि अनुभवप्रधान आहे. पहिल्या मार्गाला ज्ञानयोग असेंही नांव आहे. ह्यांत पूर्ण विवेकानें कर्मसंन्यास करावयाचा असतो. म्हणजे कोणतेंही कर्म करावयाचें नाहीं असा बुद्धीचा निश्चय विवेकानें करावयाचा. दुसऱ्या मार्गांत कोणतेंही कर्म करणें सोडावयाचें नसतें. विश्वांतील प्रत्येक प्राण्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारचें तरी कर्म करावेंच लागतें. ज्यांचें मन स्वतःच्या ठिकाणींच पूर्ण संतुष्ट असतें त्यांची मात्र गोष्ट निराळी आहे. आत्मज्ञानाशिवाय त्यांना दुसऱ्या कशाचीही वासना नसते, ह्यामुळें स्वस्वरूप सोडून त्यांचें मन बाह्य जगांत कधींही भटकत नाहीं. बाह्य वस्तूंपैकीं कशाचीही अपेक्षा उरली नसल्यामुळें ज्यांची बुद्धि अंतर्मुखता कधींही सोडीत नाहीं अशा पुरुषांस मात्र कोणत्याही कर्माचा अवलंब करण्याचें कारण नाहीं. ह्याहून अन्यप्रतीच्या सर्व लोकांस कर्म करणें भागच आहे. ज्याप्रमाणें उंचावरून खोल दरींत पडणारा पाण्याचा झोत खालीं पडल्याबरोबर प्रथम भोवरा उत्पन्न करतो आणि त्या भोवऱ्यांत चक्राकार फिरून नंतर पुढें जातो, तद्वतच मनुष्यप्राण्याचीही गति आहे. मनुष्यप्राणी जन्मास आल्यापासून ह्या संसार-रूपी भोवऱ्यांत सापडतो. त्यांत चक्राकार परिभ्रमण करीत असतां तो कोणाला बाप म्हणतो, कोणाला भाऊ म्हणतो, 'माझी कीर्ति, माझें नांव' असें ओरडतो आणि अनुभवानें शहाणा होऊन शेवटीं आपल्या मुक्तस्थितीस परत जातो. सर्व विश्व नेहमीं ह्याच स्थितींत असतें. समजून अथवा न समजतांही आपण सर्व जगद्रूपी स्वप्नांतून जागें होण्याचाच प्रयत्न करीत आहों. ह्या संसाररूपी भोवऱ्यांत जे जे अनुभव आपणांस प्राप्त होतात त्यांचा उद्देश हाच कीं त्यांच्या योगानें आपणांस त्या भोवऱ्यांतून सुटण्यास मदत व्हावी.

आपणांपैकीं बहुतेकांस कर्मसंन्यास करतां येणें शक्य नाहीं. आपणांस कर्माचा अवलंब केलाच पाहिजे. असें आहे, तर कर्म करतांच मुक्ति मिळविण्याचें साधन असेल तर तें आपणांस हवें आहे. कर्मयोगानें असें

साधन आपणांस दिलें आहे. कर्मयोगानें आपणांस कर्मसंन्यासाचें रहस्य प्राप्त होतें. आपणा सभोवतालचें सर्व विश्व कार्यरत आहे हें आपण नित्य पाहातों. ह्या सर्व कार्यांचा उद्देश काय? मुक्ति – स्वातंत्र्य हाच ह्या सर्व कार्यांचा अंतिम हेतु आहे. जगांतील अणुरेणूपासून तों हत्तीपर्यंत एकंदर सर्व प्राणी केवळ मुक्तीसाठींच धडपडत आहेत. ह्या शरीरबंधांतून सुटावें, मनोबंधाचा त्याग करावा आणि आत्म्याला मोकळें करावें ह्यासाठींच ही सारी गडबड आणि धडपड सुरू आहे. प्रत्येक वस्तूची गति पाहिली तरी तिचा हेतु हाच आहे. मुक्ति – स्वातंत्र्य – ह्यावांचून दुसरा कोणताही हेतु ह्या गतीच्या मुळाशीं नाहीं. सूर्य, चंद्र, पृथ्वी आणि इतर सर्व गोलसुद्धा बंधनांतून मुक्त होण्याकरितांच भ्रमण करीत आहेत. सशास्त्र ज्ञानाच्या अभावीं आपणांस अनंतकाल प्रवास करावा लागेल आणि अनेक वेळां ठोकरा खाण्याचा प्रसंग आपणांवर येईल. परंतु कर्मयोगाचें रहस्य आपणांस बरोबर समजलें, तर हा सर्व त्रास आपणांस चुकवितां येतो. कर्मयोग हें कर्मरहस्य सांगणारें शास्त्र आहे. कर्म करीत असतां त्याच वेळीं त्या कर्मापासून आपली शक्ति कशी वाढवावी आणि तिचा उपयोग मुक्तीकडे कसा करावा, ह्याचें ज्ञान आपणांस कर्मयोगापासूनच प्राप्त होतें. अनंत काल आपण कर्म करीत राहिलों तरी आपलें कर्म अशास्त्र असेल तर आपली सर्व शक्ति अनाठायीं खर्च होऊन मुक्तिपथाची एक पायरीही आपण चढलों नाहीं असें होतें. रसायन-शास्त्रामुळें जसें पदार्थांचा बरोबर उपयोग आपणांस समजून क्षुद्र पदार्थांपासून मोठीं कार्यें आपण निर्माण करतों, अथवा पदार्थविज्ञानशास्त्रामुळें अल्पशक्तीनें जशीं प्रचंड कार्यें आपण लीलेनें पार पाडतों, तसेंच कर्मयोगाच्या सशास्त्र ज्ञाननें इच्छाशक्तीची योग्य संघटना करून आपण मुक्ति मिळवूं शकतों. कर्मत्याग जर आम्हांला अशक्य आहे, तर मग कर्म करून कर्मत्यागाचें पूर्ण फल मिळेल, अशी कांहीं युक्ति सापडेल तर आम्हांस हवी आहे. हें जग म्हणजे कांहीं थोडासा वेळ विश्रांतीची जागा आहे, ही गोष्ट कबूल करणें भाग आहे.

ही आपली निरंतर वस्तीची जागा नसून केवळ मधल्या मुक्कामाची जागा आहे, हें प्रतिक्षणीं आपल्या प्रत्ययास येतें. येथून कोठें तरी दुसरीकडे जाणें आम्हांस भाग पडतें. येथें राहून स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं. ही गोष्टही दर क्षणीं आपल्या अनुभवास येते. जर आम्हांस स्वातंत्र्य – मुक्ति – पाहिजे असेल तर ती जगाच्या पलीकडे कोठें तरी शोधली पाहिजे, हें उघड आहे. ह्या जगाच्या बंधनांतून बाहेर पडण्याचा मार्ग हळूहळू पण निश्चयानें आक्रमिला पाहिजे. 'नेति' म्हणून जगाचे सर्व पाश एकदम तोडणारे कांहीं पुरुष असतील. ज्याप्रमाणें सर्प आपली कात टाकून मोकळा होतो, त्याप्रमाणें केवळ इच्छामात्रेंकरून जगाचीं बंधनें टाकून मोकळे होणारे धीर पुरुष कांहीं थोडेसे असतील ह्यांत संशय नाहीं, पण त्यांचा मार्ग बाकीच्या गरीब दुबळ्यांस कितपतसा उपयोगी पडणार ! कर्म करतां करतां मुक्ति मिळविण्याचा मार्ग त्यांस हवा आहे. हा मार्ग – हें कर्मरहस्य – कर्मयोगानेंच आपणांस मिळवितां येतें. आपल्या प्रत्येक कर्मानें मुक्तिमंदिराची पायरी कशी बांधावी, हें रहस्य कर्मयोग आपणांस शिकवितो.

'सदोदित कर्म करा, पण तें अलिप्तपणें करा,' हें कर्मयोगाचें मुख्य सांगणें आहे. आपण आपली बुद्धि सूक्ष्म केली तर आपणांस असें आढळून येईल कीं कर्म करतां करतां आपण स्वतःस विसरून कर्माशींच एकजीव होऊन राहातों. हीच आपली पहिली मोठी चूक आहे. कर्म आणि आपण निरनिराळे आहों, ही भावना प्रथम दृढ केली पाहिजे. ह्याच भावनेनें आपण आपलें मन स्वतंत्र ठेवलें पाहिजे. आपणाभोवतीं अनेक प्रकारचीं दुःखें आणि संकटें आपण हरघडी पाहातों, परंतु जगाचें अस्तित्व जर त्यांच्यावर अवलंबून आहे, तर त्यांजबद्दल अधिक विचार करून आपलें डोकें फिरविण्यांत काय फायदा आहे ! तीं अनंत काल अशींच राहाणार आहेत. त्याचप्रमाणें गरिबी अगर श्रीमंती हींसुद्धा थोडा वेळ टिकणारीं आहेत. आमचें जें खरें अनंत अस्तित्व आहे, त्याशीं ह्या गरिबीचा, अगर श्रीमंतीचा, अगर लौकिक सुखाचा यत्किंचितही संबंध नाहीं. आमचें

नित्य स्वरूप त्याच्या फार पलीकडचें आहे. एवढेंच नव्हे, तर तें प्रत्येक दृश्य पदार्थापलीकडे आणि कल्पनेच्याही पलीकडे आहे. ‘**यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह**।’ असें तें आपलें नित्यरूप आहे. त्या आपल्या मूळ रूपास परत जाण्याचा मार्ग नित्य कर्म करीत असतांच आपणांस आक्रमावयाचा आहे. ह्यासाठीं आपण एक सिद्धान्त नित्य लक्षांत वाळगिला पाहिजे तो हा कीं ‘**दुःखाची प्राप्ति कर्मामुळें होत नसून फलासक्तीमुळें होते**’ कर्म आणि त्याचा कर्ता हे एकजीव होऊन राहिले म्हणजे त्यापासून उद्भवणारीं दुःखें भोगणें कर्त्याच्या नशिवीं येतेंच येतें. परंतु कर्म आणि कर्ता हे वेगळे झाले, तर कर्मापासून उद्भवणाऱ्या सुखदुःखाशीं कर्त्याचा कांहीं संबंध उरत नाहीं. दुसऱ्याच्या एखाद्या सुंदर वस्तूचा नाश झालेला पाहून तिऱ्हाइतास कांहीं दुःख वाटत नाहीं. पण त्या तिऱ्हाइताची स्वतःची तसलीच वस्तु नाश पावली तर? तर तो ऊर बडवून घेऊं लागतो. वास्तविक त्या दोन्ही वस्तु सुंदर होत्या. अगदीं एकसारख्याच सुंदर होत्या. परंतु एकीच्या नाशानें दुःख झालें नाहीं आणि दुसरीच्या नाशानें तें झालें. असें कां? ह्याचें कारण पहिल्या वस्तूशीं त्याचें मन संलग्न नव्हतें, तें मोकळें होतें, पण दुसऱ्या वस्तूशीं त्याचें चित्त एकजीव होऊन गेलें होतें; ह्यामुळें तिच्या नाशानें त्याच्या चित्तास धक्का बसून तेथें दुःखाची उत्पत्ति झाली. ‘मी’ आणि ‘माझें’ ह्या दोन शब्दांतच साऱ्या जगांतलें दुःख सांठविलें आहे. ही वस्तु ‘माझी’ अशी भावना झाल्याबरोबर तेथें आसक्ति उत्पन्न झाली व तिजबरोबर तिचेंच अपत्य जें दुःख तेंही येणारच. ‘मी’ आणि ‘माझें’ ही भावना धरून कोणतेंही कर्म केलें अथवा ह्या भावनेनें प्रेरित असा एखादा विचार आपल्या चित्तांत उद्भवला कीं तत्क्षणींच आपण त्या कर्माचे अगर त्या विचाराचे गुलाम बनतों. तत्क्षणींच धन्याचें गुलामांत रूपांतर होतें. ‘मी’ आणि ‘माझें’ ह्या विचारानें आपलें चित्त तत्क्षणींच आपल्याभोवतीं पडणाऱ्या शृंखलेचा एक एक दुवा घडवूं लागतें. ‘मी’ आणि ‘माझें’


मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ...२३५५५... दि: ...१०/७/६४...

हा विचार जसजसा वाढत जातो, तसतशी आपली शृंखला अधिक जड आणि कष्टप्रद होऊं लागते. ह्यासाठीं जगाच्या स्वरूपाकडे पाहून आनंद करा आणि त्यांतून शिकण्यासारखें कांहीं असेल तें शिका; पण त्याच्या तडाक्यांत सापडूं नका, असें कर्मयोगाचें आम्हांस सांगणें आहे. 'माझें' असें कांहींच म्हणूं नका. 'माझें' ह्या शब्दाबरोबर दुःखाचें बीज पेरलें जातें. मुलाच्या लीला पाहून आनंद करा, पण 'माझें' मूल म्हणूं नका. 'माझें' घर, 'माझें' शरीर हेंही म्हणूं नका. 'माझें' हेंच सर्व दुःखांचें आणि संकटांचें मूळ आहे. वास्तविक शरीर तुमचें नव्हे, माझें नव्हे आणि कोणाचेंच नव्हे. सृष्टीच्या कायद्यास अनुसरून हजारों देह येतात आणि जातात. त्यांचें जाणें आणि येणें ह्यांचे आपण नुसते साक्षी आहों. नुसत्या शरीराची खरी योग्यता ही भिंत अथवा तिजवरील तें चित्र ह्याहून अधिक नाहीं. तर मग ह्या मातीच्या गोळ्यास आपण इतकें काय म्हणून चिकटावें? एखाद्या चितार्‍यानें चित्र रंगविलें आणि तो पुढें चालता झाला, तर त्या चित्राचें त्यास स्मरणही उरत नाहीं, पण तेंच जर त्यानें 'माझें' चित्र असें म्हटलें तर तत्क्षणींच त्याच्याभोवतीं एक नवा बंध उपस्थित होतो. बंधाबरोबर त्याचें सहचारी जें दुःख तें येणारच.

ह्यासाठीं कर्मयोग आपणांस कंठरवानें सांगतो कीं 'मी' आणि 'माझें' ह्या भावनेचा प्रथम त्याग करा. ह्या भावनेवर थोडासा ताबा चालवितां येऊं लागला कीं तेथें तसेंच हट्टानें चिकटून राहून मनास ह्या लाटेच्या तडाक्यांत जाऊं देऊं नका. असा ताबा ठेवून मग खुशाल जगांत जा आणि वाटतील तितकीं कर्में करा. वाटेल तेथें जा आणि वाटेल त्या मंडळींत मिसळा. पाप तुम्हांस स्पर्शही करूं शकणार नाहीं. कमळाचें पान पाण्यांत जन्मास येतें आणि पाण्यांतच राहातें, पण पाणी जसें त्यास चिकटून राहूं शकत नाहीं, तसेंच तुमचा ताबा तुमच्या मनावर आहे, तुम्ही त्याचे धनी आहांत, तोंपर्यंत पाप आणि दुःख तुम्हांस स्पर्शही करूं शकणार नाहींत. ह्यालाच वैराग्य असें म्हणतात. 'साधकाची वृत्ति असावी उदास।'

म्हणून संतांनीं जो उपदेश केला आहे, ती उदासवृत्ति हीच. उदासवृत्ति पूर्ण बाणल्यावांचून कर्मयोगच काय, पण कोणताही योग साध्य होणें शक्य नाहीं. अनासक्ति ही सर्व योगांचा मूळ पाया आहे. पण उदासवृत्ति म्हणजे काय, ह्याची कल्पना प्रथम बरोबर असली पाहिजे. कोणी घरदार सोडून अरण्यांत जाऊन आणि नुसती लंगोटी लावून कंदमुळें भक्षून राहिला, म्हणून तो खरा उदासी असेलच असें नाहीं. त्याची हाव फक्त त्याच्या शरीरापुरतीच असूं शकेल आणि त्यामुळें त्याच्या धडपडीचें क्षेत्र आकुंचित झालें इतकेंच. उदासीनता ह्या शब्दानें शारीरिक सुखदु:खाचा बोध होत नसून ती केवळ मानसिक स्थिति आहे. 'मी' आणि 'माझें' ह्या बंधनाचा वास बाह्य देहावर नसून त्याच्या आंत आहे. बाह्य वस्तु आपल्या मनाशीं जोडून देण्याचें काम इंद्रियद्वारा देह करतो इतकेंच. पण त्यापासून जें बंधन प्राप्त होतें ती सांखळी आंतच तयार होते. ह्यासाठीं 'मी' आणि 'माझें' ही भावना जाऊन बाह्य पदार्थांचा व आपला संबंध तुटला, तर आपण उदासीन होऊं. एखादा मनुष्य राजा असून आणि सर्व भोग भोगूनही उदासीन असूं शकेल, आणि दुसरा एखादा लंगोटी लावूनही अत्यंत आसक्त असूं शकेल. ह्यासाठीं प्रथम उदासवृत्ति बाणली पाहिजे आणि नंतर सदैव कार्यरत असलें पाहिजे. ही उदासवृत्ति आपल्या अंगीं कशी आणावी ह्याचा कर्मयोगानें बराच खुलासा होतो; तथापि ही स्थिति साध्य करणें मोठें बिकट काम आहे.

कर्मयोगानें मुख्यत: दोन मार्ग सांगितले आहेत. एक मार्ग निरीश्वरवादी लोकांकरितां आहे. ज्यांना परमेश्वराचें अस्तित्व मान्य नाहीं अथवा त्याबद्दल ज्यांच्या वृत्ति साशंक आहेत आणि परमेश्वराचें आपल्या कार्यांत आपणांस साहाय्य मिळतें अशी भावना ज्यांच्या चित्तांत उत्पन्न होत नाहीं, अशा लोकांकरितां एक मार्ग कर्मयोगानें आंखून दिला आहे. त्यांनीं स्वबुद्धीनेंच सदैव कार्यमग्न असावें. स्वत:स सुचेल अथवा बरा वाटेल असा मार्ग त्यांनीं स्वीकारून कार्यरत राहावें. त्यांची स्वत:ची सदसद्विवेकबुद्धि हाच

त्याचा मोठा आधार. अशा रीतीनें कार्यमग्न असतां मनानें मात्र त्या कार्यांत चिकटूं नये. मन अगदीं मोकळें ठेवावें. 'मला ह्यांतून सुखदु:खाची अपेक्षा करावयाची नाहीं' असें त्यांनीं सदोदित चिंतन ठेवावें. कार्य करीत असतां फल काय येईल ह्याची चिंता न करतां बऱ्याचें सुख अथवा वाइटाचें दु:ख मानूं नये. ज्यांचा परमेश्वराच्या अस्तित्वावर पक्का भरंवसा आहे, त्यांच्याकरितां कर्मयोगानें दुसरा मार्ग सांगितला आहे. हा मार्ग पुष्कळ सोपा आहे. अशा मनुष्यांनीं सदैव उद्योगरत राहून सर्व कार्य 'कृष्णार्पण' म्हणावें. कार्याचें जें कांहीं फळ येईल तें 'माझें' नव्हे, तर 'परमेश्वराचें' आहे, असें त्यांनीं सदोदित चिंतन करावें. जें कांहीं करावयाचें तें सारें परमेश्वराप्रीत्यर्थंच करावयाचें. स्वत:च्या सुखासाठीं म्हणून कांहीं करावयाचेंच नाहीं असा पक्का निर्धार असावा. जें कांहीं पाहावयाचें, ऐकावयाचें अथवा दशविध इंद्रियांनीं जें कांहीं करावयाचें तें सर्व परमेश्वरासाठीं. कांहीं चांगलें काम त्यांच्या हातून घडलें तर त्याबद्दल स्वत:च्या स्तुतीचा शब्दही ऐकावयाचा नाहीं. कारण तें कार्य परमेश्वराचें म्हणून स्तुतीसही तोच पात्र आहे. आपण म्हणजे निवळ परमेश्वराचे नोकर अथवा हस्तक असून तो आपल्याकडून स्वत:चीं कर्में करवितो आणि अमूक करावें असें आपल्या मनांत येतें, तो त्याचाच हुकूम अशी दृढभावना त्यांनीं धरली पाहिजे. 'यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणं॥' असा हा कर्मयोगाचा दुसरा मार्ग भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितला आहे. कर्ता करविता सर्व परमेश्वर आहे. मग आपण सुखदु:खांनीं स्वत:स व्यर्थ शीण कां करून घ्यावा? अशा विचारानें भक्तांनीं सदोदित संतुष्ट वृत्तीनें राहिलें पाहिजे. त्यांनीं आपलें शरीर आणि आपलें मन भगवंतास अर्पण केलें पाहिजे. मोठमोठे अग्नि प्रदीप्त करून त्यांत आहुति देण्यापेक्षां हा महायज्ञ करा. हा शेवटास गेला कीं ज्ञानजलाच्या अवभृथस्नानानें तुम्ही मुक्त व्हाल. 'ह्या जगांत आढळणाऱ्या वस्तु बऱ्या, वाईट अगर उपेक्ष्य असोत. त्या सर्व त्याच्या आहेत. मला त्यांपैकीं कांहींच नको' असें आपण

सदोदित आपल्या चित्तांत वागवूं या. ही सवय सदोदित राहिली म्हणजे ती हळूहळू स्वभावरूप होऊन तिचा प्रवेश नखशिखान्त आपल्या देहांत होईल; आपल्या रोमरोमांत ती पक्की भिनून जाईल. इतकी स्थिति झाल्यावर मग हातघाईच्या लढाईंत प्रवेश करून, आपल्या प्रचंड कडकडाटानें मेघराजाला लाजवूं पाहाणाऱ्या तोफांच्या तोंडांवर आपण चाल करून गेलों, तरीही आपली मनःशांति आपणांस सोडून जाणार नाहीं.

सामान्य व्यवहारांत ज्याला आपण कर्तव्यकर्म असें म्हणतों, ती कर्मयोगाच्या दृष्टीनें अगदीं खालची पायरी आहे. अशीं कर्तव्यें आपणां सर्वांच्या मागें रोजचीं लागलेलीं आहेत. 'कर्तव्य, कर्तव्य' म्हणून रोजचीं कामें करीत असतां, त्यांतच दुःखाची उत्पत्ति होते, असा आपणांस नेहमीं अनुभव येतो. अशा वेळीं त्या कर्माचें कर्तव्य हें रूप जाऊन तो एक रोगच आपणांस जडल्यासारखा होतो आणि मग ह्या कर्तव्यरोगाचें पाऊल एकसारखें पुढें पुढेंच पडत जातें. जें जें कांहीं करावेंसें चित्तांत येतें तें तें सारें कर्तव्यच वाटूं लागतें आणि ह्या कर्तव्यभ्रमाच्या चरकांत आपण एकदा सापडलों म्हणजे सर्व आयुष्य संपेपर्यंत त्यांतून सुटका होत नाहीं. कर्तव्यभ्रम हा आपल्या साऱ्या आयुष्याचें मातेरें करतो. भर उन्हाळ्यांतला माध्यान्हींचा सूर्य जसा वस्तु करपवून टाकतो, तसा हा कर्तव्यभ्रम आपल्या साऱ्या आयुष्याची होळी करतो. संसारचक्रांत पूर्ण सापडलेल्या आणि कर्तव्यभ्रमानें गुलामाच्या स्थितीस पोचलेल्या ह्या पामरांकडे पाहा! सकाळीं उठल्यापासून त्यांचीं 'कर्तव्यें' त्यांच्या पाठीस लागतात, त्यांना स्नान करावयास अथवा परमेश्वराचें नांव घ्यावयासही वेळ मिळत नाहीं. सारीं 'कर्तव्यें' करून मट्टयास आलेलें शरीर जमिनीवर आडवें होईपर्यंत एकसारखें 'कर्तव्यास' जुंपलेलें असावयाचें. कामावरून हे लोक घरीं आले तरी कामाचे विचारच त्यांच्या डोक्यांत घोळावयाचे. स्वप्नांतही त्यांस तें पिशाचरूपी 'कर्तव्य' सोडीत नाहीं. त्या बिचाऱ्यांस झोपही चांगलीशी लागत नाहीं. अरेरे, 'कर्तव्य' 'कर्तव्य'

म्हणून भ्रमांत पडलेला हा प्राणी ह्याच भ्रमांत एखादे दिवशीं मरण पावतो. सामान्य व्यवहारांत ज्याला कर्तव्य असें आपण समजत असतों, त्याचा हाच प्रकार चोहोंकडे आपणांस आढळून येतो. परंतु हें आपलें कर्तव्य नव्हे. बायकापोरांच्या, आप्तेष्टांच्या अथवा स्वतःच्या सुखकल्पनांस बळी पडून कर्में करणें, हें कर्तव्य नव्हे. अनासक्त चित्तानें आणि स्वतःच्या सुखकल्पनांस बळी न पडतां प्राप्त झालेलीं कामें केवळ ईश्वराची आज्ञा म्हणून पार पाडून त्यास फल अर्पण करावयाचें हें आपलें खरें कर्तव्य आहे. सर्व कर्में हीं त्याचीच आज्ञा म्हणून करावयाचीं. आपणांस त्याच्या हुकमानें ह्या जगांत मनुष्यदेह मिळाला हा त्याचा उपकार. त्याच्या हुकमानें प्राप्त झालेलीं कर्तव्यें सुचतील तशीं करावयाचीं. तीं बरीं अगर वाईट झालीं तर त्याचा तो पाहून घेईल. त्याचा विचारच आम्हांस नको. तीं चांगलीं झालीं तर त्यांचीं चांगलीं फळें आम्हांस नकोत, तसेंच तीं वाईट झालीं तर त्यांचीं वाईट फळेंही ज्याचीं तोच घेणार. चित्त सदोदित शांत ठेवा; सुखकल्पनांचे बंदे गुलाम होऊन दिवसभर राबूं नका: आणि मग प्राप्तकर्तव्य खुशाल करा. हा धनीपणा – हें स्वातंत्र्य – मिळविणें फार कठीण काम आहे. भिकार देहाच्या तुच्छ वासना तृप्त करण्याकरितां नीच कर्में करून त्यांस 'कर्तव्यें' असें सोज्ज्वल नांव द्यावयाचें हें मात्र सध्या फार सोपें झालें आहे. वाटेल त्याच्या माना कापाव्या, वाटेल तसे घातपात करावे आणि वाटतील तीं कर्में करावीं. 'अमूक असें तूं कां केलेंस ?' म्हणून विचारणारा कोणी भेटलाच तर 'काय करावें, हें माझें कर्तव्य म्हणून मीं केलें,' असा जबाब द्यावा. ह्याहूनही अधिक मखलाशी करावयाची असली तर आपल्या ह्या धनतृष्णाकूपावर आणखी कांहीं फुलें पसरावीं म्हणजे झालें. आपल्या कृतीला कांहीं देशहिताचें, मित्रहिताचें अथवा कुटुंबहिताचें रूप द्यावें, म्हणजे त्याखालीं हवीं तीं कृष्णकृत्यें लपलीं जातात. 'कर्तव्य' ह्या शब्दाचा हाच अर्थ सध्या पुष्कळांस पटल्यासारखा दिसतो !

कर्तव्य ह्या शब्दाचा खरा अर्थच आपणांस समजत नाहीं. अमूक कर्म करावें असें आपल्या मनांत येतें, त्या वेळीं कांहीं तरी शारीरिक सुखाच्या कल्पनेनें हा विचार आपल्या चित्तांत उद्भवलेला असतो. हा विचार बहुधा तृष्णाजन्य असतो. अनंत कालाच्या संवयीनें इंद्रियजन्य सुख हेंच आपलें सर्वस्व होऊन बसतें आणि त्याच्या प्राप्त्यर्थ करावीं लागणारीं कर्में हीं सर्व कर्तव्येंच आहेत, असें आपणांस वाटूं लागतें. उदाहरणार्थ, आपण कांहीं सांसारिक कर्मांस पतिपत्नींमधील कर्तव्यें असें म्हणतों. पण ज्या देशांत लग्नविधिच नाहीं, तेथें पति आणि पत्नी हें नातेंच नाहीं. त्यामुळें तेथें पतीपत्नीचीं कर्तव्यें हा शब्दही ठाऊक नाहीं. स्त्रीपुरुषें लग्न करितात तीं एकमेकांच्या सुखाकरितां करतात. अशी चाल बराच काळ चालू राहिली म्हणजे त्याच चालीनें कर्तव्यें निर्माण होऊं लागतात. एखादा मंदरोग जडला म्हणजे फारसा त्रास न देतां तो मनुष्याचें शरीर हळूहळू भक्षण करतो. मनुष्याच्या शरीरावर एखाद्या विकाराचा जाज्वल्य परिणाम झाला तर त्याला आपण रोग असें नांव देतों; पण तोच परिणाम अत्यंत मंद – दृष्टोत्पत्तीस न येण्याइतका मंद – असला म्हणजे प्रकृतिच तशी असें वाटूं लागतें. मंदगतीमुळें त्याचें रोग हें वाईट स्वरूप आपल्या नजरेस येईनासें होतें. तथापि सशास्त्र दृष्टीनें तो रोगच. तसेंच पत्नीबद्दल फाजील आसक्ति असणें हाही वास्तविक रोगच आहे; पण त्याचें सान्निध्य कित्येक शतकें – सहस्रकें – असल्यामुळें आपण त्याला कर्तव्य हें गोंडस आणि भपकेबाज नांव दिलें आहे. लग्न झालें म्हणजे ताशेमर्फे वाजत्रावेत, ब्राह्मणांनीं मंत्र म्हणावेत, देव आणि अग्नि साक्षीस आणावेत आणि लोकांनीं फुलें – अक्षता उधळाव्यात आणि लग्न झाल्यावर त्याच बायकोच्या नादीं लागून नवऱ्यानें वाटतील तीं अमानुष कृत्यें करावींत आणि त्याला कुटुंबाचें कर्तव्य असें नांव द्यावें. हा प्रकार जगांत जिकडे तिकडे चालू आहे. सामान्य व्यवहारांत ज्याला आपण कर्तव्य असें म्हणतों, त्याचा थोडासा उपयोग इतकाच आहे कीं तेवढी तरी जाणीव असल्यानें मनुष्य अगदींच पशूच्या कोटीस न जातां

थोडासा तरी शुद्धीवर असतो. ज्या पामरांना ह्याहून उच्च दर्जाचा विचारच मनांत येणें शक्य नाहीं, त्यांस अधिक खालीं जाऊं न देण्याकरितां ह्या बागुलबोवाचा उपयोग होतो. पण ज्यांना कर्मयोगी व्हावयाचें असेल त्यांनीं कर्तव्याच्या ह्या सामान्य कल्पनेस आपल्या डोक्यांतून प्रथम हद्दपार केलें पाहिजे. असलें कर्तव्य तुमच्या–आमच्यासारख्यांच्या उपयोगी नाहीं. जगाकरितां कांहीं करावयाचें आमच्या मनांत असेल तर तें आम्ही खास करूं; पण कर्तव्याच्या बागुलबोवास भिऊन मात्र नाहीं. कर्तव्याचें भूत आमच्या पुढें उभें करून आम्हांस कोणी कांहीं करावयास भाग पाडील ही गोष्ट कोणीं स्वप्नांतही आणूं नये. आम्हांस कोणतेंही कर्म करावयास भाग पाडणारा कोणी मायेचा पूत जन्मास आला आहे काय? नाहीं, खास नाहीं. आपण नित्य लक्षांत बाळगिलें पाहिजे तें हें कीं कोणासही भिऊन अथवा कोणीं भाग पाडलें म्हणून आपण कांहीं कर्म केलें तर त्याचें पर्यवसान शेवटीं आसक्तींत व्हावयाचेंच. अमक्यासाठीं कर्तव्य आणि तमक्यासाठीं कर्तव्य असला नेभळटपणाचा विचारच मनांत आणूं नका. आपला देह, आपलें मन आणि आपलें सर्वस्व परमेश्वराच्या चरणीं अर्पण करा. धडाडून पेटलेला हा संसाराग्नि आपणां सर्वांची पूर्णाहुति घेण्याची इच्छा करीत आहे. त्याच्या ज्वाला प्रत्येक क्षणीं जवळ जवळ येत आहेत. त्यांचा दुःसह ताप आपणांस भाजून काढीत आहे. मित्रांनो, हा अमृताचा पेला घ्या म्हणजे हाच अग्नि चंद्रासारखा शीतल होईल आणि तुम्हांस अनुपमेय सुखाची प्राप्ति होईल. वास्तविक कर्ता करविता निराळा असून आपण सर्व त्याचे नुसते हस्तक आहों. असें असतां तुम्हांला एखाद्या कर्माबद्दल बक्षीस हवेंसें वाटलें तर दुसऱ्या एखाद्या कर्माबद्दल चाबूक खाण्याचीही तुमची तयारी असली पाहिजे. चाबूक नको असें वाटत असेल, तर बक्षिसाची आशा सोडली पाहिजे. चाबूक आणि बक्षीस हे सहोदर आणि संलग्न असल्यामुळें जेथें एक जातो तेथें दुसरा येणारच. त्यांची जोडी फुटणें शक्य नाहीं. तुमच्या एका बाजूस सुख आणि दुसऱ्या बाजूस दुःख

अशीं जोडीनें चाललीं आहेत. एका बाजूस जीवित आहे तर दुसऱ्या बाजूस मृत्यु आहे. जर तुम्हांस मृत्यूच्या पलीकडे जावयाचें असेल तर जीविताची आशा सोडली पाहिजे. तशा स्थितींत तुम्हीं प्रवेश केला तर चालू जीवित आणि मृत्यु ह्यांची किंमत तुम्हांस सारखीच वाटूं लागेल. असो. ह्यावरून दुःखावांचून निर्भेळ सुखाचें जीवित आणि मृत्यूवांचून जीवित ह्या कल्पना शाळेंत जाणाऱ्या पोरांसच शोभणाऱ्या आहेत, अशी तुमची खात्री होईल. ज्याची दृष्टि ज्ञानमय झाली आहे, त्याला ह्या स्थितीची अशक्यता तेव्हांच पटते आणि तो ह्या कल्पनेचा तत्क्षणींच त्याग करून सुखी होतो. जें कांहीं तुम्ही करीत असाल त्यापासून स्तुतीचा एखादा शब्द अथवा कांहीं बक्षीस मिळण्याची आशा करूं नका. आपण एखादें चांगलें कृत्य करण्याचीच खोटी कीं त्याजबद्दल आपला गौरव व्हावा, असें आपणांस वाटूं लागतें. एखाद्या निराश्रितांच्या फंडाला थोडेसे पैसे दिले कीं आपलें नांव कोणकोणत्या पत्रांत आलें आहे, ह्याचा आपण प्रथम शोध करूं लागतों. आपल्या मनांत तृष्णा इतकी रसरसत असतां तिच्यापासून दुःखाची प्राप्ति होऊं नये हें शक्य तरी आहे काय? ज्यांनीं जगावर महदुपकार करून ठेवले आहेत, अशा महात्म्यांचीं नांवेंही कोणास ऐकूं न येतां ते जग सोडून गेले. बुद्ध आणि ख्रिस्त हे ज्यांच्या तुलनेनें फिक्के पडतील, अशा मनुष्यांनीं आपलीं नुसतीं नांवेंही कोणाच्या कानीं जाऊं दिलीं नाहींत. आजपर्यंत प्रत्येक देशांत असे शेकडों महात्मे जन्मास आले आणि आपलें कार्य करून गेले. देहधारी असतां त्यांनीं जगावर अनंत उपकार केले आणि ते गेले. त्यांचेच विचार बुद्ध आणि ख्रिस्त ह्या रूपानें आपणांस प्रत्यक्ष दिसले, पण खुद्द त्यांचें दर्शन आपणांस झालें नाहीं; एवढेंच नव्हे तर त्यांचीं नांवेंही आपणांस ऐकूं आलीं नाहींत. स्वतःच्या ज्ञानाचें पर्यवसान मोठ्या नांवांत – कीर्तींत – व्हावें अशी इच्छाही त्यांस कधीं शिवली नाहीं. आपला विचार जगावर सोडून ते मोकळे होतात. त्याबद्दल स्तुतीचा एखादा शब्द ऐकावा अथवा एखादा नवा धर्म अगर

पंथ काढावा असेंही त्यांस वाटत नाहीं. त्यांची वृत्ति म्हणजे शुद्ध सात्त्विकतेची मूर्तिच असते. प्रेमरसानें ते ओथंबलेले असतात. गडबड आणि धडपड हीं त्यांच्या स्वभावास खपतच नाहींत. हिमालयांतील एका गुहेंत अशा एका योग्याचें दर्शन मला झालें. त्याचा अहंकार अगदीं समूळ नष्ट झाला होता. सर्वतोपरी बद्ध असें जें मानवरूप तें पूर्ण नष्ट होऊन शुद्ध परमेश्वरस्वरूपच तो झाला होता. त्याच्या एका हातास एखाद्या प्राण्यानें दंश केला तर तो आपला दुसरा हात ताबडतोब पुढें करी. 'परमेश्वराची मर्जीच तशी' असें तो म्हणत असे. जें जें कांहीं घडतें तें तें परमेश्वराच्या मर्जीनेंच घडतें, असा त्याच्या बुद्धीचा निश्चय झाला होता. त्याचें दर्शन फार करून कोणास होत नसे. तथापि प्रेम आणि ज्ञान ह्यांची केवळ चिन्मूर्तिच तो होता.

ह्या सात्त्विक पुरुषांच्या खालोखाल ज्ञानी पण रजोगुणी अशा पुरुषांची पायरी असते. सात्त्विक पुरुषांपासून मिळालेलें ज्ञान सर्व जगाला सांगण्याचें काम हे पुरुष करतात. अत्युच्च दर्जाच्या सात्त्विक पुरुषांनीं जें शुद्ध ज्ञान सांठविलेलें असतें, तें जगांत पसरविण्याचें काम बुद्ध आणि खिस्त करीत असतात. 'मी पंचविसावा बुद्ध आहें' असें गौतमबुद्धानें जागोजाग सांगितलें आहे. पहिले चोवीस बुद्ध कोण होते, त्यांनीं काय सांगितलें वगैरे हकीकत आपणा मानवजातीस उपलब्ध नाहीं. तथापि त्यांच्याच ज्ञानाच्या बळावर ज्यानें आपल्या ज्ञानरूपी इमारतीचा पाया रचला, तो पंचविसावा बुद्ध मात्र आपणांस माहीत आहे. केवळ विचारांत केवढें सामर्थ्य वास करीत असतें, ह्याची जाणीव त्या पूर्वीच्या बुद्धांस पूर्णपणें होती. मनुष्यजातीस अज्ञात अशा एखाद्या गुहेंत आपण जाऊन राहिलों व केवळ पांचच विचारतरंग आपल्या चित्तांत उद्भवले तरी ते अनंतकाल जगांत राहातील अशी त्यांची पक्की खात्री होती. असे पांच विचारतरंग पर्वतांच्या कित्येक गुहा फोडून व अनेक समुद्र ओलांडून सर्व जगभर प्रवास करून त्यांत भरून राहातील असें सामर्थ्य त्यांत असतें.

त्यांचें ग्रहण करण्यास योग्य अशीं मानवी अंतःकरणें सापडतांच ते त्यांत शिरून त्यांस जागे करतात. ज्यांना ह्या विचारांनीं जागृति आली आहे, अशीं स्त्रीपुरुषें त्या विचारांचें व्यवहार्यरूप आचरणांत व्यक्त करतात. जगाच्या कल्याणाकरितां झालें तरी त्यांत फिरून ज्ञान सांगावयाचें म्हणजे वादविवाद होणार आणि अनेक प्रकारच्या अडचणींशीं तोंड देण्याचे नित्य प्रसंग येणार हें उघड आहे. हें करावयास बऱ्याच रजोगुणाची अपेक्षा असते. ह्यामुळें सत्त्वगुणैकमूर्ति महात्मे जगांत येऊन आपलें ज्ञान व्यक्त करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. केवळ ब्रह्मरूप होऊन बसल्यानंतर जगाच्या अस्तित्वाची जाणीव उत्पन्न होण्याइतकाही रजोगुण त्यांच्या ठिकाणीं नसतो. प्रत्यक्ष कार्यकारी जे बुद्ध आणि ख्रिस्त हे कितीही उत्तम पुरुष असले तरी अज्ञानाची शेवटची छटा त्यांच्या ठिकाणीं राहिलेली असते. आपल्या हृदयांत अशुद्धत्व थोडें तरी शिल्लक असल्या-शिवाय जगांत येऊन काम करणें आपणांस शक्य नाहीं. कोणतेंही कर्म झालें, तरी कर्म म्हटलें कीं त्यांत हेतु आणि आसक्ति ह्यांची अगदीं थोड्या अंशानें तरी उत्पत्ति असावयाचीच. कर्मांचा हा स्वभावच आहे. परंतु एखादें क्षुद्र कार्य करून त्याबद्दल महत्कीर्तीची अपेक्षा करणें हें मूर्खपणाचें आहे. ज्याच्या इच्छेवांचून गवताची एक काडीही इकडची तिकडे होऊं शकत नाहीं व जो अगदीं अणुवत् कीटकाचीही पूर्ण काळजी वाहातो, त्या परमात्म्यासमोर उभें राहून आपण आपल्या क्षुद्र कृत्यांचा डांगोरा पिटावा हें आपणांस शोभतें काय ? वास्तविक विचार केला तर असें करणें हें परमेश्वराचा अत्यंत उपमर्द करण्यासारखें आहे. त्याच्यासमोर उभें राहून ‘ परमेश्वरा ! तुझी मर्जी ’ इतकेंच म्हणण्याची आपली योग्यता आहे.

सत्त्वगुणैकमूर्ति पुरुष प्रत्यक्ष जगांत कांहींच कार्य करीत नाहींत ; कारण त्यांच्या ठिकाणीं आसक्तीचा यत्किंचित् अंशही उरलेला नसतो. ज्यांच्या वृत्ति ब्रह्माच्या ठिकाणीं अत्यंत लीन झाल्या आहेत, ज्यांच्या सर्व वासना ब्रह्मरूप पावल्या आहेत, सदैव ब्रह्मचिंतन करणें हाच ज्यांचा उद्योग, त्यांस

करावयाचें असें कांहींच उरलेलें नसतें. ही अगदीं शेवटची पायरी झाली. पण त्याशिवाय बाकीच्या सर्वांस कर्म करणें भागच आहे. परंतु कर्म करीत असतां त्यामुळें विश्वांतील एखाद्या अणूलाही आपल्याकडून मदत होत आहे, असा विचार आपल्या चित्तास शिवूं नये. कारण त्यास स्वतंत्रपणें मदत करणें हें आपणांस शक्यच नाहीं. ह्या जगद्रूपी तालमींत आपण आपलेंच शरीर कमावीत असतों. कर्म करीत असतां सदैव ध्यानांत बाळगावयाचें तें हेंच. आपण ह्या गोष्टीचा केव्हांही विसर पडूं दिला नाहीं व कर्म करणें हा एक विशिष्ट हक्कच परमेशाच्या कृपेनें आपणांस प्राप्त झाला आहे अशी भावना बाळगली म्हणजे आसक्ति आपल्या चित्तांत बिऱ्हाड करणार नाहीं. तुमच्या आमच्यासारखे लक्षावधि लोक स्वत:स मोठे समजून त्यांत गर्क असतात; पण तुम्ही आम्ही मरण पावलों तर पांच मिनिटांच्या आंतच तुमचें आमचें विस्मरण जगास होईल. परमेश्वराची मर्जी नसेल तर एक क्षण तरी जिवंत राहाणें तुम्हां-आम्हांस शक्य आहे काय? सर्व कर्ता करविता तोच आहे. सर्व सामर्थ्य त्याचेंच. विश्वांतील यच्चयावत् वस्तूंत आढळणारें सामर्थ्य त्याच्या इच्छेवरच अवलंबून आहे. त्याच्याच आज्ञेनें वारा वाहतो, सूर्य प्रकाशतो, माणसें जगतात आणि मृत्यु हरण करतो. सर्व तोच आणि सर्वांतर्यामीं तोच. त्याची पूजा करावी इतकीच आपली योग्यता. सर्व कर्मांचें फळ त्यास अर्पण करा. चांगलें कर्मही केवळ त्याच्याचसाठीं, त्याच्याच हुकमानें करावयाचें अशी दृढ भावना धरा; म्हणजे अनासक्ति तुमच्या ठिकाणीं उत्पन्न होईल. आपणांस जखडणारे पाश खटाखट तुटून आपण मुक्त होऊं. मुक्ति मिळविणें हेंच कर्मयोगाचें साध्य आहे.

# प्रकरण आठवें

# कर्मयोगाचा आदर्श

अनेक प्रकारच्या निरनिराळ्या मार्गांनीं गेलें तरी सर्वांचें पोचण्याचें ठिकाण एकच आहे, ही वेदान्ताची कल्पना अत्युच्च दर्जाची आहे. हे मार्ग सामान्यतः चार प्रकारचे आहेत. कर्मयोग, भक्तियोग, राजयोग आणि ज्ञानयोग. हे चार मार्ग भिन्न असले, तरी त्यांचा परस्परांशीं कांहींच संबंध नाहीं असें मात्र नव्हे. केवळ नांवांवरून भिन्नता दिसते तितकी ती प्रत्यक्ष आचारांत नसते, ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. बाह्यतः जरी ते मार्ग वेगळे दिसले तरी तत्त्वतः त्यांचा एकमेकांशीं अत्यंत निकट संबंध आहे. त्यांच्यापैकीं व्यवहारांत ज्याचें स्वरूप अधिक उघड दिसतें त्यावरून एखादें विशिष्ट नांव त्या मार्गास आपण देतों; पण त्यामुळें इतर मार्गांतलें कोणतेंही तत्त्व त्यांत अंतर्भूत होणार नाहीं, असें नाहीं. एखादा मनुष्य कर्मयोगी असला तरी तो ज्ञानी असणार नाहीं, असें नाहीं. एखादा भक्त असूनही राजयोगी असूं शकेल, अथवा तिसरा एखादा ज्ञानी असून भक्तही असेल. एखाद्या मनुष्यांत एखाद्या मार्गाचें स्वरूप उघड दिसतें व त्यावरून तो अमूक मार्गाचा असें आपण म्हणतों इतकेंच. हे चार मार्ग आरंभीं भिन्न दिसले तरी त्यांचें लक्ष्य एकच असल्यामुळें पुढें पुढें ते एकमेकांजवळ येतात व शेवटीं त्या लक्ष्यांत एकरूप व एकजीव होतात. त्याचप्रमाणें जगांतील सर्व धर्म आणि पंथ ह्यांचें पर्यवसान शेवटींही त्याच लक्ष्यांत होतें.

हें लक्ष्य - साध्य - कोणतें ह्याचा उलगडा मीं पूर्वीं केलाच आहे. मुक्ति मिळविणें हेंच सर्वांचें साध्य आहे. आपणाभोंवतीं दिसणारा प्रत्येक अणुरेणु मुक्तीसाठींच धडपड करीत आहे. नुसत्या डोळ्यांनीं न दिसण्या-इतक्या सूक्ष्म पदार्थांपासून तों मनुष्यापर्यंत आणि अगदीं निर्जीव जडपदार्थांपासून तों जगांतील अत्युच्च दर्जाच्या जीवात्म्यापर्यंत सर्वांची धडपड केवळ मुक्तीकरितां आहे. किंबहुना ही धडपड आहे म्हणूनच हें विश्व आकाराला आलें आहे. प्रत्येक अणूच्या गतीचें सूक्ष्म अवलोकन केलें, तर तो इतरांपासून दूर दूर जाण्याचा प्रयत्न करीत असून, इतर अणु त्याला आपल्याजवळ ओढीत असतात असें आढळून येईल. आपली ही पृथ्वी सूर्यापासून लांब जाण्याचा प्रयत्न प्रत्येक क्षणीं करीत आहे. तसेंच चंद्रही पृथ्वीपासून दूर जाण्यासाठीं, प्रत्येक क्षणीं धडपड करीत आहे. भोंवतालचीं बंधनें तोडून अनंतांत जाऊन मिळावें हाच हेतु ह्या साऱ्या धडपडीच्या मुळाशीं आहे. केवळ ह्याच हेतूनें प्रेरित होऊन सत्पुरुष परमेश्वराची भक्ति करतात आणि ह्याच हेतूनें चोरही चोऱ्या करतात. सर्व कर्मांच्या मुळाशीं हेतु एकच आहे. हा हेतु सिद्ध करण्याचा मार्ग अयोग्य असला म्हणजे त्याला आपण पातक असें नांव देतों व योग्य मार्गानें हेतु सिद्ध करूं पाहाणारास आपण सज्जन म्हणतों. मार्गाच्या इष्टानिष्टतेप्रमाणें नांवें भिन्न झालीं तरी मुळांत हेतु तोच आहे. मुक्ति मिळवून अनंताशीं एकरूप – एकजीव – होणें हाच हेतु सर्व विश्वांतील पदार्थांचा आहे. आपणाभोंवतीं असणारे पाश कोणत्या प्रकारचे आहेत ह्याचें ज्ञान होऊन त्यांच्या जाचामुळें श्रमी झालेला पुरुष परमेश्वराची प्रार्थना करतो आणि आपणांपाशीं अमूक वस्तु नाहीं ह्या विचारानें श्रमी झालेला पुरुष ती वस्तु मिळविण्याकरितां चोरी करतो. 'माझ्याजवळ अमूक वस्तु नाहीं,' हा विचारच येथें पाशरूप झालेला असतो. ती वस्तु मिळाली म्हणजे ह्या पाशाचें अस्तित्व नाहींसें होईल, ह्या भावनेनें चोर चोरी करतो. विश्वांतील यच्चयावत् पदार्थ – जड अथवा सचेतन – मुक्तीसाठींच

धडपडत आहेत. आपण मुक्तीसाठीं धडपडत आहों ह्याचें ज्ञान कित्येकांस असतें आणि कित्येकांस नसतें. पण एवढ्या फरकामुळें मार्ग भिन्न होऊन अंतिम परिणामही विपरीत होतात. आपली गरज काय आहे व ती पुरविण्याचा मार्ग कोणता ह्याचें ज्ञान ज्यास बरोबर झालें आहे, असा मनुष्य योग्य मार्गावर आरूढ होऊन शेवटीं अनिर्वाच्य सुखाच्या स्थितीस पोचतो. परंतु आपली वास्तविक गरज काय आहे ह्याचेंच ज्ञान चोरास नसतें; ह्यामुळें विपरीत मार्गानें जाऊन शेवटीं त्याची फसगत होते. जीवात्मा मोकळा व्हावयाचा तो बाजूस राहून उलट आणखी नवे पाश त्याच्या गळ्यांत पडतात. ह्याकरितां आपणास पाहिजे काय व तें मिळविण्याचा मार्ग कोणता ह्याचें बरोबर ज्ञान असणें प्रत्येकास आवश्यक आहे.

जगांतील सर्व धडपड मुक्तीकरितां सुरू आहे, ही गोष्ट सर्व धर्मांनीं सूचित केली आहे. सर्व धर्मांनीं प्रतिपादिलेलीं नीतितत्त्वें व सांगितलेला स्वार्थत्याग ह्यांच्या मुळाशीं हेंच तत्त्व आहे. मी म्हणजे देह हा जो जन्मापासून लागलेला अध्यास तो सुटून जीवात्मा मुक्त व्हावा ह्याकरितां सर्व धर्मांचा अवतार आहे. ज्या वेळीं एखादा मनुष्य परोपकारासाठीं झटतो असें आपण पाहातों त्या वेळीं त्याची बुद्धि केवळ ‘मी’ आणि ‘माझें’ एवढ्यांतच गुंतली नसून ही हद्द त्यानें ओलांडली आहे असें सहज आपल्या लक्षांत येतें. तथापि परोपकार करीत असतां दिसून येणारा स्वार्थत्याग कितीही मोठा असला तरी ती शेवटची पायरी नव्हे, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. परोपकाराकरितां जीव दान दिला तरी त्याच्या मुळाशीं कीर्तिसंपादनाचा स्वार्थ असण्याचा संभव आहे. ह्यासाठीं ‘मी’ आणि ‘माझें’ ह्यांची पूर्ण विस्मृति होणें हेंच साध्य आहे, असें सांगण्याचा सर्व धर्मांचा, पंथांचा अथवा नीतिशास्त्रांचा रोख आहे. मनुष्याला अशा प्रकारचा पूर्ण त्याग करतां आला, तर त्याची स्थिति तरी कोणत्या प्रकारची होईल, अशा प्रकारचा प्रश्न उद्भवेल. त्यावर उत्तर असें कीं अशी स्थिति

प्राप्त झाल्यानंतर असा मनुष्य अमूक एक गोमाजी ( देहधारी ) अशा स्वरूपाचा राहिला नसून तो विश्वव्यापी झाला असें समजावें. विश्वांत जें जें म्हणून दृश्यास आलेलें आहे, तें तें सर्व तोच, इतका त्याचा मोठा विस्तार होतो. ‘ मी ’ आणि ‘ माझें ’ म्हणणारी त्याची क्षुद्र वृत्ति अनंतत्वांत एकवार हरवली म्हणजे तिचा पुन्हा पत्ता लागत नाहीं. सर्व धर्म, सर्व नीतिशास्त्रें आणि सर्व तत्त्वज्ञान हेंच साध्य साधा, म्हणून उपदेश करीत आहेत. हें स्थितिवर्णन ऐकून देहाध्यासपिशाचानें पूर्ण पछाडलेल्या मनुष्याची भीतीनें गाळण उडते. परंतु अशीं मनुष्येंही नीतितत्त्वांचा उपदेश करीत असतात, असें पुष्कळ वेळां आढळून येतें. अशा वेळीं स्वत:स न समजतां तीं त्याच साध्याचा उपदेश करीत असतात. मनुष्य कितीही देहाध्यासी असला तरी अमूक एक प्रतीचा स्वार्थत्याग केला म्हणजे नीतीची परमसीमा झाली असें म्हणत नाहीं. किंबहुना अशा प्रकारची परमसीमा निश्चित करतां येणेंच त्यास शक्य नाहीं. अशा रीतीनें केवळ नीतिशास्त्राचा पूर्ण अवलंब करावयाचा म्हटलें तरी विश्वरूप होईपर्यंत मध्यें कोठें थांबतां येणेंच शक्य नाहीं. आमचें तरी म्हणणें हेंच आहे कीं विश्वरूप होणें हीच शेवटची पायरी आहे. मग ती तुम्हीं कोणत्या मार्गानें सिद्ध केली हा प्रश्न यत्किंचितही महत्त्वाचा नाहीं. आमच्या विचारांत व देहाध्यासी मनुष्याच्या नीतिमार्गांत फरक इतकाच कीं त्याला स्वत:च्याच सदसद्विवेकबुद्धीस शेवटपर्यंत चिकटून राहाण्याची छाती होत आहे. त्याच्याच बुद्धीनें दाखविलेलें अंतिम साध्य पाहून त्याला भीति वाटते. जिच्यासाठीं सर्व सृष्टि धडपड करीत आहे त्या मुक्तीचा मार्ग दाखविणें हेंच कर्मयोगाचेंही साध्य आहे. स्वार्थ विसरून अनासक्त विचारानें कर्म केलें म्हणजे मुक्ति मिळते असें कर्मयोगाचें सांगणें आहे. ह्या एकंदर विवेचनाचा मथितार्थ हा आहे कीं स्वार्थप्रेरित प्रत्येक कर्म आपणांस आपल्या साध्यापासून दूर नेतें आणि अनासक्त चित्तानें केलेलें प्रत्येक कर्म आपणांस आपल्या साध्याच्या जवळ नेतें आणि ह्यावरून नीति आणि अनीति ह्यांची व्याख्या अशी

आहे कीं प्रत्येक स्वार्थप्रेरित कर्म अनीतिवर्धक आणि निःस्वार्थी असें प्रत्येक कर्म नीतिवर्धक.

अनीतिवर्धक कर्में आणि नीतिवर्धक कर्में ह्यांची व्याख्या परमार्थतः इतकी सोपी असली तरी त्या कर्मांचें प्रत्यक्ष – व्यवहार्य – स्वरूप ठरविणें सोपें नाहीं. परिस्थिति बदलली म्हणजे पूर्वींचीं विहित कर्में अविहित कशीं होतात व पूर्वीं अविहित म्हणून समजलेलीं कर्में विहित होण्याचा संभव कसा उत्पन्न होतो, ह्याचें विवेचन पूर्वीं एकवार केलेंच आहे. एक कर्म एखाद्या परिस्थितीस अनुरूप व विहित असलें, तरी तेंच कर्म परिस्थिति बदलल्याबरोबर अननुरूप व अविहित होतें. तसेंच विशिष्ट परिस्थितींत एखादें कर्म निःस्वार्थी असलें तरी परिस्थिति बदलली तर तेंच कर्म स्वार्थी होण्याचा संभव असतो.

अमूक एक कर्म स्वार्थी व अमूक दुसरें निःस्वार्थी असें निश्चयानें ठरवितां येणें शक्य नाहीं; त्या अर्थी अशा कर्मांची सर्वसामान्य व्याख्या सांगितली आहे. देश, काल आणि परिस्थिति ह्यांस अनुसरून विहित कर्म कोणतें आणि अविहित कोणतें, हें ज्याचें त्यानेंच ठरविलें पाहिजे. एखाद्या देशांत अमूक एक प्रकारची वागणूक नीतिसंमत समजली जाते; परंतु दुसऱ्या देशांत निराळ्या परिस्थितीमुळें तीच वर्तणूक नीतिबाह्य ठरण्याचा संभव आहे. सर्व धडपडींचा – सर्व कर्मांचा – अंतिम हेतु मुक्ति हा असून अत्यंत निःस्वार्थी कर्में करणें हाच मोक्षाचा मार्ग होय, इतकेंच तात्त्विक दृष्ट्या सांगणें शक्य आहे. अत्यंत निःस्वार्थी असें प्रत्येक कर्म, असा प्रत्येक विचार आणि शब्द आपणांस मोक्षाकडे नेतो आणि म्हणूनच तो नीतिवर्धक. प्रत्येक धर्मांत आणि प्रत्येक नीतिग्रंथांतील विवेचनांत नीतीची हीच व्याख्या लागू पडते असें आपणांस आढळून येईल. कित्येक ग्रंथांत नीति ही परमेश्वराची आज्ञा आहे, असें प्रतिपादन केलें आहे. मनुष्यानें अमूक एक कर्म कां करावें अथवा अमूक एक कर्म कां करूं नये, अशा प्रश्नांस ' परमेश्वराची आज्ञा म्हणून ' इतकेंच उत्तर

आपणांस मिळेल. नीतिविषयक कल्पनांच्या उत्पत्तीचें मूलस्थान कोणतेंही असलें तरी त्यांच्या पोटीं निःस्वार्थ हेंच तत्त्व गोवलें असल्याचें आपणांस आढळून येईल. नीतिदृष्ट्या अथवा धर्मदृष्ट्या ह्या सिद्धान्ताचा उच्चपणा इतका उघड असतां ' तूं स्वतःला विसर ' असें म्हटल्याबरोबर कित्येक लोक गर्भगळित होतात, हें आश्चर्य नव्हे काय? एखाद्यानें केवळ स्वतःसाठीं असें कोणतेंही कर्म करावयाचें सोडून दिलें, स्वतःबद्दल तो अक्षरही उच्चारीनासा झाला अथवा स्वतःबद्दल कांहीं विचारही त्याच्या मनांत येईनासा झाला, तर अशा मनुष्यांत ' मी ' आणि ' माझें ' ह्यांचें वास्तव्य कोठें आढळेल? किंबहुना, ' तूं कोण ' असा प्रश्न आपण त्या मनुष्यास केला तर तो स्वतः तरी ह्या प्रश्नाचें काय उत्तर देईल? स्वतःबद्दल यत्किंचित् तरी विचार शिल्लक असल्याशिवाय ' मी ' आणि ' माझें ' ह्या भावनेची उत्पत्ति होणेंच शक्य नाहीं. मग स्वतःबद्दलचा विचारही ज्याच्या चित्तांतून लुप्त झाला आहे, स्वतःबद्दलची ज्याची भावना विश्वभावाशीं एकरूप झाली आहे, अशा मनुष्याच्या चित्तांतून हरवलेलें ' मी ' आणि ' माझें ' पुन्हा परत मिळण्याची आशा आहे काय? त्यानें उत्तर दिलेंच तर " **मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं ॥ न च श्रोत्रजिव्हे न च घ्राणनेत्रे** " अशाच प्रकारचें कांहीं उत्तर तो देईल. ' मी ' आणि ' माझें ' हें एकवार अनंतत्वांत हरवलें म्हणजे तें कायमचेंच हरवलें.

अशा रीतीनें नीतितत्त्वें आणि धर्मतत्त्वें ह्यांचा सुखकर मिलाफ कर्मयोगांत झाला असून ' निःस्वार्थी होऊन आणि युक्तकर्मे करून मुक्त हो, ' असा त्याचा उपदेश आहे. अमूक एका मतावर विश्वास ठेवला पाहिजे अथवा अमूक एक धर्म खरा मानिला पाहिजे असें बंधन कर्मयोग्यास नाहीं. फार काय, पण परमेश्वराचें अस्तित्वही त्यास मान्य नसलें तरी चालेल. आत्मा काय आहे आणि परमात्मा कोण, इत्यादि प्रमेयांचें उद्घाटन करीत बसण्याचेंही त्यास प्रयोजन नाहीं. ह्या देहांत प्रत्ययास येणारा इतकाच ' मी ' नसून त्याचें खरें स्वरूप जाणण्याचा कर्मयोगाचा

मार्गच निराळा आहे. हा मार्ग कर्मयोग्यानें स्वतःच आक्रमिला पाहिजे. आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं त्यानें स्वार्थ विसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जीं प्रमेयें बुद्धीला आटोकाट ताण देऊन समजावयाचीं तींच प्रमेयें कर्मयोग्याला कर्में करून प्रत्यक्ष प्रमाणानें अनुभवावयाचीं असतात. त्याला कोणत्याही मताची अथवा कोणत्याही उपपत्तीची मदत होण्याचा संभव नसतो. अव्यभिचारी भक्तीनें भक्ताला अथवा अत्युच्च ज्ञानानें ज्ञान्याला जो अनुभव होतो, तोच कर्मयोग्याला कर्मांनीं मिळवावयाचा असतो. निःस्वार्थी कर्में हाच कर्मयोगांतील पहिला धडा आहे.

आतां ह्यापुढें आणखी एका प्रश्नाचा विचार कर्तव्य आहे. 'कर्म म्हणजे काय? निःस्वार्थी कर्म करा, जगाच्या बऱ्यासाठीं कर्म करा, असें तुम्ही म्हणतां; पण आमच्या हातून जगाचें बरें काय होणार?' अशा प्रकारच्या प्रश्नपरंपरेस काय उत्तर देतां येईल ह्याचा आतां विचार करूं. आपणास जगाचें बरें करतां येईल कीं नाहीं, ह्या प्रश्नास केवळ निरपेक्ष दृष्टीनें — केवळ परमार्थदृष्टया — उत्तर द्यावयाचें म्हटलें तर तें नकारार्थींच दिलें पाहिजे. केवळ तात्त्विकदृष्टया बोलावयाचें म्हटलें तर जगाचेंच काय पण एखाद्या क्षुद्र व्यक्तीचेंही आपण बरें करूं शकत नाहीं. पण ह्या विचारांत दुसरीही एक दृष्टि आहे, ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. सापेक्ष दृष्टीनें पाहातां आपणांस बऱ्याच गोष्टी जगाच्या बऱ्याकरितां करतां येणें शक्य आहे. जगाचें चिरकालिक कल्याण होईल अशी एकही गोष्ट आपणांस करतां येणें शक्य नाहीं. कारण तसें असतें तर आज जगाची जी स्थिति आहे तशी ती आपणांस आढळली नसती. क्षुधिताला अन्नदान करून त्याची भूक चालू वेळेपुरती भागविली तरी थोड्या वेळानें ती पुन्हा उद्भवणारच. अशाच रीतीनें मनुष्याच्या सुखासाठीं आपण केलेला प्रत्येक प्रयत्न खरोखरच क्षणभंगुर आहे, असें आपल्या प्रत्ययास येतें. सुखदुःखांचा जो ताप साऱ्या जगाच्या अंगांत भिनून गेला आहे, त्यावर रामबाण उपाय अजून कोणींही योजिला नाहीं. चिरस्थायी सुखाचें जीवित जगास देणें

शक्य तरी आहे काय? समुद्रांत एका ठिकाणीं लाट उठवावयाचा आपण उद्योग केला, तर तितक्याच प्रमाणानें दुसरीकडे खाडा पडतो. सुखसाधनांची कितीही समृद्धि केली, तरी मनुष्यांची हाव आणि ती पुरी करण्याचीं साधनें ह्यांचा मेळ अनादिकालापासून आजपर्यंत पडला नाहीं. जी स्थिति तेव्हां होती तीच आज आहे. त्या स्थितींत वृद्धि अथवा क्षय ह्यांपैकीं कांहींच झालेलें नाहीं. जगांतील आनंद आणि दुःख आणि उच्चनीच भाव पूर्वींप्रमाणेंच आतांही आहेत. गरीब आणि श्रीमंत, रोगी आणि निरोगी, आनंदी आणि दुःखी अशा अत्यंत विरुद्ध दशेंतील लोक पूर्वींप्रमाणेंच आतांही नाहींत काय? इजिप्शियन लोकांच्या वेळीं, ग्रीक लोकांच्या अमदानींत, रोमन रियासतींत अथवा सध्यांच्या अमेरिकन लोकसत्ताक अमलांत लोकस्थितींत यत्किंचितही फरक नाहीं. इतिहासकालापासून चालू क्षणापर्यंत जगाची स्थिति अगदीं एकसारखी आहे. असें असलें तरी मानवी दुःख हलकें करण्याचे प्रयत्नही इतिहासकालापासून चालू आहेतच. इतिहासकालापासून प्रत्येक शतकांत इतरांच्या बऱ्याकरितां झटणारीं हजारों स्त्रीपुरुषें जन्मास आलीं आणि त्यांच्या प्रयत्नांस कितपत यश आलें ह्याचा आढावा काढला तर? पण ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याची जरूरच नाहीं. फूटबॉलच्या खेळांत ज्याप्रमाणें चेंडू इकडून तिकडे आणि तिकडून इकडे जातो, त्याचप्रमाणें जगांतील सुखदुःखांची गति आहे असें आपणांस आढळून येतें. शारीरिक यातना हलक्या करण्यासाठीं यत्न करावे तों त्या यत्नांनींच मानसिक यातनांची वृद्धि होते, असा अनुभव येतो. सर्व जग सुखमय करून सोडावयाचें ही आपली कल्पना आरबी भाषेंतील गोष्टींत शोभण्यासारखी आहे आणि तिची वास्तविक योग्यताही तितकीच आहे. सर्व जग सुखी करण्यासाठीं म्हणून जें जें राष्ट्र पुढें सरतें, त्याची इच्छा पाहिली तर हीच कीं त्यांतल्या त्यांत त्या सुखांत स्वतःला मोठा वांटा मिळावा. अहाहा! ह्यापेक्षां अधिक निःस्वार्थी उद्योग कोणता आहे बरें! आणि असल्या निःस्वार्थी उद्योगानें जगाचें कोटकल्याण होणार!

जगांत सुखाची वृद्धि करणें जसें अशक्य आहे, त्याचप्रमाणें त्याच्या दु:खांतही थोडीसुद्धां भर टाकणें आपणांस अशक्य आहे. सुखदु:खाचें व्यक्त स्वरूप कोठें अधिक अथवा उणें दिसलें, तरी त्यामुळें ज्या शक्तीच्या योगानें ह्या संवेदना भासतात, त्या शक्तींत कांहीं अधिक उणेपणा येत नाहीं. सुखदु:खें इकडून तिकडे गेलीं अथवा तिकडून इकडे आलीं, तरी एकंदर समवायी परिणामांत त्यामुळें वैगुण्य येत नाहीं. निरंतर एकरूप राहाणें हा त्या शक्तीचा स्वभावच आहे. त्याचप्रमाणें जीवित आणि मरण व सुख आणि दु:ख हीं द्वंद्वें असणें, हा जगाचा स्वभावच आहे. ह्या द्वंद्वांवांचून जगाची उत्पत्ति आणि स्थिति शक्यच नाहीं. तसें नसतें तर अनंतकालपर्यंत आपण देह धारण करूं अशी इच्छा करणें वावगें झालें नसतें. परंतु जीविताची कल्पना आली कीं तिजबरोबर मृत्यूचीही कल्पना अवश्य येणारच. सुखाच्या कल्पनेबरोबर दु:खाच्याही कल्पनेचा जन्म होणारच. हीं द्वंद्वें आहेत म्हणून जग आहे. हीं द्वंद्वें नाहींशीं झालीं तर त्याच क्षणीं जगही अदृश्य होईल. खरें चिरकाल जीवित तुम्हांस हवें असेल तर तें मिळविण्यासाठीं तुम्हांस क्षणोक्षणीं मेलें पाहिजे. ज्यांना आपण जीवित आणि मृत्यु ह्या नांवांनीं ओळखतों, तीं तात्त्विकदृष्ट्या एकाच स्थितीचीं दोन अंगें आहेत; परंतु दृष्टिभेदामुळें त्यांची एकतानता आपल्या लक्षांत येत नाहीं. समुद्रांत एका ठिकाणीं लाट उठली म्हणजे उंचवटा झाल्यासारखा दिसतो व दुसऱ्या ठिकाणीं खाडा दिसतो, तरी त्यामुळें ज्याप्रमाणें त्याच्या पृष्ठभागांत वास्तविक वैगुण्य येत नाहीं, त्याचप्रमाणें जीवित आणि मृत्यु हीं एकाच स्थितींत उत्पन्न होणाऱ्या लाटेप्रमाणें आणि खड्ड्याप्रमाणें आहेत. अशा रीतीनें दोन अंगें मिळून एक स्थिति आहे. केवळ मृत्यूच्या म्हणजे खड्ड्याच्या अंगाकडे पाहाणारे ते निराशावादी बनतात व जीविताच्या म्हणजे लाटेच्या बाजूकडे पाहाणारे असतात ते आशावादी बनतात. शाळेंत जाणारीं मुलें पाहावीं तेव्हां आनंदी दिसतात; त्यांच्या गरजा भागविण्यास त्यांचे आईबाप हजर असतात; त्यांना ह्या जगांत कांहीं उणीव आहे,

ह्याचें भानच नसतें; ह्यामुळें नैराश्याचे प्रसंगही त्यांस ठाऊक नसतात. तीच वृद्धाची स्थिति पाहा. ती मुलाच्या स्थितीच्या अगदीं उलट असते. जगांत अनेक प्रकारच्या कष्टांचा त्यास अनुभव येऊन त्याच्या वृत्ति शांत झालेल्या असतात. ह्यामुळें कसल्याही स्थितीनें तो हुरळून जात नाहीं. जी गोष्ट व्यक्तीला तीच राष्ट्रालाही लागू आहे. तारुण्यांत नुकतेंच प्रवेश करूं लागलेलें राष्ट्र आशावादी असलें—आपण म्हणूं तें करूं अशी धमक त्यास वाटत असली—तर त्यांत नवल नाहीं. परंतु वृद्ध राष्ट्राची स्थिति ह्याहून निराळी आहे. अनेक शतकें निरनिराळ्या परिस्थितीचा अनुभव येऊन त्याच्या वृत्तींत नैराश्यवादाचा प्रवेश झालेला असतो. ' हजार वर्षें शहर आणि हजार वर्षें रान ' अशा अर्थाची एक म्हण आहे. ही म्हण साऱ्या जगाच्या स्थितीस लागू आहे. आज वैभवाच्या शिखरावर असलेलीं राष्ट्रें उद्यां धुळीस मिळतात! आणि आज अत्यंत अवनतावस्थेंतला समाज उद्यां प्रगतीच्या उच्च शिखरावर आरूढ झालेला दिसतो. अशा रीतीनें परिस्थितींत बदल होत असतां ज्याच्या नजरेस जी परिस्थिति येते तिच्याकडे पाहून तो आशावादी अथवा निराशावादी बनतो; पण अशा अदलाबदलीमुळें जगाच्या सामान्य रूपांत कांहीं बदल होत नाहीं. जगांतील दुःखें नाहींशीं करूं पाहाणारांच्या मतांपैकीं एकाचा विचार येथवर केला.

अशा लोकांचें दुसरें एक तत्त्व समता हें आहे. जगांतील विषमावस्था हें त्याच्या दुःखाचें एक मोठें कारण असून ती नाहींशी होऊन सर्वत्र समता नांदूं लागली तर जग सुखी होईल, असें ह्या लोकांचें दुसरें तत्त्व आहे. सर्व जगाला सुखी करण्याची इच्छा करणें, ही कल्पना एका दृष्टीनें प्रशंसनीय आहे. केवळ ह्याच कल्पनेनें प्रेरित असे अनेक उद्योग चालू असल्याचें आपल्या पाहाण्यांत येतें. हिच्या अभावीं हीं कार्यें सुरू झालीं नसतीं. सर्व मानवजातींत समता उत्पन्न करणें हें आपल्या धर्माचें एक ब्रीदच आहे असें कित्येक धर्मांचे उपदेशक सांगत असतात. खुद्द परमेश्वर

ह्या पृथ्वीवर राज्य करण्यास येणार असून त्याच्या अमलांत विषमावस्था कोठें औषधासही मिळणार नाहीं, असें प्रतिपादन हे लोक मोठ्या जोरानें करीत असतात. असें प्रतिपादन करणारे लोक हे वस्तुतः धर्मवेडे असतात. धर्मवेड्यांइतके खरे भाविक कोणी नाहींत. ग्रीक आणि रोमन रियासतींतील गुलामांस ख्रिस्ती धर्म इतका मानवला ह्याचें कारण हेंच कीं ह्या धर्माच्या उपदेशांत समतेच्या तत्त्वाचा प्रमुखपणें उल्लेख होत असे. त्यामुळें त्या बिचाऱ्यांची साहजिकच अशी कल्पना झाली कीं सर्व जग ख्रिस्ती झालें, तर त्यामुळें सर्वत्र समता उत्पन्न होऊन गुलामगिरीचें समूळ उच्चाटन होईल. आपण एकदा गुलामगिरींतून सुटलों म्हणजे यथेच्छ खाऊन पिऊन आनंद करूं, अशी त्या बिचाऱ्यांस आशा उत्पन्न होऊन ख्रिस्ताच्या निशाणाभोवतीं ते जमा झाले. ज्यांनीं ह्या तत्त्वाचा उपदेश केला ते उपदेशक धर्मवेडे असले तरी खरोखर फार भाविक होते. परमेश्वर ह्या जगावर राज्य करण्यास येईल, ही कल्पना खरी मानण्याइतका भोळा आणि भाविक माणूस सध्याच्या काळीं फारसा आढळावयाचा नाहीं. ह्यामुळें पूर्वकालींच्या ह्या समतेच्या तत्त्वाचें थोडेंसें रूपांतर झालें आहे. ह्या रूपांतराचे समानार्थक असे स्वातंत्र्य आणि बंधुभाव हे शब्द आतां जिकडे तिकडे ऐकूं येतात. व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, इत्यादि प्रकारचीं अनेक स्वातंत्र्यें मिळालीं व परमेश्वर सर्व मनुष्यांचा पिता ही कल्पना एकसमयावच्छेदेंकरून सर्वांस पटली म्हणजे सर्वत्र समता उत्पन्न होऊन जग सुखी होईल, असा घोष सध्या ऐकूं येतो. परंतु हाही दुसऱ्या प्रकारचा वेडेपणाच आहे. पूर्वींचें धर्मवेड जाऊन त्या जागीं हें नवें वेड आलें इतकेंच. खरी समता ह्या पृथ्वीवर पूर्वीं केव्हांही नव्हती, सध्या नाहीं आणि पुढेंही कधीं होणार नाहीं. सर्वांची स्थिति एकसारखी असणें ही गोष्ट शक्य कोटींतील तरी आहे काय? राजा आणि रंक ह्यांस जेथें एकसारखाच मान मिळतो असें ठिकाण ह्या पृथ्वीवर एकच आहे. तें ठिकाण कोणतें म्हणाल तर स्मशान! सर्वत्र समता उत्पन्न करण्याकरितां सर्व जगाचें स्मशानभूमींत

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३३६५५... दि: १९६९-

रूपांतर करावें लागेल ! जग ज्या स्वरूपानें आपणांस भासत आहे तें रूप त्यास कां प्राप्त झालें, ह्याचा प्रथम विचार केला पाहिजे. सृष्टिमालिकांपैकीं आपल्या ह्या एका सृष्टीचा आपण विचार केला, तर अगदीं आरंभीं म्हणजे प्रलयकालीं जगाचें रूप सध्या आहे तसें नव्हतें असें आपणांस दिसून येईल. त्या वेळीं सर्व तत्त्वें एका महत् तत्त्वांत लीन होतीं व जगाला दृश्य स्वरूप नव्हतें. अग्नि जसा गारगोटीच्या पोटीं लीनावस्थेंत असतां अदृश्य असतो, त्याप्रमाणें जगाची अवस्था होती. ज्या त्रिगुणांच्या साहाय्यानें हें जग दृश्य स्थितीस आलें आहे, ते तीन गुण म्हणजे सत्त्व, रज आणि तम हे समसमान स्थितींत होते. ह्यांची जी समावस्था ती जगाची लीन, अथवा अदृश्य स्थिति होय. जेव्हां ह्या समावस्थेचा भंग होतो, जेव्हां ह्या त्रिगुणांत असमान स्थिति उत्पन्न होते, तेव्हां जग दृश्य होतें. म्हणजे जग दृश्य होण्याकरितां ह्या गुणांत असमानावस्था उत्पन्न व्हावी लागते असें सिद्ध होतें. ह्या गुणत्रयांत चढाओढ आणि अहमहमिका सुरू झाली म्हणजेच जग दृश्य होतें. चढाओढीबरोबर कमीअधिकपणा अवश्य येणारच. ज्या अणुरेणूंचें हें जग बनलें आहे त्या अणुरेणूंतील चळवळ बंद होऊन त्याची समावस्था झाली तर काय होईल ? अशा वेळीं त्यांतून कशाचीही उत्पत्ति होणें शक्य नाहीं. आपल्या भौतिकशास्त्रांनीं ही गोष्ट प्रत्यक्ष सिद्ध केली आहे. एखाद्या भांड्यांत शांत असलेलें पाणी आपण हातानें ढवळलें तर त्या पाण्यांतील प्रत्येक बिंदु आपली पूर्वींची समता प्राप्त करून घेण्यासाठीं धडपड करतो. सर्व बिंदु एकमेकांच्या आश्रयानें पूर्वस्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं धडपड करीत असतात. त्याचप्रमाणें ह्या विश्वांतील यच्चयावत् पदार्थ आपल्या पूर्वींच्या समानावस्थेस जाण्याकरितां धडपडत आहेत. अशी समानावस्थां प्राप्त होते न होते तोंच पुन्हा एखादा आघात होऊन तो समानावस्थेचा बिघाड करतो व जग पुन्हा दृश्यावस्थेस येतें. ह्यावरून असमानावस्था हेंच जगाच्या दृश्य स्वरूपाचें आदिकारण आहे असें सिद्ध होतें; तसेंच जग दृश्य स्वरूपास येण्याकरितां आघाताची

जशी जरूर आहे, त्याचप्रमाणें त्याकरितां समावस्थेस जाऊं पाहाणाऱ्या गुणांचीही आवश्यकता आहे.

ह्यावरून गुणत्रयाची सर्वत्र समता उत्पन्न झाल्याशिवाय जगांत समानता उत्पन्न होणें ही गोष्ट अगदीं अशक्य कोटींतली आहे, हें सिद्ध झालें. गुणत्रयाची समावस्था सर्वत्र आणि एकाच कालीं उत्पन्न होईल ही गोष्ट शक्य नाहीं. गुणत्रयाची समावस्था उत्पन्न होऊं लागली, तर त्या वेळीं जगांत सध्या असलेले सर्व पदार्थ निराळ्या स्थितींत जाऊं लागतील. ज्या दोन वायूंचें पाणी बनलें आहे, त्यांतील गडबड बंद झाली म्हणजे पाण्याचें अस्तित्व नाहींसें होईल. अशा रीतीनें पदार्थमात्राचें रूपांतर होऊं लागलें म्हणजे आपणा मनुष्यांस जीव धारण करणें शक्य आहे काय ? म्हणजे ज्या कालीं पदार्थमात्रांत समता उत्पन्न होईल, त्याच क्षणीं हें जग आपणांस राहावयास अयोग्य होऊन जग म्हणजे एक मोठी स्मशानभूमि होऊन राहील ! स्मशानांत मात्र खरी समता असते, हें आपण नित्य पाहात आहोंच ! ह्या एकंदर विवेचनावरून सर्वत्र समता आणि बंधुभाव उत्पन्न करण्याचे आपले प्रयत्न किती बालिशतेचे आहेत, हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. हे प्रयत्न केवळ बालिशतेचे आहेत एवढेंच नव्हे, तर ते फलद्रूप करण्याच्या प्रयत्नांत आपणांस यश आलेंच तर त्याच दिवशीं प्रलयकाल सुरू होईल ! मनुष्यामनुष्यांत जो फरक आढळतो त्याचें कारण काय ? दोन मनुष्यांच्या मेंदूंत जो फरक असतो तोच पुढील अवस्थेंत असमता उत्पन्न करतो, असें म्हणणें वावगें होणार नाहीं. एकाच दिवशीं जन्मलेलीं चार मुलें आपण पाहिलीं तरी त्यांच्या मेंदूंत फरक असतोच, असें शास्त्रज्ञ आपणांस सांगतात. सर्व मनुष्यांचे मेंदु सारख्याच शक्तीचे असतात, असें निव्वळ वेड्यावांचून सध्याच्या काळीं तरी कोणी म्हणणार नाहीं. आपण ज्या शस्त्रास्त्रांनीं सिद्ध होऊन ह्या जगांत अवतरतों त्या शस्त्रास्त्रांत आरंभींच फरक असतो. हा फरक गर्भावस्थेंतच उत्पन्न झालेला असतो. गर्भावस्थेंतून बाहेर येऊन आपण

जगांत वावरूं लागलों म्हणजे बुद्धीच्या कमीअधिकपणास दृश्य स्वरूप येऊं लागतें. बुद्धीचा कमीअधिकपणा नाहींसा करणें शक्य आहे काय ? तुमच्या ह्या देशांत ( अमेरिकेंत ) मूळचे लोक – ज्यांना तुम्ही इंडियन लोक म्हणतां – हजारों वर्षें राहात होते. त्यानंतर तुमचे मूठभर पूर्वज येथें आले. त्या वेळची स्थिति पाहिलेला एखादा मनुष्य सध्या येथें आला, तर त्या वेळच्या आणि सध्याच्या स्थितींत त्यास जमीनअस्मानाचें अंतर दिसून येईल. पूर्वींचा देश तो हाच, ही गोष्ट त्यास खरीही वाटणार नाहीं. अमेरिकन इंडियन लोकांनीं हजारों वर्षें ह्या देशांत राहून एखादें तरी शहर वसविलें होतें काय ? एखादा कारखाना तरी त्यांनीं उभारला काय ? त्यांनीं असें कां केलें नाहीं ? जन्मतः सर्वांच्या बुद्धीचें प्रमाण जर एकसारखें आहे, तर तुमच्या मूठभर पूर्वजांनीं जी गोष्ट थोड्याशा अवधींत करून दाखविली, तीच हजारों वर्षें वस्ती करून राहिलेल्या हजारों इंडियनांस कां करतां आली नाहीं बरें ? तुमच्या पूर्वजांबरोबर ह्या भूमींत आलेली बुद्धिमत्ता निराळ्या प्रकारची होती. त्यांचे निराळे पूर्वसंस्कार त्यांजबरोबर आले होते व येथें अनुकूल भूमि सापडतांच त्या संस्कारांस दृश्य स्वरूप येऊन झोपड्यांचीं इंद्रभुवनें आणि वनांचीं उपवनें बनलीं. सर्वत्र समावस्था म्हणजे मृत्यूचें साम्राज्यच होय ! जोंपर्यंत जग आहे तसेंच चालेल, तोंपर्यंत त्यांतील विषमावस्था कधींही नाहींशी होणार नाहीं आणि सर्वत्र समता उत्पन्न करून जगाला सुखी करण्याचा आपला प्रयत्न प्रलयकालीं मात्र सिद्ध होईल ! प्रलयकालावांचून इतर कोणत्याही कालीं समावस्था शक्य नाहीं. असें आहे तरीसुद्धा ह्या कल्पनेनें प्रेरित असे महत्त्वाचे अनेक उद्योग सुरू आहेत, ही गोष्ट विसरतां कामा नये. जग दृश्य स्वरूपास येण्यास ज्याप्रमाणें असमतेची जरूर आहे, त्याचप्रमाणें ती असमता अधिक होऊं नये अशा प्रयत्नांचीही जगाच्या स्थितीस जरूर आहे. अशा मार्गांनीं प्रयत्न करून मनुष्य आपल्या मूळच्या सच्चिदानंदस्वरूपास परत जातो. आपल्या मूळच्या स्वरूपास

परत जाण्याची इच्छा न उद्भवती तरीसुद्धा जगाला दृश्य स्वरूप प्राप्त झालें नसतें. म्हणजे जग दृश्यस्वरूपास येण्यास व त्याची स्थिति कायम राहाण्यास, पूर्वस्वरूपास परत जाण्याची इच्छा आणि असमता ह्या दोहोंचीही सारखीच आवश्यकता आहे. ह्याकरितां जगाची स्थिति बदलण्याचा यत्न करणारे आणि ती स्थिति कायम ठेवूं पाहाणारे अशा दोन्ही प्रकारच्या मनुष्यांची जगास जरूर आहे. ह्या दोहोंपैकीं जी एक इच्छा अंतःकरणांत प्रबळ असते, तिला अनुरूप असा हेतु उत्पन्न होतो व त्या हेतूस अनुसरून मनुष्य कर्मास प्रवृत्त होतो. जगाला जोंपर्यंत अस्तित्व आहे, तोंपर्यंत हे दोन्ही प्रकार कायम राहाणारच व हे दोन्ही प्रकार कायम आहेत तोंपर्यंत जगाला अस्तित्व असणार; असा हा परस्परावलंबी संबंध आहे.

ह्या प्रचंड संसारचक्राच्या पोटांत इतर अनेक चक्रांची इतकी भयंकर गुंतागुंत आहे कीं, आपला हात त्यांत कोठेंही एक वेळ गुंतला कीं हीं चक्रें आपणांस आंत ओढून शुष्क करून टाकण्यास चुकत नाहींत. आपण एखाद्या कर्मास प्रवृत्त झालों, म्हणजे तें कर्म संपल्याबरोबर आपणांस विश्रांति मिळेल अशी आपली अपेक्षा असते. परंतु आपल्या हातचें कर्म अर्धवट झालें न झालें तोंच आपल्या पाठीशीं दुसरें कर्म दत्त म्हणून उभें राहातें. आज आपण सर्वजण ह्या प्रचंड चक्राच्या सपाट्यांत सापडलों आहों. ह्यांतून सुटण्यास आपणांस दोनच मार्ग आहेत. पहिला मार्ग असा आहे कीं ह्या चक्राशीं आपला कांहीं संबंधच येऊं द्यावयाचा नाहीं. म्हणजे सर्व वासनांचा त्याग एका क्षणींच करावयाचा. सांगतांना हें फार सोपें वाटतें, पण करणें मात्र जवळ जवळ अशक्य आहे. कोट्यवधि मनुष्यांत असा एखादा असला तर असेल. दुसरा मार्ग हा कीं ह्या चक्रांच्या भेसूर स्वरूपाला न भितां एकदम त्यांत उडी घालावयाची व तीं कशीं फिरतात, कशाच्या जोरावर फिरतात आणि मधूनच त्यांतून निसटण्यास कोठें रस्ते आहेत कीं काय, इत्यादि रहस्याचा शोध करावयाचा. हें रहस्य

सापडलें कीं चक्राचें धनीपण आपणांस प्राप्त होतें. हेंच रहस्य आपल्या स्वाधीन करणें, हा कर्मयोगाचा उद्देश आहे. ह्या चक्रव्यूहाला भिऊन पळून जाऊं नका. पळून जाऊन रक्षण होणें शक्य नाहीं. तर मग निधड्या छातीनें एकदम आंत शिरून बालेकिल्ला हस्तगत करा, म्हणजे तुमचें काम झालें. ह्या कामास फार चातुर्यानें हात घातला पाहिजे. आंत शिरून योग्य मार्गानें तुम्ही गेलांत, तर सुरक्षितपणें बाहेर पडण्याचा मार्गही तुम्हांस आपोआप दिसेल.

कर्म म्हणजे काय ह्याचा विचार आपण पूर्वीं एक वेळ केलाच आहे. जगाचें अस्तित्वच कर्मावर अवलंबून आहे, हेंही आपणांस समजून आलें आहे. तसेंच जगाला सुखी करूं पाहाणें हें मूर्खपणाचें व सर्वथैव अशक्य आहे, हेंही आपणांस कळून आलें आहे. अंतःकरणापासून ईश्वराच्या अस्तित्वावर ज्यांचा खरा विश्वासही असतो त्यांस हें लवकर पटतें. आपल्या मदतीची अपेक्षा करण्याइतका परमेश्वर लंगडालुळा नाहीं, ही गोष्ट ते केव्हांही विसरत नाहींत. जग जसें चाललें आहे तसें चालणारच. आपलें काम मुक्ति मिळविण्याचें आहे आणि अत्यंत निःस्वार्थी होणें हा मुक्तीचा मार्ग आहे. कर्म करीत असतांच निःस्वार्थी होणें आणि निःस्वार्थी होऊन मुक्ति मिळविणें ह्यालाच कर्मयोग म्हणतात. जगाला सुखी करण्याची ही कल्पना धर्मवेड्या लोकांना कार्यरत ठेवण्यास उपयोगी पडते ही गोष्ट खरी, पण धर्मवेडापासून जसें कांहीं चांगलें कार्य होतें, तसेंच अनेक अहितकर भावना त्यापासून निर्माण होतात, ही गोष्टही खरी आहे. आपण मुक्त व्हावें अशी जी लालसा प्रत्येक वस्तूंत आढळते, तिला अनुसरून वस्तुमात्र प्रयत्न करीतच असतो. ही इच्छा इतकी बलवती आहे कीं ती तुम्हांस स्वस्थ बसूं देणारच नाहीं. मग कर्मास प्रवृत्त करण्यास बाहेरील एखाद्या शक्तीची अपेक्षा कां असावी, असा आपणांस कर्मयोगाचा प्रश्न आहे. 'मी अमूक करीन आणि त्याचें तमूक फळ भोगीन' इत्यादि लौकिक विचार झुगारून देऊन फलासक्ति न ठेवतां कर्म करा. सतत

अभ्यासानें हें सर्व साध्य होण्याजोगें आहे, असें कर्मयोगाचें सांगणें आहे. स्वतःच्या इंद्रियजन्य सुखार्थ कर्म करावयाचें नाहीं, अशा भावनेनें कर्म करण्याचा अभ्यास सुरू केला, म्हणजे स्वार्थाचा समूळ लोप होऊन, परार्थ हाच कर्त्याच्या जीविताचा एक घटक होऊन बसतो. आपल्या हातून परार्थ न घडेल तर जगणेंही योग्य नाहीं, इतकी उत्कट भावना त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होऊं लागते. असें जर आहे तर कार्यरत राहाण्यास चालकशक्ति बाहेरून येण्याची अपेक्षा कां करावी ? अमूक कार्य चांगलें आहे असें आपणांस वाटलें तर तें करण्यास आपली सदोदित तयारी असली पाहिजे. त्यांत स्वतःच्या सुखाची अपेक्षा मुळींच असतां कामा नये. इहलौकिक सुखाची अपेक्षा तर राहोच, परंतु स्वर्गसुखाच्या अपेक्षेनें केलेलें सत्कर्मसुद्धा आत्म्यास बद्धक होतें. स्वार्थाची यत्किंचितही छटा शिल्लक असेपर्यंत केलेलें प्रत्येक कर्म मुक्तिपथापासून आपणांस दूर ठेवतें, एवढेंच नव्हे, तर आपणाभोवतीं अगोदरच असलेल्या शृंखलेंत त्या कर्माच्या योगानें आणखी एका दुव्याची भर पडते.

ह्यासाठीं कर्मयोगाचें त्रिवार सांगणें हेंच आहे कीं प्रत्येकानें कर्म करीत असतां फलाची आसक्ति ठेवूं नये. जग हें आमच्यासाठीं उत्पन्न झालें नाहीं, अथवा आम्हीही जगासाठीं उत्पन्न झालों नाहीं. कोणी कोणाचें बरें अगर वाईट करूं शकत नाहीं. तसेंच बाह्य शरीरावरून दिसून येतें तें आमचें स्वरूप नव्हे. अनेक कर्मे करून फळें भोगतांना जरी आम्ही दिसलों, तरी तें आमचें खरें स्वरूप – मूळरूप – नाहीं. आमचें खरें रूप म्हणजे सच्चिदानंदरूप हेंच आहे. आम्ही कर्म करतांना आढळलों, तरी वस्तुतः आम्ही कांहींच करीत नाहीं. असें आहे तर आम्हीं सध्यांचा बंदिवास कां भोगावा ? ह्या बंदिवासांतून मुक्त होण्याचा राजमार्ग एकच आहे. अत्यंत अनासक्त चित्तानें केलेलें प्रत्येक कर्म आमच्या पायांतील शृंखलेचा एक एक दुवा तोडीत असतें. चित्त अनासक्त असतां त्यांतून एखादाही शुभ विचार निघून जगांत संचार करूं लागला, तर त्या विचारालाही असला एखादा दुवा तोडण्याचें सामर्थ्य येतें व अशा रीतीनें

शुद्धीकरणाची क्रिया पूर्ण होऊन आम्ही अत्यंत पवित्र बनतों. आतांपर्यंत केलेलें सर्व विवेचन इतकें उघड असतांही निव्वळ वेड्याची बडबड आहे, असें समजणारे वेडेपीर अस्तित्वांत आहेत. कर्मयोग हा निव्वळ बोलण्याचा विषय असून तो कृतींत येणें अशक्य आहे, असें म्हणणारे अनेक लोक माझ्या पाहाण्यांत आले आहेत. कांहीं तरी हेतु असल्याशिवाय मनुष्याच्या हातून कोणतेंही कर्म घडणें शक्य नाहीं व ह्यासाठीं गीताप्रतिपादित मार्ग दिसण्यास चांगला दिसला, तरी तो सर्वथा अव्यवहार्य आहे, असें म्हणणारे अनेक लोक मला भेटले. परंतु ह्यांतील तात्पर्य इतकेंच कीं अनासक्त चित्तानें कर्में करणारे कर्मयोगी त्यांच्या पाहाण्यांत आले नसल्यानें ते असें बोलतात. केवळ परोपकारार्थ कर्म करणें ही गोष्ट धर्मवेड्यासच शक्य आहे, असें त्यांस वाटतें.

कर्मयोगानें दाखविलेला मार्ग पूर्ण व्यवहार्य आहे, ही गोष्ट भगवान् बुद्धानें तो मार्ग स्वतः पूर्णपणें आचरून प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविली आहे. कर्मयोगाचा आचार प्रत्यक्ष करून दाखविणारा असा हा एकच महात्मा ह्या भूतलावर झाला. जगांत आजपर्यंत जितके धर्मप्रवर्तक झाले त्यांच्या चरित्रांत कोणता ना कोणता तरी हेतु प्रधान होता. अगदीं अहेतुक असें चरित्र एकट्या बुद्धाचेंच आहे. बुद्धाखेरीज जितके धर्मप्रवर्तक होऊन गेले, त्यांत मुख्यतः दोन प्रकार आढळतात. आपण प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार आहों असें कांहीं प्रवर्तक म्हणत, हा एक प्रकार आणि आपण परमेश्वराचे केवळ दूत असून त्याचा संदेश मनुष्यजातीस पोचवावयाचा हें आपलें काम आहे, असें म्हणणारे प्रवर्तक हे दुसऱ्या प्रकारचे होत. ह्या प्रकारचे प्रवर्तक कितीही उच्च दर्जाचे असले व त्यांची धर्मबुद्धि कितीही श्रेष्ठ असली, तरी त्यांचीं कर्में अगदीं अनासक्त चित्तानें केलेलीं होतीं असें म्हणवत नाहीं. कसल्या तरी प्रतिफलाची अपेक्षा त्यांस होतीच. एका वादविवादाच्या प्रसंगीं भगवान् बुद्ध म्हणाला, "ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल अथवा आत्म्याच्या स्वरूपाविषयीं तुमच्या अनेक प्रकारच्या उपपत्ति

ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. परमेश्वर असला अथवा नसला तरी त्यामुळें माझ्या दानतीवर बरावाईट परिणाम काय होणार आहे ? असलें कोंडा-कांडप करून कालक्षेप करण्यापेक्षां सन्मार्गवर्ति होण्यांत गेलेला वेळ सत्कार्यीं तरी लागेल. स्वतःच्या सुखाची यत्किंचितही पर्वा न करतां परोपकारार्थ कर्म करा, म्हणजे सत्य म्हणून जें काय असेल, त्याची तुम्हांस प्रत्यक्ष भेट होऊन तुम्ही मुक्त व्हाल." त्याच्या एकंदर जीवितयात्रेंत स्वतःच्या सुखाबद्दलचा विचार त्यास शिवलासुद्धा नाहीं. त्याचें चित्त इतकें अहेतुक असतांही त्यानें केलेल्या कार्याचा शतांशही इतर कोणीं करून दाखविल्याचें आढळत नाहीं. जगाच्या इतिहासांत इतक्या अनासक्त चित्तानें एवढा मोठा कार्यभाग केल्याचें दुसरें एकही उदाहरण आपणांस सापडणार नाहीं. पृथ्वीवर मनुष्यजात अस्तित्वांत आल्यापासून "अनामिका सार्थवती' करणारें असें हें एकच नररत्न आजपर्यंत उदयास आलें. केवळ परार्थचिंतन, निस्सीम त्याग आणि अत्यंत निरपेक्ष बुद्धि ह्यांचा मनोहर संयोग इतर कोठेंही तुम्हांस आढळणार नाहीं. अत्यंत उच्च प्रतीचें तत्त्वज्ञान सांगत असतां नीचतम प्राण्याबद्दलही अत्यंत कळकळ त्याच्या अंतःकरणांत वास करीत होती. 'मी' आणि 'माझें' ह्या शब्दांचे अर्थही तो विसरला होता. कर्मयोगाचा शुद्ध आदर्श पाहावयाचा असेल तर तुम्ही बुद्धाकडे पाहा. अहंकाराची छटासुद्धा त्याच्या हृदयांत नव्हती. बुद्धि आणि अंतःकरण ह्या दोहोंचीही परिपक्व दशा एकत्र कोठें पाहाणें असेल तर बुद्धावांचून ती दुसऱ्या कोठेंही सापडणार नाहीं. जीवात्म्याचें ह्याहून अधिक उज्ज्वल असें रूप दुसऱ्या कोठेंही सापडणार नाहीं. मनुष्यजात सन्मार्गवर्ती व्हावी एवढ्याचसाठीं खटपट करणारा असा हा पहिला महात्मा होय. एके वळीं तो आपल्या शिष्यांस म्हणाला, "अमूक गोष्ट अमक्या जुन्या ग्रथांत सांगितली आहे, एवढ्यावरूनच ती सत्य म्हणून गृहीत धरूं नका. तुमचे आप्तेष्ट अमूक गोष्ट खरी मानतात, एवढ्यावरूनच ती तुम्ही खरी मानूं नका. लहानपणापासून वडिलांनीं अमूक गोष्ट सांगितली, एवढ्यावरूनच

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्र
अनुक्रम ३३५५५ दि: १।०।६१

तुम्ही ती खरी मानूं नका. जें जें तुम्ही ऐकाल तें तें सर्व आपल्या बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहा. जर तें उत्तम ठरलें तर तें खरें माना, त्याचा प्रत्यक्ष आचार करा, इतरांस तें सांगा आणि तसें करण्यास इतरांस मदत करा!" "जुनें तें सोनें' असें म्हणण्याची साऱ्या जगाची प्रवृत्ति असतां त्या प्रवृत्तीविरुद्ध उघडपणें उपदेश करणारा वीर किती निधड्या छातीचा असला पाहिजे, ह्याचा तुम्हीच विचार करा. 'केवळ मोठ्या नांवावर भुलूं नका' असा उपदेश उघडपणें करणारा महात्मा आजपर्यंत दुसरा कोणीही झाला नाहीं. अत्यंत अनासक्त चित्तानें कर्म करून बुद्धाची पदवी मिळविणें तुम्हांसही अशक्य नाहीं. साऱ्या जगाला नवें वळण लावण्याचें सामर्थ्य तुम्हांसही प्राप्त करून घेतां येण्याजोगें आहे. हें तुम्हांस साधलें तर कर्मयोगाचे आदर्श असे तुम्ही व्हाल. 'नर करणी करे तो नरका नारायण हो' असें सत्पुरुषांनीं [illegible] आहे.

REFBK-0012330

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
१२३३०

अनुक्रम 33554 वि: १०/६/६२
क्रमांक १५७४ नों दि: १६-१०-६२